# मेहता मराठी ग्रंथजगत

। दीपावली २०१५ ।

(ऑक्टोबर-नोव्हेंबर २०१५ जोड अंक)





# मेहता मराठी ग्रंथजगत


॥ दीपावली २०१५ ॥

११ ऑक्टोबर २०१५ (वर्ष पंधरावे)
अंक दहा-अकरा
किंमत १०० रु.

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

विशेष साहाय्य
**योजना यादव**

आतील रेखाचित्रे व मांडणी
**चंद्रमोहन कुलकर्णी**

मुखपृष्ठ व मांडणी साहाय्य
**यशोधन लोवलेकर**

तीन वर्षांची वर्गणी ३५० रु.
पाच वर्षांची वर्गणी ५०० रु.

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता
१९४१, सदाशिव पेठ,
बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर,
माडीवाले कॉलनी,
पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४,
२४४७५४६२
**Email:**
mmgj@mehtapublishinghouse.com,
customercare@mehtapublishinghouse.com
**Website:**
www.mehtapublishinghouse.com



या अंकातील लेखांतील मते त्या त्या लेखकाची असून
संपादक त्यांच्याशी सहमत असतीलच असे नाही.

# ।। अंतरंग ।।

**संपादकीय** / ६

**फक्त प्रौढांसाठी**
माणिक मुंढे / १७

**काही फुलपाखरांच्या 'गोची'विषयी**
सोनाली नवांगुळ / २४

**लैंगिकतेची मृत्युलालसा**
संजीव खांडेकर / २९

**सोशल मीडियावरील ती भाषा!**
अविनाश वीर / ३५

**देहधून टिपणारी कविता**
उत्पल व. बा. / ३९

**सेक्स वर्कर** / ४६

**दिखा दिखाके छुपाना.. छुपा छुपाके दिखाना... फॅन्टसी बाईची...**
योजना यादव / ५१

**अनावृत कला आणि चित्रांमधली सेक्श्युअल फॅन्टसी**
जुई कुलकर्णी / ५५



**दांभिकता आणि दुटप्पी : लैंगिकता आणि चित्रपट**
डॉ. अनमोल कोठाडिया / ६१

**साकडं**
प्रा. डॉ. आनंद पाटील / ६५

**गुरुत्वाकर्षणाचे अध्यात्म**
राहुल बनसोडे / ७३

**द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स** / ९९

**फॅन्टसी शृंगारातली**
गीतांजली गोंधळे / १०५

**रंगारंग पॉलिटिक्स**
प्रा. श्रीरंजन आवटे / १०९

**धाडसानं लिहिणाऱ्या बाया**
गौरी कुलकर्णी-फाटक / ११३

**आदिवासींच्या कला-साहित्यातील फॅन्टसीज**
प्रमोद मुनघाटे / ११९

**उघडले नरकाचे दार**
अनंत मनोहर / १२३

**फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे** / १२८



## ।। संपादकीय ।।

# फॅन्टसी आणि अनुवाद

पुस्तकं शब्दांच्या अद्भुत ताकदीतून प्रतिसृष्टी निर्माण करतात. परकायाप्रवेशाची अनुभूती देतात. विश्वाचं आकलन समृद्ध करतात. मानवी जगण्याला नवा आयाम देणाऱ्या पुस्तकांच्या या विश्वात पाऊल ठेवून 'मेहता पब्लिशिंग हाऊस'नं आपल्या परीनं योगदान दिलं. आपल्या मातीतल्या अनेक सर्जनशील लोकांना लिहितं केलंच, शिवाय सातासमुद्रापारच्या दिग्गज सर्जनांची मराठी वाचकांना ओळख घडवली. अनुवादाच्या चळवळीतून भाषेच्या सीमा संपवून टाकल्या. वाचनाचा अनुभव चतुरस्त्र करण्यास प्राधान्य दिले. नानाविध देश, तिथलं सांस्कृतिक, सामाजिक वातावरण, राजकारण, जीवनशैली, आहार-विहार, शारीरिक संबंध, युद्ध, साहस, अशा बहुरंगी विषयांची मांडणी त्यामुळे शक्य झाली. इंटरनेटमुळे आज सारं विश्व हाकेच्या अंतरावर आलं आहे; पण या विश्वाला मराठी मातीत रुजवण्याचे प्रयत्न आम्ही कित्येक वर्षांपासून करीत आहोत. या प्रयत्नांना कालानुरूप नवे आयाम जोडले जातात. विभिन्न स्तरांतील वाचकांची आवड आणि समाजभान यांचा मिलाफ घडवत नवा साहित्याविष्कार सादर करण्याचा आमचा प्रयत्न आहे. यंदाचा दिवाळी अंकाचा बौद्धिक खुराकही याच प्रयत्नांचा आविष्कार.

एकाच वेळी अनेक पिढ्यांचं सहअस्तित्व समाज अनुभवतो. या पिढ्यांचं जगणं, दृष्टिकोन, प्राथमिकता...सारं भिन्न. त्यांची विचारशैली आणि त्याचं प्रकटीकरणही भिन्न. सृष्टीचा आधारस्तंभ असणारी लैंगिकता या मतभिन्नतेची सर्वांत मोठी शिकार. खुलेपणाचा अभाव आणि या चर्चांशी जोडली गेलेली अपराधी भावना लैंगिकतेला फॅन्टसीच्या मखरात सजवू लागते. कोणतही क्षेत्रं या फॅन्टसीच्या स्पर्शाला पोरकं राहत नाही. चौसष्ठ कला असोत वा त्याचं व्यावसायिकीकरण-सेक्शुअल फॅन्टसी प्रत्येक घटकाशी जोडली गेलेली आहे. नव्या पिढीचा या फॅन्टसीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत्या विचारप्रवाहांची ग्वाही देतो. या विचारप्रवाहांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न आम्ही या दिवाळी अंकात करत आहोत.

समाजाला दिशा देण्याचं (किंवा बिघडवण्याचंही) काम प्रसारमाध्यमं करतात. माध्यमांवर नजर टाकली की समाजमन ओळखणं कठीण नाही. टीआरपीच्या स्पर्धेला नाकं मुरडताना त्या स्पर्धेतून उगम पावणारा आविष्कार समाजाचा आरसा आहे, हे विसरता कामा नये. त्यामुळे आजच्या माध्यमांमध्ये सेकंदासेकंदाला डोकावणारी सेक्शुअल फॅन्टसीही नजरेआड करण्याजोगी नाही. या फॅन्टसीला तथाकथित नैतिक चौकटींच्या तराजूत न तोलता माध्यमांची भूमिका मांडण्याचा प्रयत्न माणिक मुंढे यांनी 'फक्त प्रौढांसाठी' या लेखात केला आहे. तर संजीव खांडेकर यांचा लेख मानवी उत्क्रांतीच्या प्रदीर्घ टप्प्यातला लैंगिकतेचा प्रवास स्पष्ट करतो. एक चित्र हजार शब्दांचं काम करतात, म्हंटलं जातं. चित्रकलेच्या माध्यमात तर लैंगिक अविष्कारांचे नाना रंग पाहायला मिळतात. या रंगांचे अन्वयार्थ जुई कुलकर्णी यांनी स्पष्ट केले

आहेत. आदिवासी कला-साहित्य तर नागरी कलाजाणिवांनाही चपराक देणारे. या कला-साहित्याला लैंगिकतेचं वावडं नाही. उलट मोकळ्या चर्चांचं खुलं दालन इथं पाहायला मिळतं. अशा कलाविश्वाची भेट प्रमोद मुनघाटे यांचा लेख घडवतो. सिल्व्हर ज्वेलरी डिझायनर गीतांजली गोंधळे लैंगिकतेतलं शृगांराचं महत्त्व अधोरेखित करतात; तर मराठीत लैंगिकतेवर धाडसानं लिहिणाऱ्या लेखिकांच्या लिखाणाचा आढावा गौरी कुलकर्णी यांनी घेतला आहे. लैंगिक जाणिवांना गोंजारणारं सर्वांत मोठं माध्यम म्हणजे सिनेमा. काही सिनेमे पारंपरिक चौकटींच्या धाकानं दांभिक आणि दुटप्पी भूमिका मांडतात. तर काही प्रायोगिक सिनेमे लैंगिक आविष्काराची मनमोकळी मांडणी करतात. सिनेसमीक्षक अनमोल कोठाडिया आमच्या अंकात अशा सिनेमांविषयी चिंतन करीत आहेत.

लैंगिकतेचा विषय निघाला की तथाकथित सौंदर्यदृष्टी जागी होते. शरीराची ठेवण आणि वर्ण असल्या बुरसटलेल्या निकषांपाशी सारी विचारधारा थांबते. या तथाकथित लैंगिक दृष्टिकोनाची बुरसट मानसिकता वाचकांसमोर आणण्याचा प्रयत्न आमची मैत्रीण सोनाली नवांगुळ हिनं केला आहे. लैंगिकतेचं निव्वळ ऑब्जेक्ट म्हणून पाहिली जाणारी स्त्री या फॅन्टसीकडे कसं पाहते हे योजना यादव यांनी मांडलं आहे. साहित्यविश्वात आणि प्रामुख्यानं आजच्या कवींचा लैंगिकतेकडे पाहण्याचा दृष्टिकोन उत्पल यांनी शब्दांत पकडला आहे, तर राजकारणातल्या फॅन्टसीला श्रीरंजन आवटेंनी शब्दबद्ध केलं आहे. लैंगिक चर्चांना व्यासपीठ देणाऱ्या सोशल मीडियाचं महत्त्वही कमी नाही. अविनाश वीर यांनी या मीडियावरच्या फॅन्टसीला वाचकांसमोर मांडलं आहे. आमचा अंक बौद्धिक साहित्यिक मेजवानीसोबत निखळ कलाविष्काराची अनुभूतीही देईल. राहुल बनसोडे, आनंद पाटील, अनंत मनोहर यांचं लिखाण आपल्याला ही अनुभूती देईल, यात शंका नाही.

लैंगिक फॅन्टसीबद्दल बरीच साधकबाधक चर्चा होऊ शकते; त्यात प्रत्येक माध्यमाचं अंगभूत वैशिष्ट्य असतंच. दोन वा अधिक माध्यमांच्या संपर्कानं, साहचर्यानं रसिकांच्या अधिक जवळ जाता येतं.

'मेहता मराठी ग्रंथजगत'नं गेल्या वर्षी दिवाळी अंकात माध्यमान्तरावरील वेगवेगळे मतप्रवाह आणि प्रयोग यांचा आढावा घेतला होता. या अंकात रोमॅन्टिक, सेक्शुअल फॅन्टसीचा मागोवा घेण्यात आला आहे. काव्य, कथा, कादंबरी, चित्र, शिल्प, सिनेमा, अशा कलामाध्यमांमधून आढळणारी फॅन्टसी या निमित्तानं वाचकांच्या भेटीस येत आहे. वाचक त्याचं स्वागत करतील, अशी आशा आहे.

ही दीपावली आणि नूतन वर्ष
आपणां सर्वांना सुखसमृद्धीचे जावो ही कामना!



# ।। पुरस्कार ।।




रोटरी क्लब ऑफ पूना मिडटाऊन इंटरनॅशनल
यांच्याकडून स्थानिक पातळीवर
कौतुकास्पद कामगिरी करणाऱ्यांना
'वेरा' (व्होकेशनल एक्सलन्स रेकग्निशन अ‍ॅवॉर्ड)
हा मानाचा पुरस्कार दिला जातो.
व्यावसायिक गुणवत्तेसाठी
वर्ष २०१५-१६ मध्ये हा पुरस्कार
मेहता पब्लिशिंग हाऊसचे कार्यकारी संचालक
श्री. सुनील मेहता यांना देण्यात आला.
वेकफील्ड ग्रुप ऑफ कंपनीजचे कार्यकारी संचालक
श्री. मुकेश मल्होत्रा यांच्या हस्ते
दिनांक ७ ऑक्टोबर २०१५ रोजी हा पुरस्कार
प्रदान करण्यात आला.

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएससी, एमपीएससी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

भवानी मंडपजवळ, कोल्हापूर
: (०२३१) २५४२९०१
स.९. ३० ते रा. ८.०० (शनिवार बंद)

Email: mehtabooksellers@gmail.com

मेहता पब्लिशिंग हाऊस व dailyhunt

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा
नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर - थेट तुमच्या कॉम्प्युटर,
आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

# ।। नवीन पुस्तके ।।

### अनुवादित कादंबरी

| | | | |
|---|---|---|---|
| **अतरापी** | ध्रुव भट्ट | अनु. सुषमा शाळिग्राम | १६० |
| **नो ऑर्डिनरी डे** | डेबोरा एलिस | अनु. तोषदा आलटकर | १५० |
| **मोरॅलिटी फॉर ब्यूटिफुल गर्ल्स** | अलेक्झांडर मॅक्काल स्मिथ | अनु. नीला चांदोरकर | २२० |
| **द सेव्हन्थ स्क्रोल** | विल्बर स्मिथ | अनु. बाळ भागवत | ५५० |
| **क्रिटिकल मास** | स्टीव्ह मार्टिनी | अनु. सुदर्शन आठवले | ४८० |

### कथासंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| **संदेह** | रत्नाकर मतकरी | | १७० |
| **काळोखाचे थेंब** | पी.एन. परांजपे | | १५० |
| **समीपा** | | अनु. सुषमा लेले | २२० |
| **तीन सांगातिणी** | रवीन्द्रनाथ टागोर | अनु. मृणालिनी गडकरी | १२० |

### अनुवादित सत्यकथा

| | | | |
|---|---|---|---|
| **वेदनेची फुले** | मारिआतू कामारा<br>सुझन मॅक्लेलँड | अनु. सुनंदा अमरापूरकर | २०० |
| **एका प्राणिसंग्रहालयाची गोष्ट** | थॉमस फ्रेंच | अनु. मयुरी गांधी | ३०० |
| **अविचल** | रिचर्ड एम. कोहेन | अनु. डॉ. वसू भारद्वाज | २९० |
| **निर्व्याज प्रेम** | ॲन नेमार्क | अनु. आनंद वैद्य | १४० |
| **असाध्य ते साध्य** | लुईस गॉर्डन पग | अनु. मोहन गोखले | ३९५ |
| **अनोळखी स्वर्गमंदिरात...** | सुझन जेन गिलमन | अनु. संजीवनी मुळे | ३०० |
| **मायकल जॅक्सन** | जे. रॅन्डी ताराबोरेली | अनु. रेश्मा कुलकर्णी | ७९५ |
| **अ नोट फ्रॉम इचियो** | रेई किमुरा | अनु. सुनीता कट्टी | २०० |

### अनुवादित अनुभवकथन

| | | | |
|---|---|---|---|
| **नावीन्याच्या शोधात** | मार्शिया रेनॉल्ड्स | अनु. सुमिता बोरसे | २४० |
| **सफारी आफ्रिकेतली** | पीटर ॲलिसन | अनु. मंदार गोडबोले | २४० |
| **क्षितिजापार...** | फराह अहमदी/तामिम अन्सारी | अनु. विनिता जोगळेकर | २०० |

### आत्मकथन

| | | | |
|---|---|---|---|
| **प्लेइंग इट माय वे** | सचिन तेंडुलकर | अनु. दीपक कुळकर्णी | ६४० |
| **मी मलाला** | मलाला युसूफजई | अनु. सुप्रिया वकील | २९५ |
| **गबाळ** | दादासाहेब मोरे | | २५० |

### चरित्रे / व्यक्तिचरित्रे

| | | | |
|---|---|---|---|
| **तेलसम्राट** | डॅनियल अमान | अनु. मोहन गोखले | ३५० |
| **टेक मी होम** | रश्मी बन्सल | अनु. सुनीति काणे | ३०० |

### माहितीपर

| | | | |
|---|---|---|---|
| **तिळा तिळा दार उघड!** | सायमन टी. बेली | अनु. प्रमोद शेजवलकर | २०० |











### मार्गदर्शनपर

| | | | |
|---|---|---|---|
| **प्रयत्ने धरू यशपंथ!** | रॉब युंग | अनु. सुजाता राऊत | २४० |
| **Be The Change- भ्रष्टाचाराशी लढा** | किरण बेदी | अनु. सुप्रिया वकील | १५० |
| **जिच्या हाती पाळण्याची दोरी..** | स्टेफनी हर्श/हॅना सेलिग्सन | अनु. सुनीति काणे | २८० |
| **कालाय नमः** | इव्हा हॉफमन | अनु. पुरुषोत्तम देशमुख | १६० |
| **लघुउद्योजकांचा मार्गदर्शक** | मायकेल जर्बर | अनु. शेखर जोशी | २६० |

### आरोग्यपर

| | | | |
|---|---|---|---|
| **संजीवनी उच्च तंत्रज्ञानाची** | डॉ. अनिल गांधी | | २५० |

### लेखसंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| **परदेशी** | रत्नाकर मतकरी | | १३० |

### व्यक्तिलेखसंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| **साहित्यशिल्पी :** | वि.स. खांडेकर<br>संपादन : डॉ.सुनीलकुमार लवटे | | १८० |
| **जीवनशिल्पी :** | वि.स. खांडेकर<br>संपादन : डॉ.सुनीलकुमार लवटे | | १४० |
| **समाजशिल्पी :** | वि.स. खांडेकर<br>संपादन : डॉ.सुनीलकुमार लवटे | | १२० |
| **समकालीन साहित्यिक** | डॉ.सुनीलकुमार लवटे | | २०० |

### व्यंगचित्रसंग्रह

| | | | |
|---|---|---|---|
| **कसं बोललात (भाग १ ते ७)** | आर.के. लक्ष्मण | अनु. अविनाश भोमे | ६६५ |

### ललित

| | | | |
|---|---|---|---|
| **स्वान्सीतील दिवस** | वीणा देव | | ३९५ |

### संशोधनात्मक

| | | | |
|---|---|---|---|
| **भारतीय गणिका** | डॉ. सुरेश देशपांडे | | २०० |

### वैचारिक

| | | | |
|---|---|---|---|
| **मृत्यूचं अमरत्व** | ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १८० |
| **मृत्यायुषी** | ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १९० |
| **नानक संसारी संन्यस्त** | ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५० |
| **नानक सूरसंगीत एक धून** | ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १३० |
| **नानक निरंकारी कवी** | ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १४० |
| **नानक परमात्म्याचा नाद ओम्कार** | ओशो | अनु. स्वाती चांदोरकर | १५० |


### कुमारसाहित्य


| | | | |
|---|---|---|---|
| **दोस्ती** | मधुमती शिंदे | | १२० |









# ।। आगामी ।।

| | | |
|---|---|---|
| **जॉर्जस् कॉस्मिक ट्रेझर हंट** | ल्यूसी । स्टीफन हॉकिंग | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **जॉर्जस् सिक्रेट की टू द युनिव्हर्स** | ल्यूसी । स्टीफन हॉकिंग | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **जॉर्ज अँड द बिग बँग** | ल्यूसी । स्टीफन हॉकिंग | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **माय लाईफ विथ द तालिबान** | अब्दुल सलाम झाईफ | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **कॉन्फिडन्स ट्रिक्स** | रॉस टेलर | श्याम भुर्के |
| **चिकन सूप फॉर मदर्स सोल २** | मार्क व्हिक्टर हॅनसन | उष:प्रभा पागे |
| **डेथ ऑफ अ गॉसिप** | एम.सी. बीटन | दीपक कुळकर्णी |
| **डेथ ऑफ अ कॅड** | एम.सी. बीटन | दीपक कुळकर्णी |
| **डेथ ऑफ ॲन आऊटसाइडर** | एम.सी. बीटन | दीपक कुळकर्णी |
| **डेथ ऑफ अ परफेक्ट वाईफ** | एम.सी. बीटन | दीपक कुळकर्णी |
| **डेथ ऑफ हसी** | एम.सी. बीटन | दीपक कुळकर्णी |
| **ओन्ली टाइम विल टेल** | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| **द ब्रिजेस ऑफ द मॅडिसन काउंटी** | रॉबर्ट वॉलर | लीना सोहोनी |
| **अ थाउंजड कन्ट्री रोडस्** | रॉबर्ट वॉलर | लीना सोहोनी |
| **द सिन्स ऑफ द फादर** | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| **अ ट्विस्ट इन द टेल** | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| **बेस्ट केप्ट सिक्रेट** | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| **द केस ऑफ द लकी लूझर** | पेरी मेसन | बाळ भागवत |
| **द केस ऑफ द हॉलिंग डॉग** | पेरी मेसन | बाळ भागवत |
| **द केस ऑफ क्रुकेड कॅन्डल** | पेरी मेसन | बाळ भागवत |
| **द केस ऑफ केअरलेस क्युपिड** | पेरी मेसन | बाळ भागवत |
| **अ टाइम टूल किल** | जॉन ग्रिशॅम | बाळ भागवत |
| **द केस ऑफ द काऊंटरफिट आय** | पेरी मेसन | ए. एस. केतकर |
| **द केस ऑफ डेडली टॉय** | पेरी मेसन | ज्योती आफळे |
| **द केस ऑफ क्रिमसन किस** | एरिल गार्डनर | ज्योती आफळे |
| **भारतीय समाज विज्ञान कोश भाग ६** | प्रमुख संपादक : स.मा. गर्गे | |
| **भारतीय समाज विज्ञान कोश पुरवणी खंड** | प्रमुख संपादक : स.मा. गर्गे | |
| **अ गोल्डन एज** | ताहमिमा अनाम | भारती पांडे |
| **साधी यंत्रे** | डी.एस.इटोकर | |
| **विज्ञानातील गमती** | डी.एस.इटोकर | |
| **विज्ञानातील रंगकथा** | डी.एस.इटोकर | |
| **प्रयोग वनस्पती विज्ञानाचे** | डी.एस.इटोकर | |
| **द मॅड तिबेटिअन** | दीप्ती नवल | सुनंदा अमरापूरकर |
| **ब्रेकिंग आऊट** | पद्मा देसाई | सुनंदा अमरापूरकर |
| **स्पिचेस दॅट शेप्ड द मॉडर्न वर्ल्ड** | ॲलन जे. व्हीटीकर | डॉ. विवेक कोरडे |
| **चिकन सूप फॉर द फादर्स सोल** | जॅक कॅनफिल्ड | सुप्रिया वकील |
| **चिकन सूप फॉर द वुमन्स सोल - भाग २** | जॅक कॅनफिल्ड | उषा महाजन |
| **चिकन सूप फॉर द सोल - टु लव्ह** | जॅक कॅनफिल्ड | उषा महाजन |
| **चिकन सूप फॉर द सोल - फॅमिली मॅटर** | जॅक कॅनफिल्ड | रेवती सप्रे |
| **चिकन सूप फॉर द सोल - बॅक पेन** | जोनाथन ग्रीर | वसु भारद्वाज |
| **चिकन सूप फॉर द सोल - अस्थमा** | नॉर्मन एडेल्मन | वसु भारद्वाज |
| **चिकन सूप फॉर द टीनएज सोल- भाग २** | जॅक कॅनफिल्ड | विनिता जोगळेकर |
| **चिकन सूप फॉर सिस्टर्स सोल - भाग २** | जॅक कॅनफिल्ड | अवंती महाजन |
| **चिकन सूप फॉर द सोल रिझोल्युशन** | जॅक कॅनफिल्ड | वैशाली रानडे |
| **चिकन सूप फॉर द फादर सन सोल** | जॅक कॅनफिल्ड | मीना शेटे-संभू |
| **चिकन सूप फॉर द इंडियन डॉक्टर्स सोल** | जॅक कॅनफिल्ड | जोसेफ तुस्कानो |
| **चिकन सूप फॉर टफ टाइम टफ पीपल** | जॅक कॅनफिल्ड | श्यामला पेंडसे |







| | | |
|---|---|---|
| **चिकन सूप फॉर द सोल ऑल इन द फॅमिली** | जॅक कॅनफिल्ड | सुनिता कट्टी |
| **चिकन सूप फॉर द सोल शेपिंग न्यू यू** | जॅक कॅनफिल्ड | शुभदा विद्वांस |
| **चिकन सूप फॉर द सोल थिंक पॉझिटिव्ह** | जॅक कॅनफिल्ड | मंजूषा मुळे |
| **चिकन सूप फॉर द सोल ग्रिव्हिंग ॲण्ड रिकव्हरी** | जॅक कॅनफिल्ड | श्रद्धा वर्दे |
| **चिकन सूप फॉर द सोल काऊंट युअर ब्लेसिंग** | जॅक कॅनफिल्ड | शुभदा अभ्यंकर |
| **चिकन सूप फॉर इंडियन फादर्स सोल** | जॅक कॅनफिल्ड | अवंती महाजन |
| **मी कधीही माफी मागणार नाही** | सावित्री साहनी | अवंती महाजन |
| **द ड्रीम मॅनेजर** | मॅथ्यू केली | सुनीति काणे |
| **डिलिव्हरींग हॅपीनेस** | टोनी हसीह | सुनीति काणे |
| **टीच युअरसेल्फ बी अ गुड डॅड** | ॲन्ड्र्यू वॉटसन | सुनीति काणे |
| **इट डिलिट** | पूजा माखिजा | सुनीति काणे |
| **द डान्स ऑफ डिसेप्शन** | हॅरिएट लर्नर | सुनीति काणे |
| **टू किल अ मॉकिंग बर्ड** | हार्पर ली | नीला चांदोरकर |
| **हाऊ स्टारबक्स सेव्हड् माय लाईफ** | मायकेल गिल | नीला चांदोरकर |
| **द फुल कबर्ड ऑफ लाईफ** | अलेक्झांडर स्मिथ | नीला चांदोरकर |
| **हो मी सुंदर आहे** | अनिता नाईक | मंजुषा मुळे |
| **मॅकडोनाल्डस्** | जॉन एफ लव्ह | सुधीर राशिनकर |
| **अ किडनॅप्ड माइंड** | पामेला रिचर्डसन | सुषमा जोशी |
| **गन्स ऑफ नॅव्हरॉन** | ॲलिस्टर मॅक्लीन | अशोक पाध्ये |
| **बेअरआयलंड** | ॲलिस्टर मॅक्लीन | अशोक पाध्ये |
| **अल्टिमेट हॅपीनेस** | दीपक चोप्रा | सुमिता बोरसे |
| **बाळासाहेब ठाकरे यांच्या मुलाखती** | संजय राऊत | |
| **विनिंग इन ट्रबल टाइम** | डॉ. क्रेफ्लो डॉलर | गौरी गाडेकर |
| **चिटिंग डेथ** | संजय गुप्ता | गौरी गाडेकर |
| **लिंकन ऑन लीडरशिप** | डोनाल्ड फिलिप्स | गौरी गाडेकर |
| **प्रकाशाची रहस्यं** | डॅनियन ब्रिंकले | सचिन रायलवार |
| **फर्ग्युसनची वाटचाल** | वि. मा. बाचल | |
| **अंतराळातील मृत्यु** | संजय ढोले | |
| **संकरित** | संजय ढोले | |
| **गोमंतकीय खाद्ययात्रा** | ज्ञानदा नाईक | |
| **गोष्ट डॉट कॉम किशोरांसाठी** | ज्ञानदा नाईक | |
| **गोष्ट डॉट कॉम बालांसाठी** | ज्ञानदा नाईक | |
| **हसाल तर वाचाल** | मीरा सिरसमकर | |
| **जीवनाचे मानसशास्त्र** | कुमार कुलकर्णी | |
| **वाटचाल** | राम प्रधान | |
| **आघात** | सूर्यकांत जाधव | |
| **द्विदल** | बाळ फोंडके | |
| **सहज मदत** | मधुमती शिंदे | |
| **माय लाईफ ॲज अ ट्रेटर** | झारा गाहरमनी | रेश्मा कुलकर्णी |
| **डिनायल** | जेसिका स्टेर्न | मैत्रेयी जोशी |
| **आयलंड ऑफ द ब्लू डॉल्फिन** | स्कॉट ओ'डेल | मैत्रेयी जोशी |
| **ब्लू बर्ड** | व्हेनेसा मॅरिक | मैत्रेयी जोशी |
| **द्विखंडित** | तसलिमा नासरिन | विलास गीते |
| **पीस लव्ह ॲण्ड हिलिंग** | बर्नी सिगल | पूर्णिमा कुंडेटकर |
| **द माइंड बॉडी मूड सोल्युशन** | | ऋजुता काणे |
| **आयडिया मॅन** | पॉल ॲलन | स्वाती देशपांडे |
| **आर्ट ऑफ कॉन्सन्ट्रेशन** | हॅरिप ग्रीफी | मयुरी गांधी |
| **द आर्ट ऑफ चूझिंग** | शीना अय्यंगार | सुभाष जोशी |






| | | |
|---|---|---|
| **वर्क लेस डू मोअर** | डॉ. जॅन येगर | दिलीप गोगटे |
| **अँजेलाज् अॅशेस** | फ्रॅन्क मॅक कोर्ट | गीतांजली वैशंपायन |
| **आय इज फॉर इन्फ्लुअन्स** | डॉ. रॉब युंग | सुदर्शन आठवले |
| **१०० लिरिक्स** | गुलज़ार | सुदर्शन आठवले |
| **द डिफिकल्टी ऑफ बिईंग गुड** | गुरुचरण दास | सुदर्शन आठवले |
| **ओशो एक ओंकार सतनाम** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **ओशो मै मृत्यु सिखाता हूँ** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **कृष्ण स्मृती** | ओशो | स्वाती चांदोरकर |
| **सुनभाई साधो** | ओशो | प्रज्ञा ओक |
| **गीता दर्शन** | ओशो | वृषाली पटवर्धन |
| **फिश फॉर लाइफ!** | स्टीफन | शुचिता फडके |
| **फिश** | स्टीफन | शुचिता फडके |
| **फिश स्टिक्स** | स्टीफन | शुचिता फडके |
| **फिश टेल्स - भाग २** | स्टीफन | शुचिता फडके |
| **इनसाइड द कोका-कोला** | नेव्हील इझडेल / डेव्हिड बीसले | प्रदीप सिंदेकर |
| **उद्योजकांच्या वाटचाली** | श्रामना मित्र | प्रदीप सिंदेकर |
| **गोष्ट अम्मीची माझ्या** | हॅनन अल शेख | वंदना कुंडेटकर |
| **द ड्रेसमेकर ऑफ खैरखाना** | गेल लेमन | वर्षा वेलणकर |
| **द फेसबुक इफेक्ट** | डेव्हिड किर्कपॅट्रिक | वर्षा वेलणकर |
| **बॅड ट्रॅफिक** | सिमॉन लुईस | प्रसाददत्त गाडगीळ |
| **लाईफ विदाऊट लिमिटस्** | निक ड्युजिकिक | प्रसाददत्त गाडगीळ |
| **टीच युअरसेल्फ बी अ ग्रेट मम** | ज्युडी रीथ | मुग्धा शुक्रे |
| **बोनोबो हॅन्डशेक** | व्हॅनेसा वूडस् | शर्मिला फडके |
| **अचिव्हिंग द इम्पॉसिबल** | लुईस पघ | मोहन गोखले |
| **१९१२ वर्ल्ड डिस्कव्हर** | ख्रिस टर्नी | मोहन गोखले |
| **कर्मयोगिनी भगिनी निवेदिता** | मृणालिनी गडकरी | |
| **व्हिसल ब्लोअर** | कॅथरीन बोल्कव्हॅक | सिंधु जोशी |
| **कॉन-टिकी** | थॉर हेअरडेल | श्रीया भागवत |
| **इआकोका** | ली इआकोका | अशोक पाथरकर |
| **सेल्फ डिसेप्शन** | अरूण शौरी | अशोक पाथरकर |
| **द ओडिसा फाइल** | फ्रेडरिक फॉर्सिथ | अशोक पाथरकर |
| **द डे ऑफ द जॅकॉल** | फ्रेडरिक फॉर्सिथ | स्वाती देशपांडे |
| **इंटरव्हेन्शन** | रॉबिन कुक | डॉ. प्रमोद जोगळेकर |
| **सार्थ** | एस.एल. भैरप्पा | उमा कुलकर्णी |
| **लिटील डॉटर** | झोया फन | श्रद्धा भुवड |
| **टीनएजर्स** | डेव्हिड बेनब्रिज | डॉ. कल्याणी अच्युते |
| **सॅन्क्टस** | सिमॉन ट्वेन | उदय भिडे |
| **द घोस्ट रनर** | बिल जोन्स | उदय भिडे |
| **हेवन इज फॉर रिअल** | टॉड बक्सपो | मेधा मराठे |
| **द डर्टी लाइफ** | क्रिस्टीन किम्बॉल | मेधा मराठे |
| **घड्याळाचे काटे उलटे सुलटे** | एलन लँगर | श्रीपाद पुराणिक |
| **कॅलिस्टो** | टॉर्स्टन क्रोल | उज्ज्वला केळकर |
| **डेज ऑफ गोल्ड अँन्ड सेपिया** | | अंजनी नरवणे |
| **काळपुरुष** | दिनकर जोषी | सुषमा शाळिग्राम |
| **हग्ज फॉर मॉम** | ख्रिस हॉवर्ड | विदुला देशपांडे |
| **हग्ज फॉर सिस्टर** | ख्रिस हॉवर्ड | विदुला देशपांडे |
| **द मदर डान्स** | हॅरिएट लर्नर | जयश्री गोडसे |
| **द रोड टू वाँटिंग** | वेंडी लॉ-योन | चित्रा वाळिंबे |
| **टीच युअरसेल्फ मोटीव्हेट युअरसेल्फ अँण्ड रीच युअर गोल्स** | फ्रान्सिस कूम्बस् | मिलींद पराडकर |
| **टीच युअरसेल्फ हाऊ टू रिमेंबर एनीथिंग** | मार्क कॅनन | डॉ.लक्ष्मीकांत शिवणेकर |



| | | |
|---|---|---|
| **टीच युअरसेल्फ सक्सेसफुल लीडरशिप** | कॅरॉल ओ'कोनॉर | विनिता पिंपळखरे |
| **द मॅनेजमेंट मास्टर क्लास** | एमा विटा | संजीव परळीकर |
| **द लीडरशिप मास्टर क्लास** | एमा विटा | प्रमोद शेजवलकर |
| **स्टेपिंग अप** | जॉन इझो | श्यामल कुलकर्णी |
| **जेनिम ॲण्ड जेम्स** | ब्रूक न्यूमॅन | दुलारी देशपांडे |
| **रिव्हर गॉड** | विल्बर स्मिथ | सुभाष जोशी |
| **फीड युअर फेस** | जेसिका | डॉ. मीना शेटे-संभू |
| **संवाद परमेश्वराशी - भाग ३** | नील वॉल्श | वृषाली पटवर्धन |
| **द ग्रेटर गोल** | केन जेनिंग्ज | रेवती सप्रे |
| **थॉट्स ॲण्ड फिलिंग्ज** | मॅथ्यू मॅकी | सदानंद चावरे |
| **माय डॉटर माय मदर** | ॲनी मुरे | रमा नाडगौडा |
| **द माइंड्स ओन फिजिशिअन** | जॉन झिन ॲण्ड रिचर्ड | चिंतामणी पटवर्धन |
| **विल पॉवर इन्स्टिन्ट** | केली मॅकगॉनिगल | अरूंधती सुभाष |
| **पेरेंटिंग युअर स्ट्रेस्ड चाइल्ड** | मायकेल केली | धनंजय बिजले |
| **जॅपनीज पिओनी** | रेई किमुरा | वासंती घोसपूरकर |
| **फॉर बेटर** | तारा पारकर पोप | उषा महाजन |
| **इमॅजिन** | जोनाह लेहेर | डॉ. हर्डीकर |
| **द माइंड जिम गिव्ह मी टाइम** | | श्याम भुर्के |
| **द माइंड जिम रिलेशनशिप** | | श्याम भुर्के |
| **व्हेन फ्रेन्डशिप हार्टस्** | डॉ. जेनेगर | सुप्रिया वकील |
| **द सायलेंट फिल्म - दादासाहेब फाळके** | शरयू समनवार | नीता गद्रे / इंदुमती पोळ |
| **व्हाय मार्स ॲण्ड व्हीनस कोलाइड** | जॉन ग्रे | शुभदा विद्वांस |
| **चिल्ड्रेन फ्रॉम हेवन** | जॉन ग्रे | शुभदा विद्वांस |
| **द फाइव्ह इसेन्शिअल पीपल स्कील** | डेल कार्नेगी | शुभदा विद्वांस |
| **पिझ्झा टायगर्स** | टॉम मॉन्घन | सुधीर राशिनकर |
| **अ इयर बाय द सी** | जोआन ॲन्डरसन | अरूंधती चितळे |
| **अशी माणसे असे नमुने** | शिवाजी सावंत | |
| **शेलका साज** | शिवाजी सावंत | |
| **मोरावळा** | शिवाजी सावंत | |
| **कवडसे** | शिवाजी सावंत | |
| **मृत्युंजय (नाटक)** | शिवाजी सावंत | |
| **छावा (नाटक)** | शिवाजी सावंत | |
| **फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे** | इ.एल. जेम्स | शोभना शिकनीस |
| **कलाकार** | नाना कुंभोजकर | |
| **अ न्यू अर्थ** | एखार्ट टोल | नीलिमा जोशी |
| **द टूल्स** | फिल स्टट्झ / बॅरी मायकल्स | जयश्री गोडसे |
| **अग्निदिव्य** | कल्याणीरमण बेन्नूरवार | |
| **उत्खनन** | स्वाती चांदोरकर | |
| **अनाहत** | स्वाती चांदोरकर | |
| **इन्फाईनाईट व्हिजन** | पवित्रा मेहता/शेणॉय | ऋजुता खरे |
| **द तालिबान क्रिकेट क्लब** | तिमेरी मुरारी | अमृता दुर्वे |
| **आय शॅल नॉट हेट** | इझेल्डिन अॅब्युलेईश | श्यामल कुलकर्णी |
| **लायसन्स टू लिव्ह** | प्रिया कुमार | श्यामल कुलकर्णी |
| **लीड टू विन** | हर्षित भावसार | संजीव परळीकर |
| **युअर ब्रेन ॲट वर्क** | डेव्हिड रॉक | कीर्ती जोशी |
| **अ क्वीव्हर फुल ॲरोज** | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| **बी केअरफुल व्हॉट यू विश फॉर** | जेफ्री आर्चर | लीना सोहोनी |
| **ट्वेल्व्ह रेड हेरिंग्ज** | जेफ्री आर्चर | देवदत्त केतकर |
| **द डान्स ऑफ इन्टिमसी** | हॅरिएट लर्नर | श्यामल चितळे |
| **द क्राय ऑफ द किंगफिशर** | बेलिंदा वेगास | श्यामल चितळे |
| **जस्ट मॅरिड प्लीज एक्सक्यूज** | यशोधरा लाल | नीता गद्रे |






| | | |
|---|---|---|
| **ॲन्ड द माऊंटन एकोड** | खालिद हुसेनी | वैजयंती पेंडसे |
| **बी अ ब्रिलियन्ट आंत्रप्रेन्युअर** | ॲलेक्स मॅकमिलन | अपर्णा कुबल |
| **इफेक्टिव्ह टाइम मॅनेजमेंट** | पॉली बर्ड | अपर्णा कुबल |
| **मार्केटिंग फॉर सक्सेस** | ॲलेक्स मॅकमिलन/जेफ आर्चर/ टीना कॉन्स्टंट आणि मॉरीस टेलर/ जे. जोनाथन गॅबे | अपर्णा कुबल |
| **वर्क स्मार्टर लाइव्ह बेटर** | ॲलेक्स मॅकमिलन/जेफ आर्चर/ टीना कॉन्स्टंट आणि मॉरीस टेलर/ जे. जोनाथन गॅबे | अपर्णा कुबल |
| **द गर्ल विथ ड्रॅगन टॅटू** | स्टीज लार्सन | विभाकर शेंडे |
| **द किल लिस्ट** | फ्रेडरिक फॉर्सिथ | बाळ भागवत |
| **व्हेन आय डाय** | फिलीप गोल्ड | अजय हर्डीकर |
| **हे आदिमा हे अंतिमा** | सुवर्णा ढोबळे | |
| **मॅनेजिंग पीपल हू हेट मॅनेजिंग** | डेव्होरा झॅक | राजकुवर राणे |
| **डेथ ऑफ सोल्जर** | मार्गरिट एव्हिसन | विनिता जोगळेकर |
| **गार्डियन** | सुधा रिसबूड | |
| **डिंबक** | संजय ढोले | |
| **यू आर ओरिजिनल बॉर्न** | जॉन मॅसन | सरोज पाटणकर |
| **संस्कार** | यू. आर. अनंतमूर्ती | व्ही.जी. कानिटकर/लोकापुरे |
| **योगा फॉर हेल्थ** | सई साने | |
| **वेताळ पंचविशी** | शरद दळवी | |

**बालसाहित्य**

| | |
|---|---|
| **कल्पतरू आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर |
| **आशा आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर |
| **वल्लूचा मोर आणि इतर कथा** | मंजूषा आमडेकर |
| **शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ** | अनुराधा गुरव |
| **बब्बड - भाग ५** | राजीव तांबे |
| **बब्बड - भाग ६** | राजीव तांबे |
| **बाल बिरबल - १० पुस्तके** | मंजूषा आमडेकर |

**चरित्र पुस्तके**


| | |
|---|---|
| **सती साध्वी देवी अहिल्या** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **महाराणा प्रताप** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **राजा राममोहन राय** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **महाराणी ताराबाई** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **स्वराज्यसेवक खंडो बल्लाळ** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **पंडितजी** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **बुद्धभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **महर्षि दयानंद सरस्वती** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **फ्लॉरेन्स नाइटिंगेल** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **आचार्य गांगेय भीष्म** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **बापूजींची अमर कहाणी** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **रणरागिणी दुर्गाराणी** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **नेताजी सुभाषचंद्र बोस** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **विश्वकवी रविबाबू** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **राजराणी मीराबाई** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **करूणासागर ईश्वरचंद्र** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **अब्राहम लिंकन** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **मदर टेरेसा** | रा.वा. शेवडेगुरुजी |
| **जाणता राजा श्री शिवछत्रपती** | रा.वा. शेवडेगुरुजी |






# ।। फक्त प्रौढांसाठी ।।

। माणिक मुंढे ।



बायका स्वप्नाळू असतात आणि पुरुषांना रमायला आवडतं. मग पुरुष स्वप्नाळू नसतात का, आणि बायका रमत नाहीत का? पुरुषांना कायम कुठल्या ना कुठल्या बाईची स्वप्नं पडत असतात आणि स्वप्न पाहणाऱ्या पुरुषाच्या प्रेमात बायका पडतात. पण अशा स्वप्नाळू पुरुषाशी त्या क्वचितच लग्न करतील, ही बाब वेगळी. कारण त्यांना स्वप्नात रमायची सवय नसते. स्वप्नातला राजकुमार वास्तवात 'मोगँबो खुश हुआ' म्हणत समोर उभा असतो.

आणखी एक गोष्ट- पुरुष तीन प्रकारचे दिसतात. एक आयडियाजवर बोलणारे, त्यावर काम करणारे; दुसरे लोकांबद्दल बोलणारे- म्हणजे याला-त्याला कायम बरं-वाईट म्हणणारे; आणि तिसरे मूर्ख. बायका पहिल्याच्या भन्नाटपणे प्रेमात पडतात; लग्न, लेकरं वगैरे मात्र त्या दुसऱ्या दर्जाच्या पुरुषासोबत करतात आणि तिसरे भेटले की नाकं मुरडतात. यात आणखी एक गफलत होण्याची शक्यता जास्त असते. तिसऱ्या दर्जाचे काही पुरुष पहिल्या दर्जाच्या पुरुषाची अशी काही नक्कल करतात की,

बायकांना असा चेहरा कळेपर्यंत उशीर झालेला असतो. पण तो कधी ना कधी फाटतो म्हणजे फाटतोच.

दुसऱ्या प्रकारच्या लोकांचं बहुमत आहे. ते सत्ता, प्रतिष्ठा, पैसा बाळगून असतात. पहिले कमालीचे स्वार्थी असतात. जग त्यांच्यामुळेच चालतं. ते आईनस्टाईन, पिकासो, कलाम यांच्या पंक्तीतले असतात. बायका वास्तवाला चिकटून राहतात. कारण वास्तवाचा कोलाज पैसा, प्रतिष्ठा, जातपात, वर्ग यांनी तयार झालेला आहे. आपल्याकडे आता कुठं बायकांना जमिनीची मालकी वगैरे मिळायला लागलीय. नाही तर सगळे हक्क पुरुषांकडेच. त्यामुळेच की काय, तुम्ही बहुतांश ठिकाणी बघा- बाईला जमिनीची उपमा दिलेली असते आणि पुरुषांना आकाशाची... समुद्राची...

हे उलटंही वाचता येईल. जमीन, धरणी हे स्त्रीलिंगी आहेत, तर समुद्र पुल्लिंगी. पुरुषाला नवनवीन जमीन पादाक्रांत करायला आवडतं आणि त्याची मालकी गाजवायलाही. तो ज्या वासनेतून जमीन मिळवायचा प्रयत्न करतो, त्याच वासनेनं तो बाई मिळवायचा प्रयत्न करतो. 'वासना' या शब्दाचा अर्थ काही तरी मिळवण्याची 'इर्षा', या अर्थानं मी वापरतोय. जर सगळ्या गोष्टी मिळवणं, सोडणं अशातच मोडत असतील तर मग आमचं प्रेम खूप नैसर्गिक वगैरे होतं असं म्हणणाऱ्यांचं काय? तर माणूस जगाला नंतर फसवतो; अगोदर तो स्वतःला फसवत राहतो आणि त्यासाठी तो वेगवेगळे मुखवटे घेऊन फिरत असतो. अशी माणसं वास्तवापासून दूर पळत राहतात. तळ पाहणं त्यांना नकोसं होतं. पंचविशीनंतरचा प्रत्येक निर्णय गरजेवर अवलंबून असतो.

इतिहासात एखाद्या बाईनं 'अलेक्झांडर द ग्रेट' किंवा 'वास्को द गामा' किंवा 'कोलंबस'सारखा लुटारू दर्यावर्दीपणा केल्याची नोंद नाही. साहजिक आहे- आता कुठं टीसीवर आईचं नाव यायला लागलंय. तेव्हा इतिहास लिहिणारे पुरुष अशा दर्यावर्दी बाईला जागा कशी देतील? पण जग जिंकणारा पुरुष हा एखाद्या बाईतच रमलेला दिसतो किंवा अनेक बायकांमध्ये. जगाचा ताबा असणाऱ्या पुरुषावर मालकी मिळवायचं कसब मात्र बाईकडेच आहे. त्यामुळे गावात डरकाळी फोडणारा पाटील घरात मांजरीसारखा चाटत असतो.

एवढंच काय, पौगंड अवस्थेतल्या पोराला ओलीचा झरा फुटायला लागला की त्याची फॅन्टसी जन्म घेते. मग एखादी पोरगी, बाई त्याच्या मेंदूत तरंग उमटवायला लागते. आपण मग 'हा हवेत आहे' असं म्हणायला लागतो. पुरुष मूठ मारतो म्हणजे तो फॅन्टसाईज करतोच किंवा फॅन्टसाईज केल्याशिवाय ती बाई डोक्यातून जातच नाही, हे वास्तव. किंवा त्या फॅन्टसीत थोडासा जरी त्याला अडथळा आला तरी त्याची भूक भागत नाही. तो शरीराच्या सर्वोच्च अवस्थेला मुकतो. तो परत फॅन्टसाईज करण्यासाठी सावज शोधतो आणि परत मोकळा होत राहतो. प्रत्यक्ष आयुष्यात असलेली बाई रुटीन झाली, की मग तो तिच्याशी सेक्स करताना पण इतर एखाद्या आयटम बाईला फॅन्टसाईज करून आनंद घेण्याचा प्रयत्न करतो. बायकाही तेच करत असाव्यात. स्वप्न, वास्तव, फॅन्टसी, ओल याचं हे चक्र त्याच्या मरणापर्यंत सुरूच राहतं. मी असं ऐकलंय की, पुरुषाला मेनोपॉज कधीच येत नाही. त्याचं वीर्य शेवटपर्यंत धडका मारत राहतं.

बायका काय करतात मला माहीत नाही. मी एकदा माझ्या गर्लफ्रेंडला विचारलं की तू कितव्या वर्षी पहिल्यांदा मूठ मारली; तर ती म्हणाली, 'म्हणजे काय?' ती खरं बोलली. 'मूठ मारणे' हा शब्दही पुरुषाच्या लिंगाशी संबंधित आहे. बायकांसाठी मराठीत शब्द नाही. फॅन्टसीला एक शाप आहे. ती ज्या क्षणी पूर्ण होते, त्या क्षणी ती दम तोडते, मृत्यू पावते. पुरुष पुन्हा नव्या फॅन्टसीच्या शोधात निघतो. वयानुसारही त्यात बदल होतो. पहिल्यांदा प्रेमात पडलेले मुलं-मुली एकनिष्ठ वगैरे राहतात. तेच तिशी ओलांडले की स्वतःच्या पार्टनरमध्ये इतर आवडलेल्या बायका-पुरुषांना फॅन्टसाईज करायला लागतात. त्यातूनच मग विवाहबाह्य संबंध, ग्रुप सेक्स, थ्री सम, फोर सम असं सगळं वास्तव समोर येतं. फक्त खजुराहोच्याच नाही, तर आमच्या अंबाजोगाईतल्या मंदिरावरही अशी वेगवेगळी आसनं कोरली गेलीयत. बाई-पुरुषाचे संबंध... त्यातले पदर अनादी अनंत काळापासून सारखेच असावेत, त्यातले पोत काळानुसार बदलत असावेत. ब्रेकअप, घटस्फोट, पुन्हा पॅचअप, मल्टी पार्टनर, लिव्ह इन अशी नवनवीन जगं जन्माला येतायत. संपतायत. एक गोष्ट खरी- फॅन्टसी हाच सेक्सचा आत्मा आहे आणि नैसर्गिकरीत्या तो बहुविध आहे. एकपत्नी राम त्यामुळे आता आऊटडेटेड आहे आणि रामाचीच वाट पाहणारी सीता आता परग्रहावर राहत असल्यासारखी वाटते. लग्न ही माणसानं निर्माण केलेली सर्वांत मोठी अनैसर्गिक गोष्ट आहे. सेक्सच्या संदर्भात जोडलेली एकनिष्ठता भंपक आहे. बाई-गड्याचे एकनिष्ठ संबंध टोकाचे कंटाळवाणे, बोअरिंगच असतात, हे वास्तव.

आता टीव्हीकडे या. तुम्ही कुठल्याही क्षणी टीव्ही लावा, मग ते न्यूज चॅनेल असो की जनरल एन्टरटेनमेंट चॅनेल किंवा जाहिराती बघा- बाई-पुरुष किंवा त्यांचे संबंध हेच त्यांच्या मुळाशी असतात. बी. आर. चोप्राचं महाभारत लागलं की बायका-पोरी त्यातल्या पांडवांकडे बघून हात जोडायच्या आणि 'कृपा ठेवा देवा' म्हणायच्या. आता एकता कपूरच्या महाभारतातले पाच पांडव बघून बायका-पोरी उसासे टाकतात. चोप्राच्या महाभारतात द्रौपदीचं वस्त्रहरण बघताना दुःशासनाचा लोक राग करायचे. एकता कपूरची द्रौपदी बघताना आता दुःशासनच्या जागी पुरुष स्वतःला फॅन्टसाईज करतात. चोप्राच्या महाभारतातलं वस्त्रहरण बघतानाही फॅन्टसाईजच करायचे; पण त्या वेळेस देवाची भीती होती. आता लोकांनी त्याला देवघरातून काढून चौकटीच्या वर लटकवलंय. पुढे त्याची जागा कुठं असेल कुणास ठाऊक! पण बातमीत महाभारत कसं दाखवणार? एक बाई आणि पाच पुरुष म्हणजे 'फाईव्हसम' प्रत्येकाच्या आयुष्यात शक्य आहे?

सुंदर बाईसारखं महागडं काहीच नाही. पण त्या इर्षेचं काय करायचं? फॅन्टसाईज करता येईल. जी गोष्ट मिळत नाही तिची

कल्पना तर करता येते... पण न्यूजमध्ये कसं दाखवणार? आहे ना, एक खली और चोबीस हसिनायें, सास बहु और साजिश किंवा सास बहु और बेटीयाँमध्ये दाखवून टाका. बरं लव्ह ट्रॅंगल आता इतिहासजमा झालेत; 'सात खून माफ' घेऊन प्रियंका चोप्रा आता प्राईमटाईमला न्यूज चॅनेलवर असते. सात पुरुषांसोबत ती कशी संबंध ठेवते आणि त्यांचा ती मग कसा खून करते, याची ती स्टोरी सांगत असते. तिचे हावभाव, बोलण्याची ढब आणि सोबत सेक्स-हिंसा असं मिश्रण. फॅन्टसीचा हा अत्युच्च बिंदू. 'सब कुछ चलता है, दिखा. न्यूजवाले हुए तो क्या हुआ!' जमाना आता 'फिफ्टी शेडस ऑफ ग्रे'चा आहे. मुंबई आता सेक्स टॉईजपासून ते हातकड्या, काळ्या पट्ट्या, छानशा दोऱ्या असं सगळं ऑनलाईन बुक करतेय. हे सगळं न्यूजचा भाग आहे. तुमच्या फॅन्टसीचा मसाला तुम्हाला टीव्हीवाले आता घरपोच पाठवतायत. फक्त पैसे तेवढे मोजा.

बरं, प्रत्येक जण काही 'अलेक्झांडर द ग्रेट' नाही, की त्याच्या आयुष्यात अनेक बायका असतील! अशा पुरुषापेक्षा बायकांचं प्रमाण किती तरी पटींनी अधिक आहे, ज्यांच्या आयुष्यात अनेक पुरुष सर्वार्थानं असतात. या बाबतीत नैसर्गिकरीत्या त्या अधिक सक्षम आहेत. पण त्याची दखल समाज कसा घेणार; कारण तो पुरुष आहे. पण जमिनीवर दिसत नसली तरी जमिनीच्या खालून सरस्वती वाहायची थोडीच थांबते? बरं आपण काय काय फॅन्टसाईज करतो? सेक्स काय आहे? माझ्या दृष्टीनं हिंसेचा हा सर्वोच्च आविष्कार आहे. मी म्हणतो, प्रत्येकाला हिंसा आवडते. युद्धाच्या कथा रम्य वाटतात. देश कुठलाही असो- तो युद्ध मोहिमेवर असला की युद्धभूमीत बायकांवर बलात्कार वगैरे वाढतातच. ते फक्त इसिसच करतं असं नाही, तर भारतीय शांती सेना जाफनात होती तर त्यांच्यावरही आरोप झालेच. क्लिओपात्राच्या नादात साम्राज्य नष्ट झाल्याचा इतिहास आहे. या सगळ्या गोष्टी सकाळी आठ वाजता घरातून नोकरीला बाहेर पडून पाच वाजता परतणाऱ्या माणसाच्या आयुष्यात घडू शकतात. पण त्याला हे असं रम्य असणारं आयुष्य हवं असतं की नको? अर्थातच बहुतांश जणांना हवं असतं; पण वास्तवात ते शक्य नाही. मग त्याचा फील तरी मिळू शकतो ना? तो कोण देणार? अर्थातच टीव्ही.

आता न्यूज चॅनेल्स काय देतात आणि जनरल एन्टरटेनमेंट चॅनेल्स काय करतात? ही रेषा तशी धूसर आहे. फिक्शन-नॉन फिक्शन. होळीच्या दिवशी रंग खेळला जातो. मालिकेतले सगळे हिरो-हिरोईन्स जे अंगापिंडानं आता धष्टपुष्टच आहेत- सगळे जण मंदाकिनीसारखे पांढरे शुभ्र कपडे, साड्या घालतात आणि रंगपंचमी साजरी करतात. त्यात मग ती साडी तिच्या अंगाला अशी काही चिकटते की पाहणाऱ्याच्या अंगावर गारवा निर्माण होतो. तिच्याशी चाळे करणाऱ्या नटाच्या जागी टीव्ही बघणारा पोरगा- पुरुष स्वतःला फॅन्टसाईज करतो आणि व्हर्च्युअली सगळं अनुभवून घेतो. तुम्ही अजय देवगणचा 'दृश्यम' बघा. त्यात त्याची बायको म्हणते- 'आज काय सनी लिओनीनं घरी लवकर यायला भाग पाडलं का?' टीव्हीतल्या हवाई दुनियेचं अजब वास्तव आयुष्याशी जोडलं गेलंय. न्यूज चॅनेल्सवाले काय करतात? होळीच्या दिवशीच जिथं बायका-पोरी-पोरं- तेही खात्यापित्या घरचे- होळी साजरी करतायत, तिथलं असं काही शूट करतात, की ते बघून तुमचं शरीर गरम व्हायला लागतंच. भिजलेली बाई तुम्हाला रोज मिळते का?

तुम्ही 'आज तक'ची अँकर बघा- अंजना ओम कश्यप. उंच आहे, केस कायम मोकळे असतात. असं वाटतं, ती आताच न्हाऊन वगैरे आलीय आणि बातम्या द्यायला उभी राहिलीय. देहबोली अशी की स्क्रिनचा मोह पडेलच. इतकी अग्रेसिव्ह असते की तिला बघता बघता तुमच्या भावना चाळवल्या जातात. 'आज तक'च्या सगळ्या अँकर्स अशाच ॲग्रेसिव्ह ठेवलेल्या आहेत. ड्रेसिंग असं की, काय दाखवण्यासारखं आहे हे त्यांना व्यवस्थित कळलंय. त्या ते व्यवस्थित दिसेल याची काळजी घेतात. एक बरं की, त्यांना हे कळून गेलंय की लोक काही फक्त मोदीवरची चर्चा ऐकण्यासाठीच फक्त टीव्हीसमोर येत नाहीत. पुरुषांना बाईच्या मेंदूत शून्य रस असतो. असतो असं दाखवणारे एक तर खोटारडे आहेत किंवा त्यांच्या लिबिडोचा प्रॉब्लेम आहे.

टीव्हीवर काय दिसावं याचे निर्णय ज्यांच्या हातात आहेत त्यांना बरोब्बर माहितीय की, काय दाखवलं म्हणजे लोकांची फॅन्टसी चाळवली जाणारेय- मग ती बाई असो की गडी. एकता कपूरच्या मालिकांनी दशकभर तरी देशावर एकहाती सत्ता गाजवली. तिनंच सिक्स पॅक असणारे पुरुष टीव्हीवर आणले. ढेरीवाला पुरुष बायकांना आवडत नाही, हे तिनं बरोब्बर हेरलं. बायकांना तिनं केवढी मोठी फॅन्टसी पुरवली. बायकांचा निचरा फक्त पुरुषांमध्येच होतो, हे खोटंय. दोन बायका आपापसात निचरा करून घेऊ शकतात. तिनं मालिकांमध्ये हिंसाही आणली- 'सास भी कभी बहु थी.' त्यातून तिनं दोन गोष्टी केल्या. दोन भांडणाऱ्या बायका पुरुषाला बघायला आवडतातच. पण बायकांनाही अशा बायका आवडतात. आवडतात एवढंच नाही, तर व्हर्च्युअली त्या त्यात सहभागीही होतात. तुमच्या आतल्या हिंसेची फॅन्टसी तिनं किती व्यवस्थित हेरली!

टाईम्स नाऊ किंवा हिंदी न्यूज चॅनेल्स बघा. मीनाक्षी लेखी, स्मृती इराणी, अलका लांबा, शायना एन.सी., शोभा ओझा या त्या बायका आहेत ज्या रोज संध्याकाळी न्यूज चॅनेल्सच्या टॉक शोजमध्ये असतात. यातल्या एका तरी बाईला दहा लोकांचा तरी लीडरशिप बेस आहे का? मग तरीही या टीव्हीवर दिसतात. मंत्रिमंडळापर्यंत या कशा पोहोचल्या? न्यूज चॅनल्सवाले यांनाच का दाखवतात? फॅन्टसीचेही वेगवेगळे तरंग आहेत, त्यासाठी वेगवेगळ्या बायका लागतात. या सगळ्या बायकांचा स्क्रीनवरचा वावर बघा, तुम्ही त्यांचे राजकीय विचार बघायला टीव्ही बघता असं सांगत असाल तर मी म्हणतो ॲरिस्टॉटलला नव्यानं राजकीय सिद्धान्त मांडावे लागतील.

पंकजा मुंडेंचीच हाक कशी लाखोंच्या गर्दीपर्यंत बरोब्बर ऐकू

गेली. तिची भावनिक साद तुमच्या आतली कुठली भावना चाळवते? टीव्हीवाल्यांना कायम नवीन डार्लिंग लागत असते. मग त्यासाठी ते प्रियंका गांधींचा साधा फोटोही दिवसभर दाखवतील आणि पंकजाची भाषणं अर्धा अर्धा तास. आर्जव करणाऱ्या बाईचं भलं करणं पुरुषाला स्वतःचं राष्ट्रीय कर्तव्य वाटतं. त्याचा धंदा करतात न्यूज चॅनेल्स. प्रत्यक्षात नसली तरी स्क्रीनवरून तुमची कुठली ना कुठली ती फॅन्टसी पुरवतात. त्याचा भोवरा ही वासना आहे. 'वासना' हा शब्द मी चांगल्या अर्थानं वापरतो.

बरंय, आता नेतृत्व करणाऱ्या तरुण बायकांनीही स्वतःला व्यवस्थित प्रेझेंट करायचं ठरवलंय. लंडनमधून पंकजा ज्या वेळेस टीव्हीवाल्यांना लाईव्ह भेटली त्या वेळेस तुम्ही तिला बघायला हवं होतं! तिच्या चिक्कीत खरंच कुण्या टीव्हीवाल्याला रस होता काय? ती बोलत होती त्या वेळेस तुम्ही पाहत होतात की ऐकत? मी म्हणतो, आता बायकांनी मिरवण्याचाच काळ आहे. त्यांचं स्वातंत्र्य तिथूनच सुरू होतं. फक्त जगानं त्यांच्याकडे 'असं नाही, असं पाहावं' असं म्हणणारी बाई मूर्ख. ते जगावर सोडून दे. तू बिनधास्त राहा.  बरं, या बायका अशाच नुसत्याच दाखवल्या तर? कोण बघेल? कॉकटेलनं माणूस लवकर आऊट होतो, हे लक्षात असू द्या.

हुशार बाई टीव्हीत दुर्मीळ गोष्ट आहे. दुर्दैवानं ज्या कुण्या बायकांना देवानं चांगला मेंदू देऊन पाठवलंय, त्यांनाही आपलं शरीर हीच आपली संपत्ती आहे आणि त्याच्याच जिवावर सगळं मिळवण्याचा मोह आवरत नाही. जगात तुम्हाला जे काही हवंय ते मिळवण्यासाठी तुम्ही जे काही शस्त्र वापरता, मग लोक त्यावरच हल्ला करत राहतात. म्हणजे संघर्ष आहे आणि त्या फ्रिक्शनमध्येच आनंद. गुदगुल्या. कुठल्या कॉन्डोमची ॲड आहे माहीत नाही- पण त्याची टॅगलाईन आहे- 'डॉटेड फॉर एक्स्ट्रा प्लेजर.' टीव्ही ते फ्रिक्शन कॅच करण्याचा प्रयत्न करते आणि आपल्याला ते फ्रिक्शन फॅन्टसाईज करण्याची- हवं तर संधी म्हणा, किंवा भाग पाडते. तीन टाईट सुटाबुटातल्या अँकर एका छोट्याशा टेबलच्या भोवती बसल्यात आणि समोर एकच गेस्ट. म्हणजे एक टेबल, तीन बायका आणि एक पुरुष. कॅमेरा ऑन. प्रश्नांचा भडिमार. गेस्ट असदुद्दीन ओवेसी आहे असं गृहीत धरा. न्यूजरूममध्ये शो लागला की कुणी तरी पुटपुटत- साल्या एकालाच तिघी तिघी घेतायत. या वाक्यातच त्यानं एक अख्खी फॅन्टसी जगून घेतली. हा कार्यक्रम असतो 'आज तक'वर आणि कार्यक्रमाचं नाव बघा- थर्ड डिग्री. तुम्ही आता पॉर्न साईटवर जा आणि त्यावर थर्ड डिग्री म्हणून सर्च करा. कुठले व्हीडीओ मिळतात ते पाहा.

शो डिझाईन करणाऱ्यांना स्वतःची टेस्ट माहीत असते, मग स्वतःला ते जगाच्या केंद्रस्थानी ठेवतात आणि जग उभं करतात. मी म्हणतो मार्क्सला कसं काय कळलं नाही की, जगाच्या पाठीवर आर्थिक समानता तर सोडाच; पण कशातच समानता असण्याची शक्यता दूरदूरपर्यंत नाही. अलीकडे मी खूप ऐकतो- बायकांना समानता वगैरे हवी असते. इक्वल इक्वल. मी म्हणतो त्या खूप पुढं आहेत. समानता ही अनैसर्गिक आहे. टीव्ही स्टेशन्स चालवणाऱ्यांना ते माहीत आहे. त्या अनैसर्गिकपणाचा ते बाजार करतात. तुम्ही त्या बाजारात वेड लागलेल्या मोहम्मदासारखे आहात. सगळी जादुई दुनिया. 'गँग्ज ऑफ वासेपूर'मध्ये एक डायलॉग आहे- 'जब तक इस देश में फिल्मे बनती रहेंगी, लोग च्युते बनते रहेंगे.'

तुम्ही असं काही गृहीत धरू नका की, पुरुषाची फॅन्टसी काही उघड्यानागड्या बायकाच असतात. असं असतं तर सनी लिओनीचेच व्हीडीओ लोकांनी बघितले असते; विद्या बालनला साडीत एकाही पुरुषानं बघितलं नसतं. आपल्या फॅन्टसीही आपल्या सांस्कृतिक-सामाजिक जडणघडणीतून जन्म घेतात. भारतीय पुरुषांबद्दल बोलायचं तर मला वाटतं, त्याला साडीत जेवढी बाई हवीहवीशी वाटते, तेवढी बिकिनीत नाही वाटत. असं नसतं तर एम. एफ. हुसेन मुंबई ते दिल्ली असा चकरा मारत नसता राहिला. मला वाटतं, हा शोभा डेच्या पुस्तकात कुठं तरी प्रसंग आहे. दिल्लीच्या वर्तुळात एक बाई असायची. ती साडी अशी काही नेसायची आणि पदर अशा काही नजाकतीनं सरकवायची की, ती नजाकत बघण्यासाठी हुसैन मुंबईतून दिल्लीला जायचा- म्हणजे जायचा फक्त त्या साडीतल्या नजाकती बाईसाठी. तुम्ही सीरीयल्सही बघा. ते काही आपलं भारतीय संस्कृती दाखवायची म्हणून हिरोईन्सला साड्या नाही नेसवत. त्यांना व्यवस्थित माहिती आहे भारतीय पुरुषांची फॅन्टसी. मग वेगवेगळ्या प्रकारच्या साड्या, वेगवेगळ्या प्रदेशातल्या. सगळं कलरफुल- पण व्यवस्थित मोकळंढाकळं... सिल्की... हवंहवंसं वाटेल असं. जे झाकलेलं आहे ते पाहण्याचा माणूस प्रयत्न करत राहतो. सगळंच उघडं असेल तर मग बघायला स्पेस कुठं राहते?

तुम्ही एनडीटीव्हीच्या अँकर्स बघा सगळ्या- हे एकमेव न्यूज नेटवर्क आहे जिथं अँकर्स साडीत असतात. त्यांची बातमी वाचण्याची पद्धत, नजाकत तेही शांत; पण भरलेल्या नदीसारखं जाणवत राहतं. निधी कुलपतीला बघा. आमचे पाटील एके दिवशी म्हणाले, 'हिनं ना एकोणीस नवरे केले आणि विसाव्या वेळेस मला विचारलं तरीही एका पायावर हिच्यासोबत लग्न करेन.' पाटलांची ती केवढी मोठी फॅन्टसी आहे आणि ती पूर्ण होण्यासाठी त्यांची केवढी मोठी तयारी आहे!

नेटमुळं फॅन्टसी मारली जातेय असं वाटतं. दिवसभर व्हॉटस अपवर कसले कसले फोटो येत राहतात. नेटवर तुम्ही सेक्सची एक साईट सर्च करा किंवा एका साईटवर 'इंडियन अमॅच्युअर' असं सर्च करा. कमीत कमी एक लाख व्हीडीओज तुमच्यासमोर एका सेकंदात येतात. कुठलाही व्हीडीओ बघा. माणसाला वाईल्ड कल्पना करायला आवडतात. रुटीन सेक्स माणसाला म्हातारा बनवतो. मग लोक त्यात साहसी काही तरी करू पाहतात. पार्टनरसोबत शक्य नसेल  किंवा बाहेरही कुठं जमत नसेल तर मग ते जे काही करायची इच्छा आहे त्याची कल्पना करत राहतात. पण जे काही कल्पनेत छान छान वाटत राहतं, त्याचे व्हीडीओज

आता तयार असतील आणि ते तुमच्या मोबाईलवर असतील तर तुम्ही काय कल्पना कराल? घंटा?

आयुष्यात सगळंच रेडीमेड असण्यात आनंद नाही. सनी लिओनीला तुम्ही किती काळ बघणार? टेलरकडे कपडे शिवायला टाकून त्याची चार दिवस वाट पाहण्याचा लहानपणीचा काळ तुम्हाला रम्य वाटतो की आता मॉलमध्ये जाऊन रेडीमेड कपडे खरेदी करताना? सध्याच्या जगाचा प्रॉब्लेम असा आहे की, सगळं तयार आहे; तुम्ही फक्त काय हवं ते सांगा. तुम्ही कल्पना करा- ते तयार आहे. वस्तू, माणसं... सगळं सगळं. टीव्ही नावाच्या खोक्यात ते सगळं सामावलंय. फक्त पूर्ण होत नसेल तर ती एकच फॅन्टसी. पैशाची फॅन्टसी. हजारा हजाराच्या नोटांची कल्पना केली आणि त्या लगेचच हातात आल्या, असं कधी होत नाही. हातात नोटा घेऊन किंवा नोटांनी भरलेला खिसा घेऊन फिरण्याची मजाही आता डेबिट आणि क्रेडिट कार्डनं हिरावून घेतलीय. आता तर काही जण म्हणतायत की नोटा हद्दपारच करा. त्याही डिजिटल असू द्या. म्हणजे फक्त आकडे अस्तित्वात असतील. म्हणजे एक दिवस असाही येईल, ज्या दिवशी तुम्हाला पैसाही टीव्हीत बघून फॅन्टसाईज करावा लागेल. कसंय, माणसाला स्पर्श आवडत असतो. कारण त्याचा फील असतो. कल्पना रम्य असतात. काही काळ त्या गुदगुल्या आणतात; पण त्या मालकी गाजवू देत नाहीत. टीव्हीचं तसंच आहे. त्यात जे काही जग आहे त्यावर तुमची मालकी नाही. टीव्ही बंद केला की ती एक निर्जीव वस्तू होऊन जाते. त्यातलं आयुष्यही अंधारात.

ओले ओले केस, जाड अशी लालभडक लिपस्टिक, अंगावर भरजरी उत्तर भारतीय साडी... अंग कसं सगळं सोन्या-नाण्यात भरून गेलेलं, तिच्या अंगावर फुलांचा असा काही सडा की, साक्षात देवही फुलांचं झाड हलवतोय तिच्यासाठी. तीही अशी काही की, 'सुहाग रात'नंतर तिचे अस्ताव्यस्त केस, कुंकू- खरं तर सिंदूर असा सगळ्या केसात पसरलाय. अहो हे लग्नातल्या नवरीचं वर्णन नाही, टीव्हीवर अधूनमधून जिच्या बातम्या असतात त्या 'राधे माँ'चं आहे. तिच्या सत्संगाची मोठमोठी होर्डिंग्ज मुंबई-पुणे हायवेवर भर मुंबईत लागलेली असतात. तिथं जाहिरातबाजी करायची तर लाखो मोजावे लागतील. पण वर्षभर तिचं एक तरी होर्डिंग तिथं लागलेलं असतंच. तिच्याबद्दल काहीही घडो, न्यूजवाले तिला दाखवतातच. का? तिची पार्श्वभूमी गुन्हेगारी आहे म्हणून नाही, तर ती एका पुरुषी जगाची फॅन्टसी पूर्ण करते म्हणून. अशा किती तरी बायका-पुरुषांचा सत्संग तुम्हाला सकाळी सकाळी टीव्हीवर पाहायला मिळत असतो. तो तुमची कुठली भूक पूर्ण करतो ते एकदा स्वतःला विचारा बरं. आसाराम बापू ज्या पद्धतीनं पिचकारी फिरवतो, ते कसं दिसतं? असे बाबा लोक नेमकी कुठली फॅन्टसी पूर्ण करतात?

टीव्हीवाले क्राईम, सेक्स विकत राहतात; कधी भडकपणे, कधी सॉफ्ट रूपात तर कधी नुस्त्या शब्दातूनही तुमच्या भावना चाळवतात. 'लाईफ ओके'वरची इंडिया फाईटस् बॅक, सोनीवरची क्राईम पेट्रोल या मालिका बघा. क्राईम कसं करू नये यासाठी तुम्ही हे शो बघता असं सांगत असाल तर जरा चिमटा घेऊन बघा. हे सगळे शो सॉफ्ट पॉर्ननं ओतप्रोत भरलेत. त्यात कॅरेक्टर करणाऱ्या बायका एकदम 'भाभी' टाईप, आयटमच आहेत. कॅमेऱ्याचे अँगल असे काही की, तुम्ही त्यात कैद होता. एका बाजूनं क्राईम आणि दुसऱ्या बाजूला सेक्सचं टॉनिक. रात्री मध्यरात्रीपर्यंत तुम्ही टीव्हीच्या पुढून उठणार कसे? तुमची कुठली फॅन्टसी कैद होतेय ते एकदा चेक करा. हे सगळं फक्त एन्टरटेनमेंट चॅनेललाच होतंय असं नाही. प्रत्येक हिंदी न्यूज चॅनेलला क्राईम शो आहेत. 'सनसनी' हा त्यातला फेमस. त्याचे अँकर्स बघा. शब्दांचं उच्चारण, काही ठिकाणी तर फिमेल अँकर आहेत, त्यांचे कपडे बघा. काहींना तर या क्राईम शोजचं व्यसन आहे. हे पॉर्न मुव्ही बघण्याची चटक लागण्यासारखं आहे.

फक्त स्क्रीनच नाही- शब्दांमधून केवढी मोठी भूक निर्माण होते आणि ती भागवलीही जाते. पुस्तकं फक्त हुशारीसाठीच वाचली जातात असं कोण म्हणतं? मी शाळेत असताना आम्ही 'हैदोस' नावाचं पिवळं पुस्तक वाचायचो. लपूनछपून. त्यावरचे फोटो अजूनही आठवले तर अंग सरसर करतं. ते वाचताना जे मेंदूत तरंग उमटून अंगाला हुडहुडी भरायची ती कशानंच लपायची नाही. नंतर कॉलेजला गेलो तर अशा पुस्तकांचं हॉस्टेलला सामूहिक वाचन करायचो. अशी पुस्तकं मिळण्याचं ठिकाण म्हणजे, टॉयलेटमध्ये वर कुठं तरी ठेवलेली असायची. किंवा बेडवर उशाला. बरं आम्ही एवढे प्रामाणिक होतो की, टॉयटेलमधलं ते पुस्तक काम झालं की तिथंच परत जशास तसं ठेवून द्यायचं. अख्खं हॉस्टेल वाचायचं; पण वाचलंय म्हणून कुणीच सांगायचं नाही. कधी तरी बोलण्या बोलण्यात ते उघडं पडायचं. मग काय हशा ! मध्यात एका मराठी चॅनेलला वॉल होती आणि त्यावर मोठ्या अक्षरात हेडर होतं 'फक्त प्रौढांसाठी'. अँकरही एकदम झकास. वॉल बघून म्हटलं बातमी बघू. बातमी होती दहीहंडीची. म्हणजे सुप्रीम कोर्टाचा निर्णय आला होता की आता अठरा वर्षाखालच्यांना दहीहंडीत थर लावता येणार नाहीत. पण त्याला 'फक्त प्रौढांसाठी' म्हणून जो काही टर्न दिला होता, तो अफलातून. मला वाटतं, अशा पिवळ्या पुस्तकांमधून, फिल्म्समधूनच ही सर्जनशीलता येते.

फक्त शब्द कामसू असतात असं कुणी सांगितलं? आवाज. ओशोचा आवाज तुमच्या कानात केवढा रुंजी घालत राहतो! माणसाचा ॲसेट फक्त त्याचं शरीरच आहे, असं नाही. आवाज काय कमाल नाही करत... काही अँकर बघा, त्या बातम्या कशा वाचतात. तो आवाज ऐकून काय काय होत राहतं? बेडमध्ये बिन आवाजाची बाई तुम्हाला चालेल? जे तुमच्या घरात आहे, बेडरूममध्ये आहे, तेच टीव्हीवर आहे; फक्त त्यातली माणसं वेगळी आहेत. स्वतःचा ॲक्ट तुम्हाला किती बोअरिंग वाटतो ; पण दुसऱ्याचा पाहताना किती उद्दीपित होता? टीव्ही तुमच्यासाठी दुसरं जग घेऊन तुमच्या घरात राहतो.

मराठी टीव्हीवाले अजून तसे सरावलेले नाहीत. खंडोबाच्या दोन बायका बघताना तुम्हाला नेमकं काय वाटतं? तुम्ही खरंच खंडोबाचीच गोष्ट एन्जॉय करता की, त्या जागी स्वतःला ठेवून स्वतःच्याच आयुष्यातली फॅन्टसी पूर्ण करून घेता? मराठीत पाच-सहा न्यूज चॅनेल्स आहेत; पण त्यात एखाद-दोनच फिमेल अँकर्स आहेत ज्या प्रेक्षकांची फॅन्टसी पूर्ण करू शकतील. त्यात अजूनही आपल्या मराठमोळ्या पोरींना स्क्रीनवर कसं हवंहवंसं दिसावं, हे कळत नाही. त्या 'कॅरी' नाही करत स्वतःला व्यवस्थित. ज्या कुणी थोड्याशा तसं धाडस करतील त्यांना हिणवण्याचा प्रकार होतो. मराठी चॅनेल्सचे संपादक अजून तरी नैतिकतेची दांभिक झूल घेऊ जगू पाहतायत. पण जे जे बंदिस्त असतं ते तुटतंच. मराठीतही हळूहळू हे येईल. तुमच्यापाशी जे आहे ते तुम्ही मिरवलंच पाहिजे. टीव्हीचा स्क्रीन ही मोठी विचित्र गोष्ट आहे; तिला जे सूट होत नाही त्याला ती फार विद्रूप करून दाखवते. म्हणजे जे लपवण्याचा प्रयत्न कराल, ते अगोदर उघडं पडतं.

मी 'हे चूक आहे, ते बरोबर आहे' असं कधीच म्हणणार नाही. ते तुमच्या हातात नाही. एखाद्या गोष्टीला तुम्ही चूक आहे म्हणून बॅन कराल, तर दुसऱ्या कुठल्या तरी फॉर्ममध्ये ते तुमच्यासमोर येतंच. माझी आई अशिक्षित आहे; पण ती टीव्हीला आरसा म्हणते. मी टीव्हीच्या दुनियेत दशकभरापासून आहे; पण तिच्याएवढा चपखल शब्द मला कधीच सुचला नाही. मला वाटतं, बेडरूममधला आरसा आपण काही फक्त भांग पाडण्यासाठी नाही वापरत. आपण स्वतःला वेगवेगळ्या रूपांत न्याहाळत असतो. काही फॅन्टसी तिथं पूर्ण होतात; काही टीव्हीवर- म्हणजेच घरातल्या दुसऱ्या आरशात.

**माणिक मुंढे**
manikmundhe@gmail.com



# ।।श्रद्धांजली ।।



२० वर्षांहून अधिक काळ, एक अभिजात अनुवादक म्हणून
मेहता परिवाराचे सदस्य असणारे

**श्री. अशोक पाध्ये**

यांचे दिनांक १९ सप्टेंबर २०१५ रोजी निधन झाले.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
**व**
**मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर**

यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली



रशियन कथांचा भावानुवाद करणाऱ्या
मेहता परिवाराच्या सदस्य

**डॉ. सुनीती देशपांडे**


यांचे दिनांक २३ सप्टेंबर २०१५ रोजी निधन झाले.

**मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
**व**
**मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर**

यांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली

# ।। काही फुलपाखरांच्या ‘गोची’विषयी ।।

। सोनाली नवांगुळ ।



‘हा’ अनुवाद करताना वेगळ्याच तऱ्हेचा थकवा आला.

थकवा बायकांच्या घुसमटलेल्या श्वासांचा आणि मानवी भावभावनांच्या गुंत्याचा उलगडा करताना आलाच; पण अजूनही ‘या’ गोष्टी मोकळेपणानं बोलायला, लिहायला जमत नाहीयेत, याचा थकवा होता. संकोचाचा थकवा होता.

सलमाच्या मूळ तमीळमध्ये लिहिलेल्या ‘द आवर पास्ट मिडनाईट’नं मराठीत येताना थबकायला लावलं मला. उंबरठ्याआतल्या बायकांच्या घुसमटीच्या आणि दाबलेल्या हुंदक्यांच्या गोष्टी त्या मानानं सहज करता येत होत्या... पण बायका जेव्हा लैंगिकतेबद्दल सैल बोलायला लागायच्या, तेव्हा या सगळ्याला मराठी शब्द काय व कसे लिहू म्हणून जाम पंचाईत झाली होती. यांत्रिकपणानं पाहू म्हणूनही पाहता येईना! खरं तर तोपर्यंत मी माझं काम, घर स्वतंत्र केल्यामुळे बराचसा मोकळेपणा इतरांशी व स्वतःशीही आला होता. जागतिक सिनेमानं शरीर व्यवहारांकडं पाहायची दृष्टी बदलत चालली होती. हां, अर्थात

पॉर्नबिर्न काही पाहिलं नव्हतं. एका मित्रानं काहीतरी चर्चा चालू असताना 'सनी लिओनसारख्या प्रोफेशनल पॉर्न स्टारची वेबसाईट कशीय बघ तरी' असं म्हटलं तेव्हा होमपेज पाहिलं; पण व्हीडीओ पाहिले नाहीत. लॉगइन करताना मेलपत्ता रजिस्टर झाला तर आपण मागितले नाहीत तरी ते व्हीडीओज आपल्याला येत राहतात, किंवा मग आपल्या नावे आपल्या फेसबुक यादीतील लोकांना जातात, असं अर्धवट काहीतरी ऐकल्यामुळं वेबसाईट पाहावी वाटूनही पुढे जाण्याचं धाडस झालं नाही. या विचित्र संकोचानं मी चकित झाले...

**पुरुषांचे 'घरा'बाहेरचे घरोबे, स्त्रियांचे 'गुपचूप' भावुक नि शरीर व्यवहार, नुकतंच शरीर उमलू पाहाणाऱ्या राबिया आणि अहमदचं एकमेकांतलं अस्फुट व निरागस आकर्षण, शरीराला स्पर्श करून पाहण्याची इच्छा, बायका एकत्र जमल्या की लैंगिक भुकेची होणारी मोकळी चर्चा, हे सगळं 'मध्यरात्रीनंतरचे तास' मध्ये होतं... लहानपणापासून मुलींना बजावलं जायचं, 'स्वतःच्या छातीकडे, जननेंद्रियांकडे पाहायचं नाही, नाहीतर ...' - 'नाहीतर' या शब्दानंतर कधी धर्माचं अस्तर लावून भीती घातली जायची, तर कधी 'तुम्ही काळ्याठिक्कर पडाल आणि मग तुमच्याशी लग्न कोण करेल,' असं म्हणून भविष्याचा वास्ता दिला जायचा.**

'मध्यरात्रीनंतरचे तास'सारख्या सलमाच्या या कादंबरीला मराठीत आणताना माझा संवाद जरा अधिक मोकळा होत गेला स्वतःशी, हे मात्र खरं!

लहानपणचं काही आठवतंय. तसं मासिक पाळीबद्दलही घरून मोकळेपणानं बोलण्याची-समजून घेण्याची रीत नव्हती. टीव्हीवर सॅनिटरी नॅपकिनच्या जाहिराती येऊ लागल्या तेव्हा ब्रेडसारखा काहीतरी पदार्थ वाटून सहज मोठ्या माणसांना विचारलं तर कुणीतरी 'चूप बस! नसत्या चौकशा लागतात..'असं म्हणून गप्प बसवलं होतं.

एकदा असंच कुठल्यातरी देवाला निघालो होतो. पाहुणेबिहुणे होते बरोबर. रस्त्यातलं सगळं वाचायचा नाद. भिंतीवर रंगलेल्या जाहिराती वाचता वाचता दिसलं 'तांबी बसवा पाळणा लांबवा..' वाटलं की बाळाच्या पाळण्याला सारखी दोरी हलवून झोका देण्यापेक्षा हे काहीतरी वेगळं दिसतंय, तांबी नावाचं काही बसवलं की पाळणा आपोआप झोके घेत राहील. तसं म्हटलं आणि दाणकन धपाटे बसले पाठीत. दिवसभर वटारलेले डोळेही सहन करावे लागले...आणि चूक काय केली हे कळलं नाही ते नाहीच.

चौथीत असताना अपघात होऊन चालणं बंद झालं तेव्हापासून घराबाहेर पडण्याची वेळ क्वचित यायची. ग्रॅज्युएट झाल्यावर स्वावलंबी राहण्याचा एक प्रयत्न करून पाहायचा म्हणून गाव सोडून शहरात एका संस्थेत काम करायला आले. ती संस्था विकलांग माणसांसाठीच काम करणारी, त्यामुळं राहण्याच्या सोयी होत्याच. काम करता करता बरंच काही शिकले, धाडसी झाले. उरक वाढला. भिन्न लिंगाचं कुणीतरी आवडतंच अशा वयात होते; पण आपण इतरांपेक्षा भिन्न शारीरिक स्थितीत आहोत याचं भान जागं असायचं. या लिमिटेड जगात आजूबाजूला पाहायचे तेव्हा धडपडून, लगट करून स्पर्शाचं चुटपुटतं समाधान मिळवणारी माणसं दिसायची. उत्सुकतेनं फारच पुढे जात नवी जबाबदारी 'गळ्यात' येऊन पडली म्हणून भांबावलेली माणसं दिसायची. मोहावर मात करता यायला हवी असं मन म्हणायचं आणि मोहाच्या रस्त्यानं जाऊन जबाबदारीनं अनुभव देता-घेता यायची काहीतरी व्यवस्था असायला हवी, असंही मन म्हणायचं. या 'म्हणण्याला' संकोचामुळे एक्सप्रेशन फुटायचं नाही.

बाहेर राहून जबाबदार आणि अधिक तल्लख झालेली मी मनानंही तितकीच खंबीर आहे का, याचं उत्तर मिळण्याची वेळही लवकरच आली. धाकट्या बहिणीचं लग्न ठरलं. खूप छान वाटलं; पण घरी या आनंदात सामील होताना न जाणे का एक विचित्र अवघडलेपण होतं. माझ्यापाशी येऊन थांबलेल्या नजरा मला कळायच्या. पाहणाऱ्यांच्या दृष्टीनं 'ही चांगली असती तर ....'ची सहानुभूती होती... आणि माझ्यापाशी ठामपणा नव्हता. लग्नात मी छान नटूनथटून सहभागी झाले. मी घरात पडून राहिलेली 'अपंग' नव्हते, सेल्फ रिलायंट माणसं असतात तसाच रुबाब माझ्या व्हीलचेअरवरच्या वावरण्यातही होता; पण बहिणीला शुभेच्छा देऊन आल्यावर माझ्या पाठीवर किंवा दंडावर थोपटणारे हात कसे चुकवू, असं मला झालं होतं. लग्न, मुलं होणं या गोष्टींपेक्षा 'नॉर्मल' दुसरं काही असूच शकत नाही आणि ज्यांच्याबाबतीत हा फेरा चुकतो, ते 'बिचारे' असं काहीतरी मी त्या प्रतिक्रियांमध्ये वाचू शकत होते. त्या वेळी ते खरंही होतं नि खोटंही.

शरीरानं सर्वसाधारण असणाऱ्या माणसांनाही लैंगिक गोष्टींबद्दल बोलायचा मोकळेपणा नसतो किंवा प्रत्यक्ष कृतीही किती समजून व आनंदानं केली जाते, या बाबतीत शंका घ्यायला बरीच जागा आहे. अशा स्थितीत विकलांग माणूस आणि त्याची लैंगिक समज, भूक, शारीरिक स्थिती बदलल्यामुळे क्रियेत करावे लागणारे बदल या गोष्टींबद्दल तर खूपच धूसर जागा आहेत. माध्यमांची इतकी भरमार असण्याच्या काळातही लोकांच्या समजुतींना छेद बसेल किंवा अपंग माणसांच्या समजुतीत सुधारणा होईल, असं काही पॉवरफुल नजरेस पडत नाहीये.

नॉर्मल माणसांसाठीही ॲक्टिव्ह सेक्स ही गोष्ट आणि संबंधित विषय टॅबू असतात, तर मग अपंगत्वाच्या प्रांतात केवढे जटिल प्रश्न उगवलेले असू शकतात याची कल्पनाच केलेली बरी! यामुळेच पन्नास टक्क्यांहून अधिक अपंग माणसं या गोष्टीपासून तुटलेली राहतात.... केवळ मोकळं बोलता न आल्यामुळं किंवा केवळ शरीराच्या दिसण्याबद्दलचे व कार्यक्षमतेच्या असण्या-नसण्याबद्दलचे गंड बाळगल्यामुळे 'माणूस' म्हणून विकसित होण्याच्या जागा उगीच रिकाम्या राहतात. अर्थात स्पर्शांमधले फरक बाकी नॉर्मल व्यक्तींनाही अचूक कळतात, तसे या माणसांनाही कळतात. माणसांशी बंध निर्माण होऊन कृती झाली तर ती सहज होऊ शकते; पण नैसर्गिक 'भूक' आहे म्हणून मिळेल तिथून

अनुभव घेण्यासाठी सगळे अपंग हपापलेले असतात, असं अजिबात नाही.

दीपा मलिक नावाच्या एका मैत्रिणीशी या संदर्भात एकदा बोलणं झालं होतं. तिशी उलटल्यानंतर ती पॅराप्लेजिक झाली. मणक्यावरच्या गाठी काढण्याचं तिचं ऑपरेशन चाललं होतं तेव्हा तिचा नवरा कारगिल फ्रंटवर लढत होता. अभिरुचीसंपन्न आयुष्य जगणारी, दोन लहान मुलींची आई असलेली दीपा व्हीलचेअरवरच्या नव्या स्थितीला समजून घेत जगण्याचे प्लॅन करत होती, तेव्हा बहुतांशी नातेवाईक व मित्रमंडळी 'आता कसली ही संसार करणार! मेल्यात जमा...' म्हणून तिला निकालात काढत होती. आडून आडून बोलून दाखवत होती. दीपा थोडी सावरल्यावर तिचा नवरा व ती डॉक्टरांकडे गेले व मोकळेपणानं बोलले त्यांच्याशी. कमरेखाली संवेदना नाहीत, लघवी-संडाससारख्या नैसर्गिक विधींवर नियंत्रण नाही, अशा अवस्थेत लैंगिक संबंध ठेवणं योग्य की अयोग्य, या प्रश्नावर डॉक्टरांनीसुद्धा सविस्तर उत्तर दिलं. त्यांनी सांगितलं, की शरीराची अवस्था बदलली म्हणून घाबरायचं कारण नाही. तुमची लैंगिक संबंध ठेवण्याची पद्धत थोडी बदलेल; पण हा विषय जगण्यातून रद्द झाला, असं मानू नका. प्राचीन काळापासून या बाबतीत शास्त्र म्हणून भरपूर अभ्यास झालाय. बऱ्याच देवळांच्या खांबांवर आणि भिंतींवरही तुम्ही तो पाहत आलाय. एकमेकांवर विश्वास ठेवत आणि स्वतःवर विश्वास ठेवत तुम्ही तुमचा कंफर्ट शोधा... शंका आली तर पुन्हा विचारा. यू आर बियाँड नॉर्मल टु डु धिस! ऑल द बेस्ट!

आणखी एका मैत्रिणीचाही असाच किस्सा. ती पॅराप्लेजिक, तर तिचा नवरा शारीरिक दृष्ट्या नॉर्मल. त्यांनीही मनातल्या शंका योग्य ठिकाणी विचारून आपला आनंद गमावण्याची वेळ येऊ दिली नाही. अर्थात यासाठी म्युच्युअल अंडरस्टँडिंग हवं खूप!

अशी मोजकी उदाहरणं फार पोहोचत नाहीत किंवा चर्चेत येत नाहीत म्हणून गैरसमजुतींचं जाळं दाटच राहतं.

'मार्गारिटा विथ ए स्ट्रॉ' या सिनेमाच्या निमित्तानं अपंग व्यक्ती आणि लैंगिक सुखाबद्दलचा त्याचा हक्क याबद्दल माणसांना किती आकलन आहे हे तपासायचा लिटमस मिळून गेला. हा सिनेमा पाहिल्यावर शारीरिकदृष्ट्या नॉर्मल असणाऱ्या काही मित्र-मैत्रिणींना मी विचारलं, 'काय वाटलं सिनेमा पाहून? काय वेगळं हातात आलं?' तर उत्तर आलं, 'अशा माणसांनाही लैंगिक भूक, प्रेमाची ओढ असते हे जाणवलं.' - केवळ जिद्द, प्रेरणा वगैरेंमध्ये अडकवून टाकलेल्या अपंग व्यक्तीच्या लैंगिकतेबद्दलच्या भावना सर्वसाधारण असतात, या नैसर्गिक सत्याचा साक्षात्कार या निमित्तानं यांना प्रथमच होतोय म्हणून चीड यावी की किमान या निमित्तानं याही बाजूचं आकलन येण्याची सुरुवात होते आहे, याचा आनंद मानावा, की या शिडीवरून धुकं फिटण्याची चिन्हं सापडताहेत म्हणून वर चढावं.... माझा गोंधळ उडाला.

'मार्गारिटा' मधली नायिका लैला ही सेरेब्रल पाल्सी असणारी. त्यामुळे तिचे अवयव तिच्या मेंदूतून सुटलेल्या आज्ञांना सावकाश प्रतिसाद देतात. तिची हालचाल, बोलणं यात तिचं स्नायूंना कष्टवणं जाणवतं. अर्थात मोटराईज्ड व्हीलचेअरवरून ती इकडेतिकडे सुईंकन धावते, त्यामुळे व तिच्या एकूणच दिसण्यामुळे ती बापुडवाणी किंवा कीव करावी अशी वाटत नाही. तरुण, कलासक्त व उत्सुक लैला पॉर्न व्हीडीओज पाहणारी, घरात माणसांचा वावर असेल तेव्हा व्हीडीओ मिनिमाईज करून हेडफोनने 'ते' आवाज ऐकणारी. विकलांगतेचा दृश्य स्वरूपातला ठसा वगळता इतरत्र तेजतर्रार! तिला वाटतं किस करून पाहावं किंवा प्रेमात पडावं... पण तिच्या या प्रवासात तिला धक्के बसतात. कुठल्याही स्त्री-पुरुषाकरिता मग तो व्यंगासहित असो किंवा विरहित लैंगिक गोष्टी बोलणं, करणं याचं औत्सुक्य असतं. व्यक्तिमत्त्व घडण्यात याचाही वाटा असतोच. अदृश्यपणे. माणूस म्हणून ती नैसर्गिक गरज आहे... पण लैला अपंगत्वासहित जगताना काही न्यूनगंडांतून अजून बाहेर पडलेली नाही आणि ते होण्याकरता तिचं म्हणणं ऐकण्याची परिस्थिती तयार होत नाही. कामवासना ही तारुण्य व शारीरिक सामर्थ्य-सौंदर्याशी कनेक्टेड समजली गेल्यामुळे या चौकटीव्यतिरिक्त इतर कोणाला असे वाटेल, तर ती विकृती मानली जाते. थोडा वेळ सिनेमाचा विषय बाजूला ठेवून आठवतंय ते काही सांगते-

सात-आठ वर्षांपूर्वीची गोष्ट असेल... एका नावाजलेल्या वर्तमानपत्रात एका आईचा निनावी लेख वाचला होता. त्यात तिनं तिचा मतिमंद मुलगा वाढवतानाच्या आणि तो वयाच्या नाजूक टप्प्यांवर असतानाच्या ताणांबद्दल लिहिलं होतं. मुलगा शरीरानं वाढत होता; पण त्याची बुद्धी लहान मुलासारखी. शरीरात फुलपाखरू धडका मारत होतं, त्यामुळे तो आक्रमक व्हायचा. खासगीत कसं वागावं आणि सार्वजनिकरीत्या कसं, यांतल्या सीमारेषेचं भान नसल्यामुळे तो केव्हा हस्तमैथुन सुरू करेल, याचा नेम नसायचा. त्यानं असं केलं की 'तू मुलाला नीट वळण लावत नाहीयेस' असा दोष सारखा आईकडे यायचा. बरं त्याच्यात ताकद अफाट; त्यामुळे आईला तो आवरायचा नाही. नेमकं व्यक्त करता न आल्यानं रोज नवे उपद्व्याप व्हायचे. अशा आईनं त्याची उलघाल समजून त्याची 'गरज' भागवली, पण ती स्वतः समाजानं निर्धारित केलेल्या नैतिक-अनैतिकतेची सीमारेषा ओलांडल्यामुळे अपराधभावनेत अडकली. एकीकडे मुलाला शांत केल्याचं चुटपुटतं समाधान आणि दुसरीकडे 'आई' या प्रतिमेच्या विरोधात आपण वर्तन केल्याची टोचणी. या घटनेमागच्या भावनिक व शारीरिक व्यवहारांची फोड कशी करावी?

शारीरिक दृष्ट्या किंवा बौद्धिक दृष्ट्या विकलांग असणाऱ्या माणसांना नेहमीच लैंगिक बाबतीत एकतर विकृत किंवा अक्षम गणलं जातं. आजच्या सोसायटीत दिसण्या-जगण्याचे जे पॅटर्न सेट झालेले आहेत, त्याबरहुकूम आपण दिसत नाही, त्या कसोटीला आपण उतरू शकत नाही, त्यामुळे एखाद्याशी लैंगिक संबंध प्रस्थापित करणं वगैरे गोष्टी घडणार नाहीत, असा समज अनेकदा अपंग व्यक्तीही स्वतःबद्दल करून घेते. याचा उलटा-तिरका

परिणाम व्यक्तिमत्त्वावर होत राहतो. आधीच जगण्यात चॉईसेसही कमी असतात. त्यामुळे आत्मसन्मानाच्या पॅरामिटर्समध्ये फरक पडत राहतो. सेक्शुॲलिटीवर याचा परिणाम होत राहतो.

अपंग व्यक्ती आणि लैंगिकता याबद्दल विसंगतीनं ठासून भरलेले अनेक स्टिग्मा किंवा मिथ्स आहेत. ठळकपणानं सांगायचे तर ते असे -

अपंग स्त्री-पुरुषांना सेक्सची गरजच नसते.

अशा स्त्री-पुरुषांमध्ये लैंगिक संबंधांची गरज अधिक जोरकस किंवा विकृत असते.

लैंगिक संबंधात उत्स्फूर्तताच आवश्यक असते / त्याची एक ठराविक वेळ किंवा वय असतं.

अपंग स्त्री-पुरुषांना 'खऱ्या अर्थानं' लैंगिक संबंध ठेवता किंवा उपभोगता येत नाहीत.

अपंग स्त्रीपुरुष सेक्शुअली आकर्षक नसतात.

अशा व्यक्तींना लैंगिक शिक्षणाची गरज नसते.

अशा व्यक्तींच्या आयुष्यात सेक्सचा नैसर्गिक आनंद उपभोगण्यापेक्षा अधिक मोठी आव्हानं असतात, त्यामुळे त्यांनी असा आनंद उपभोगण्याचा विचार करणं चूक किंवा त्यांच्या जगण्याच्या धडपडीत ती गरज महत्त्वाची उरत नाही.

अशा माणसांच्या लैंगिक संबंधातून मुलं जन्माला आली तर ती अपंगच असतात.

मतिमंद माणसं 'सेक्शुअली डिव्हिअंट' म्हणजे लैंगिक दृष्ट्या विकृत असतात.

अपंगत्वाचे असंख्य प्रकार, त्या दृष्टीनं प्रत्येकाची मर्यादा समजून त्याला/तिला साथ करणारा सहप्रवासी लाभू शकेल, इथपर्यंत समजूत येण्यासाठी शंकांची, गैरसमजांची, अंधविश्वासांची, प्रश्नांची कोंडी तर फोडायला हवी! अवघडलेपण सैलावायला हवं! स्वतःच्या ओळखीच्या परिघावर असणारी 'मार्गारिटा'मधली लैला अनेक प्रश्नांचं प्रतिनिधित्व गाजावाजा न करता निभावते. तिच्या प्रेमाचा, इच्छांचा शोध तिला शरीराची क्षमता आणि फरकांच्या पार करतो. 'पलीकडे' जाण्यासाठी खूप जण केवळ संकोचानं तिष्ठत राहतात. अपंग व्यक्तीला पडद्यावर दाखवतानाची भाषा व चित्र बदलतंय...खरंतर अपंगत्व ही अडचण नव्हे, त्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन व स्वच्छ आकलन करून घेण्याची इच्छाशक्ती नसणं, ही अडचण आहे. अपंग व्यक्ती आणि तिच्याबद्दलची शारीरिक व भावनिक जाणीव याबद्दल मुळातच पाणी डहुळलेलं आहे... पण अशा सिनेमांमधून काही जाणिवा स्पष्ट होऊ शकण्याची सुरुवात होईल कदाचित. हा सिनेमा ज्या 'जागा' दाखवतो त्या पाहण्यासाठी, समजून घेण्यासाठी आपल्या आसपास वावरणाऱ्या, काही शारीरिक मर्यादा असणाऱ्या, पण त्या पलीकडे सर्व मानवी भावभावनांनी संपृक्त माणसांमध्ये मिसळायला हवं. मोकळेपणानं चर्चा व्हायला हवी. खरा विषय तर सिनेमा थिएटरच्या बाहेर आल्यावर एक्सप्लोअर केला जाणं महत्त्वाचं!

नेमकं नाव आठवत नाही, कदाचित नॅशनल जिओग्राफिक चॅनेलवर 'टॅबू' ही मालिका असावी. त्यात एका प्रौढत्वाकडे झुकू लागलेल्या व्हीलचेअरबाऊन्ड मुलाची आणि त्याच्या बापाची गोष्ट चालू होती. तो मुलगा त्याच्या पर्यावरणात स्वावलंबी आहे; पण अपंगत्वामुळे शरीर बेढब आहे. त्याला लैंगिक अनुभवाची इच्छा आहे, हे त्याच्या बापाला ठाऊक आहे; पण जबाबदारीसह वैवाहिक आयुष्य जगणं त्याला शक्य नाही. आपल्या मुलाची तगमग पाहून बाप मुलाच्या वाढदिवशी एक वेगळाच प्लॅन ठरवतो. तो शेकडो किलोमीटर्स कार ड्राईव्ह करत आपल्या मुलाला वेगळ्या देशात घेऊन जातो. तिकडे क्वालिफाईड सेक्स वर्कर एजन्सीकडे त्यानं आपल्या मुलाच्या आवडीनुसार बुकिंग केलं आहे. स्वतःच्या देशात ही मुभा कायद्यानं नसल्यामुळे, ज्या देशात ती आहे तिकडे त्यानं मुलासाठी व्यवस्था केली आहे. तिथलं वातावरण अत्यंत क्लासी आहे. बाप मुलासह त्या विशिष्ट, हॉटेलसारख्या दिसणाऱ्या जागेच्या लाऊंजमध्ये वाट पाहतो आहे. इतक्यात मॉडेलसारखी दिसणारी, उंचनिंच हसरी मुलगी अत्यंत अदबीनं त्या दोघांपुढे झुकते आणि 'चलू या?' असं विचारत त्या मुलाच्या व्हीलचेअरचा ताबा घेते. बाप बाहेरच लाऊंजमध्ये काही वाचत बसला आहे. मुलगी त्या मुलाला खोलीत घेऊन जाते, त्याला कुठं मदत लागू शकते याचे डिटेल्स तिच्याकडे आधीच पोहोचले आहेत. त्यानुसार ती त्याला बेडवर सरकायला, कपडे काढायला मदत करते. त्यानंतर थेट आपण बापाचा उत्सुक चेहरा पाहतो. दोन तास झालेले असतात आणि ती मुलगी व्हीलचेअर ढकलत त्याला घेऊन येते, वडिलांकडे सोपवते व शेकहँड करून, हलकीशी मिठी मारत त्याचा निरोप घेते. मुलाला हवा असलेला अनुभव मिळवून दिल्याचा अपार आनंद वडिलांच्या चेहऱ्यावर दिसतो. दोघंही आनंदानं मिठी मारतात व एपिसोड संपतो. - हे असं काही कल्पनेत पाहणंही मला अशक्य होतं, तिथं वास्तवात घडलेली स्टोरी टीव्हीवर दाखवली जात होती. लैंगिक संबंधांची इच्छा असेल तर तो अनुभव सन्मानपूर्वक मिळायला हवा, अशी समजूत असणारे पालक, समाज हे सगळं अद्भुतच होतं.

अशा गरजा असणं ही नैसर्गिक गोष्ट आहे आणि ती अमुकतमुक शारीरिक स्थिती असल्यामुळे काही माणसांना यातून वगळणं किंवा त्यांचा हक्क नाकारणं, हे अमानवी आहे.

प्रत्येक माणसाला स्नेह, प्रेम, प्रणय, विशेष खासगी जवळीक, स्वीकार आणि साहचर्याची ओढ असते. केवळ याबद्दलची साक्षरता नसल्यामुळे अनेकांची घुसमट होत राहते. मुळात शारीरिक संबंध ही केवळ यांत्रिक गोष्ट नव्हेच... त्यासाठी जी भावनिक समज व आकलन लागते, वेगळं अनुभवविश्व समजून घेण्याची जी ताकद लागते, ती हळूहळू शिकत जाण्याची गोष्ट आहे. समोरच्याला आपोआप कळणार नाही हे विश्व. काही गोष्टींत बदल घडायला हवा असेल तर म्हणणं वेगवेगळ्या माध्यमांमधून पोहोचत- पोहोचवत राहिलं पाहिजे. अपंग मुलं इतर

नॉर्मल मुलांच्या तुलनेत काही वेळेस थोडी मंद असू शकतात, पण त्यांची शारीरिक पक्वतेची वेळ जी योग्य असायला हवी तीच असते; पण नेमकी भावनात्मक व अनुभूतीविषयक वाढ तेवढ्या प्रमाणात न झाल्यानं त्यांना सेक्स एज्युकेशनची जरुरी असते.

तसं म्हटलं तर अपंग काय नि सुदृढ काय- शारीरिक व मानसिक अवस्थांबद्दलची साक्षरता सरसकट दिसत नाहीयेच. ही कोंडी फुटण्यासाठी समोर येऊन बोलायला हवं... लिहायला हवं... सिनेमा, लघुपटांसारख्या माध्यमांमधून दिसायला हवं. एक्स्प्लोअर करण्यासारखं खूप...कचरण्याचं जरा काहीतरी करायला हवं!

'सलमा'च्या 'मध्यरात्रीनंतरचे तास' मधल्या अशिक्षित बायका आता मला अधिकच पुढारलेल्या आणि मुक्त वाटू लागल्यात...

...

**सोनाली नवांगुळ**
sonali.navangul@gmail.com


**नवे कोरे**




आधुनिक पुरोगामी विचारांच्या आणि
आपल्या प्रेमाशी आणि विचारांशी एकनिष्ठ असणाऱ्या
रवीन्द्रनाथांच्या या तीन मानसकन्यांच्या कथा

**तीन सांगातिणी**

**रवीन्द्रनाथ टागोर**
अनुवाद : **सुषमा लेले**
किंमत : **१२० रु.**

# ।। लैंगिकतेची मृत्युलालसा ।।

## । संजीव खांडेकर ।

माणूस हा या अवनीवरचा प्राणी आहे की कोठून परग्रहावरून येथे पडला आणि वाढला, असा प्रश्न मला अनेकदा पडतो. याचे एक कारण म्हणजे जसे अन्य प्राणी-पशू-पक्षी मुख्यतः निसर्गाचे नियम मान्य करून, जे जमत नाही तशा परिस्थितीला सामोरे जाताना बदल करून- शारीरिक बदल करून घेतात, तसा मनुष्य राहतोच असे नाही. माणसाची उत्क्रांती ऐतिहासिकता केवळ स्वीकारण्यापुरती वा बदललेल्या परिस्थितीनुसार स्वतःच्या शरीरात बदल करण्यापुरती मर्यादित नाही, तर माणसाने अन्य प्राणी विश्वाच्या नेमक्या उलट पद्धतीने आपला उत्क्रांतीचा रस्ता निवडला. स्वतःत बदल करणे व (बदलत्या परिस्थितीत) वेगाने बदल करणे कदाचित शक्य न झाल्याने, त्याने परिस्थितीलाच म्हणजे निसर्गालाच बदलणे, वा अनुकूल करणे या पर्यायाचा स्वीकार केला. त्यासाठी निसर्गाची गुपिते उलगडली व त्याला वश केले; किंवा प्रसंगी निसर्गाबरोबरच युद्ध छेडले- समुद्र हटवला, झाडे लावली, कापली, जमिनी सपाट केल्या, शेती केली, झाडांची प्रत, फुलांचे रंग व फळांची चव बदलली. अन्य प्राण्यांना निसर्गाने बहाल केलेल्या कातडी, नखे, दात वास घेण्याची अति सूक्ष्म व्यवस्था, रात्री दिसण्याची क्षमता, पंख, कल्ले, वेग या व अशा अनेक देवदत्त देणग्या नसतानाही त्याने त्या झगडून मिळवल्या. नैसर्गिक सिम्बॉयसिस किंवा सहजीवनाच्या उतरंडीमध्ये माणसाचे नाते हे नेहमीच डायलेस्टिकल किंवा परस्परविरोधी संबधांतून आकाराला आले.



मानवी व्यवहार म्हणूनच केवळ जैविक- बायॉलॉजिकल न राहता, उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यात तात्त्विक प्रश्नाने भारलेले, बदलाच्या राजकीय प्रेरणेने प्रेरित झालेले दिसतात. रिचर्ड लेवोन्टिन या प्रसिद्ध मार्क्सवादी अनुवंश शास्त्रज्ञाने लिहिलेल्या 'बायॉलॉजी ॲज आयडिऑलॉजी' व 'ट्रिपल लिक्स' या दोन्ही पुस्तकांत माणसाचा जनुकीय ठसा त्याच्या राजकीय इतिहासाचा वारसा घेऊनच कसा उमटतो, याचे विवेचन आले आहे.

मॉस्लोची गरजांची उतरंड हा प्राथमिक मानसशास्त्र धडा गिरवताना सुलभतेने मनोव्यापारांची गुंतागुंत समजावी यासाठी दिलेला पहिला पाठ असतो. या उतरंडीत 'भूक, तहान व मैथुन' या तीन गरजा मूलभूत मानून, त्यांना उतरंडीच्या सर्वांत खाली– पिरॅमिडच्या पायात, सर्वांत मोठ्या जागेत बसवण्यात आले आहे. बहुतांश मनुष्यांचा वेळ व आयुष्य या गरजा भागवण्यात वा त्या गरजांपुरतेच असते व राहते असा त्याचा निष्कर्ष.

मानवाव्यतिरिक्त या पृथ्वीतलावरील अन्य प्राणिमात्रांचे जीवन या तीन गरजांपुरतेच मुख्यतः सीमित असते. यामुळे आपल्याला कुत्रा कविता करताना  किंवा हरिण शिल्प निर्माण करताना, पुस्तक लिहिताना वगैरे दिसत नाही.

**आणि महत्त्वाचे असे की, या तीन गरजा भागवताना मनुष्याखेरीज अन्य प्राणी केवळ जैविक इच्छेनेच व जैविक इच्छा भागवण्यासाठीच खातात, किंवा (पाणी) पितात, किंवा मैथुन करतात.**

**भूक लागली नसताना खाणे, तहान लागली नसताना पिणे वा जैविक प्रेरणेशिवाय मैथुन करणे, हे फक्त माणूसच करतो. राजकीय व तात्त्विक प्रश्न, प्रेरणा, इच्छा, कामना, मोह यांच्या अस्तित्वामुळे मानवी आयुष्यात या मूलभूत इच्छाअभिव्यक्तीत व त्यांच्या पूर्ततेत शेकडो पदर व पैलू प्राप्त झाले आहेत.**

अन्नाचे लाखो प्रकार व ते 'एकत्र वा मिळून' खाण्याच्या हजारो पद्धती, पाण्याचे वा पेयांचे तसेच; तर मैथुनाच्या बाबतीत पृथ्वीवरील अन्य कोणत्याही प्राण्यापेक्षा वेगळे व जैविक प्रेरणांखेरीज अन्य विविध प्रेरणांनी रंगवलेले रती-मदन आयुष्य माणसाने त्याच्या उत्कांतीच्या इतिहासात मिळवले आहे.

माणूस हा असा एकमेव जीव आहे की, जो जवळपास आयुष्यभर मैथुन करू शकतो, वा इच्छा धरतो. अन्य प्राण्यांत मादी माजावर असेल तरच व तेवढाच तिच्या संमतीने संभोग होतो. माणसाचे तसे नाही. उत्क्रांतीच्या कोणत्या टप्प्यात व कोणत्या कारणाने माणसाला ही दिव्य शक्ती प्राप्त झाली याचे आज तरी कोणतेही उत्तर माझ्या वाचनात आलेले नाही. माझ्या दृष्टीने या प्रश्नाचे उत्तर माणसाची राजकीय इच्छाशक्ती असेच आहे. त्यावर सवडीने वेगळे पुन्हा कधीतरी सविस्तर लिहावे, अशी मनीषा आहे.

राजकीय इच्छाशक्तीतून निर्माण झालेल्या अन्य दोन महत्त्वाच्या सिद्धी म्हणजे (वि)ज्ञान व कला(कृती). त्यामुळे लैंगिक प्रेरणांचा त्यांच्याशी निकटचा संबंध आहे. 'उत्क्रांतीशास्त्राच्या' अंगाने विकसित झालेला समाज व मानसशास्त्राच्या, जैव व जनुक शास्त्राच्या अनेक अभ्यासकांच्या मते लैंगिक प्रेरणा– डार्विनचे 'लैंगिक निवड'शास्त्र हेच विज्ञान व कला या दोहोंचा पाया आहे. आणि लैंगिक प्रेरणा मूलतः राजकीय असतात, असे माझे मत आहे. अनेक राजकीय प्रेरणा या लैंगिक असतात, या अंगाने मुख्यतः विचार झालेला दिसतो. परंतु त्यात तथ्य असले तरी सत्य असेलच असे नाही.

लैंगिक प्रेरणा या राजकीय असतात या विधानात लैंगिकतेच्या जैविक– शारीरिक- बायॉलॉजिकल धारणा नाकारण्याचा माझा हेतू नाही. परंतु मानवी उत्क्रांतीच्या विविध टप्प्यांत लैंगिकतेच्या शारीर जाणिवांचा संकोच, तर राजकीय जाणिवेचा विस्तार झालेला मला जाणवतो. इतिहासाचार्य राजवाडेंच्या 'कुटुंबसंस्थेचा इतिहास' या पुस्तकात व त्या पुस्तकाला लिहिलेल्या कॉ. डांगेच्या प्रस्तावनेत माझ्या विधानाला पूरक अशा पुराव्यांची जंत्री जशी मिळते, तशीच ती गेल्या पंचवीस वर्षांत विकसित झालेला इव्हॉल्युशनरी मानसशास्त्राच्या व संज्ञाप्रवाह अभ्यासशास्त्राच्या विविध प्रयोगांतून मिळते. फ्रॉईड व त्याच्या शिष्य संप्रदायाने या विषयात उघडलेले एक कवाड आता शेकडो दालनांनी भरलेले व म्हणूनच अधिकाधिक जटिल, नवनवी गुपिते  उघडणारे एक नवेच विश्व बनले आहे.

माणसाच्या लैंगिक इच्छांचे दमन किंवा नियंत्रण करून येथील संस्कृतीचा विकास कसा कसा झाला, याचा इतिहास राजवाडेंच्या पुस्तकात जसा आहे तसाच तो पुढे मार्क्स व एंगल्सच्या 'कुटुंब संस्था व शासन संस्था' या पुस्तकात राजकीय अंगाने उघडतो. लैंगिकतेच्या व लिंग विशिष्टतेच्या दमनात राजकीय शक्तीचा उगम व विस्तार दडलेला आहे. गेल्या काही वर्षांत स्त्रीवादी विचारवंतांनी व उत्क्रांती मानसतज्ज्ञांनी स्त्रीच्या लैंगिकतेचा व लिंग विशिष्टतेचा नव्याने अभ्यास केला आहे.

मानवी संभोग पुनरुत्पादनासाठीच मर्यादित न राहिल्यामुळे– व तरीही पुनरुत्पादनाच्या मूलभूत जैविक प्रेरणेवर रचला गेला असल्याने, हा संभोग नेमका कशाकशासाठी, हा प्रश्न गेल्या शंभर-सव्वाशे वर्षांत अधिक प्रकर्षाने पुढे आला.

पुनरुत्पादनाची मूल्ये व सूत्रे बाजूला ठेवून मानवी लैंगिकतेकडे कोंडलेल्या इच्छांचे भांडार म्हणून पाहण्याचे, व्यक्ती व समाज यांच्यातील संवादी व विसंवादी सूरांचे अर्थ अशा दाबलेला इच्छांच्या व त्यांना मुक्त करणाऱ्या प्रयत्नांच्या शृंखलेत उलगडण्याचा व म्हणून माणूस व समाज यांच्याकडे नव्याने पाहण्याचा आरसा फ्रॉईडने आपल्याला प्रथम पुरवला. फ्रॉईडच्या चिंतनात स्त्रीच्या लैंगिकतेकडे पारंपरिक पद्धतीने पाहण्याची मर्यादा जरी असली तरी, त्याने आपल्याला प्रथमच स्वतःशी बोलायला शिकवले असो.

सारा निसर्ग केवळ पुनरुत्पादनाच्या इच्छेने मैथुनाकडे पाहत असताना माणूसच मैथुनाकडे, संभोगाकडे पुनरुत्पादनाखेरीज

लैंगिक गरज, क्षुधा व तृष्णा म्हणून का पाहतो. ही कसली भूक माणसालाच लागते, या कोणत्या तहानेच्या शोधात तो वणवण करतो, ही गरज वा भूक स्त्री-पुरुषांना समान आहे की वेगवेगळी, कोणाची जास्त वा कमी, किती व का, किती मुक्त किती बंदिस्त, अडकलेली की अडकवलेली, तिचे सामान्य नियम कोणते व विशेष कोणते, हे व असे अनेक प्रश्न आपल्या सगळ्यांच्याच तात्त्विक व मटेरिअल जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. मानवाच्या विकासाच्या अंतिम टप्प्यावर मार्क्सला तो माणूस 'इरॉटिक्स व आर्ट' या दोन कृतींत रममाण झालेला दिसतो. अशा आनंदी समाजात 'युद्धखोरी' नसेल असे तो व त्यानंतर ॲगमबेनपर्यंत अनेक विचारवंत ठासून सांगतात. युद्धखोरी नसलेला म्हणजेच 'न राजकीय' की युद्धखोरी नसावी म्हणून राजकीय समाजनिर्मिती असा तो विचार आहे.

मानवी लैंगिकता ही फक्त नैसर्गिकच नाही. ती नैसर्गिक तत्त्वानुसार जरी प्रवण होत असली तरी अनेक अनैसर्गिक प्रेरणांमधून निर्माण झाल्याने, व्यामिश्र व बहुपदरी आहे. भाषा, संस्कृती, कला व राजकारण यांच्या प्रेरणा व प्रभावातून ती उद्दीपित होते आणि तिच्या पूर्ततेसाठी दोन स्वतंत्र मानवांची, स्त्री आणि पुरुषांची गरज असल्यामुळे, ती एकट्यापुरती न राहता दोघांची होते. (पुनरुत्पादनाची जोड असल्याने सामाजिक व राजकीय होते.) पुनरुत्पादन नसताना रंजनापासून समाधिस्त चिंतनापर्यंत अबोधाचे आविष्करण म्हणून भाषा आणि सामाजिक किंवा सांस्कृतिक उद्‌गार म्हणून सामर्थ्य, आणि राजकीय गरज म्हणून... अशी ती कशीही प्रगटते.

फ्रॉईडचे लेखन मी अनेकदा वाचतो, चाळतो. त्याचा 'Beyond the Pleasure Principles हा निबंध मी अनेकदा पाहिला, वाचला. हा निबंध फ्रॉईडच्या आधीच्या कामापेक्षा वेगळा व त्याच्या कारकिर्दीच्या जवळपास मध्यावर १९२० साली लिहिला आहे. त्या आधीच्या काळात फ्रॉईडने मानवी संबंध, विकार, व आचार हे मुख्यत: मानवी लैंगिकतेच्या दमन-शमन क्रिया-प्रतिक्रिया म्हणूनच स्पष्ट केले आहेत. इरॉस व लिबिडो हा त्याच्या चिंतनाचा गाभा. मात्र या निबंधात प्रथमच व अधिक स्पष्ट झालेली डेथ ड्राईव्ह (थॅनटोस) म्हणजे मृत्यूची इच्छा किंवा मरणाची आस या नव्या अंतःप्रेरणेविषयी विस्ताराने लिहिले आहे.

**फ्रॉईडची 'मृत्युप्रेरणा' मला नेहमीच वेगवेगळ्या कारणांनी खुणावत राहते. याचे मुख्य कारण म्हणजे- या कल्पनेच्या धारणेत जीवशास्त्र, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान व पुराणकथा अभ्यास किंवा आदिबंधात्मक जाणिवा असा विविध शास्त्रांचा संगम तेथे आढळतो. आज आपण जेव्हा इव्होल्युशनरी मानसशास्त्राचा वा जाणीवशास्त्राचा अभ्यास करतो तेव्हा या शास्त्रांची मुळे फ्रॉईडच्या व त्याआधी मार्क्सच्याही लेखनात सापडतात, ही गंमत आहे.**

'मृत्युप्रेरणा' ही फ्रॉईडच्या सिद्धान्ताचा दुसरा पक्ष म्हणून अवतरते. म्हणजे इॅरॉस किंवा लिबिडो हा भाग जर सर्जनशील वृत्तींचा, जीवनाची प्रेरणा जर 'सुखा'च्या शोधात, तर 'मृत्युप्रेरणा' ही उलट बाजूने म्हणजे एक विध्वंसक शक्ती म्हणून जन्माला येते. सजीवाचे निर्जिवात रूपांतर करण्याची इच्छा म्हणून ती प्रकटते.

फ्रॉईडच्या अभ्यासकांनी व अनेक मानसतज्ज्ञांनी या दोन स्वतंत्र इच्छा आहेत व लैंगिकता (लिबिडोसकट) हा इरॉसचा भाग आहे, असे मानले आहे.

मला ही विभागणी मान्य नाही. माझ्या मते, मानवी लिबिडोचा जीवनइच्छेचा प्रत्येक कण परमाणू मॉलिक्यूल हाच मुळी इॅरॉस व डेथ ड्राईव्ह अशा दोन्ही प्रेरणा घेऊनच बनला आहे. जीवनेच्छेमध्येच मरणेच्छा समाविष्ट असते. मानवी लैंगिकतेचा आविष्कार, निर्माण व तिचे आविष्करण अशा परस्परविरोधी, द्वंद्वात्मक प्रेरणांनी बनलेले असते. लिबिडो म्हणजेच हे द्वंद्व होय.

एकदा का आपण ही द्वंद्वात्मक भूमिका समजून घेऊ लागलो की, मानवी लैंगिकतेच्या, पुनरुत्पादनासाठी वा पुनरुत्पादनाशिवाय, अशा असामान्य, अविरत व सर्वसमावेशी लैंगिक धारणेमागची परस्परविरोधी सत्ये समजून घेता येतात.

जीव जन्माला घालण्यासाठी व मरण्या-मारण्यासाठी या प्रेरणा मानवी जीवनाला चहूबाजूंनी कशा व्यापून टाकतात, याची कल्पना इरॉस व डेथ ड्राइव्ह या दोहोंच्या एकत्रित परिणामात समजू शकते.

फ्रॉइडच्या मते, मृत्युप्रेरणेचे दमन हे संस्कृतीकरणाचे एक मुख्य कार्य आहे. माझ्या मते, लैंगिकतेचे दमन व व्यवस्थापन हे संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेचा गाभा आहे. मृत्युप्रेरणेचा आविष्कार एका पातळीवर विध्वंसक, तर दुसऱ्या पातळीवर नवनिर्मितीचा साधक, असा दुहेरी आहे.

फ्रॉइडच्या 'मृत्युइच्छे'च्या गर्भात त्याला विनाशाची बीजे दिसली होती. युद्धखोरीचे मूळ अशा इच्छेच्या मातीवर असे त्याचे मत होते आणि 'लिबिडो' किंवा जीवनइच्छेच्या गठितामध्ये इरॉस किंवा लैंगिक वासना व मृत्युलालसा या दोहोंचे प्रतिबिंब असते, असे माझे प्रतिपादन आहे.

जीवनेच्छेचा व वरील दोन वासनांच्या दमनाचा सामाजिक व राजकीय व्यवस्थेवर कसा परिणाम होतो, या लालसेच्या दमनातून सामाजिक नीतिनियमनाची कशी बांधणी होते, याचे विवेचन अनेक विचारवंतांनी केले आहे.

भांडवलशाहीच्या एक टप्प्यापर्यंत अशा दमनाचा उपयोग व्यवस्थेचा पाया प्रस्थापित करण्यात खर्च झाला. असा दबाव तेजांच्या विरुद्धचा उठाव 'द अदर' किंवा 'नियंत्या'च्या विरोधी उठलेला आवाज आहे, असे सांगत तो दाबण्याचे प्रयत्न करण्यात आले.

भांडवलशाही व्यवस्थेचे यश मुळातच मुक्त अर्थव्यवस्थेत दडलेले आहे. अशी व्यवस्था व्यक्ती आणि व्यक्तिविशिष्ट स्वातंत्र्यावर भर देते; सामाजिक स्वातंत्र्यावर नव्हे. अशा व्यक्तिस्वातंत्र्याचे एक मॉडेल तयार करण्यात येते व नकळत त्या मॉडेलप्रमाणे व्यक्त होणे म्हणजेच मुक्त होणे, असे प्रत्येक व्यक्ती मानू लागते. म्हणजेच मुक्तीतच दमनाचे तंत्र वापरावे, स्वातंत्र्यातच

पारतंत्र्याची बेडी अडकावी, 'डाळिंबाचे दाणे वेड्या घात तुझा करती' या उक्तीनुरूप पिंजऱ्याचेच उदात्तीकरण करण्याचा हा खेळ असतो.

स्वतःचे वेगळे वा स्वतंत्र अस्तित्व म्हणजे स्वतःची स्वतः उपभोगाची वेगळी वस्तू असणे, असा स्वातंत्र्याचा गुळगुळीत अर्थ, अशा वेळी तयार होतो. पब्लिक किंवा सार्वजनिक उपयोगापेक्षा प्रायव्हेट किंवा खासगी उपक्रम हाच कसा श्रेष्ठ आहे, व अशा व्यवस्थेत व्यक्तीच्या अंगीभूत गुणाला अधिक क्षमतेने कसे प्रकटता येते, त्यांचे कसे चीज होते, यांना कसे अधिक मोल मिळते, यांचे तत्त्वज्ञान तयार केले जाते. व्यक्ती-व्यक्तीमधील स्पर्धा वाढवली जाते. 'युद्धखोरी'ला मात करण्याला प्रतिष्ठा मिळू लागते. जगण्याची व्याख्या जिंकणे वा हरणे अशी व एवढ्यापुरतीच केली जाऊ लागते. जिंकण्याची नशा चढून वेगाने धावणारी व्यक्ती, तिने पार केलेले नवनवे उच्चांक व तिने हरवलेल्या- मागे टाकलेल्या सीमारेषा यांचे नवे सौंदर्यशास्त्र बनू लागते. युद्धखोरीला सौंदर्यानुभवाचा दर्जा देणे, म्हणजे खून-बलात्काराला मान्यता देणे असा होतो, याचा विचार न होता, खून-बलात्कारांचे विश्लेषण 'जिंकण्या-हरण्याच्या' नैराश्यांशी व व्यक्तिगत दुबळेपणाशी व व्यक्तिस्थित व्यंगापुरते मर्यादित राखण्यात येते.

दुर्बळ, गरीब, मागास, वर्गाची स्पर्धा सबल, श्रीमंत, पुढारलेल्या वर्गाबरोबर लावण्यासाठी व अशी स्पर्धा कशी योग्य व तात्त्विकदृष्ट्या श्रेष्ठ आहे हे पटवण्यासाठी बुद्धिवंतांची प्रतिभा भराऱ्या घेऊ लागते. आरक्षण कसे गुणवंतांची गळचेपी करते याचे समर्थन अशा निर्लज्ज व्यक्तिविशिष्ट मुक्तीच्या कल्पनेचेच एक नवे भारुड बनते.

युद्धखोरीचे उदात्तीकरण, व्यक्तिनिष्ठतेचे समर्थन, जिंकण्याचे जीवनतत्त्वज्ञान व हरवण्याची सक्ती यांतून एका बाजूला व्यक्ती व समाज यांतील अंतर वाढते; तर राष्ट्रीयत्व, जातपात, वर्ण, प्रांत, भाषा अशा व इतक्याच परिमाणांमध्ये 'सामाजिकता' गठित व म्हणून कुंठित होऊ लागते. फ्रॉईडच्या 'मृत्युइच्छे'च्या संकल्पनेचे असे रूपांतर भांडवली व्यवस्थेला आवश्यक वाटते; कारण सामाजिक किंवा राजकीय नव्हे, तर व्यक्तिगत स्वातंत्र्याच्या कल्पनेवरच बाजाराची- विशेषतः ग्राहक बाजारपेठेची प्रगती अवलंबून असते. जे जे पब्लिक किंवा सार्वजनिक,ते ते निकृष्ट वा बिनफायद्याचे व जे जे प्रायव्हेट किंवा खासगी, ते उत्कृष्ट व किफायतशीर असे एकदा मान्य झाले की, आपोआपच व्यक्तीच्या गरजा वाढतात, मालाचा उठाव वाढतो, उत्पादनाचे आकडे वाढतात, बाजारपेठा गरजेपेक्षा कित्येक पटींनी अधिक अशा मालाने खचाखच भरून वाहू लागतात. डझनावारी शॉपिंग बॅगांचे ओझे घेऊन माणूस घरी येतो. 'शॉप शॉप टिल यू ड्रॉप' अशा उथळ व बेशरम घोषणेला धर्माज्ञेचे स्वरूप येते. उधळपट्टी वाढते. वाढलेली उधळपट्टी हा मानदंड बनतो. अधिक उधळणारा अधिक वाया घालवणारा बलिष्ठ किंवा नेता बनतो. उधळणे व वाया घालवणे याला सौंदर्याचे निकष मानले जाऊ लागते. त्यासाठी लागणारा पैसा कोठूनही कसाही आणला तरी अशी व्यवस्था प्रश्न विचारीत नाही. कुणी विचारलाच तर त्यांचे आवाज गप्प करणे, त्यांना विकासविरोधी किंवा देशविरोधी मानून त्यांना नष्ट करणे, यातच कायदेपंडितांची बुद्धी खर्च होते.

सार्वजनिक वाहन, इस्पितळ, शाळा वा तत्सम पायाभूत गरज व सोयी वापरणारा साहजिकच या व्यवस्थेत बाजूला फेकला जातो. सामान्याला डावलून वा प्रसंगी त्याची नैतिक धारणा बदलून अशी 'मुक्त' व्यवस्था लोकशाहीचा पायाच उद्‌ध्वस्त करते.

'आणखी' 'मोअर' (More) आणि 'पुन्हा एकदा' (Encore) अशी धारणा समाजाच्या प्रत्येक व्यवस्थेत निर्माण होते. अतृप्त, भुकेली, असंतुष्ट आणि स्पर्धात्मक जाणिवेने मारलेली, युद्धखोर व्यक्ती व म्हणून हिंसक समाज ही अशा व्यवस्थेची ओळख असते.

अशा व्यक्तीची वा समाजाची 'लिबिडो' किंवा जीवनेच्छा ही प्रेम वा परस्परसंवाद या भावनेवर वा इच्छेवर नव्हे, तर विनाशकारी युद्धखोर मृत्युलालसेवर उभी राहते.

समाधानाचे कोणतेच मानक नसलेल्या भाषेत मनोरुग्ण समाज निर्माण झाला नाही तर नवलच. मनोरुग्ण समाजाची निर्मिती ही भांडवलशाही व्यवस्थेचा परिपाक आहे.

मानवी लैंगिकता ही केवळ शारीरिक नसते. मानवी लैंगिकता ही साऱ्या मानवी व्यवहारातून सतत व सातत्याने उत्सर्जित होत असते; किंबहुना ती तशी नसते म्हणूनच जैविक प्रेरणेशिवाय, प्रजोत्पादनाच्या नैसर्गिक उद्दिष्टाशिवाय मानवी लैंगिक व्यवहार अहोरात्र, आयुष्याच्या अंतापर्यंत सुरू असतात.

त्या त्या समाजाचे व्यवहार त्या त्या समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय जीवनातून प्रकट होत असतात. म्हणजेच सामाजिक वा राजकीय, सांस्कृतिक वा कलात्मक आविष्कार हेच त्या त्या समाजाची त्या त्या वेळी लैंगिकता समजून घेण्याचे आरसे असतात.

मनोरुग्ण समाजाची लैंगिकता समजून घ्यायची असेल तर या व्यवहारांकडे लक्ष पुरवणे आवश्यक आहे. जागेअभावी अशा सर्व व्यवहारांचा धांडोळा घेणे शक्य नसले तरी काही उदाहरणे समोर ठेवून आपल्याला शिताभाताची परीक्षा करणे सहज शक्य होईल.


उद्‌ध्वस्त नातेसंबंध, अविश्वास, वाढणारे बलात्कार, बलात्कारातील बीभत्स क्रौर्य, दहशतवाद, धार्मिक उठाव, अल्पसंख्याकांवर अन्याय, वर्ण व भाषा वाद, जगाच्या प्रत्येक देशात व शेजारच्या देशात चाललेली शेकडो युद्धे, आत्मघाती हल्ले, कोवळ्या मुलांवर, अति अल्पवयीन मुलींवर होणारे लैंगिक अत्याचार, बेबंद फ्लर्टिंग, कर्जबाजारी समाज व मोडकळीस आलेले संस्थात्मक जीवन, कलेचा बाजार, आरक्षणाला विरोध व प्रबळांनी मागितलेले आरक्षण, जर्मन विंग्जच्या पायलट विमानातील शेकडो प्रवाशांसह केलेली आत्महत्या, गोऱ्या पोलिसांनी मारलेली काळी तरुण मुले, सार्वजनिक ठिकाणी विनाकारण अंदाधुंद गोळीबार करून अनेकांना ठार मारणे व शेवटी स्वतःला

संपवणाऱ्या तरुण मुला-मुलींच्या संस्थेत झालेली वाढ, झाडे, प्राणी, निसर्ग वाचवण्यासाठी जीव देणारे तरुण, स्त्रिया, गरीब, दलित यांच्या अधिकारासाठी मरणाऱ्या कार्यकर्त्यांच्या चळवळी, पुसी रायट ते कबीर जथ्थे यापर्यंत रस्त्यावर उभी राहणारी कला पथके व त्यांना देशद्रोही ठरवणारी यंत्रणा, मानवी अधिकार, गुलामीला विरोध, बालमजुरीचा निषेध करणाऱ्यासाठी गोळ्या खाणारी माणसे, तेलाच्या अर्थस्रोतासाठी देशादेशात वणवे पेटवणारी यंत्रणा... या व अशा शेकडो-हजारो घटना म्हणजेच इरॉस, म्हणजेच लिबिडो, म्हणजेच लैंगिक व म्हणून जीवनइच्छेच्या प्रेरणा.

रुग्ण समाजाच्या विकृत वासना आज नकळत आपल्या सर्वांच्याच अतिखासगी आयुष्यातील लैंगिक सणांच्या, आपल्या शृंगाराच्या आणि संभोगाच्या प्रेरणा बनून आपले सार्वजनिक आयुष्य बिघडवत असतील तर आपण स्वीकारलेला मुक्त व्यवस्थेचा पर्याय शोधणे म्हणजेच आपला प्रियकर किंवा प्रेयसी शोधणे असा व इतकाच त्याचा अर्थ नव्हे काय?

**संजीव खांडेकर**
sanjeev.khandekar@gmail.com

नवे कोरे




भटक्या जमातीची दुःखे,
त्यांच्या व्यथा, वेदना,
स्त्रियांचे पशुतुल्य जीवन,
त्यांच्या रूढी, परंपरा, चालीरीती,
अंधश्रद्धा, अशिक्षितपणा
या विषयीचा सत्य वृत्तान्त
सांगणारी कथा


धबाक

दादासाहेब मोरे
किंमत : २५० रु.

नवे कोरे


# जेफ्री आर्चर यांचे नवीन साहित्य

अनुवाद : लीना सोहोनी




हॅरी क्लिफ्टनच्या अस्तित्वाची ही लोकविलक्षण कहाणी वाचकाला एका प्रदीर्घ प्रवासाला घेऊन जाते. वाचकासमोर एक भलं मोठं प्रश्नचिन्ह उभं करते आणि विचार करायला भाग पाडते.

## ओन्ली टाइम विल टेल




या महाकादंबरीत जसजशी एक-एक करून कौटुंबिक रहस्यं उलगडत जातात, तसतशी त्या परिवाराच्या सदस्यांची निष्ठापणाला लागते. एका रहस्यमयी प्रदीर्घ प्रवासाची अनुभूती.

## द सिन्स ऑफ द फादर

साधारण नव्वदीचा काळ. उदारीकरणाचे वारे घुमायला लागलेले. अशात दैनंदिन जीवनात बऱ्यापैकी प्रभाव पाडणाऱ्या हिंदी चित्रपटांत याचे प्रतिबिंब उतरायला हरकत नव्हती. त्यात मग 'राईट सेड फ्रेड' या ब्रिटिश ग्रुपचे एक गाणे कॉपी होऊन गोविंदा-करिष्माच्या 'दुलारा' चित्रपटात आले. गाण्याचे बोल होते 'मेरी पँट भी सेक्सी'. अर्थात गदारोळ झाला नेहमीप्रमाणे. ही गोष्ट १९९४ मधली. त्याच्याच सहा महिने आधी आलेला 'खलनायक'. त्यातले 'चोली के पीछे क्या है' हे गाणे. यावरदेखील तुफान राडा झालेला. यथावकाश आपण पुढे सरकलो. आता ही गाणी आपल्याला तितकीशी 'वाईट' वाटत नाहीत. आपल्याला म्हणण्यापेक्षा त्या वेळी गदारोळ करणाऱ्या पिढीला वाटत नसावीत. सर्रासपणे ती ऐकली जातात. तर याला काळाबरोबर आपल्याला आलेली प्रगल्भता म्हणायची की, 'वय वाढले की केस पांढरे तर होणारच,' असा निसर्गाने आपल्यावर थोपलेला दत्तक नियम म्हणायचा?

असो. तर अश्लील भाषा ही सापेक्ष असते असे म्हटले तर वावगे ठरेल असे वाटत नाही; पण त्यातल्या त्यात 'सो कॉल्ड' समाजमान्य सभ्य भाषेपासून फारकत घेऊन बोलल्या जाणाऱ्या भाषेबद्दल बोलू.

आपल्याकडे फेसबुक आणि ट्विटर या दोन मीडियांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. आता रेड-इट या मीडियांचा वापर वाढू लागला आहे. जसे ओर्कुट- नंतर फेसबुक- नंतर ट्विटर असे वळण लागले, तसे आता रेड-इटकडे आपले लक्ष जाऊ लागले आहे, असे म्हणता येते. सोशल मीडिया हे म्हणजे एका मोठ्या समूहाला आपली मते मांडण्यासाठी मिळालेले प्रचंड मोठे व्यासपीठ आहे. कोणीही यावे आणि आपल्याला काय वाटते ते बोलून जावे, असे स्वरूप सोशल मीडियाचे राहिलेले आहे. संवाद वेगवान होत चालला आहे. हा संवाद वेगवान होत असतानाच संवादाची भाषादेखील बदलत चालली आहे. आपण एरवी जसे बोलतो,

# ।। सोशल मीडियावरची ती भाषा ।।

### । अविनाश वीर ।



तसेच सोशल मीडियावर बोलतो असे सरसकट म्हणता येत नसले तरी, अगदी नाकारतादेखील येणार नाही, अशी परिस्थिती आहे. आपल्याला पूरक किंवा आपल्या भूमिकेशी मेळ खाणारी भूमिका दिसली की आपली भाषा मवाळ किंवा संवादाच्या सुराची असते; आणि जर ती आपल्या भूमिकेच्या विरोधातली असेल तर अतिरेकी पद्धतीने त्याचा प्रतिवाद करणारी भाषा वापरली जाते. याला काही अपवाद नक्कीच आहेत. थोडासा विचार केला तर, ज्यांना सोशल मीडियावर टिकून राहायचे आहे, ते सहसा संवादाच्या भूमिकेत असतात. तर ज्यांना दोन घटका येऊन करमणूक करून घ्यायची आहे, ते सहसा अशा अतिरेकी भाषेचा वापर करताना दिसतात. यात थेट आई-बहिणीवरून शिव्या किंवा जातीवरून शिव्या प्रकर्षाने दिसतात. आता ब्लॉक वगैरेसारखी अस्त्रे असल्याने अशा भाषेवर मात करता येते. पण 'फेक अकाउंट' हे दुधारी शस्त्रदेखील सहजरीत्या उपलब्ध असल्याने, बरेच जण त्याचा आधार घेऊन आपली भडास काढायचा प्रयत्न करत असतात. अशा अतिरेकी भाषेचा काही जण त्याच भाषेत प्रत्युत्तर देऊन समोरच्याला निरुत्तर करताना दिसतात. असे निरुत्तर करणारे सोशल मीडियावर जास्त प्रसिद्ध असल्याचे दिसते. 'खूप शिव्या द्यायचा ना; कशी जिरवली त्याची' असा विचार करणारी मंडळी या निरुत्तर करणाऱ्या लोकांच्या प्रेमात असतात. ब्लॉक करणे हा पळपुटेपणा आहे, असे मानणारेदेखील सोशल मीडियावर कमी नाहीत. फेक अकाउंट रिपोर्ट करणे हे आता आता लोकांना नीटसे कळू लागले आहे.

हे झाले फेसबुकबद्दल. ट्विटरची दुनियाच न्यारी आहे. कमी शब्दांत जास्त टिवटिव म्हणजे ट्विट करायचे असल्याने, इथे मर्यादा पडतात. 'थोडक्यातच परिणामकारक लिहा' असा ट्विटरचा बाणा असल्याने, बऱ्याच जणांना आपला निबंध लिहिणारा हात आखडता घ्यावा लागतो. थोडक्यातच लिहायचे असल्याने, इथे शब्दांशी अगणित वेळा खेळायचे असते. त्यात बऱ्याच जणांची कसरत होते. मग आपल्याला काही पटत नसले की सरळ शिव्या घालून मोकळे व्हायचे, अशी रीत इथे असते. इथे फेक अकाउंटचे प्रमाण भयंकर आहे. राजकीय पक्षांचे कार्यकर्ते कायम एकमेकांना भिडत बसलेले असतात. शेलक्या शिव्यांचा वापर तर सर्रास केला जातो, जे प्रमाण फेसबुकवर त्यामानाने कमी आहे, असे सहजच म्हणता येईल. तरीपण वेगवान माहिती मिळवण्यासाठी बरेच जण ट्विटरचा आधार घेतात. 'ट्विटर हे इंटरनेटपेक्षाही फास्ट आहे' असे म्हटले तरी अतिशयोक्ती ठरणार नाही. मराठी देवनागरी भाषेचे आणि ट्विटरचे काही जमत नाही असे बऱ्याचदा वाटते. काल-परवाच बातमी वाचली की ट्विटरचा मेनू आता मराठी भाषेतदेखील दिसू लागणार आहे. याआधी तो फक्त हिंदी आणि बंगाली भाषेतच उपलब्ध होता. निदान यामुळे तरी एकंदरीत मराठी भाषा खूप प्रमाणात ट्विटरवर वापरली जाईल, अशी आशा धरायला हरकत नाही.

सध्या भारतात हळूहळू...पण वेगाने लोकप्रिय होत जाणारा सोशल मीडिया म्हणून रेड-इटकडे पाहिले जाते. ट्विटर वापरणारी बरीच मंडळी या मीडियाकडे वळताना दिसतात. इथे विविध विषयांवर चर्चा होताना दिसतात. इथली एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे मॉडरेटस. रेड-इटचे मॉडरेटर्स भाषेसंबंधांत जरा जास्तच जागरूक असल्याने, शिव्यांचे प्रवाह आणि प्रमाण इथे कमी आढळते. तरीपण 'चोर हा पोलिसापेक्षा थोडासा हुशार असतो' या उक्तीनुसार त्यातदेखील शब्दांचे खेळ करून आपले घोडे पुढे दाटणारे बरेच जण सापडतात. पण रेड-इटवाले बऱ्यापैकी जागरूक असल्याने, हा खेळ फार चालत नाही.

सोशल मीडियावर- विशेषतः फेसबुकवर विविध विषयांना वाहिले जाणारे ग्रुप्स आहेत, जे खूप सक्रिय असतात. त्यातल्या त्यात धार्मिक आणि राजकीय ग्रुप्स तर नको तेवढे सक्रिय असतात. त्यात बऱ्याचदा विधायक चर्चा कमी आणि विरोधी कॉमेंट्स जास्त पाहायला मिळतात. एक उदाहरण घेऊ. एखादी पोस्ट ग्रुपवर टाकली जाते. अ आणि ब त्याला समर्थन करणाऱ्या कॉमेंट्स टाकतात. क आणि ड त्या पोस्टशी सहमत नसल्याने विरोध दर्शवतात. ई थोडे वेगळे मत मांडतो आणि पोस्ट अर्धवट माहिती देत असल्याचे दर्शवतो. क्ष हा अ आणि ब यांच्याशी सहमत आहे; पण क, ड यांनी प्रदर्शित केलेले मत त्याला पटत नाही. तो त्यांना प्रतिवाद न करता जहाल भाषेत उत्तर देतो. यावरून मग झोंबाझोंबी सुरू होते. शेवट एकमेकांना शिव्या देण्यात होतो. अशा ग्रुपवर शेलक्या शिव्या दिल्या जातात, ज्यात नावीन्य आढळत नाही. भांडणारे जर वेगवेगळ्या प्रदेशांतील असतील, तर उत्तर-प्रत्युत्तरादाखल जे काही शब्द वापरले जातात, त्यांत जिज्ञासू माणसाला शाब्दिक प्रादेशिक खजिना आणि म्हणी सापडू शकतात. ती भूमिका बऱ्याचदा ई पार पाडत असतो. जर तुम्ही नीट निरीक्षण केले असेल तर अशा वादात २-३ तरी कॉमेन्ट्स अशा असतात, ज्या भाषेच्या कोंदणात नीट बसवून शालजोडीतले फटके दिलेले असतात. हा ज्याच्या त्याच्या जिज्ञासू प्रतिभेचा विषय आहे. धार्मिक ग्रुपमध्ये एकमेकांच्या श्रद्धास्थानावर जमेल त्या पद्धतीने वार करणे, हा प्रकार खूप दिसतो. त्यात बरेचसे 'कॉपी-पेस्ट' दाखले देऊन त्यावर मोठी चर्चा वगैरे घडवून आणणे दिसते. यात किती घ्यायचे आणि किती नाही, हे आकलनाच्या पलीकडले असते. साधारणपणे पुराणातल्या कथा वापरून त्याचे समर्थन/विरोध असा प्रकार इथे चाललेला असतो. त्या चर्चेला शेवट नसतो. प्रत्येक जण आपापल्या हिशोबाने, आकलनाप्रमाणे लिहीत बसलेला दिसतो. भाषेचा वापर हा कधीही कुठल्या थराला जाईल हे ठरलेले असते. श्रद्धास्थाने असल्याने, त्यांच्या विरोधात लिहिणाऱ्या कोणाबद्दलही भाषेचा जमेल तेवढा अतिरेकी वापर विरोधकाला नेस्तनाबूत वगैरे काहीतरी करायला केला जातो. कधीतरी वाटते की, अशी भाषा वापरणारे टाईप करताना कसे दिसत असतील, याचे मानसशास्त्रीय विश्लेषण व्हायला हवे. असो!

सामान्यतः महाराष्ट्रभर पसरलेल्या आणि सोशल मीडिया- विशेषतः फेसबुकवर बऱ्यापैकी सक्रिय असणाऱ्या व्यक्तींशी बोलताना असे आढळते की, त्यांना आपापल्या भागातली

बोलीभाषा या मीडियावर प्रमोट करावीशी वाटते. त्यामुळे ते खूपदा त्याच भाषेत व्यक्त होताना दिसतात- न की पुस्तकी भाषेत. दुसरी एक आढळणारी गोष्ट म्हणजे- काही शिव्या या त्या त्या बोलीभाषेचाच भाग असल्याने त्या अश्लील भाषेच्या शहरी परिमाणात बसत नाहीत. फेसबुकवर तर बऱ्याच अशा 'सो कॉल्ड' शिव्या दैनंदिन वापराच्या भाग झाल्या आहेत. बरेच जण त्या सर्रास वापरताना दिसतात. ग्रामीण भागात इंटरनेट क्रांती रुजल्याने आणि त्याला स्मार्ट फोनची भक्कम जोड असल्याने बरेचसे लोक भाषेच्या वापराबाबत थोडे सावधदेखील असतात, असे आढळते. आपण जर काही वावगे लिहिले, ते गाव-तालुक्याच्या ठिकाणी पसरले, पै-पाव्हण्यांपर्यंत पोचले तर काय, असा बराचसा सावध पवित्रा या ठिकाणी दिसतो. पण बोलीभाषेतूनच इरसाल परिणाम साधला जात असल्याने, त्याची खंतदेखील बऱ्याच जणांना वाटत नाही. साधारण सेम चित्र शहरात दिसते. नोकरदार वर्ग सहसा अशा भाषेच्या भानगडीत पडत नाही. नातेवाईक, सहकारीदेखील लिस्टमध्ये असल्याने शक्यतो पुस्तकी भाषा वापरण्याचा प्रयत्न असतो. पण जो कोणी त्यांचा राग किंवा प्रेम शिवराळ वगैरे भाषेत व्यक्त करत असेल तर ते आतून सुखावलेले दिसतात. त्यांचा अशा पोस्टला लाईक किंवा ट्विटरच्या भाषेत रीट्विट ठरलेला असतो. बरेच जण नकली अकाउंट उघडत असल्याने अशी भाषा ओळख लपवून वापरण्यात ट्विटरने नेहमीच आघाडी घेतलेली असते. आपल्याकडे ट्विटर अजूनही तितकेसे लोकप्रिय माध्यम नसल्याने, बरेच जण अशी भाषा वापरण्यासाठी ट्विटरचा वापर करतात- अर्थात बरेचसे ओळख लपवून. ओळख लपवून फेसबुकला अशा भाषेत लिहिणारे बहाद्दरदेखील सापडतात; पण कालांतराने ते फेक अकाउंट आहे म्हणून त्याच्या नादी लागणे लोक सोडून देतात, असा अनुभव आहे. स्वतःचे नाव लावून असे लिहिण्यात पराक्रम आहे, अशी बऱ्याच जणांची मानसिकता असते आणि ती चुकीची आहे, असे म्हणता येत नाही. मुद्देसूदपणे लिहिणारे आणि त्यात अशा शब्दांचा योग्य तिथे भरणा करणारे सोशल मीडियातल्या लोकांना जास्त भावतात. नुसतेच येता जाता मुद्द्यांवर न बोलता निव्वळ अश्लील बोलणारे कालांतराने नामशेष होतात. थोडक्यात, इथे जो तो आपल्या कर्माने मारतो. कर्मा इज बिच!

सोशल मीडियावर वावरणारे- विशेषतः फेसबुकवर- कुठल्या गोष्टींना लाईक किती गांभीर्याने करतात, हा संशोधनाचा विनोदी विषय आहे. बरेच जण सेक्शुअल फँटसी जपायला या 'लाईक'चा उपयोग करतात. सुंदर चेहरा असलेल्या स्त्रीची प्रोफाइल एकदा निरखून पाहा. एखादी सुंदर स्त्री- जिने नुकताच तिचा एखादा फोटो अपलोड केला आहे- तिथल्या कॉमेंट्स आवर्जून वाचाव्यात अशा असतात. काही काही कॉमेंट्स सरळसरळ लाळघोटेपणाच्या असतात. त्या सुंदर पोरीशी मग सलगी वाढवायला मेसेंजरला जाणे, फोन नंबर मिळवणे किंवा मग तसेपण काही होत नसेल तर निदान मेसेंजरवरूनच का होईना आपली भूक शमवणे, असे प्रकार सर्रास सुरू असतात.

एक उदाहरण सांगतो. एका बाईचा वाढदिवस आहे. 'मग मी तुला कशा सर्वांत आधी शुभेच्छा दिल्या' असे झेंडे मिरवायला एक जण रात्री बाराच्या ठोक्याला तिच्या फेसबुक भिंतीवर लिहितो आणि तितकाच सजग असलेला कोणीतरी त्याला लाईक करतो. आपली चोरी पकडली गेली या हिशोबात भिंतीवर लिहिणारा उसळतो. हे असले प्रकार बऱ्याचदा पाहायला मिळतात. बरे एक महत्त्वाचे म्हणजे, हे असले धंदे करणारे स्वतःच्या कुटुंबातल्या स्त्रियांना मात्र फेसबुक वाईट आहे असे सांगत स्वतःचा सोस वगैरे सोशल मीडियावर अभिमानाने मिरवत असतात. यात वयोगटच धरायचा झाला तर चाळिशीपुढचे प्रकर्षाने आढळतात. चाळीशी-पन्नाशीपुढच्या अशा काही लोकांना तर काही सुंदर पोरींनीदेखील मस्तपैकी गंडा घातलेला आहे. या सर्व संभाषणात वापरली जाणारी भाषा स्तुतिपाठकापेक्षा वेगळी नसते. किती पावले पुढे सरकत येईल या हिशोबाने एकेक प्यादे पुढे सरकवले जाते. शेवटी लॉजिक एकच असते- गाजराची पुंगी; वाजली तर वाजली नाहीतर मोडून खाल्ली!

फेसबुक चॅटिंग ही एक वेगळी भानगड किंवा प्रकरण आहे असे बिनदिक्कत म्हणता येईल. ते ए-एस-एल प्रकरण बंद झाल्यापासून काही लोक जरा थंडावले होते. पण मेसेंजरसारख्या सुविधा सुरू झाल्यापासून ते सुखावलेले दिसतात. एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या प्रयत्नांत फेक अकाउंट काढणे आणि लोकांशी सरळ सरळ अश्लील चॅट करून त्यांना नादाला लावणे, अशा बऱ्याच गोष्टी फेसबुकवर सरळसरळ घडताना दिसतात. एवढेच कशाला, तर एखाद्याचा काटा काढायचा आहे, तर पोरीचे फेक अकाउंट बनवून एखाद्या पुरुषाला गळाला लावणे किंवा एखाद्या मुलाचे अकाउंट काढून बाईला गळाला लावणे, हे प्रकार सर्रास घडतात. नियमितपणे फेसबुक वापरणाऱ्या लोकांना ते माहितीच असते. पण या प्रकरणात काय भाषा वापरून समोरच्याला गळाला लावले आहे, हे सहसा पुढे येत नाही. पण त्याने/तिने दिलेला प्रतिसाद मात्र स्क्रीनशॉटसहित एखाद्या भिंतीवर डकवला जातो. यात वापरली गेलेली भाषा ही हैदोस किंवा तत्सम जुन्या मासिकांपेक्षा वेगळी नसते. रबर कितपत ताणता येतोय इतपत ती लुटूपुटूची लढाई सुरू असते. हरतो किंवा जिंकतो कोण हे तहात ठरते इथे. सहसा तहच जास्त होतो. 'मराठी माणसे तहात हरतात' या म्हणीला इथे मात्र पूर्णविराम मिळतो, असे म्हणायला हरकत नसावी. काही दिवसांपूर्वीच सरकारने घातलेली पॉर्नवरची सरसकट बंदी काही दिवसांतच उठवली, यातच काय ते लक्षात येईल. त्याआधी सेन्सॉर बोर्डाने काही शब्द अश्लील किंवा आक्षेपार्ह म्हणून ठरवले होते, तेदेखील आता मागे घेण्यात आलेले आहेत, हे कळले. यांतले बरेचसे शब्द सर्रास वापरले जातात. एका वेबसाईटच्या निरीक्षणानुसार 'ऑर्गॅझम'हा शब्द साहित्यामध्ये विसाव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत वापरला गेला नव्हता. व्हर्जिनिटी हा शब्द जरी १९ च्या शतकात वापरला गेला असला तरी, त्याचा

खरा धुमाकूळ हा गेल्या पन्नास वर्षांतच झालेला आहे. गेल्या २०० वर्षांत साहित्यात वापरली जाणारी लैंगिक भाषा बरीच बदलली आहे, असे या वेबसाईटचे मत आहे.


जाता जाता सांगतो. एमआयटी टेक्नॉलॉजी रिव्ह्यूच्या एका लेखात असे म्हटले आहे की, सोशल मीडियावरची लोकप्रियता हा 'बहुमताचा भ्रम' असू शकतो. हे म्हणजे काय, तर वैश्विक सत्य जरी वेगळे असले तरी स्थानिक पातळीवर लोकप्रिय असणारे सत्य हे सत्य म्हणून माथी मारलेले असू शकते. त्याच अनुषंगाने असे म्हणता येईल की, सोशल मीडियावर वापरली जाणारी 'सो कॉल्ड'अश्लील भाषा ही लोकप्रिय आहे की नाही याबद्दल गृहीतक जो तो आपापल्या तर्काने मांडू शकतो!

**अविनाश वीर**
avveer@mail.com



# ।। देहधून टिपणारी कविता ।।

। उत्पल व.बा. ।



काळाच्या पटावरील कुठल्याही तुकड्यामध्ये जे जे साहित्य निर्माण झालं आहे त्यांत कविता हा साहित्य प्रकार नेहमीच लक्षवेधी ठरला आहे. प्रत्येक साहित्य प्रकाराची स्वतःची अशी काही अंगभूत वैशिष्ट्यं आहेत आणि काळाच्या प्रवाहाबरोबर त्या सर्वांनी अनेक स्थित्यंतरं अनुभवली आहेत. लेखक आणि कवी आपापल्या काळाचे प्रॉडक्ट जसे असतात, तसेच ते आपल्या काळावर स्वार व्हायचं सामर्थ्यही बाळगून असतात. त्यांची अभिव्यक्तीची निकड ही साहित्य प्रकारांच्या प्रचलित स्वरूपाची मोडतोड करणारीही असू शकते आणि अशा घर्षणातूनच काळानुरूप साहित्याचं स्वरूप बदलत राहतं. कवितादेखील त्याला अपवाद नाही.

मराठी कवितेचा वेध आजवर अनेक समीक्षकांनी अनेक अंगांनी घेतला आहे. कविता हा माझाही आस्थाविषय असला तरी कवितेबाबतची विद्याशाखीय बैठक माझ्याकडे नाही. कविता ही माझ्याकरता एक अनुभूती आहे. तिनं मला 'दर्शन' घडवलं आहे; अस्वस्थ आणि उन्नत केलं आहे आणि प्रामुख्यानं ती माझ्याकरता 'क्रिएटिव्ह जीनियस'चा आविष्कार म्हणून समोर आली आहे. मला खरं तर कवितेविषयी काही बोलूच नये, कविता शोधत हिंडावं आणि कुठली कविता आपल्याला 'खतम' करतेय ते पाहावं, इतकंच वाटतं. एखादी कविता आपल्यावर अतिशय तीव्र आघात करते, एखादी कविता केवळ तिच्या शब्दसौंदर्यानं मोहून टाकते किंवा एखादी कविता शब्दांत पकडता न येणारा तीव्र अनुभव देते. कविता तिच्या 'असण्यानं' अंतर्मनातील अनेक स्थळांना स्पर्श करते आणि कधीकधी या स्थळांना जोडणारे पूलही बांधते. हा संपूर्ण अनुभव घेणं, तो 'प्रोसेस' करणं ही एक विलक्षण प्रक्रिया आहे. आणि मला असं वाटतं की, ही प्रक्रिया हा एक अतिशय व्यक्तिगत स्वरूपाचा अनुभव आहे. कवितेशी जोडलेपण वाटणं अथवा न वाटणं याचा संबंधही अनुभव येण्याशी आहे.

मी पहिल्या परिच्छेदात म्हटलं तसं कवितेचं स्वरूप बदलत गेलं आहे आणि कवितेनं हाताळलेले विषय हेही या बदलाचं एक कारण आहे. अर्थात एकाच काळात अनेक स्वरूपाच्या कविता वाचायला मिळतात हे खरं, पण काळाची छाप त्या काळात लिहिल्या जाणाऱ्या सकस कवितेवर पडलेली दिसते. एकोणिसाव्या शतकात आणि विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अनुक्रमे केशवसुत (१८६६-१९०५) आणि मर्ढेकर (१९०९-१९५६) या दोघांनी मराठी कवितेला महत्त्वाचं वळण दिलं. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात दलित कवितेनं मराठी साहित्यात आणखी एक सशक्त प्रवाह निर्माण केला आणि नव्वदोत्तरी कालखंडात 'विखंडित वास्तवा'ची कविता जन्माला आली. या दीड-दोन शतकांच्या काळात मराठी कवितेनं अनेक जाणिवांना स्पर्श केला आहे. मानवी लैंगिकता, शरीर अनुभव, शरीर जाणीव, 'लैंगिक द्वंद्व' याबाबतची जाणीवदेखील या कवितेत- विशेषतः साठोत्तरी काळातील स्त्रीवादी जाणिवेच्या कवितेत दिसून येईल.

मानवी लैंगिकता आणि शरीरविचार हा खरं तर आपल्या अस्तित्वाशी जोडलेला, अविभाज्य, कदाचित 'प्रथम' असा विचार आहे. कवितेनं ही जाणीव कशा प्रकारे प्रकट केली आहे हे पाहणं रंजक आणि उद्‌बोधक ठरेल. या लेखातून अशाच काही कवितांची ओळख करून द्यायचा प्रयत्न मी करणार आहे. यांतील बहुतेक कवी माझे समकालीन आहेत. फेसबुक, ब्लॉग यांसारख्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या आम्हा मित्र-मैत्रिणींच्या गटातले आहेत. नव्वदोत्तरी कवींच्या पुढच्या पिढीतली ही कविता आहे. 'अभिधानंतर' (दिवाळी, २०१४) च्या अंकात विश्राम गुप्ते यांनी 'फेसबुक आणि कविता' या शीर्षकाचा एक दीर्घ लेख लिहिला आहे. यात त्यांनी या कवितेची उत्तम ओळख करून दिली आहे. (साहित्यातील नवीन प्रवाहांकडे आस्थेनं बघत त्याची साक्षेपी समीक्षा करण्याचं महत्त्वाचं काम विश्राम गुप्ते सातत्यानं करत आले आहेत. मी स्वतः या फेसबुक कवितेचा प्रतिनिधी असल्यानं त्यांच्याविषयीची कृतज्ञता इथं आवर्जून नोंदवतो. 'अतिरिक्त' (मार्च २०१३) च्या अंकात त्यांनी नव्वदोत्तरी कवींविषयी लिहिलेले विस्तृत लेखही त्यांच्या अभ्यासपूर्ण आस्थेची साक्ष देणारे आहेत. ते जरूर वाचावेत.)

अर्थात या विषयाच्या अनुषंगानं काही इतर जुन्या-नव्या कवितांचे संदर्भ मी टाळणार नाही. मुळात माझा प्रयत्न फेसबुकवरील आजच्या कवितेवर लक्ष देत ही कविता लैंगिकतेबाबत, सेक्शुअल फँटसीबाबत, देहभानाबाबत काय बोलते आहे हे सांगणं, हा आहे; परंतु फक्त फेसबुकपुरतंच मर्यादित न राहता किंवा आमच्या पिढीच्या काळापुरतं न बोलता, एखादी जुनी कविता याबाबत काय बोलली होती तेही सांगायला मला आवडेल. यात अर्थातच मी न वाचलेल्या अनेक कविता निसटायची शक्यता आहे. ही मर्यादा वाचक लक्षात घेतील, अशी मी आशा करतो.

फेसबुकच्या महाकाय पसाऱ्यात आणि बऱ्याचदा चिंतेत टाकणाऱ्या उद्रेकी देवाण-घेवाणीत काही चांगले कवी मित्र-मैत्रिणी जोडता आले, ही एक मोठीच जमेची बाजू आहे. आधुनिक, महानगरी जाणिवांबरोबरच वर्गीय व जातीय विभाजनाला आव्हान देणारी सामाजिक कविताही इथं भेटते. नव्या स्त्री-जाणिवा दिसतात, आभासी जगातल्या अस्वस्थ जाणिवा दिसतात आणि तरल काव्यमयतेचा पडदा पूर्ण बाजूला करून थेट आतलं, 'पॅशनेटली सेक्शुअल', व्यक्तिवादी मुशीतनं घडलेल्या प्रामाणिक कबुलीचा प्रत्यय देणारं मनोगत मांडणारी कविताही दिसते. ही कविता जशी subtle आहे तशीच ती बेधडकही आहे आणि तिचा हा 'सेक्सी' अवतार चकित करणारा आणि दाद द्यायला लावणारा आहे.

'बाइक सेक्स' या नावापासूनच भन्नाट असलेल्या कवितेत प्रणव सखदेव हा कवी आपल्यापैकी अनेकांना आलेला शारीर अनुभव बरोब्बर शब्दांत पकडतो –

गाडी गाडी सुसाट वारा
रोखठोक अर्जंट ब्रेक
पाठीच्या कॅनव्हासवर
मांसल मांसल उबदार शेक

कानापाशी गुणगुण भुंगी
मानेवरती ओली जीभ
सिग्नल पाळत धावे गाडी
दाबत दाबत पीप पीप

कानपाळीवर ओठ गुलबट
जणू सिल्कचा काठपदर
पोटापाशी हात घट्ट
भूक होते खालीवर

लेदरसीट गरमागरम
ढुंगणावर घासे मांडी
मोठी मोठी होत जाते
आतल्या आत जादूची कांडी

हा essentially पुरुष अनुभव आहे आणि प्रणवने ही 'राइड' त्याच्या शब्दांतून जिवंत केली आहे. नैसर्गिक सत्याला जादूमध्ये बसवून तो काव्यात्म परिणाम तर साधतोच, पण वाचणाऱ्यांच्या- विशेषतः पुरुषांच्या मनात 'पटल्याचं' हास्य खुलवतो.

अजिंक्य दर्शने याची एक कविता मला वरच्या कवितेसारखीच

तिच्या अंतिम परिणामामुळे फार लक्षवेधी वाटते. कवितेचं शीर्षक आजच्या बोलीभाषेतलं, पण उर्दूकडून उसनं घेतलेलं, बोलकं आहे -

उफ्फ -
६९, मिशनरी, डॉगी
वीर्याळलेली पहाट
कोकीळेचं नरडं

कोंबड्याचा मोबाईल अलार्म
ओलावल्याली पँट
पाणावल्याले डोळे

अंगाला फुटलेलं पांघरूण
सेमी-ट्रान्स्परंट खिडकी
पहाटलेला ब्रश, व्हिंटेज मोड

सकाळ ऊर्फ रद्दी
दूध ऊर्फ चितळे
बाई ऊर्फ सुवर्णा

पोळ्या ऊर्फ कागद
भाजी ऊर्फ लगदा
चहा ऊर्फ चॉकलेटी साय

एक कावळी आंघोळ
झिजलेला लक्स
मळीचा फ्लक्स

गरम पाणी
गरम बाथरूम
वाफाळलेला मी

तरारलेल्या फॅन्टसीज
काही फटीग फेल्युअर्स
आणि दारावर थाप

अर्धवट ओलं शरीर
अर्धवट हातातलं 'काम'
अर्धवटलेली झपझप पाऊलं

लक्ष्मी अष्टक, भक्तिसागर
उदबत्त्या, गूळ-खोबरं, जप वगैरे
सगळंच तीनदा तीनदा...

पँटीनच्या केसांवर तीर्थ
पुसटसं एक थेंब कुंकू
श्रद्धाळलेले गंध

लिफ्ट बंद
चढणाऱ्या पायऱ्या
ओझरता कुजलेला डक्ट

१२५ सीसी, बटन स्टार्ट
ढर्रर्र...ढर्रर्र?...ढर्रर्रर.
गाडी बंद, गोट्या कपाळात

प्रतीक्षा दुग्धाळ हसतीये
अगं थांब..एवढं काय झालंय
मादक तुषार, कपाळात गरमाहट

कॉक रिझर्व्हवर पिळला
ढर्रर..गाडी स्टार्ट..टोटल कंट्रॉल
प्रतीक्षा हसतीये..मी बुंग...

पत्र्या मारुती, ऑफिसला उशीर
मग ख्रिश्चनी नमस्कार
फक्त...मुलचंदानी इकडे काय करतीये?

मी हजर, ती हाय, भीमरूपी येतं?
मी हो, तिच्या जवळ, मोठ्यानं पुटपुटतो
लिटिल लाऊडर...साली मंदिरात काय एरोटिक हसते?

भीमरूपी...बिच हसणं थांबव
महारुद्रा...ए शिवू नकोस
भीमरूपी..६९, मिशनरी, डॉगी
फक्त..लेट मी कॉन्सन्ट्रेट यू बिच...भी..म..रू..पी...

कविता प्रवाही आहे. कवी जणू आपल्यालाही बरोबर घेऊन, सकाळची आवराआवर करून, त्यातले अनेक बारकावे, विशेषतः 'एकट्या पुरुषाच्या शरीरधर्मा'चे बारकावे दाखवत पुण्यातल्या पत्र्या मारुतीच्या मंदिरापाशी येतोय आणि त्याच्या 'इरॉटिक हसणाऱ्या' मूलचंदानी नामे मैत्रिणीला भेटवतो. आणि कवितेत जागोजागी (आणि शेवटच्या चार ओळींत विशेष) अजिंक्य आपली टाळी मिळवतो. 'भीमरूपी महारुद्रा'च्या जोडीला किंवा अंघोळ करून, गाडी स्टार्ट करून निघेपर्यंत मागे येणारे सेक्शुअल विचार तो इतक्या धाडकन मांडतो की, आपण अवाक् होतो. आणि त्या अवाक् होण्यात 'हे असं होतं बरं का' ही कबुली असते. शब्दांची

थेट पेरणी करत; परंतु त्यामुळे कविता न विस्कटवता एक संपूर्ण अनुभव आहे तसा मांडण्याची क्षमता या कवितेमध्ये आहे.

अजिंक्यच्या या कवितेनंतर मला चटकन आठवतेय ती सलील वाघ यांची 'देवदर्शन' ही कविता. सलील वाघ हे नव्वदोत्तरी कवितेतील एक महत्त्वाचं नाव. माझ्यासकट अनेक समकालीन कवींवर त्याच्या कवितेची मोहिनी आहे. आपल्या अंगभूत धीटपणे एकसंधपणा न सोडता व्यक्तिगत लैंगिकतेचा 'षट्कार' मारल्यासारखा अनुभव ही कविता देते.

तळ्यातल्या गणपतीला
नेहमीच गर्दी असते
चतुर्थीला तर मी जातोच मित्राबरोबर खास
लाईन असते मोठी
पण फार जागृत दैवत
लायनीत उभा होतो
तेवीस बायका लायनीत
सेहेचाळीस तर लायनीबाहेर
पुरुषं-पोरं तर कित्येक
पंधराएक तरी धंदेवाल्या असतील गर्दीत
बाकीच्या धंदा न जगणाऱ्या पतिव्रता
आणि धक्के मारणारे सगळेच भाविक
रांगेत.... रांगेबाहेर....
एका सँडल घालणाऱ्या पोरीचा
स्कर्ट वर गेला, सगळे भाविक तिकडे
मी मात्र पूजा-अभिषेकांचे रेट
तसेच रांगेतल्या बायांचे बॉल
पाहून घेतले तेवढ्यात
माझं आत्मभान वाढलं
लाईन पुढे सरकली
एक जनरल ओळखीचा मित्र भेटला
जातीनं पत्रकार नाही; समीक्षक असावा
खूप बोलणं झालं काही बाही
नेमाड्यांची नवनैतिकतावादी भूमिका
ही च्यूत्येगिरी आहे असा त्याचा मथितार्थ होता
माझी काहीच हरकत नव्हती
आपल्याला काय घेणंय, मी म्हटलंही
वाङ्मयाची लफडी वाईट; तेवढ्यात
एक मित्र आला आयेमडीआरचा
त्यानं पूनम शहाला
फ्लॅटवर कसं ठोकलं ते सागितलं
कल्ला यार
तेवढ्यात माझा नंबर आला, मी
मुठ्या मारून बळकट झालेले माझे पंजे
देवाला जोडले; अभावित प्रसाद घेऊन निघालो
तर पाकीट आणि चपला गायब

एक सलग अनुभवाचे अनेक तुकडे आणि एकेका तुकड्यामागचं एक सलग जगणं. हीदेखील अर्थातच पुरुषाची कविता आहे आणि हा पुरुष निःसंकोचपणे आपली स्वतःची व इतरांचीही लैंगिक बाजू आपल्यासमोर बजावून मांडतोय. चांगली कविता आघात करते असं जे मी सुरुवातीला म्हटलं, त्यात मला या कवितेतल्यासारखा आघात अभिप्रेत आहे. आणि आघात वेगळा व 'चमकदारपणा' वेगळा. आघाताचं मूळ कमालीच्या अस्वस्थतेत असतं. काहीतरी झडझडून सांगण्यात असतं. इथं कवीला फक्त शॉक देऊन आपल्याकडे लक्ष वेधून द्यायचं नसतं, तर त्याच्या जगण्याचा पैस त्याला आपल्यासमोर कधी आस्थेनं, तर कधी हताशपणे मांडायचा असतो. लैंगिक जाणिवांचं प्रभावी प्रकटन करणाऱ्या कवितांपैकी ही माझी एक आवडती कविता आहे.

लैंगिक जाणीव, शरीरभान हे अनेक स्वरूपांत मांडलं जाऊ शकतं. साकेत कानेटकर हा कवी अजिंक्य किंवा प्रणवसारखाच धडकपणे बोलतो आणि लैंगिकतेचा संदर्भ देत एकमेकांच्या आंतरिक ओठीचं साफल्य अनुभवण्याची अपेक्षा धरतो. त्याची 'जजमेंट डे' ही कविता पहा -

तुला नॉस्टॅल्जिया रिव्हिझिट करायचाय तेव्हा ये.
माझ्या हाडांवरचं क्लेश उपभोगायचंय तेव्हा ये.
पण जेव्हा माझे विचार आठवून यावंसं वाटेल
तेव्हा हे वाटणं कन्फर्म करून ये
हा दिवस असू शकतो आपला
जजमेंट डे ठरवण्याचा.
काँट्रॅडिक्शन्स मान्य करून एकत्र येण्याचा.

नव्या कवितेतील इंग्लिश शब्दांचा वापर हा कदाचित वाङ्मयीन वादाला आमंत्रण देणारा मुद्दा ठरू शकेल; पण काही संदर्भात इंग्लिश शब्द चपखल बसतात आणि काही समकालीन अनुभूती समकालीन भाषेशिवाय येऊ शकत नाही, हे खरं. अनुभवाचा प्रवाह खंडित न करता या कवितेत इंग्लिश शब्द जागा पटकावून बसले आहेत आणि त्यांना जागेवरून उठवावंसं वाटत नाही, हे या रचनेचं वैशिष्ट्य आहे. फेसबुक पिढीतील कवितेत इंग्लिश शब्दांचा वापर असलेल्या अनेक रचना दिसतात. इंग्लिशचा अतिवापर यावर वेगळी चर्चा संभवते; पण मला वाटतं की कवितेचं 'कवितापण' जपलं जात असेल तर, शब्दांच्या वापराला सूट द्यायला हरकत नसावी.

देह जाणीव आणि लैंगिक जाणीव या कवितांमधून अनेक अस्तरं घेऊन प्रकट होताना दिसते तेव्हा थेटपणा, बेधडकपणा

यातच फक्त अडकून न राहता, ही कविता खोलातही उतरते आहे. खरं तर मांडणीतला थेटपणासुद्धा उथळपणे येत नाहीच; परंतु शब्दांच्या प्रभावी वापरामुळे, अनुभवाच्या थेट वर्णनामुळे आत्मिक अनुभूतीकडे दुर्लक्ष होतं का, असं वाटायची शक्यता आहे. अजिंक्य दर्शने त्याच्या एका कवितेचा शेवट करताना म्हणतो -

काट्यावर मारलंय करियर
फाट्यावर मारल्यात मुली
तरी सगळ्या नसण्यात हल्ली असणं लपत नाही.

हे 'नसण्यातलं असणं' वाचताना खराखुरा कवी आपल्याला दिसतो. सत्यपालसिंग राजपूत याच्या 'लिपीकथा' या कवितेतील एक तुकडा पाहा. कविता बरीच मोठी आहे. त्यातील हा सुरुवातीचा भाग -

तुमच माझं कुणाचंही
लिपी म्हणजे एक आयुष्य असू शकते.

आपण आईच्या गर्भात असतो
तेव्हाची न आठवणारी आपली जाणीव
लिपी असू शकते गूढ
मोहंजोदारोच्या मुद्रांवरची न वाचता येणारी
आपण ओठांनी जेव्हा पहिल्यांदा लुचतो आईचे स्तनाग्र
तेव्हा आईला फुटलेला असू शकतो लिपीचाच पान्हा
शिकारनृत्य असू शकतं आपलं मातीत खेळत राहणं
हे म्हणजे लिपीनंच घेतलेलं एक वळण
कोळशानं भिंतीवर मारलेल्या रेघोट्या

किंवा गिरवलेली पहिली अक्षरं पाटीवर
म्हणजेच फक्त लिपी नसू शकते

लिपी असू शकते माणसाच्या संस्कृतीचे चित्र
भीमबेटकाच्या गुहेतलं
सहावीत रागारागात वर्गातल्या पोराच्या थोबाडीत
उमटलेली आपली लाल बोटं
किंवा लिपी असू शकते अवघड
अगदीच लहानपणी पँटच्या चेनीत अडकलेल्या नुन्नीसारखी.

लिपी म्हणजे भाषा आपल्यासमोर येताना जे रूप घेऊन येते ते रूप. सत्यपालने अनेक रूपं मांडून 'लिपीकथा' सांगितली आहे. शारीरिक, मानसिक आणि सामाजिक स्पर्शबिंदूंचे अनेक दाखले देत तो ही कथा सांगतो. कवितेत पुढे तो एके ठिकाणी म्हणतो,

एखाद्या विप्लवी संघटनेच्या मेंबरशिपचं पावतीपुस्तक
किंवा दीर्घ किसनंतर प्रेयसीने काढलेले विव्हळते सीत्कार
मानवी डोक्यातून आलेली लिपी असू शकते
थिअरी ऑफ रिलेटिव्हिटी

लैंगिक जाणीव, देह जाणीव याचा विचार करताना मला असं वाटतं की जैविक आणि सामाजिक दोन्ही घटकांचा परिणाम म्हणून पुरुषाची कविता आणि स्त्रीची कविता यांत रोचक फरक पडत जातो. पुरुषाचं 'अवघडलेपण' कवितेतून प्रकट होतं ते बऱ्याचदा देहाच्या पातळीवर आणि स्त्रीचं अवघडलेपण मात्र प्रामुख्यानं मानसिक पातळीवर प्रकट होतं. कवयित्रींच्या कविता वाचताना तिचं 'आतूनचं तुटलेपण' फार भिडतं. कारण तिच्या उद्‌गारात एका आदिम दुःखाचा साक्षात्कार झाल्यासारखा वाटतो. पुरुष स्त्रीचं 'असणं', त्याच्या लैंगिकतेतील आंदोलनं प्रकट करतो. त्यातून त्याची असोशी दिसते; पण 'सेक्शुअली सरेंडर' होणंही प्रतीत होतं. तर स्त्री कविता स्वतःच्या आत बघत आपल्याच जाणिवेचा अर्थ लावायच्या प्रयत्नांत असलेली दिसते. आणि आधुनिक कवितेत तर विद्रोह फार प्रत्ययकारी रीतीनं समोर आला आहे. मेघना पेठे यांची मला आवडलेली एक कविता. स्त्रीत्वाचा आणि पुरुषत्वाचा पुन्हा मुळापासून शोध घेऊ पाहणारी.

खूप खूप वर्षांपूर्वी..
जेव्हा कापूसही नव्हता नि कापडही
फक्त आंगभर केस होते
पुढल्या पायांचे हात होताना
कणा अजून ताठ व्हायचा होता
सूर होता पण गाणी नव्हती
धातू असेल पण नाणी नव्हती
अजून जेव्हा जमवाजमव सुरू झाली नव्हती..
तेव्हा कुठे रे होते
हे उच्च रवातले कज्जे तंटे?
या स्पर्धा, ही ईर्ष्या, हे राजकारण
हा कमी-जास्तीचा विचार, वर-खालीचा
हे नवरा-बायको प्रकरण..
फुकटचा झोल विनाकारण

तेव्हा होते फक्त आग, आकाश, वारा, आभाळ
वाहतं पाणी आणि बदलते ॠतू रानोमाळ
तेव्हा होतं फक्त जंदणं आणि मरणं
तेव्हा होतं फक्त जगणं आणि मरणं
नव्हता शिकारीचा गर्व, नव्हता वेणांचा अभिमान
फक्त असण्याला सलाम, फक्त असण्याला रामराम

जन्म देताना वा जीव जाताना मी गुहेत.. एकटी
जीव घेताना वा जीव जाताना तू रानात.. एकटा

असं असणार हे मान्य होतं.
नो ऑब्जेक्शन, नो ॲटिट्यूड्स
फुकट फाटक्या 'दुकट्या' झुली पांघरत नव्हतो..
..जशा आज पांघरतो
नि आणखीच उघडे पडतो..

चल ना जाऊ पुन्हा त्या रानातल्या गुहेत
आपण तिथेच की रे बरे होतो..

कविता महाजन, प्रज्ञा दया पवार, अनुराधा पाटील अशा महत्त्वाच्या लेखिका-कवयित्रींनी त्यांच्या कवितेतून लैंगिकतेचे अनेक पैलू उलगडले आहेत. प्रत्येकीची कविता उद्धृत करणं शक्य नसलं तरी त्यांची नोंद इथं आवश्यक वाटते.

फेसबुकवरच भेटलेल्या योजना यादवची एक कविता पाहा. आजच्या काळाची, आणि विशेषतः स्त्रीच्या आजच्या काळाची -

स्पायकरच्या ट्रायल रूममध्ये
कपडे उतरवत असताना
रोखलेले असतात
डिझायनरचे डोळे आपल्यावर

पायाच्या घोट्यापासून कंबरेपर्यंतचा आकार
मांड्यांचा घेराव, स्तनांचा विस्तार
स्कॅन होत राहतो आरशापल्याड

जीन्स चढवतात ते हात
आपले नसतात
पायही बहुधा आपले नसतात
नव्या कपड्यात खुललेला अहं
तोही नसतोच आपला.

डिझायनर
बेमालूम घुसलेला असतो शरीरात
दुकानात पाय ठेवल्यापासून.

योजना तिच्या अनेक कवितांमधून स्त्री असण्याला आणि स्त्रीच्या अतृप्त असण्याला आवेगानं भिडली आहे. 'स्वप्न -२' या तिच्या कवितेत तर तिनं शरीराला असा काही स्पर्श केला आहे की, मी अबोल होत मनोमन तिच्या पाठीवर थाप मारली.

शरीरात रुतून बसलीयत
माणसं
दाटीवाटीनं

नवरा योनीच्या तळघरात
पोरगी त्याच्या मांडीवर
पोटाच्या मध्यभागापर्यंत

उरलेले भाग
मिळतील तसे
वाटून घेतलेत प्रत्येकानं

अन्
आई मात्र
उभीच आहे शरीरात
नखशिखान्त ...

योजनालादेखील- जी फेसबुक पिढीची प्रतिनिधी आहे- 'आई' शरीरात कायम 'उभी' आहे असं वाटतं आणि तिचं शरीर वाटून घेतलं गेलं आहे असं वाटतं, तेव्हा ती एक महत्त्वाचं विधान करते आहे हे लक्षात घ्यायला हवं. मेघना पेठेंच्या मघाशी उद्धृत केलेल्या कवितेची आठवण करून देणारी योजनाची ही कविता पाहा-

निव्वळ अंगावर अंग
घासण्यापुरते
हवे असतो जर
आपण एकमेकांना

संवादाचा एखादाही तंतू
जुळला नसता आपल्यात

ऊर्जा विरून गेल्यावर
अलगद झालो असतो मोकळे

धास्तावलो नसतो
मत्सराच्या धाकाने

ठेवले नसते पहारे

निव्वळ अंगावर अंग
घासण्यापुरतेच
हवे असतो आपण
एकमेकांना

तर कदाचित

भेटलो असतो
मोकळ्या मनाने

या कवितेतल्या प्रत्ययानं मला फार अस्वस्थ केलं आहे. मुळात मला ही एकदम 'जेंडर न्यूट्रल' कविता वाटते. ही भावना स्त्री, पुरुष कुणाचीही असू शकेल असं वाटतं. मानवी संबंधांतील जे नग्न सत्य आहे, जे तंत्र युगातही कायम राहिलं आहे आणि अजूनही कायम राहणार आहे त्याचा स्पष्ट उल्लेख करत, त्याच एकमेव आधारे मानवी संबंध परिपुष्ट होतील अशी आशा व्यक्त करणारी ही कविता आहे. यातील विचार कदाचित पटेल; कदाचित पटणार नाही, पण ही कविता विचार ट्रिगर करण्याच्या दृष्टीनं मला फार महत्त्वाची वाटते.

कविता ही फक्त कविता असते. ती इंटरनेटच्या नवीन स्पेसमधली कविता असली आणि तिचे काळ-स्थळाचे आयाम बदललेले असले तरी ती आपलं कवितापण घेऊनच उभी असते. या कवितेतून दिसलेली देहजाणीव मला आश्वासक वाटते; कारण ती अतिशय प्रामाणिक आहे. 'नववधू प्रिया मी बावरते' या भा. रा. तांब्यांच्या कवितेपासून 'आपण नाही सालं तुझी बायको होणार' या मेघना पेठेंच्या कवितेपर्यंतचा वैचारिक प्रवास आपल्यासमोर आहे. त्या त्या काळातली प्रामाणिक भावना मांडणं हे जर कवितेचं एक मुख्य काम असेल तर मला वाटतं, फेसबुकवरची सकस कविता ते काम मनोभावे करते आहे. तिची भाषा लवचिक आहे, जाणिवा धीट आहेत आणि ती व्यक्तिकेंद्री विचारातून उमटणारा समर्थ संवाद साधायचा प्रयत्न करते आहे. आज ही कविता ज्या 'पॅटर्न'मध्ये बोलते आहे ते इतकं प्रभावी आहे की, ही कविता उद्या काय बोलणार आहे, याची मला उत्सुकता आहे!

*या लेखासाठी काही कविता मिळवून देण्याचे काम प्रणव सखदेव यांनी केले आहे त्यांचे विशेष आभार.*

**उत्पल व.बा.**
utpalvb@gmail.com

T BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!

# टी बुक क्लब २५

**सभासद फी ५०रु.**

सभासद व्हा व ५०% सवलत मिळवा!
या योजनेतील सहाही पुस्तके घेणे आवश्यक!

## टी बुक क्लब २५ मधून प्रकाशित झालेली पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| **द पार्टनर** | जॉन ग्रिशॅम | अनु. विभाकर शेंडे | ४०० |
| **द वॉचमन** | रॉबर्ट क्रेस | अनु. बाळ भागवत | ३०० |
| **एन्ड गेम** | मॅथ्यू ग्लास | अनु. उदय कुलकर्णी | ५०० |
| **द सेव्हन्थ स्क्रोल** | विल्बर स्मिथ | अनु. बाळ भागवत | ५५० |
| **क्रिटिकल मास** | स्टीव्ह मार्टिनी | अनु. सुदर्शन आठवले | ४८० |
| **ओन्ली टाइम विल टेल** | जेफ्री आर्चर | अनु. लीना सोहोनी | |

## ।। सेक्स वर्कर ।।

नलिनी जमीला
अनुवाद : सुप्रिया वकील
किंमत : ₹ १२०/-




### । पुरुष – आत्ताचे आणि तेव्हाचे ।

माझी बहुतेकशी गिऱ्हाईकं माझ्याकडे सल्ल्यासाठी का येतात, याला एक विशेष कारण आहे. आमच्यापैकी फार थोड्याजणी गिऱ्हाईकांशी बराच वेळ गप्पा मारायला तयार असतात. पण मी नेहमी एखादं गिऱ्हाईक तणावाखाली आहे असं वाटलं तर काय अडचण आहे अशी चौकशी करते. काही लोकांना खोलीत प्रवेश केल्यानंतर सेक्स नको असतो. ते आम्हाला आमचं जीवन व ठावठिकाणा यांबद्दल विचारत राहतात. हे संभाषणाची गाडी सुरू करण्यासाठी असतं. त्यानंतर मी खरी समस्या काय आहे ती विचारते. हळूहळू मला ज्या ग्राहकांना बोलायचं असतं असे अधिकाधिक ग्राहक मिळू लागले. काहीजण मला येऊन भेटून सांगायचे, माझ्या मित्रानं सांगितलं, तुला चेचीकडून चांगला सल्ला मिळेल. यांतले बहुतेक पुरुष लग्नाच्या बेतात असतात. काहीजण लग्नबंधनात अपयशी असतात. बहुतेक करून या दोन प्रकारच्या माणसांना सल्ला हवा असतो.

चाळिशीच्या मध्यातले, लग्नबंधन ताणलेले बरेच लोक माझ्याकडं सल्ल्यासाठी आले आहेत. एका माणसानं मला सांगितलं होतं, की मी बायकोवर खूप प्रेम करतो, तिला धुणं-भांडी करण्यात मदत करतो, पण मी तिला रात्री बिछान्यात नको असतो. मी अशा लोकांच्या बाबतीत, त्यांच्या संबंधांबद्दल अधिक खोदून विचारते आणि सर्वसाधारणपणे समस्या शोधणं सोपं होतं.

साधारणपणे अशा केसेसमधील बायकांची आपल्या नवऱ्यांकडून अधिक कौशल्य व अनुभवीपणाची अपेक्षा असते. आणि ही माणसं बायकोनं एखादी गोष्ट सांगितली तर त्या बाबतीतलं अज्ञान कधीही कबूल करणार नाहीत. तुला हे सगळं कुणी शिकवलं?... हा त्यांचा प्रश्न असतो! त्यामुळं काय चुकतंय हे बायकोला कळत असलं तरी ती विचारू शकत नाही. तसंच त्याला एखादी गोष्ट माहीत नसेल तर तोही विचारत नाही.

मी आणखी एक मजेशीर अनुभव घेतला आहे. एकदा एक माणूस माझ्याकडं सल्ल्यासाठी आला. त्यानं सांगितलं, मी चाळीस वर्षांचा आहे. त्याचं सव्विसाव्या वर्षी लग्न झालं होतं.

मी त्याला विचारलं, "मग तुम्ही इतकी वर्षे काय करत होता?"

"असल्या गोष्टी बायकोला कशा विचारायच्या?" तो उत्तरला.

एडस् जनजागरण मोहिमांमुळं बरेच लोक नव्या गोष्टींबद्दल विचारतात. आम्ही सुरक्षित संभोगाबद्दल ऐकत असतो. म्हणजे काय? कॉन्डोम खेरीज इतर कुठला मार्ग आहे का? आपल्या समाजात, सेक्सची अखेर धडाकेबाज आतषबाजीनं अर्थातच व्हावी लागते! काहीजण म्हणतात, मी प्रारंभीच्या पूजेत संतुष्ट असतो, पण माझ्या पत्नीला ते मान्य नसतं. तुम्ही बायकोला विचारून

बघा, ती नेमकं याच्या उलट सांगेल! याचा आरंभ कोणता, अखेर कोणती... किंवा याला निश्चित असा काही आरंभ व अखेर असते का, याबद्दल लोकांना काहीच माहीत नसतं!

माझ्या सल्ल्याचा उपयोग झाला तर काहीजण मला आवर्जून येऊन सांगतात. एक शोर्नुरचा माणूस आहे. तो त्यावेळी तिशीच्या आसपास होता. त्यानं माझ्याकडून सर्व धडे घेतले होते. एके दिवशी तो माझ्याकडं येऊन म्हणाला, ''चेची, मी तुला पुन्हा भेटलो तर मी अनोळखी माणसासारखा वागेन.''

त्याचे पत्नीशी संबंध सुरळीत झाले होते.

असाच आणखी एक माणूस आहे, प्रकाशन. मी त्याला माझ्या आत्मचरित्र लेखनाबद्दल सांगितलं तेव्हा त्यानं मला आग्रहपूर्वक बजावलं, की त्यामध्ये माझ्या नावाचा उल्लेख कर. तो चांगला श्रीमंत, हॉटेल व्यवस्थापक आहे. त्याची पहिली पत्नी त्यांच्या लैंगिक संबंधांबाबत समाधानी नसल्यामुळं त्याला सोडून गेली होती. त्यानंतर त्याचं दुसरं लग्न ठरलं. त्या लग्नाआधी तो माझ्याकडं आला होता. त्याला पहिली बायको खूप आवडायची, पण रात्री त्यांचं भांडण होत असे. आमची आत्मचरित्राबद्दल चर्चा झाल्यानंतर त्यानं मला त्याचा यामध्ये नामोल्लेख करायला सांगितलं आहे.

माझ्याकडं कोल्लमहून एकजण आला होता. माता अमृतानंदमयी यांचा शेजारी. त्याची त्यांना भेटायची इच्छा होती, पण त्या शेजारी असल्यामुळं, त्यांच्यामध्ये काही आश्चर्यकारक सामर्थ्ये आहेत यावर त्याचा विश्वास नव्हता, त्यामुळं तो माझ्याकडं आला होता. माझ्याशी बोलणं झाल्यानंतर त्यानं ठरवूनच टाकलं, की माझ्यात काहीतरी दैवी शक्ती आहे. कल्पना करा... केवळ अमृतानंदमयी त्याच्या शेजारी आहेत म्हणून मी दैवी!

यापैकी फार थोडे लोक माझ्याकडं योगायोगानं येतात. बहुतेकजण कुणाकडून तरी 'चेची'विषयी कळल्यामुळं येतात. मी तुम्हाला आमच्यासोबत बसमधून प्रवास करायला आवडणाऱ्या लोकांविषयी सांगितलं आहे. त्यांच्यापैकी काहींना भीती वाटत असते, की देहविक्रेत्यांबरोबर खोलीत गेलं तर त्याच कदाचित आपल्यावर बलात्कार करतील!

माझं असोकन नावाच्या एका व्यक्तीशी विलक्षण नातं होतं. तो थ्रिशूरच्या चेट्टीयंगडी भागात हॉटेल चालवत असे. रात्री याच हॉटेलमध्ये लोक पत्त्यांचा जुगार खेळत असत. त्याचे मित्र पत्ते खेळत असत, त्यावेळी त्याला हॉटेलच्या दुसऱ्या भागात माझ्यासोबत पडून राहायला आवडत असे. पुढं मला समजलं, की त्यानं आत्महत्या केली.

मी थ्रिशूरमध्ये अमलाजवळ राहायची त्यावेळी इब्राहिम नावाचा एक माणूस त्याच्या मारुती झेनमधून मला त्याच्या घरी नेत असे. त्यावेळी त्याची बायको व मुलंही घरी असत. तो मला गाडीत बसवून गाडी आत लावून शटर्स बंद करून घेत असे व स्वत: घरी जात असे. त्यानंतर सगळेजण झोपले, की रात्री बाराच्या सुमाराला तो बाहेर येत असे. या सगळ्यांत भीतीचं जराही सावट नसायचं. त्यानंतर तीनच्या सुमाराला तो मला गाडीतून माझ्या घरी आणून सोडत असे.

अम्बाल्लूरचा परमू नावाचा ट्रकचालक मला त्याच्या ट्रकमध्ये बसवून, शहराच्या मध्यवर्ती भागातून फिरवून आणून पुरुषार्थाचं प्रदर्शन करत असे.

अलीकडंच, मला एक मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह भेटला. मिचमिच्या डोळ्यांचा, डोक्यावर कुठंकुठं तुरळक केस, बाकी टकल्या, एका हातात मोठं कडं, घड्याळ, मनगटावर लाल गोफ बांधलेला... अगदी विदुषकी ध्यान!

काहीसा 'सन्मनास्सुल्लावरक्कू समाधानम' या मल्याळी चित्रपटातील फुशारकी मारणाऱ्या मूर्ख पोलीस अधिकाऱ्यासारखा! त्याला आपण अगदी 'माचो मॅन' असल्याचं भासवायला आवडत असे. तो 'ट्रॅव्हल सेक्स' आवडणाऱ्या जातकुळीतला होता, म्हणजे लक्झरी बसनं प्रवास करताना स्पर्श, थोड्याफार गप्पा... त्याला सेक्सखातर फक्त एवढंच हवं असायचं. हे ट्रेनमध्ये असतं तर त्यामध्ये अधिक खुलेपणा आला असता, चुंबन किंवा आलिंगन नीट देता आलं असतं.

मी या माणसाला साधारण पाच-सहा महिन्यांपूर्वी थ्रिशूरमध्ये भेटले. त्यावेळी माझी आर्थिकदृष्ट्या थोडी तंगी होती. मी रेल्वे स्टेशनवर फेरी मारून नुकतीच बस स्टँडवर आले होते, तितक्यात हा माणूस माझ्या मागं येत म्हणाला, ''या बसमध्ये बस.''

आम्ही पैशाचं बोलणं नक्की केलं नसल्यामुळं मी साशंकतेनं मागं सरकले. तेवढ्यात दुसरा एक माणूस आला आणि आमचा दोघांचा जुना स्नेह असावा तसं माझ्याशी बोलू लागला. हा माणूस फसव्या आहे हे माझ्या लक्षात आलं. पैशाचा विषय निघताच तो हुडूत करू लागला. मी त्याच्यापासून सुटका मिळवण्यासाठी स्वच्छतागृहात गेले. परत आले तेव्हा पाहिलं, मघाचाच तो माणूस तिथंच होता.

त्यानं हळूच माझ्या दिशेनं येत विचारलं, ''माझ्यासोबत अर्नाकुलमला येणार का?''

''पैशाचं काय?'' मी विचारलं.

''किती?'' त्याला जाणून घ्यायचं होतं.

''तीनशे.'' मी म्हणाले.

''आत्ता आणतो,'' असं म्हणून तो निघून गेला. मी तिथंच थांबले. मनात आलं, तीनशे रुपयांसाठी हा कुठं गेला असेल? पण मला नंतर कळलं, की तो त्याच्या सूटकेसमधून पैसे आणण्याबद्दल बोलत होता.

अखेर, आम्ही बसमध्ये बसलो. त्याच्याकडून कसलीही हालचाल नव्हती. तो प्रवासभर शहाण्या मुलासारखा बसून होता.

''तुला झोपायचं असेल तर झोप,'' तो म्हणाला.

थोड्यावेळानं त्यानं तीनशे रुपये काढून मला दिले. मध्येच माझ्या सेलची रिंग वाजली. माझं बोलणं झाल्यानंतर त्यानं माझा

नंबर विचारून टिपून घेतला.

उतरल्यानंतर, तो काही अंतर गेला. मग मागं वळून माझ्याकडं कटाक्ष टाकला. त्याला मी त्याच्याबरोबर जाईन असं बहुतेक वाटलं असावं.

तो माझ्या दिशेनं आला आणि म्हणाला, ''नीट खात जा!''

'तू दिलेल्या पैशानं मी मला वाटेल ते करीन.' मी मनातल्या मनात म्हणाले.

त्यानं आणखी एक शंभराची नोट काढली आणि घडी करून माझ्या हातात ठेवली. त्यानंतर तो काही अंतर चालून गेला, पुन्हा मागं वळला, माझ्याकडं आणखी एकदा कटाक्ष टाकला आणि नंतर समोर बघून गेला.

मी हे लिहितेय हे समजल्यानंतर त्यानं मला त्याचं नाव घालायला सांगितलं आहे.

♦

पूर्वीच्या काळी गिऱ्हाईकांना आम्ही बायकोसारखं वागलेलं आवडत असे. त्यांना आम्ही त्यांचा टॉवेल धुवून द्यावा, त्यांच्या हातात साबण द्यावा, त्यांची सुटकेस ओढत त्यांच्या मागून चालावं असं वाटत असे... पण त्या सुटकेसमध्ये एखादी मौल्यवान वस्तू असेल तर मात्र ते आम्ही सुटकेससहित गायब झालो नाही ना, ते पाहण्यासाठी सारखं मागं वळून बघत असत. मला गोष्टीची फार मजा वाटायची. विचार करा... आपली बॅग कुणालातरी धरायला लावायची आणि ती व्यक्ती ती बॅग घेऊन पळून गेली तर, याची प्राण कंठाशी येईस्तोवर काळजी करायची! काहीजणांना आम्ही सटकून जाऊ की काय याची काळजी असे, त्यामुळं ते आम्हाला त्यांच्या पाठोपाठ येण्याच्या व इतर लोकांच्या प्रस्तावाच्या मोहाला बळी न पडण्याच्या सूचना देत असत. ते सदैव आमचं कुठल्याहीक्षणी अदृष्य होणं अपेक्षित धरून, अवघडूनच चालत असत. सेक्स माझ्या आवडीनुसार, आनंददायी ठरो वा ना ठरो, मला हा प्रवास फार आवडतो. तुम्ही असल्या माणसांबरोबर हजार वेळा गेला असला तरी त्यांच्या वृत्तीमध्ये काहीही बदल नसतो.

''मी आदरणीय व्यक्ती आहे, तू वेश्या आहेस!''

आपण गिऱ्हाईक आहोत ही गोष्ट ते कधीच समजून घेत नाहीत. या असह्य वृत्तीमुळंच मी एका टप्प्यावर देहविक्रय सोडून देऊन सामान्य गृहिणी बनले. या बाबतीत सर्वोत्तम व सर्वात वाईट गिऱ्हाईकांमध्ये फारसा फरक नसतो.

त्याकाळी रात्रीच्या वेळी रेल्वे स्टेशनवर किंवा बस स्टँडवर फिरणं फार अवघड असायचं. बायकांना कसंही वागवलं तरी चालतं हे या पुरुषांना ठाऊक होतं. त्या काळी पोलीस देहविक्रेत्यांच्या प्रश्नात लक्ष घालणं हे आपलं कर्तव्य आहे असं मानत नसत. आम्हाला सार्वजनिक स्थळी मारझोड करणं अगदी सोपं होतं. एखाद्या बाईला KSRTC स्टेशनवरून जबरदस्तीनं उचलून नेलं तर कुणीही एका शब्दानंही विचारत नव्हतं. आज परिस्थिती काही प्रमाणात बदलली आहे. आता पोलीस हस्तक्षेप करतात, त्या महिलेची सुटका करण्यासाठी नाही तर त्यांची सत्ता प्रस्थापित करण्यासाठी... जणू ते आमचे तारणहार असतात!

♦

मी तरुण होते त्याकाळी पुरुषांना स्त्रीदेहाला स्पर्श करण्याचे, त्याचा अनुभव घेण्याचे किरकोळ हक्क असत. ते निसटते स्पर्श किंवा हलकेच आलिंगन देत असत. यापलीकडे जाऊन घाईगडबडीनं शयनगृहापर्यंत मजल जात नसे. त्या काळाच्या तुलनेत आत्ताचे दिवस वाईट आहेत. आज काहीही करून बायकांना भोगायचंच अशी वृत्ती आहे. त्याला वयाबियाचासुद्धा अडसर नाही.

मी आईला विचारायची, की तुला एकटीला प्रवास करताना कधी अडचण आली नाही का?

त्यावर आई म्हणायची, बाळा, आई मोठी झालेली असते.

त्यावेळी आई चाळीस-पंचेचाळीसच्या दरम्यान असेल. ती अतिशय सुंदर दिसायची. त्या काळाशी तुलना केली तर, आज मी वयाच्या बावन्नाव्या वर्षीही सुरक्षित नाही. मी कुठंही गेले तरी सर्व वयोगटातले पुरुष मला कुरवाळतात. पंचवीस वर्षांपूर्वीच्या पुरुषांपेक्षा आत्ताचे पुरुष अतिकामुक आहेत. एकदा मी बसनं गुरुवायूरला जात असताना, माझ्या पाठीवर स्पर्श जाणवला. कुणीतरी माझी पाठ गोंजारत होतं. हा प्रकार सुरूच राहिल्यानंतर मी वळून पाहिलं. माझ्या मागं एक अत्यंत घरंदाज सद्गृहस्थ उभे होते... चांगल्या छपरी मिशावाले.

''मला इथं कुरवाळण्यासाठी इतके कष्ट घेऊ नका.'' मी तिथंच खणखणीत आवाजात गरजले, ''तुम्हाला कुठं जायला आवडेल तेवढं सांगा. तिथं तुम्हाला हवं तेवढं कुरवाळा.''

त्या माणसाचा चेहरा पांढरा फटफटीत पडला. चेहऱ्यावर खुळचट हास्य धारण करून त्यानं शरणागती पत्करली.

माझ्या पहिल्यावहिल्या थायलंड सफरीत माझी खात्री पटली, की विमानातसुद्धा यापेक्षा वेगळी स्थिती नसते! मी पहिल्या विमान प्रवासाच्या कल्पनेनं रोमांचित झाले होते, त्यावेळी माझ्या शेजारच्या प्रवाशाची बोटं माझ्या देहावर कार्यरत झालेली जाणवलं. तो माणूस तर ब्लँकेटमध्ये पूर्ण लपेटून होता. आधी मला वाटलं, चुकून झालं असेल. पण पुन्हा तोच प्रकार घडला तेव्हा त्याला कसली खाज उठली होती ते माझ्या लक्षात आलं. मी त्याचा हात घट्ट पकडला आणि नीट सरळ ठेवला. आज काळ बदलला आहे, पण अजूनही कुणीही बायकांकडं त्यांच्यासारखाच प्राणिमात्र म्हणून किंवा बाईही आपल्याकडं शरीरसुखाची मागणी करू शकते अशा विचारानं बघत नाही!

मी माझ्या ग्राहकांविषयी निर्णय घेताना कायम त्यांच्या वयाचा विचार करते. फारच तरुण असणाऱ्या मुलांशी सेक्स करताना मला

अतिशय किळस येते. माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान माणसं चालतील, त्यापेक्षा लहान नाही... ही मी मर्यादा आखून घेतली आहे. एखादा माणूस बत्तीस वर्षाचा असेल असं समजून त्याच्यासोबत गेलं तर कधीकधी नंतर लक्षात येतं, की तो इतका मोठा नाहीय. अलीकडंच असा एक प्रसंग घडला. एक चोवीस वर्षीय तरुणानं मला बाहेर नेलं. तो वयापेक्षा मोठा दिसत होता.

आम्ही तिथं गेल्यानंतर त्यानं मला विचारलं, ''चेची, तू किती वर्षाची आहेस?''

''अठ्ठेचाळीस,'' मी उत्तरले.

मग त्यानं मला सांगितलं, की ''मी फक्त तेवीस वर्षाचा आहे.''

माझं वय ऐकताना त्याला जराही लाज वाटली नाही, ही गोष्ट मी टिपली. पूर्वीच्या काळी, एखाद्या तीस वर्षांच्या माणसासोबत पस्तीशीची बाई गेली आणि त्याला ते समजलं तर त्यानं हात झटकून म्हटलं असतं, ''मला तरुण बाई हवी आहे.''

त्याकाळी आम्ही वर्षा-दोन वर्षानं वय कमी करून सांगायचो. आता आम्ही अगदी दुप्पट वयाच्या असलो तरी काही अडचण नसते. पूर्वी, बसमधून जायचं तर माणसं समवयस्क दिसणारी बाईच सोबत नेत असत. प्रथमदर्शनी बायको वाटली पाहिजे अशी बाई... पण आता तशी गरज भासत नाही.

सध्याच्या काळात बरेचजण आपल्यापेक्षा वयस्क बायकांना अधिक पसंती देतात. सध्या पुरुषांना सेक्सबद्दल बोलायला आवडतं. पूर्वी असं नव्हतं. असं बोलणं दुर्मिळ असे. कुठंतरी जायचं, कमरेभोवती नेसलेलं सोडायचं... बस्स... इतकंच.

पुरुषांमध्ये झालेला आणखी एक बदल म्हणजे ते ब्ल्यू फिल्म पाहून तयारीनिशी येतात. त्यांना वाटतं, की तीस मिनिटं शक्य आहे. आम्ही पाहिलेल्या फिल्ममध्ये तीस मिनिटं चाललं होतं, असं ते सांगतात. अर्थातच, चूक त्यांची नाही, या सगळ्यात आपण कमी पडतो! मध्यमवयीन माणसं असलं मूर्खासारखं वागतात. तरुण तितके वाईट नसतात.

■


नवे कोरे

गणिका अर्थात कलावंतिणींच्या जीवनाविषयी साधार, सविस्तर माहिती देणारे अभ्यासपूर्ण पुस्तक

भारतीय गणिका





डॉ. सुरेश देशपांडे

किंमत : २०० रु.

नवे कोरे

# संजय ढोले यांचे नवीन साहित्य




या संग्रहातील प्रत्येक कथेचा विज्ञान हा गाभा असून आधुनिक विज्ञान सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. अंतराळशास्त्राबरोबरच विविध विषय यामध्ये हाताळलेले आहेत.

## अंतराळातील मृत्यू




विज्ञानाच्या नवीन संकल्पना, फॅक्चुअल विज्ञानशास्त्र शिवाय मूलभूत विज्ञानाचा स्पर्श, आधुनिक प्रयोग, नियम, वर्तमान व भविष्यातील विज्ञान-तंत्रज्ञान यावर आधारलेल्या वास्तववादी विज्ञानकथांचा संग्रह.

## संक्रमित



# ।। दिखा दिखा के छुपाना... छुपा छुपा के दिखाना... ।।
# । फॅन्टसी बाईची ।

। योजना यादव ।

विकिपीडिया सांगतं की करनजीत कौरनं वयाच्या सोळाव्या वर्षी आपली व्हर्जिनिटी घालवली. वयाच्या अठराव्या वर्षी लेस्बियन संबंध अनुभवले. तिच्या नावावर पन्नासहून अधिक सिनेमे आहेत. तिनं बॉलिवूडमध्येही पदार्पण केलंय. तिला साईन करायला गेलेल्या पहिल्या बॉलिवूड दिग्दर्शकाला तिच्या मानधनाचा आकडा ऐकून घेरी आली. ती बॉलिवूडच्या पडद्यावर झळकण्यापूर्वीच भारतातल्या लाखो प्रेक्षकांच्या परिचयाची होती.

वरची सारीच वाक्यं गोंधळात पाडणारी आहेत ना...? म्हणजे करनजीत कौरसारखं अस्सल भारतीय बयेचं नाव- तिची ओळख देताना विकिपीडिया थेट तिच्या व्हर्जिनिटीला हात घालतो म्हणजे काय? आणि अठराव्या वर्षी करनजीत कौर नावाची बाई अशा संबंधात कशी अडकू शकते?

ही प्रश्नांची मालिका फक्त दोन शब्दांत सुटू शकते. करनजीत कौर म्हणजे आपली सनी लिओनी. आपली ...? ( ? ) अंगावर पाल पडली का? संसार उद्ध्वस्त करते म्हणून तिच्याविरोधात पोलीसतक्रार दाखल झाली आहे. तिच्या पांढऱ्याशुभ्र देहाच्या काळ्या जादूनं सनातन्यांची झोप उडवली आहे. बायांनाही तिनं कॉम्प्लेक्स दिलाय. तिला देशात बंदी घालण्याची मागणी होत आहे. आणि तिला आपली म्हणायचं?

मी स्मार्ट फोन घेऊन दीडेक वर्ष झालं. या दीड वर्षातले कितीतरी दिवस सनीवरच्या जोक्सनी उजाडलेत. एखादी चांडाळ मैत्रीण असो, की काकूबाई वा एरवी बोलताना सेन्सॉर सांभाळणारा मित्र असो, सनीच्या जोकचं वावडं असणारे अभावानचं भेटतात. कधी कधी सकाळी आलेला जोक दिवसभर बारा घरं फिरणाऱ्या

मांजरीसारखा पुन्हा आपल्या मोबाईलवर आपटतो. असं हे सनीचं वेड. तिचं नाव केव्हा माहीत झालं हे कळण्यापूर्वीच ती इतक्या परिचयाची होऊन जाते. शिवाय बायांमध्येही तिचं नाव इतकं फिरत असेल, तर पुरुषा-पुरुषांच्या गप्पांची कल्पनाच केलेली बरी ! सनी लिओनी बॉलिवूडमध्ये येण्यापूर्वीच तिच्या प्रेक्षकांमध्ये भारतीयांचं प्रमाण आघाडीवर होतं- तेही लाखोंच्या घरात. भारतातून मिळणाऱ्या या प्रतिसादानंच तिला बॉलिवूडकडे आकर्षित केलं. आणि लक्ष वेधणारं खणखणीत नाणं म्हणून बॉलिवूडलाही ती हवीच होती. सेन्सॉरच्या लाजेकाजेखातर तिच्या अंगावर वितभर कापड टाकलं तरी प्रेक्षकांना तिचं नागवेपणच दिसणार, याची त्यांना खात्रीच असावी. अशी प्रेक्षकांच्या खयाली पुलावात मसाला भरणारी सनी.

ओशो एका प्रवचनात म्हणतो, 'औरते बडी मजाकिया होती है. दिखा दिखा के छुपाती है, छुपा छुपाके दिखाती है..' खोल गळ्यांचे ब्लाऊज आणि कंबरेच्या खाली सरकलेली साडी ते बिकिनीपर्यंत कोणत्याही अवतारातली बाई पाहिली की या ओळींचा प्रत्यय आल्याशिवाय राहत नाही. हा दाखवून लपवण्याचा आणि लपवून दाखवण्याचा खेळच मजेशीर. रोजच्या जगण्यात याचे शेकडो मिनी प्रयोग दिसतात. पण सनी या खेळात नाही. स्वतःच्या अनावृत देहाला कॅमेऱ्यासमोर बेधडक कुरवळणारी सनी. लाखो पुरुषांच्या सेक्शुअल फॅन्टसीला प्रतिमा पुरवणाऱ्या पॉर्न विश्वाची राणी. बाईच्या सेक्शुअल फॅन्टसीची चर्चा करताना मला तिचं नाव पहिलं घ्यावं वाटतं. हा खरं तर डोंगराच्या उंच कठड्यावर हेलिकॉप्टरनं उतरावं आणि रस्त्यावरची घसरण अनुभवत पायथा गाठावा, असा प्रकार वाटेल. भलेही तिनं पॉर्नला रामराम ठोकला आहे; पण देशात सध्या तरी चादरीत लपलेल्या फॅन्टसीची चर्चा तिच्याभोवतीच फिरताना दिसते. सनी लिओनी बिग बॉसच्या घरात दाखल झाली, त्याआधीच कदाचित देशातल्या अनेक बेडरूममध्ये दाखल झाली होती. तिची ओळख जाहीर झाली आणि तिचं नाव बंद ओठातल्या आवंढ्यासारखं कैक शरीरांत पाझरू लागलं. त्या नावाच्या उच्चारानंच हिट ऑफ द मूमेंट अनुभवणाऱ्यांची कमी नाही. तिच्याकडे वळणाऱ्या नजरांविषयी फार बोलायची गरज नाही. पण त्या नजरांना आव्हान देणारा तिचा आविर्भाव महत्त्वाचा आहे. त्या मानसिकतेचं विश्लेषण महत्त्वाचं आहे. पॉर्न सिनेमात काम केल्यानं तिच्या घरादारानं तिच्याशी संबंध तोडले. कोणाही उत्तर आधुनिक देशातल्या कुटुंबाचीही हीच प्रतिक्रिया असती. सनीचं कुटुंब तर पक्कं पंजाबी. त्यात देश सुटलेलं घर. परक्या मुलखात आपल्या संस्कृतीची रजई अधिक उबदार होतेच. तीच तिच्याही कुटुंबाची अवस्था. अशा कुटुंबात तिचा वावर. तरीही संस्कृतीच्या रजईचं काय, देहावरचं कापडाचं बंधनही तिनं नाकारलं. या नकारात कुठल्याही क्रांतिकारी तत्त्वज्ञानाचं बीज नव्हतं. फक्त स्वतःला पटणारे रस्ते धुंडाळण्याची इच्छा. ही इच्छा प्रत्येक बाईच्या अंतर्मनात रोज जन्मते आणि रोज अखेरचा श्वास घेते. बाईच्या सेक्शुअल फॅण्टसीला जडणघडणीचे अनेक पदर जोडलेले असतात. त्यामुळे या फॅन्टसीबाबतचा दृष्टिकोन निरनिराळा असतो. जिथं तथाकथित चौकटीत लैंगिकतेविषयी बोलणंही निषिद्ध, तिथं बेभान होण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. पण म्हणून लैंगिकतेच्या बाबतीत बाई नेहमी समर्पणाची भावना घेऊनच सामोरी जाते, तिला स्वतःची अशी गरजच नसते, असल्या भ्रमांची भोवती चंगळ असताना कोण बाई अशा इच्छांना गोंजारण्याची क्षमता ठेवेल. त्या इच्छेला गोंजारण्याची ताकद एखादीतच असते. त्यातनं उद्भवू शकणाऱ्या नालस्तीला, नाकारलेपणाला धीरानं सामोरं जाण्याची क्षमता असलेली स्त्रीच अशा धाडसाच्या नादी लागेल.

हनिमून ट्रॅव्हल्स प्रायव्हेड लिमिटेड सिनेमातला एक सीन खूप बोलका आहे. गोव्यात हनीमूनला आलेल्या मिली सेनला छोटे कपडे घालून किनाऱ्यावर भटकायची इच्छा असते. तिचा नवरा मात्र तिच्या देहावर सतत पहारा ठेवण्यात दंग. त्या देहावर आपल्याशिवाय कुठलीच नजर स्थिरावू नये, या खटाटोपात अडकलेला. पण ती पॅराग्लायडिंगला जाते आणि तिचा स्कर्ट निसटून पडतो. त्या निसटल्या स्कर्टमुळे तिची अतृप्त इच्छा पूर्ण होते; तर तिच्या पहारेकरी नवऱ्याची पुरती धांदल उडते. तोकड्या कपड्यात खुललेला मिली सेनचा आत्मविश्वास गोव्याच्या किनाऱ्यांवर अनेकदा पाहायला मिळतो. कोपऱ्यापर्यंत मेहंदी, हातभर चुडा आणि निव्वळ नितंबं झाकतील एवढी शॉर्ट हा इथं येणाऱ्या बायांचा आवडता पेहराव आहे. या जनरलायझेशनला अतिशयोक्तीची कडा असल्याचंही कुणाला वाटेल. पण ज्यांचे देह झाकलेले असतात, त्याही स्वतःला तोकड्या कपड्यांत कल्पित करून पाहत असतातच. हे तोकड्या कपड्यांचं आकर्षण किंवा शरीराचा विशिष्ट भाग नजरेत येईल असा पेहराव बाईच्या लैंगिक फॅन्टसीचाच भाग नव्हे का? अर्धवट दिसणाऱ्या देहातून उरलेल्या भागांचे अंदाज बांधावेत, याची पुरती काळजी पेहरावात पाहायला मिळते. त्यामुळे बाईच्या अंगावरचा प्रत्येक कपडा शृगांरातनं खुलणाऱ्या फॅन्टसीलाच संबोधित करतो. शरीर, वस्त्रं आणि लैंगिकता यांचा संबंध वयात येण्याच्या प्रक्रियेत उलगडत जातो. देहाचं भान येण्याच्या या वयातच देहप्रदर्शनाचं भानही येतं. शरीरातल्या बदलांना न्याहाळताना लैंगिक अनुभूतीच्या अपेक्षांची जाणीव भलेही होत नसेल; पण शरीरात सुरू झालेल्या उत्सवानं सुखावलेपण येतचं. ऋतुस्राव सुरू झाल्यावर पोर प्रजननासाठी सक्षम होते; पण शरीरसुखाची चुणूक त्याआधीच मिळू लागते. या वयातल्या सेक्शुअल फॅन्टसीचं प्रोतिमा बेदीनं केलेलं वर्णन खूप समर्पक वाटतं. ती लिहिते,

'आपलं 'दिसणं' या विषयानं माझ्या मनाचा पूर्ण कब्जा घेतला होता. आपल्या प्राप्तीसाठी, आपल्याशी विवाह करण्यासाठी पुरुषांनी जीव टाकावा, इतकं देखणेपण आपल्याला लाभावं, असं माझं स्वप्न होतं.'

या स्वप्नावरच तिच्यातली किशोरी थांबत नाही. तिच्यातली ऊर्जा विसर्जित करण्याचे तिचे मार्गही ती सांगते.

'आईची ब्रेसिअर चोरून आणायचे. ती अंगात घालायचे. या

ब्रेसिअरच्या कप्समध्ये कापसाचं पॅडिंग असायचं. त्यावर मी अंगावर घट्ट बसणारा टी-शर्ट अडकवायचे. आणि स्कर्ट घालायचे. पूर्ण छबी दिसणाऱ्या मोठ्या आरशापुढे उभी राहून, मी छाती पुढे काढून पोज घ्यायचे. आरशात जे प्रोफाईल दिसायचं,ते महत्त्वाचं होतं. '

प्रोतिमा बेदीचं लिखाण वरकरणी कोणालाही बोल्ड आणि सामान्य माणसाच्या जगण्यापासून 'सात आसमाँ' दूर असल्यासारखं वाटेल; पण आम्ही शाळा-कॉलेजात मारलेल्या गप्पा आठवल्या की ही फॅन्टसी जवळपास प्रत्येक पोर अनुभवत असल्याचं लक्षात येतं. पण ज्या समाजात बाईच्या लैंगिक गरजांविषयीच संवादाची वानवा, तिथं फॅन्टसीबद्दल कोण बोलणार? पण ती दबली गेलेली वासनाच फॅन्टसीच्या नानाविध रूपांत हाका घालत राहते. तिला गोंजारावं तर अपराधीपणाची भावना, आणि नाही गोंजारावं तर शारीरिक-मानसिक घुसमट.

लैंगिकतेच्या बाबतीतलं सामाजिक दडपण कमी की काय म्हणून, त्याबाबतच्या अफवांचं पीकही मोठं. स्त्रीच्या लैंगिकतेला तर नैतिक संकल्पनांच्या साखळदंडांनी इतकं करकचून बांधण्यात आलं आहे की, मैथुनाची भावनाच तिच्यात अपराधीपण घेऊन यावी. त्यामुळे नैसर्गिक ऊर्मी उफाळून येते आणि सामाजिक जाणीव त्यावर पांघरुण घालते, असा खेळ बाईला आयुष्यभर खेळावा लागतो. स्त्रियांच्या लैंगिकतेबाबतच्या अफवांची यादी करायची तर सर्वांत वरचा क्रमांक लागेल, तो तिच्या समर्पणभावनेचा. स्त्री वैवाहिक चौकटीपलीकडे लैंगिक सुखाचा विचार करू शकत नाही किंवा तिच्या लैंगिक भावना केवळ एकाच पुरुषाला समर्पित असतात, हा भ्रम हजारो वर्षांपासून माणसाच्या डीएनएत घुसल्यासारखा संक्रमित होतो आहे. द्रौपदी पाच पुरुषांची पत्नी होऊ शकते, कुंतीला लग्नाआधी मूल होऊ शकतं, तर हा भ्रम अजूनही सामाजिक चौकटीतून बाहेर का पडू शकत नाही?

स्त्रिया पुरुषांइतका मैथुनाचा विचार करत नाहीत, हा दुसरा भ्रम. पण स्त्री असो वा पुरुष, दोघांच्याही आयुष्यातला ठराविक काळ असा असतो की तुम्ही झोपलेले असता, खात असता किंवा मैथुनाचा विचार करत असता. लैंगिक संबंधातल्या चरम आनंद अर्थात ऑर्गाझमबाबतही असाच काहीसा भ्रम. मैथुनावेळी चरम आनंदावर नाही पोहोचला तर तुम्ही ॲबनॉर्मल आहात, ही अटकळ सरसकट ऐकायला येते. प्रत्यक्षात त्या चरण सीमेपर्यंत पोचलेलंही काही वेळा स्त्रियांच्या लक्षात येत नाही. पण म्हणून त्या प्रक्रियेतला आनंद ती उपभोगू शकत नाही, असंही नाही. बाईच्या लैंगिकतेविषयी पुरुषांनी उभं केलेलं कल्पनाविश्व बायकांचीही दिशाभूल करणारं आहे. या कल्पनाविश्वातले, बाईला पुरुषांनी केलेली बळजबरी आवडते, तिला मैथुनाच्या वेदना होतात आणि ती किंचाळते, असले अंदाज बाईच्या नैसर्गिक इच्छांवरच मुलामा देतात.

स्त्री-पुरुष दोघंही आपापल्या अनुभवातून लैंगिकतेसंदर्भातले तर्क-वितर्क काढतात. एका व्यक्तीला कधीच दुसऱ्या व्यक्तीसमोर आपल्या गरजांची नेमकी मांडणी करणं शक्य होत नाही. त्यामुळे बाई बाईच्या गरजा जितक्या तंतोतत ओळखते, तशा त्या पुरुषाला ओळखणं शक्य होत नाही. हेच पुरुषांच्या बाबतीतही लागू होतं. याच निकषावर प्रसिद्ध मानवंशशास्त्रज्ञ मार्गारेट मीडनं नोंदवलेलं टिपण खूप गमतीशीर आहे. ती आदर्श समाजाची व्याख्या करताना म्हणते,

'आदर्श समाज तोच होऊ शकतो, ज्यात लोक तरुणपणात समलैंगिक असतात. मूल जन्माला घालण्यासाठी आणि ते वाढवताना भिन्नलिंगी संबंध अनुभवतात आणि मूल मोठं झाल्यावर पुन्हा समलिंगी संबंधांकडे झुकतात.'

मार्गारेटच्या विधानाचं सरसकटीकरण शक्य नाही. पण स्त्रियांच्या लैंगिकतेशी जोडलेली रोमान्सची भावना या शक्यतांवर विचार करायला लावणारी आहे. बाईला प्रत्यक्ष मैथुनापेक्षा प्रेमभावना आणि त्यातलं गुंतलेपण अधिक मोलाचं असतं. तिच्या रोमान्सच्या कल्पनेत मैथुनाची जागा अगदीच कोपऱ्यातली. त्यापेक्षा लडिवाळपण, सुखावणारा संवाद, छेडछाड आणि मिलनाचा नुसता विचारच तिला मैथुनातला आनंद मिळवून देतो. पुरुषस्वभाव नेमका याउलट. 'काम आटोपलं की वेगळं व्हा' ही वृत्ती बाईच्या समाधानाच्या नेहमीच आड येते. त्यातूनच तणावाला सुरुवात होते. त्यामुळेच कदाचित मार्गारेटला स्त्री-पुरुष संबंध निव्वळ मूल जन्माला घालण्यापुरते गरजेचे वाटतात. रॅशनॅलिझमचा सोस केवळ पुरुषांनाच. त्यांच्या लैंगिकतेतही तो डोकावल्याशिवाय राहत नाही. आयन रॅण्डसारखी लेखिका भलेही पुरुषाच्या विवेकाला खुलं आव्हान देणारी नायिका रंगवते. तिचा शृंगारही विवेकाच्या पातळीवर रंगतो; पण प्रत्यक्षात ज्ञान क्षेत्रात काम करणारी बाई असो की कोणत्याही क्षेत्रात, तिला विवेकाच्या फुटपट्टीवर लैंगिक संबंधांतली भावनिक ओल जोखता येत नाही. टोकाच्या बुद्धिवादी स्त्रियांनाही ही करामत झेपत नाही. त्यातनं जन्मणारा असूयेचा फेरा बाईच्या जगण्याचा भाग होऊन जातो. म्हणूनच बहुदा 'सेकंड सेक्स' सारखं स्त्रीवादी चळवळीचं बायबल लिहिणाऱ्या सिमोन-द बोवुआमध्येही सार्त्रच्या आयुष्यातल्या दुसऱ्या बाईबद्दल असूयेची भावना जन्मते. फरक इतकाच की, सिमोन ते अमान्य करत नाही, तर त्या भावनिक गुंत्याचा समाचार घेते. स्वतःच्या भावनांनाही प्रयोगांचा कच्चा माल म्हणून पाहते. म्हणूनच ती बाईच्या जगण्याचा सांगोपांग आलेख मांडू शकते.

भावनिक आवेगाचे चढ-उतार वयानुसार बदलतात, तशी सेक्शुअल फॅन्टसीही बदलत जाते. वयात येतानाचं उतावीळपण, तारुण्यातली ऊर्मी आणि नव्हर्स थर्टीचं झपाटलेपण हे या फॅन्टसीचे मुख्य टप्पे. यांतल्या पहिल्या दोन टप्प्यांतल्या फॅन्टसीपेक्षा तिसऱ्या टप्प्यातली फॅन्टसी अधिक वरचढ. एका मैत्रिणीला ३२व्या वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना ती म्हणाली, 'आता मी डबल सोळा म्हणजे डबल धोका.' ही खट्याळता आणि लैंगिकतेबद्दलची दिलखुलास वृत्ती तिशीत खुलायला लागते. या वयातली सेक्शुअल फॅन्टसी विझण्यापूर्वी मोठी होत गेलेल्या

वातीसारखी असते. स्थिरस्थावर संसाराचं रहाटगाडगं सुरू असतं. पोरं शाळा-कॉलेजच्या निमित्तानं आपापल्या मार्गी लागतात. कुटुंब आणि जबाबदाऱ्यांनी गिळून टाकलेला वेळ पुन्हा पदरात पडतो आणि फॅन्टसी बहरू लागते. सोशल मीडियानं या फॅन्टसीतला आभास आणखी भव्य केला आहे. फेसबुकवर निर्माण होणारं स्वतःचं स्वतंत्र विश्व, वॅाट्स अॅपवर भेटलेली प्रायव्हसी स्वतःचीच नव्यानं ओळख करून देणारी असते. तिथं आपल्या दिसण्यावर मिळणाऱ्या प्रतिक्रिया फॅन्टसीला आणखी मुठभर मांस चढवतात. सोशल मीडियाच्या प्रसारात लैंगिक क्रांतीची बीजं पेरली जात आहेत. त्या क्रांतीच्या हजार तऱ्हा रोज ऐकण्यात येतात. स्त्री-पुरुषात खुलत चाललेला संवाद एकूण समाजाला मोकळीक बहाल करणारा आहे. हे घडत असताना एकीकडे कुटुंब व्यवस्था पणाला लागत असल्याचं दुःख, तर दुसरीकडे ऑनलाईन जगण्याचा सोसाट लैंगिकतेभोवतीच्या सामाजिक वलयाला मूठमाती देत असल्याचं समाधान आहे. कदाचित लैंगिकतेला नैतिकतेच्या चौकटीतून बाहेर काढणारी वाट यातनं तयार होईल. आजचा संघर्ष त्याच दिशेनं प्रवास करणारा वाटतो.

बाईच्या लैंगिकतेचा विचार करताना ई. एल. जेम्स आणि रॉबीन रिनाल्डी ही दोन नावं आग्रहानं घ्यायला हवीत. ही दोन्ही नावं साहित्य जगतात गेल्या चारेक वर्षांत उदयाला आली. मराठी लेखक, प्रकाशक हजार प्रतीसुद्धा वर्षानुवर्षं डोक्यावर घेऊन नाचतात. पण 'फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे' बाजारात आलं आणि अवघ्या एक-दोन वर्षांत त्यानं शंभर मिलियनचा आकडा ओलांडला. शंभर मिलियन हा शब्द आम्ही फक्त बॅालिवूड सिनेमाच्या बाबतीत ऐकलेला आहे. पण फिफ्टी शेड्सच्या फॅन्टसीनं हॅालिवूडच्या पडद्यालाही आकर्षित केलं. फिफ्टी शेड्समधल्या मैथुनाच्या या हजार तऱ्हा एका बाईनंच सांगितल्या आहेत. अॅनाचं निर्णयस्वातंत्र्य विकत घेऊन ग्रे तिला लैंगिक समाधानाची चरमसीमा दाखवू पाहतो. पण जगातली सारी सुखं पायाशी लोळण घेत असतानाही ती अभिव्यक्तीचा बळी देत नाही. बाईला हात-पाय न हालवता सुख हवं असतं, या समजाला ती छेद देते. बिछान्यातल्या देवाण-घेवाणीतली तिची भूमिका ती मांडते. अगदी कठोर शिक्षेची जाणीव असूनही स्पर्शाचा हक्क वापरते. बॅान्डेड सेक्सचा विषय हाताळल्यानं तथाकथित स्त्रीवादी बाया या पुस्तकाची हेटाळणी करतात. मला ती त्यांच्या बुद्धीची मर्यादा वाटते. ई. एल. जेम्स बाईच्या लैंगिक अनुभूतीच्या प्रारंभीच्या टप्प्यातली फॅन्टसी मांडते, तर रॉबीन रिनाल्डी पोक्त वयातल्या मुक्त अभिव्यक्तीला संबोधित करते. तिच्या 'द वाईल्ड ओट्स प्रोजेक्ट'चं सबटायटलच 'One woman's midlife quest for passion at any cost.' असं . वयाच्या ४४ व्या वर्षी ती नवऱ्यासोबत एक करार करते. या करारात ते ओपन मॅरेजची संकल्पना स्वीकारतात. लैंगिक अनुभूतीचे दोघांचे मार्ग वेगळे होतात. एका वर्षात रिनाल्डी अकरा जणांसोबत शरीरसुख अनुभवते. दीर्घकालीन नात्यातली ओढ टिकवून ठेवण्याची मर्यादा रिनाल्डी मांडते. स्वतःच्या लैंगिकतेची जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेणं, इच्छांना वाट मोकळी करून देणं, सुखाच्या शक्यतांचा शोध घेणं तिला महत्त्वाचं वाटतं. पण ही जाणीव आणि आत्मविश्वास गवसायला तिला लग्नाची सतरा रटाळ वर्षं सहन करावी लागतात. बाईच्या लैंगिक फॅन्टसीचा प्रवास असा 'फिफ्टी शेड्स'च्या अॅनापासून सुरू होतो आणि रिनाल्डीपाशी स्थिरावतो.

सेक्शुअल फॅन्टसीविषयी खूप लिहिलं गेलंय. वाचलं गेलंय. त्या फॅन्टसीतल्या प्रतिमांमध्ये प्रत्येक जण स्वतःला ठेवू पाहतो. ते मान्य करण्याचं धाडस असणारे केवळ तिळमात्र... फॅन्टसीचं काय करायचं हे ज्याचं त्याच्या हाती आहे. माझ्या फॅन्टसीची अशी कविता होते.

फॅन्टसीच्या अक्राळविक्राळ
मादीची पिलं
जन्मताच
सैरभैर धावू लागतात
मेंदूच्या दिवाणखान्यातून

धुडगूस घालतात
बंद दरवाजात

ज्यांना वाट गवसते
सुटकेची
त्यांचे मनोरे होतात

उरलेले
न रुजलेल्या बियांसारखे
मेंदूत बुजून जातात


तुमचं काय होतं?

**योजना यादव**
yojananil@gmail.com

# ।। अनावृत कला आणि चित्रांमधली सेक्शुअल फॅन्टसी ।।

। जुई कुलकर्णी ।

चित्रं माणसाच्या मूर्त आणि अमूर्त जगाचा आरसा असतात. चित्रं बोलतात. चित्रांची भाषा चित्रांच्या दृश्य स्वरूपापलीकडे बरंच काही उलगडून दाखवत असते. चित्रं म्हणजे फक्त रंग, रेखा, रेषा, आकार नाही. चित्रं तो काळाचा तुकडा मांडतात; चित्रं तो समाजही दाखवतात. चित्रं माणसाच्या आतलं दबलेलं लैंगिक जीवनही दाखवतात. अनावृत चित्रं हा चित्रकलेच्या अभ्यासात अतिशय महत्त्वाचा भाग आहे. अनावृत चित्रं बघायला सर्वांना आवडतं. फक्त काही जण ते मान्य करतात.



'लेदा अँड स्वान' : लिओनार्डो द व्हिंची ते साल्वाडोर दाली


१४५२ मध्ये जन्मलेला रेनेसांस ( प्रबोधन ) काळातला सर्वांत प्रभावशाली चित्रकार लिओनार्डो द व्हिंची. लिओनार्डो द व्हिंची हा समलैंगिक होता. देखण्या आणि तरुण पुरुषांमध्ये लिओनार्डो वावरत असे. पुरुषांच्या शरीराची अनेक रेखाटनं त्यानं केली. सलाय या त्याच्या प्रियकराची अनेक चित्रं त्यानं केली. कुरूप म्हातारा आणि देखणा तरुण अशी अनेक रेखाटनं त्यानं केली, त्यामागे लिओनार्डो आणि सलायची जोडी ही प्रेरणा होती.













त्या काळात पद्धत होती तशी त्यानं येशुमाता मेरीची बरीच चित्रं काढली आहेत. ग्रीक पुराणकथांवर चित्रं काढणं हाही त्या रेनेसांस काळाचा विशेष होता. लिओनार्डो जरी स्त्रियांविषयी उदासीन असला तरी तो कायम ओळखला जातो ते 'मोनालिसा' या स्त्रीच्या चित्रानं. स्त्रीबाबतीत उदासीन, स्त्रीपासून दूर असलेला लिओनार्डो मातृसत्ताक पद्धतीचा प्रचारक असणाऱ्या 'प्रायोरी पंथ' या गुप्त संस्थेचा प्रमुख होता, हीदेखील एक विलक्षणच गोष्ट आहे.

'लेदा' हे रेखाटन विलक्षण आहे. लिओनार्डोनं काढलेलं हे एकमेव नग्न स्त्रीचित्र आहे. पुराणकथेप्रमाणे यात स्वान पक्ष्याच्या रूपात आलेला 'झ्यूस' आणि राणी लेदा यांचं मिलन होतं आणि त्यातून दोन-दोन जुळी निर्माण झाली आहेत. अनेक चित्रकारांनी या थीमवर चित्रं काढली आहेत.

लिओनार्डोचे लेदा आणि स्वान एकमेकांना स्पर्शत नाहीत. मिलनाचं सुख कुठं दिसत नाही. झ्यूस लेडावर बलात्कार करतो आणि त्या मिलनातून खाली अस्ताव्यस्त पडलेली फुटलेली चार अंडी आणि त्यातून बाहेर आलेली चार बाळं आहेत.

लिओनार्डो द विंचीचं 'लेदा अँड स्वान' गहाळ झालं, तेव्हा त्याचाच शिष्य मेल्झी यानं याच थीमवर एक चित्र केलं. अर्थात ते चित्र अतिशय वेगळं आहे. यातली लेदा अतिशय शांत, तृप्त, अधोमुखी स्त्री दिसते. तिच्या हातात फुलांची डहाळी आहे. ती आणि स्वान लगटून उभे आहेत. स्वानचा एक पंख तिच्या नितंबावर पसरलेला आहे. त्यांच्या मिलनातून निर्माण झालेली दोन अंडी फुटून त्यातून दोन-दोन जुळी बाहेर आलेली दिसतात.



लेडा अँड स्वान : मायकेल अँजेलो ब्यूरोनाती :१५३७

लिओनार्डो द विंचीच्याच समकालिनांपैकी एक महान शिल्पकार मायकेल अँजेलो ब्यूरोनाती यालाही याच थीमवर चित्र काढायचा मोह झाला.



मायकेल अँजेलोचे लेदा आणि स्वान रत होण्याच्या अवस्थेत दिसतात. लेदा पाठीवर अर्धवट बसलेल्या पोझिशनमध्ये अनावृत अवस्थेत आहे. तिच्या दोन्ही पायांमध्ये स्वान घुसलेला आहे. स्वानचं मस्तक तिच्या दोन्ही स्तनांमध्ये आहे. स्वानची चोच तिच्या ओठांशी जुळलेली आहे. संभोगाचा पूर्ण आनंद दोघांच्या देहबोलीतून दिसतो. मनुष्य आणि प्राणी (मग तो मूळ देव का असेना) यांचा संभोग हे काही विपरीत आहे, याची जाणीवच हे चित्र पाहून काही क्षण विसरून जायला होतं. या चित्रात उजवीकडे एक अंडं अजून फुटायचं आहे असं दिसतं आणि एक जुळं दिसतं.

'अॅटोमिका लेदा '

'Leda Atomica', ६१.१ x ४५.३ cm, oil on canvas १९४९.

लेदा अँड स्वान हीच थीम वापरून साल्वाडोर दालीनं एक चित्र काढलं आहे. या चित्राचं नाव आहे 'अॅटोमिका लेडा'. दालीची लेदा चबूतऱ्यावर अधांतरीच बसली आहे. ही लेदा स्वानला धरायचा आविर्भाव करते आहे तरी त्याला तिचा स्पर्श होत नाही. ती अधांतरी आहे. स्वान अधांतरी आहे. चबूतऱ्याखाली निळा समुद्र आहे; पण चबूतरा समुद्राला स्पर्शत नाही. अंडी आणि बाळं कुठंच नाहीत. सगळंच जग अधांतरी होण्याच्या काळातली ही अधांतरी लेदा आणि अधांतरी स्वान आणि त्यांचा अधांतरी संभोग आहे.

सोळाव्या शतकात स्त्री-पुरुषाचा संभोग दाखवण्यापेक्षा स्त्री

आणि जनावराचा संभोग दाखवणं जास्त सोईचं आणि प्रचलित होतं. त्यामुळे ही पुराणकथा चित्रकारांना विशेष प्रेरित करत असे.

माणसांच्या संस्कृतीनं जे नैसर्गिक तेच अपवित्र ठरवलं. संभोगाची किंवा नग्न चित्रं तर पाहायला आवडतात; पण त्यामागील लाजिरवाणी, हीन भावना मात्र सहन होत नाही, हा माणसाचा प्राचीन प्रॉब्लेम आहे.

पॉल सेझान

'लार्ज बेदर्स' २०८ x २४९ cms, oil on canvas, १८९८–१९०५.

पॉल सेझान अत्यंत विक्षिप्त आणि तुसड्या स्वभावाचा होता. कुणाचा स्पर्श त्याला सहन होत नसे. बायकांविषयी एकुणात त्याचं मत वाईट होतं. असा पॉल सेझान अखेरीस वयाच्या तिशीत मेरी हार्टेन्सच्या प्रेमात पडला. लग्न न करता दोघांनी एका मुलाला जन्म दिला. पुढे पॉलची चित्रकलाही बहरली. त्याला ओळख मिळाली ती या 'लार्ज बेदर्स'नं.

पॉल सेझाननं बेदर्स (अंघोळ करणारे) या सिरीजमध्ये अनेक चित्रं काढली. अंघोळ करणारे स्त्री आणि पुरुषही. अंघोळ करणाऱ्या स्त्रियांचा समूह प्रस्तुत चित्रात दिसतो. सगळ्या स्त्रियांचे चेहरे धूसर आहेत. काही स्त्रिया पाठमोऱ्या आहेत. कुठल्याही स्त्रीचा आयकाँटॅक्ट प्रेक्षकाशी होत नाही. मागे सुंदर निसर्गाची पार्श्वभूमी आहे. अगदी मोकळ्याढाकळ्या या नग्न स्त्रिया आहेत. खुल्या स्नानाचा खुला आनंद घेऊ शकणाऱ्या स्त्रिया. नग्नतेविषयी पाश्चात्त्य समाज उदार खरा; पण हा काळही एकोणिसाव्या शतकाच्या सुरवातीचा होता.

अंघोळ करणाऱ्या लोकांची चित्रं चित्रकारांना का काढावीशी वाटत असतील? मानवी शरीराचं कुतूहल कायमच माणसांत असतं. खासगी क्रियेचं चित्रण करणं रोचक ठरतं. आणि सगळ्यात महत्त्वाचं कारण हे आहे की, 'चित्रकला' ही चौकटी मोडण्याची कला आहे.

एडवर्ड मॅने

द लंचन ऑन द ग्रास

The luncheon on the grass, १८६२

एडवर्ड मॅने या चित्रकाराचं हे एक वादग्रस्त चित्रं आहे.

सहलीला आलेले दोन पुरुष आणि दोन स्त्रिया आहेत. पार्श्वभूमीवर सुंदर झाडं आणि तळं आहे. पुरुष अगदी संपूर्ण कडेकोट पोषाखात आहेत. मागील स्त्री तळ्यात खेळते आहे. आणि दुसरी स्त्री संपूर्ण नग्नावस्थेत पुरुषांशी गप्पा मारत बसलेली आहे. ती सरळ चित्राच्या फ्रेमबाहेर प्रेक्षकांच्या डोळ्यात डोळा घालून बघते आहे. ही न्यूड स्त्री मॅनेनं स्वतःची बायको आणि अजून एका मॉडेलच्या कॉंबिनेशननं बनवली होती.

या चित्रानं तेव्हा वादळ उठवलं. संपूर्ण पोशाखात असलेल्या पुरुषांसोबत आरामात बसलेल्या त्या नग्न स्त्रीचा तो आरामशीर भाव, सरळ प्रेक्षकांच्या डोळ्यांत बघणं हे लोकांना उद्दाम निर्लज्जपणाचं वाटलं. पॅरीसचं स्वैर होऊ लागलेलं वातावरणही या चित्रात ठळक जाणवतं.

एडवर्ड देगा

स्त्रीची कुठलीही अवस्था पुरुषाला आकर्षक वाटू शकते. एडवर्ड देगानं 'After the bath' या सिरीजमध्ये पुष्कळ चित्रं केली. ही चित्रं पेस्टल्समध्ये केलेली आहेत. आंघोळीनंतर आवरणारी स्त्री ही भयंकर सेन्शुअस दिसू शकते, हे या चित्रांतून दिसतं.

'Woman combing her hair' Pastel on light green wove paper, १८८८–९०. (६१.३ x ४६ cm)

आंघोळीनंतर नग्नावस्थेत केस विंचरणारी स्त्री या चित्रात चितारली आहे. ती स्त्री पाठमोरी नग्नावस्थेत आहे. स्त्रीशरीराची मागून दिसणारी वळणं आणि उघड्या पाठीची उत्तानता या चित्रात दिसते. या चित्रांवर सुरुवातीला बरीच टीका झाली; पण नंतर या चित्रांतील सौंदर्य आणि आकर्षण लोकांना जाणवलं.

पिकासो आणि स्त्रीचित्रं

पिकासो आणि स्त्रीचित्रं यांचं नेहमीच खास नातं होतं. पिकासोच्या आयुष्यात आलेल्या बायका आणि त्यानं चित्रित केलेल्या बायका, यांचं नेहमीच नातं असे. पिकासो बायकांच्या बाबतीत हावरट होता. बाई वापरून, चुरगळून काही काळानं दूर लोटून देण्याची त्याला सवय होती. त्याच्या इतर चित्रांतील बायका बऱ्याचदा अशा ओबडधोबड, दणकट दिसत असत.

'टू वूमेन रनिंग ऑन द बीच' gouache painting on plywood, miniature, १९२२

या चित्रात दोन बायका बेफाम पळताना दिसतात. केस मुक्त आहेत. दणकट मांड्या आणि हात आहेत. पळताना दोघींचे कपडे खाली सरकून एकेक स्तन उघडा पडला आहे. त्यांची देहबोली आणि चेहऱ्यावरचे भाव बेफिकीर, मुक्त दिसतात. गर्द निळं आकाश आणि समुद्र आणि समुद्रकिनाऱ्याच्या पार्श्वभूमीवर त्या धूमशान पळत आहेत.

दोघींनी एकमेकींचे हात धरले आहेत. ते स्त्रीसोबतीचं प्रतीक आहे. त्यातून लेस्बिअननेसही सूचित होतो आहे. उघडे स्तन त्या काळात स्वातंत्र्य आणि बंडखोरीचे प्रतीक होते. बाईतला 'बाई'पणाचा उन्माद या चित्रात पुरेपूर दिसतो आहे.

फ्रिडा काहलो आणि अमृता शेरगिल

फ्रिडा काहलो आणि अमृता शेरगिल ही दोन्ही नावं एकत्र येतात. दोघीही समकालीन आणि दोघीही जबरदस्त चित्रकार होत्या. दोघीही बाय सेक्शुअल होत्या, असंही म्हटलं जातं. दोघीही वादळी

आयुष्य जगल्या.

फ्रिडाची चित्रं तिच्या मेक्सिकन मातीतली वाटतात. त्या चित्रांत काहीतरी आदिम वेदना आहे.

तरुण वयातच झालेल्या अपघातानं बराच काळ वेदना भोगत बेडरिडन असलेली फ्रिडा स्वतःची भरपूर सेल्फ पोर्ट्रेट्स काढत असे.

'टू न्यूडस इन द फॉरेस्ट' Oil on metal, १०' x १२'

या चित्रामध्ये दोन नग्नावस्थेतल्या स्त्रिया दिसतात. मागे अवाजवी मोठ्ठी पानं आहेत, झाडं आहेत, कुंपणाच्या तारांसारख्या वाटणाऱ्या वेली आहेत. हे चित्र फ्रिडानं तिची मैत्रीण डोलोरससाठी काढलं आहे. झाडांमधून माकड दोघींना न्याहाळत आहे. माकड हे मेक्सिकोत सैतानाचं प्रतीक समजलं जातं. त्या पार्श्वभूमीवर गोरी स्त्री सावळ्या स्त्रीच्या मांडीवर डोकं ठेवून पहुडली आहे. फ्रिडाची स्त्रीसंगाची आस या चित्रातून जाणवते. या दोघी फ्रिडाच्याच द्वैत व्यक्तिमत्त्वाचं प्रतीक असाव्यात, अशीही एक शक्यता आहे.

अमृता शेरगिलनं स्वतःची काढलेली न्यूड सेल्फ पोर्ट्रेट्स अतिशय अप्रतिम आहेत.

ती स्वतःच्या प्रेमात होती, हे या चित्रांतून लखलखीतपणे जाणवतं.

'सेल्फ पोर्ट्रेट ॲज ताहितीयन वूमन ' १९३४

या चित्रात अमृता उभी आहे. ती कंबरेपर्यंत नग्न आहे. या चित्रात पॉल गोगँचा तेव्हा तिच्या कामावर असलेला प्रभाव विशेष जाणवतो. गडद शेड्समध्ये एखाद्या ताहितीयन स्त्रीप्रमाणे स्वतःला रंगवलेली अमृता चित्राच्या फ्रेमच्या पलीकडे बघते आहे.

'स्लीपिंग वूमन' १९३३ या एका सेल्फ पोर्ट्रेटमध्ये अमृता स्वतः संपूर्ण नग्नावस्थेत पाठीवर झोपलेली दिसते. एक हात उंचावलेला आहे, एक हात सरळ आहे. नैसर्गिक स्किन टोन, विखुरलेले केस, एका बाजूनं दिसणारा चेहरा आणि गुलाबी स्कार्फ आहे. संभोगाच्या वेळी असणारी स्त्रीशरीराची अवस्था या चित्रातून सूचित होते आहे. अत्यंत सेन्शुअस आणि प्रचंड इनव्हायटिंग असं हे चित्रं आहे.

रेने माग्रिटेची जादू

चित्रांमधली सेक्शुअल फॅन्टसी या विषयावर लिहताना रेने माग्रिटे या बेल्जियन पेंटरविषयी लिहिणं आवश्यक आहे. या विषयाभोवती रेनेची अनेक भन्नाट आणि गूढ कल्पनाशक्तीचा आविष्कार असणारी चित्रं आहेत.

'ब्लॅक मॅजिक' Oil painting, १९१८-१९२४

हे त्याचं चित्र विशेष समजलं जातं. सुंदर निळ्या आभाळाची आणि त्यात मिसळल्या समुद्राची पार्श्वभूमी आहे. एक स्त्री पूर्ण नग्नावस्थेत उभी आहे. एक हात दगडावर रेलून ठेवला आहे. तिचा शरीराचा वरचा कंबरेपर्यंतचा भाग आभाळ आणि समुद्राच्या रंगात मिसळून गेलेला दिसतो. तिथून खालचा भाग मात्र नैसर्गिक स्त्रीसारखा दिसतो. तिचे डोळे मिटलेले आहेत. ती अधोमुखी आहे. ती एखाद्या पाषाणशिल्पासारखी वाटते. या चित्रासाठी रेनेच्या पत्नीने मॉडेल म्हणून काम केलं. या चित्राबद्दल रेने म्हणतो त्याप्रमाणे ''पाषाण हा पृथ्वीशी निगडित असतो. तो स्वतंत्र असा नसतो. स्त्रीदेखील एकप्रकारे तशीच असते. भूमीशी निगडित असते.''

रेनेचा स्त्रीशरीराकडे आणि तिच्या नग्नतेकडे पाहण्याचा हा ॲटीट्यूड विशेष आहे. ही स्त्री पाषाण, आभाळ आणि समुद्रात मिसळून गेली आहे. त्यामुळे इथं हे चित्र आध्यात्मिक लेव्हलवरच जातं.

या चित्राची जादूच अशी होते की, मग या चित्राचं नाव 'ब्लॅक मॅजिक' का आहे ते कळतं.

द डान्स १९१० ८' ६ १/२' x १२' ९ १/२'

Oil on canvas

हेन्री मातीस

पिकासोचा समकालीन असणारा हेन्री मातीस त्याच्या वेगळ्या कलरस्कीमबद्दल ओळखला जातो.

हे चित्र मातीसनं रशियन व्यापारी सर्जी शुचुकीन याच्या मागणीवरून काढलं. हे चित्र त्याच्या करिअमधील महत्त्वाचं चित्र मानलं जातं.

चित्रात पाच पूर्ण नग्न आकृत्या नृत्य करताना दिसत आहेत. हे नृत्य आदिम वाटतं आहे. त्याला मुख्य कारण या चित्राची रंगसंगती आहे. आणि अर्थातच या आकृत्या पूर्ण नग्न असणं, हेही महत्त्वाचं कारण आहेच.

हेन्री मातीस फॉविझम या चळवळीचा एक शिलेदार होता. फॉविझम म्हणजे फ्रेंचमध्ये 'वाईल्ड बिस्ट'. हे लोक त्यांच्या भडक रंगसंगती आणि वास्तवदर्शी चित्रीकरणासाठी ओळखले जातात.

या चित्रातही गडद निळा आणि हिरवा यांच्या पार्श्वभूमीवर लाल रंगातल्या या बायका उठून दिसतात. नाचताना माणसाच्या अंगात लय असायला लागते. चित्र काढतानाही ही



लय असण्याला महत्त्व आहे. त्यामुळेच नृत्याचं चित्र करणं, हे एका अर्थानं चित्रकारासाठी  हवंहवंसं  आव्हान आणि आवाहन असतं.

या चित्रात दोन स्त्रिया आहेत; पण त्यांचं 'स्त्रीत्व' काही विशेष ठळक केलं आहे किंवा करायचं आहे असं दिसत नाही. त्या सर्व आकृत्या बेभान लयीमध्ये नाचत आहेत. त्यांची झुकलेली मस्तकं, एकमेकांत गुंतलेले धरलेले हात, काही वेळा हवेत वाकडेतिकडे होणारे पाय, हे सगळं मिळून उत्तम नृत्य दिसतं.

आदिवासी नृत्याची प्रकर्षानं आठवण येते. हा मुक्ततेचा डान्स वाटतो. इथं सगळं 'सुधारलेपण' फेकून, फेडून निखळ 'माणूस' नाचतो आहे.

एकुणातच माणसाच्या संस्कृतीची प्रगती बघता, हा असा डान्स हे अशक्य कोटीतलं स्वप्न वाटतं. तरीही मूळ माणसाची आदिम प्रेरणा येनकेन प्रकारे दिसत राहतेच. हा 'द डान्स' हे त्याचंच प्रतीक वाटत आहे.

मॅडोना : १८९४ ३५ in × २७ in oils on canvas.

एडवर्ड मंच

आपल्याकडील लज्जागौरीची आठवण करून देणारी ही आहे एडवर्ड मंच या नॉर्वेजिअन चित्रकाराची मॅडोना. मॅडोना म्हणजेच येशूच्या आईचं- मेरीचं चित्रण असंख्य कलाकारांनी केलं आहे. पण या सर्वांमध्ये एडवर्ड मंचची मॅडोना वेगळी ठरते. त्याला मुख्य कारण आहे तिचे भाव.

याच चित्राचं दुसरं नाव मंचनं  'द लव्हिंग वूमन' असंही ठेवलं होतं. या नावावरूनच आता यात काय वेगळेपणा आहे ते कळेल.

नेहमीची मेरी अतिशय सात्त्विक, शांत, मातृभावांनी परिपूर्ण, करुण अशी दिसते. ही मॅडोना मात्र फार वेगळी दिसते आहे. तिचा एक हात मागे खेचलेला आहे. रत होताना स्त्रीचे हात कधीकधी अशा स्थितीत असू शकतात. तिच्या चेहऱ्यावरचे भावही तसेच आहेत. डोळे मिटलेले आहेत. ती अर्धनग्न अवस्थेत दिसते आहे. स्तनाग्र आणि नाभी लाल रंगानं उठून दिसते आहे.

हे चित्र पाहणाराच जणू या मॅडोनावर झुकलेला पुरुष असावा, असे भाव या चित्रात येतात.



सेक्स करण्याच्या क्रियेतली वेदना ही मॅडोना जिवंत करते आहे. मातृत्वाच्या आधीची मादीची भूमिका दाखवणारी मॅडोना अनेक अर्थांनी वेगळी ठरली. अशी 'सिडक्टिव' मॅडोना चित्रित केल्याबद्दल एडवर्ड मंचवर टीकाही  झाली; परंतु मंचच्या मते सेक्शुअल इंटरकोर्स हा स्त्रीसाठी अतिशय आवश्यक असा अनुभव आहे; कारण त्यामुळेच तिला मातृत्व प्राप्त होतं. त्यासाठी त्याला याचं चित्रीकरण करणं आवश्यक वाटलं.

जॉन फर्नांडिस

भारतीय चित्रकारांत चित्रं आणि सेक्शुआलिटी म्हटलं की ठाकूरसिंग यांची  'ओलेती' आठवते. राजा  रविवर्मा यांचीही काही चित्रं आठवतात. पण जॉन फर्नांडिस हे नाव या संदर्भात फार महत्त्वाचं आहे. जॉन फर्नांडिस ओळखला जातो त्याच्या स्त्रीचित्रांसाठी.

जॉन फर्नांडिसचा कुंचला स्त्रियांना असं चित्रीत करत असे, जसं पु. शि. रेग्यांची कविता स्त्रियांना. प्रत्यक्ष वास्तवात या स्त्रिया इतक्या सुंदर दिसत नसतीलही; पण जॉनच्या चित्रात सुंदरच दिसतात. जॉन फर्नांडिस आयुष्यभर स्त्रियांची चित्रं काढत राहिला. केवळ एकच विषय घेऊन त्यावर आयुष्यभर असं विलक्षण सुंदर काम करत राहणं,  ही सोपी गोष्ट नाही. जॉनची न्यूडचित्रं अंगावर येत नाहीत; अतिशय तरल वाटतात. हे जॉन फर्नांडिसचं वैशिष्ट्य आहे .

सॅटीन शीटस २४  x १२ inches, Oil on canvas

जॉनचं हे एक देखणं न्यूड चित्र आहे. मॉडेल पोटावर झोपलेली आहे. अर्धनग्न अवस्थेत आहे. नितंब पातळसर सरकत्या वस्त्रानं झाकले आहेत. चेहरा केसांनी झाकलेला आहे. एक स्तन दिसतो. तिची पातळ, लवचिक कंबर, त्वचेचा देखणा पोत जाणवतो. अर्धअनावृत असल्यानं ती अंमळ जास्त आकर्षक वाटते. चेहरा दिसत नसल्यानं जास्तच गूढ वाटते. सॅटीनवर पहुडलेला हा जणू सॅटीनचाच देह आहे.

......

चित्रं आणि सेक्शुआलिटी या दोन्ही अविभाज्य संकल्पना आहेत. अनावृत कलेद्वारा विविध काळांत, जगात विविध ठिकाणी चित्रकारांनी आपापल्या परीनं या विषयाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. माणूस आहे आणि चित्रकला आहे तोवर हा शोध तसाच चालू राहील.

**जुई कुलकर्णी**
juijoglekar@gmail.com


## नवे कोरे

जीवनमार्गातल्या कठीण प्रसंगांवर मात करून निर्भयपणे, जीवनपथावर चालण्याचे मार्गदर्शन 'बायबल'चा आधार घेऊन या पुस्तकात करण्यात आले आहे. यशप्राप्ती, मनातले संघर्ष, नैराश्यावर मात आदी विषयांवर चिंतन आणि उपाय उद्बोधक आहेत.

# वादळातील दीपस्तंभ

मूळ लेखक : **क्रेफ्लो डॉलर**

अनुवाद : **गौरी गाडेकर**







## नवे कोरे

हे पुस्तक लोकांचा विश्वास संपादन करून त्यांना लीलया कसे जिंकायचे याचे रहस्य सांगून थांबत नाही, तर याबद्दलची हमखास यशस्वी होणारी आणि अनुभवाने सिद्ध झालेली तंत्रे शिकवते.

# सूत्रे


## प्रभाव पाडण्याची!

मूळ लेखक : **डॉ. रॉब युंग**

अनुवाद : **सुदर्शन आठवले**

# ।। दांभिकता आणि दुटप्पी : लैंगिकता आणि चित्रपट ।।

। डॉ. अनमोल कोठाडिया ।



एकूणच आपण  दांभिक आणि दुटप्पी आहोत..  नग्नतेसह लैंगिकता असो, कलाकृती असो, कोणताही जीवनव्यवहार, व्यक्ती आणि समाजपातळीवर आपण दांभिक आणि दुटप्पीच आहोत..

विषय लैंगिकतेचा असला तरी त्यात नग्नतेचाही समावेश करण्याचे कारण ( भलतेच समजू नका ) म्हणजे सहज नैसर्गिक स्थिती असणाऱ्या नग्नतेकडेही आपण केवळ लैंगिक दृष्टिकोनातूनच पाहतो आणि त्यास अश्लील ठरवून दमनाची सुरुवात करतो. या दमनप्रक्रियेचा परीघ वाढता वाढता तो सर्व जीवनव्यवहारास पुरून उरतो. त्यातून मुळात निकोप अशी लैंगिकता विलय पावते आणि लैंगिकतेकडेही पाहण्याचा दृष्टिकोन विकृत होतो. तेव्हा जीवशास्त्रातील प्रजोत्पादन संस्था शिकवितानाही ऑकवर्ड होणारे सर्व नव्हे; पण काही शिक्षकमंडळी  (त्यामुळे ऑकवर्ड होणारी वा फिदीफिदी हसणारे विद्यार्थी) असतील तर नग्नता, लैंगिकता, समलैंगिकता दृश्य स्तरावर सोडाच; पण शब्द स्तरावरदेखील सहजभावाने स्वीकारता येणार नाहीत. याचा आरंभबिंदू सांप्रदायिक धर्म आणि तथाकथित संस्कृतीच्या ठेकेदारांपासून सुरू होतो आणि एकूणच जीवनव्यवहारात उतरताना चित्रपटांबाबतही चित्रपटकर्ते, प्रेक्षक, समाज, सेन्सॉरबोर्ड यांच्यापर्यंतही झिरपतो.

धर्म आणि संस्कृतीच्या ठेकेदारांचा जन्म अलैंगिक प्रक्रियेतून झाला असावा की काय, अशी मला शंका वाटते. जर तसे असते तर या महाभागांना किती पवित्र वाटले असते नाही! धरम धरम तो सब कहे.. पण मनुष्यधर्म न जाणणाऱ्या काही ठेकेदारांच्या गोट्या, लैंगिकता म्हटले की कपाळातच जातात आणि त्यांचे असामाजिक व अनैसर्गिक वर्तन सुरू होते..  समाजव्यवहारात ते 'सेन्सॉरबाह्य सेन्सॉर' बनून अभिव्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी करू लागतात आणि अंधारात ते अधिकाधिक पर्व्हर्ट वागू लागतात. अशांना कायद्याचा बडगा दाखविण्याबरोबर मानसिक उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्याचीही गरज आहे, असा माझा करुणाभाव आहे. असो. तर तोपर्यंत या आउट ऑफ फ्रेम ठेकेदारांना त्यांच्या वैचारिक गर्तेत सोडून आपण इन फ्रेम होत चित्रपटांकडे वळू यात.

कलाकृती म्हणून चित्रपट जेव्हा अभिव्यक्तीसाठी, जगण्याचा शोध घेणारा असतो तेव्हा जगण्याशी एकात्मिक असणारी लैंगिकता चित्रपटात, विषय वा आशयसूत्र वा पार्श्वभूमी वा तपशिलातील भाग म्हणून येणे अगदी स्वाभाविक आहे; त्यात त्याज्य असे काहीच नाही. आशयाच्या गरजेनुसार, दिग्दर्शकाच्या प्रकृतीनुसार, स्थळकाळसापेक्ष लैंगिकता- तपशीलवार (nymphomaniac / निंफोम्यानियाक) वा काव्यात्मक (बासू भट्टाचार्य यांचा 'अनुभव') वा प्रतिकात्मक (मजीद माजिदी यांचा 'बरान'- चिखलातील पाउलखुणेचा खड्डा पाण्याने भरले जाण्याच्या दृश्याचा तरल अन्वयार्थ ) अशा वैविध्यपूर्ण पद्धतीने प्रकट होऊ शकते.

याच्या अगदी उलट- केवळ लैंगिक क्रीडाच फोकस ठेवून त्यातही 'संभोग नव्हे तर उपभोगाचे' पुरुषसत्ताक मनोवृत्तीतून सादरीकरण करणाऱ्या, कथानक-व्यक्तिरेखा-विचार-आशयगर्भता या गोष्टी फाट्यावर बसवणाऱ्या ब्ल्यू फिल्म्सही (पोर्नोग्राफिक) बनत असतात. चंगळवादी व्यवस्थेत ओरबडण्यालाच रसास्वाद समजले जात असल्याने, पोर्नला बाजारीकरणात प्रचंड मागणीही आहे. ही विकृतीच आहे, पण याचे कारण प्रकृतीवर तथाकथित संस्कृतीच्या आरोपनात दडलेले आहे. प्रकृतीला जसे आहे तसे न स्वीकारता, संस्कृतीच्या नावाखाली दमनीय भूमिका लादल्यामुळे लैंगिकतेकडे पाहण्याची निकोप भावनाच हरवली! पोर्नचेही सामाजिक आणि व्यक्तिगत पातळीवरचे दुष्परिणाम घातक आहेत, जसे बलात्कार, बाल-यौन शोषण, भावनिक नातेसंबंधात बिघाड / अंतर, कौटुंबिक हिंसाचार, अपराध-गंड. मात्र बंदी आदी उपाय पोर्नचे काहीच वाकडे करू शकत नाहिये. पण लैंगिकतेकडे पाहण्याची स्वच्छ नजर असलेल्या निकोप मनाला डीव्हीडी पोर्न उपलब्ध झाल्या तरी (इंटरनेटच्या युगात, जागतिकीकरणाच्या बाजारीकरणात कोण अडवू शकणार?) रिझवू शकत नाहीत, हा माझा स्वतःचा अनुभव! तेव्हा खजुराहोला स्मरून, लैंगिकतेविरोधातील सांस्कृतिक दहशतवाद कमी करणे, हे एक सकारात्मक पाऊल ठरेल. कल्पनाशक्ती नसलेल्या असर्जनशील लोकांनाच पोर्नची गरज वाटते. (लैंगिक उपचारांतर्गत पोर्नचा वापर केवळ तज्ज्ञ मार्गदर्शनाखालीच आणि तरीही याबाबत माझी मते राखीव) खरे तर लैंगिक क्रीडेतील वेगवेगळ्या शक्यतांना उत्कट साद-प्रतिसादातून अनुभवता येणे शक्य असते; आभासी वास्तवात नव्हे, तर प्रत्यक्ष वास्तवात मोकळेपणाने भिडा तर खरे! असे भिडण्यासाठी अवकाश निर्माण करून देणे ही समाजाची जबाबदारी!

पोर्नमधून बीभत्स रस पाझरतो, तर शृंगारिक कलाकृतीमधून शृंगाररस पाझरतो. यातील फरक लक्षात घ्यायला हवा. त्याच वेळी जर्मन दिग्दर्शक रोलांड रेबेर आपल्या 'एंजल्स विथ डर्टी विंग्ज'सारख्या कलाकृतींमधून  तपशीलवार लैंगिक क्रीडा बीभत्स रसाचा वापर करत दाखवतो; पण ते मनोरंजनाची आंबट धारणा de-construct करत जीवनदर्शन घडवण्यासाठी. त्यामुळे वरकरणी पोर्न वाटून गर्दी खेचली तरी आंबटशौकिनांची निराशा होते व तेही अशा कलाकृतींवर पोर्न असल्याची टीका करतात, असाही एक अनुभव. रोखठोक पोर्नपेक्षा दांभिक सॉफ्ट पोर्न ( 'खुली खिडकी', 'गरम जवानी' सारखे) तर अधिक घातक; कारण एकतर त्या अंधारगृहात मोठ्या पडद्यावर पाहता  येतात त्यामुळे चित्रपट माध्यमाचा प्रभाव समाजमनावर कित्येक पटींनी वाढतो.  प्रेक्षकांचे विरेचनही विदग्धच राहते. मसालापटांमध्ये प्रेक्षकशरणता स्वीकारत साऱ्या मसाल्यांच्या वापरात लैंगिकताही केवळ मसाला म्हणून ठिगळजोडसारखी वापरली जाते. येथेही विदग्धता उपलब्ध. व्यावसायिकता जपत; पण चांगले कथानक व चित्रपटाची भाषा घेऊन तांत्रिकदृष्ट्या सफाईदार चित्रपटातूनही लैंगिकता, शृंगार रस तारताम्याने सादर करता येतो ( गिरीश कर्नाडचा 'उत्सव ' वा मीरा नायरचा 'कामसूत्र'). अर्थात कधीकधी आर्थिकादी समीकरणे असू शकतात. त्यासाठी अनेकदा विषयाची गरज मुद्दाम निर्माण करून 'जिस्म'दार लैंगिक दृश्ये पेरली जातात.

याचे उदाहरण नव्हे, तर स्पष्ट दर्शन असणारा 'व्हेन इव्हनिंग फॉलस् ऑन बुखारेस्ट ऑर मेटाबोलिझम' ही  रुमानियाची कलाकृती. चित्रपटातील चित्रपट अशा कथानकातील दिग्दर्शक नायिकेस तिचे पटकथेतील काम संपले असले तरी अजून शूट करावे लागेल, असे सांगतोय. ती विचारते- का? तो- फिल्ममध्ये एकही नग्न दृश्य नाही! ती- पण पटकथेत नाहीये! तो- नग्न दृश्याने कलात्मक सौंदर्य वाढते (!) ती- मग नायकाचे घ्या ना, कारण पटकथेत तो मध्यवर्ती भूमिकेत आहे. तो- पुरुषापेक्षा स्त्रीची नग्नता अधिक सुंदर असते!! ती- पटकथेत जागा कुठेय? तो- तुझ्या घरी दिवाणखान्यात  मित्र आलेले असताना तू तिथे नसलेले एक संवाददृश्य आहे, तेव्हा हा संवाद ऑफ स्क्रीन ठेवत तुझा कपडे काढून आंघोळ करण्याचे दृश्य पेरता येईल! अर्थातच गरज नसलेले दृश्य सोयीस्करपणे समर्थनीय करून कसे घुसडले जाते, याचा गंमतशीर वस्तुपाठ तर मिळतोच; पण या संकल्पित दृश्याची रिहर्सल होत असतानाच्या प्रसंगात ती कपड्यांवरच घेत '.. ऑर metabolism' च्या कोर्नेलिउ पोरुम्बोइ या दिग्दर्शकाने मोह टाळत स्वतःची कलावंत म्हणून आशय-रूपबंधाप्रती इंटेग्रिटीही पाळलेली आहे. एखाद्या धूर्त दिग्दर्शकाने नग्न दृश्य पेरण्याची अशी धंदाधार्जिण संधी गमावली नसती.

मूळ व्हिएतनामची असणारी अमेरिका स्थित 'ट्रिम टी मिन्ह हा' ही दिग्दर्शिका आपल्या 'नेकेड स्पेसेस' या विलक्षण माहितीपटामध्ये केवळ विषयवस्तूच नव्हे, तर दृश्य आणि ध्वनी पातळीवरील सादरीकरण de-construct  करीत माहितीपटकर्त्यांसमोरच काही नैतिक प्रश्न उपस्थित करते. एरवी मसालापटांना नाके मुरडणारे काही माहितीपटकर्ते विषय निवडताना एक्झोटिक आणि सनसनाटीपणास प्राधान्य देतात व बुद्धिजीवी पोझ घेऊन अनेकदा आशयावर सफाईदारपणे कुरघोडी करत नग्न, अर्धनग्न स्त्रियांची शरीरे फोकस करतात.

चित्रपट हे समाजवास्तवाचे प्रतिबिंब असते हे लक्षात घेता, पुरुषसत्ताक पगडा असलेल्या समाज व्यवस्थेत पुरुषवर्चस्वाचे प्रतिबिंब पडणारच. (दर्शन घडवत  वर्चस्वाला आव्हान देणे वा प्रश्न निर्माण करणे वेगळे आणि ते स्तुत्य!) हा पगडा लिंगनिरपेक्षपणे चित्रपटकर्त्यांवर आणि प्रेक्षकांवरही असतो आणि तो चित्रपटाच्या हाताळणीतून, तसेच त्यास मिळणाऱ्या प्रतिसादातूनही जाणवत राहतो. पोर्न फिल्म्सच नव्हेत, तर अगदी

मुख्य प्रवाहातील चित्रपटांमधूनही 'स्त्री ही व्यक्ती नव्हे तर वस्तुमात्र' उरते. ती उपभोग्य वस्तू होते. तिला नकाराचा अधिकार नसतो. गरज असो, नसो, तिच्या देहाचे प्रदर्शन / वर्णन गरजेचे बनते. चित्रपटविषयक लिखाण करणारी मंडळीही एकतर गॉसिप्स वा माध्यमावर लिहितानाही स्त्रीदेहाच्या वर्णनावर (त्यास आक्षेप नाही) संबंध नसतानाही घसरतात. नायकत्व ठसवण्यासाठी खलनायकाकडून नायिकेचा विनयभंग वा बलात्कार- तोही रंगीतसंगीत विनोदरम्य करून- हा प्रसंग असा रंगवतात की, तोपर्यंत भावना चळलेले प्रेक्षक मनोपातळीवर त्या उपभोगात सामील झालेले असतात आणि विनयभंग जर नायकच करत असेल तर त्याचे गौरवपूर्ण सादरीकरण व शेवटी नायिकेचे त्यास शरण जाणे... खेदाची बाब म्हणजे, स्त्री-पुरुष समानतेच्या उद्‌घोषित या युगात हे असले मसालेदार गलिच्छ प्रसंगही आपण निखळ मनोरंजक समजतो.

याच पुरुषसत्ताक मानसिकतेतून तृतीयपंथीय, समलैंगिक आदींबद्दलदेखील समाजात आणि प्रवाहपतित चित्रपटांमधून नकारात्मक वा छद्मी- विडंबनात्मक वा सनसनाटी चित्रण आढळते; समंजस संवेदनशीलपणे पाहिले जात नाही. बहुतांश वेळा 'दोस्ताना' छाप मामला. 'ब्रोबक माउंटन'सारखा चित्रपट भारतात बनणे अवघडच,' असे ऋतुपर्णो घोष म्हणायचे. तशा फॅशन, हनिमून ट्रॅव्हल्स यातून काहीसे डोळस चित्रण; पण उपकथानकातून. विषय आणि कथानक म्हणून 'बॉम गे', 'mango सुफले' या गे'पटांपासून सुरुवात. पण सनातन्यांनी या प्रयत्नांना अनुल्लेखाने मारले; मात्र 'फायर' मधून निघालेल्या लेस्बियन स्त्री लैंगिक उद्गारांना मात्र 'जाज्वल्य' विरोध झाला. जागतिक पातळीवर 'ब्ल्यू इज द वार्मेस्ट कलर'सारख्या तपशीलवार चित्रण करणाऱ्या लेस्बियन फिल्म्स या काळातही दुर्दैवाने फक्त खळबळजनकच ठरतायेत. आता समलैंगिकता विषयाकडून पार्श्वभूमीकडे 'द परेड' (सबिऱ्या) करू लागलीये.

इस्राईल- palestine ही संघर्षाची धगधगती पार्श्वभूमी पाहता, अशा हाडवैर असणाऱ्या देश, समूहातून आलेल्या व्यक्तींमध्ये प्रेमसंबंध निर्माण झाले तर.. वरकढी म्हणजे ते समलैंगिक असतील तर.. प्रेमात वैरभाव विसरता येतो..? जोडीदाराचा देश व धर्म यांविषयी असणाऱ्या पूर्वग्रहांवर मात करता येऊ शकते..? कल्पनेइतके वास्तवात सहजशक्य नसेलही; पण अगदीच अशक्यही नाही. एक गे आणि दुसरे लेस्बियन अशा जोडप्यांच्या मुलाखती असल्या तरी विषय केवळ समलैंगिकतेत अडकत नाही, तर अधिक व्यापक बनत राजकीयदृष्ट्या सुसंवादी, समंजस भूमिका मांडण्याचा प्रयत्न करतो. समलैंगिकतेच्या पार्श्वभूमीवर असा व्यापक आशय मांडणारा 'झिरो डिग्रीज ऑफ सेपरेशन' हा लक्षवेधक माहितीपट ठरतो.

आपण चित्रपट पाहतो- म्हणजे दिग्दर्शकाला जे दाखवायचे आहे ते कॅमेऱ्याच्या नजरेतून तो प्रेक्षकाला दाखवत असतो. म्हणून तर विषय, कथानक, संवाद काय आहे यापेक्षा दिग्दर्शकाचा दृष्टिकोन महत्त्वाचा ठरत असतो. मग ते नायिकेचे सहज दर्शन असो, प्रणयाराधन असो, प्रणय असो व बलात्कार! इतर माध्यमांपेक्षा चित्रपट प्रभावी माध्यम आहे; कारण कॅमेऱ्याच्या माध्यमातून आपण अगदी घटनास्थळावर पोचून तो प्रसंग तटस्थपणे पाहू शकतो (ऑब्जेक्टिव्ह शॉट). प्रसंगी घटनेच्या केंद्रस्थानी जाऊन एखाद्या व्यक्तिरेखेच्या दृष्टिकोनातूनही (सब्जेक्टिव्ह शॉट) पाहू शकतो. नायिका कपडे बदलण्याच्या दृश्याची कल्पना करू. जगण्यात स्त्रिया कपडे बदलतातच ना..? तशी नायिका सहजपणे कपडे बदलू शकते (ऑब्जेक्टिव्ह शॉट) हे झाले सहज नग्न दृश्य! पण कपडे बदलताना तिने कॅमेऱ्याशी नजरानजर केली तर तेथे कॅमेरा म्हणजे प्रेक्षकाचा डोळा असतो. येथे हे दृश्य कामुकतेकडे झुकते. कारण तिचे वागणे सहज नसते, तर तो पुरुषी नजरांसाठी नजराणा पेश केलेला असतो. आणि ही कामुकता सर्वसाधारणपणे अन्य माध्यमांपेक्षा अधिक प्रभावीपणे मनात भिनते. म्हणूनच मला आशयपूरक सहज संपूर्ण नग्नदृश्यापेक्षा, आशयविसंगत मुद्दाम घुसडलेले संपूर्ण साडीत असणाऱ्या नायिकेचे उपभोग्य पातळीवरचे दर्शनसुद्धा अधिक व्हल्गर वाटते. पूरब और पश्चिम अशी तुलना सतत करणाऱ्या मनोज कुमारचे तथाकथित देशभक्तीवरचे भारतपट आठवून पाहा.

'मदर and चाईल्ड' या १० मिनिटांच्या नृत्यपटात एकाच जागी बसलेली नर्तिका केवळ शरीराच्या लयदार हालचालींतून आई आणि बाळाचे नाते व्यक्त करते. ही फिल्म संपल्यानंतर त्या नृत्य आणि cinematic प्रभावातून मला कोणीतरी भानावर आणताना ती नर्तिका संपूर्ण नग्नावस्थेत होती, हे उत्तेजित आवाजात सांगितले. त्या सहज नग्नतेतूनच मी या जैविक आत्मीय नात्यात तन्मयित झालो होतो. मान्य; अशा कलाकृती पाहतानाही नग्न स्त्रीदेहाचा उपभोगात्मक आस्वाद घेणारेही काही प्रेक्षक असतील; पण तो दोष दिग्दर्शकाचा नाही!

मग प्रेक्षकांची अशी मानसिकता लक्षात घेऊन दिग्दर्शक धंदेवाईकपणा अंगी बाणवत चित्रपट बनवू लागतात. मुळात बाल व्यक्तिरेखा नायक असणाऱ्या स्टीव्हन स्पिलबर्गच्या 'इ.टी.' चा राकेश रोशन 'कोई मिल गया' हा रिमेक बनवतो तेव्हा धंद्याच्या हेतूने प्रणयरंग भरण्यासाठी नायकाला शरीराने तरुण करतो; पण निरागस ठेवण्याची कसरत करताना विशेषमतीने ग्रस्त करतो. बालप्रेक्षक मुख्यत्वे अपेक्षित असूनही प्रौढांनाही (प्रौढ म्हणजे प्रगल्भ नव्हे!) खेचण्यासाठी नायिकेची एन्ट्रीच पाठीमागून पाय आणि पार्श्वभाग दाखवत दऱ्याडोंगरांचे नेत्रसुखद दर्शन घडवितो. असले भेसळपटही आपल्याकडे निर्भेळ करमणूक समजले जातात.

'व्हरायटी इज द सोल ऑफ प्लेझर'चे चंगळवादी तत्त्वही

धंदेवाईक निर्मात्यांनी अंगीकारले आहे की काय, अशी एक शंका येते. पूर्वी नायकाची आई ही व्यक्तिरेखा निरुपा रॉय छाप असायची; आता तीही सेक्स-ऑब्जेक्ट म्हणून दाखवणे सुरू झालेय. बहीण तर कधीच बनली होती. आता तर लहान वयोगटातील मुलीही सेक्स-ऑब्जेक्ट म्हणूनच प्रस्तुत होतायेत की काय, असे पोशाख, हावभाव, कॅमेरा कोन व फोकस पाहता वाटते. वेगवेगळ्या वयोगटांत, प्रत्येक व्यक्तीत ही कामभावना कमी-जास्त प्रमाणात असतेच; आक्षेप त्यास नाही. काळ प्रभावाने समाजही बदलतोय. या कामभावनेचे दर्शन घडायलाही हरकत नाही; पण त्यांची सेक्स-ऑब्जेक्ट म्हणून प्रस्तुती खटकते. तीच बाब वेशभूषेबाबत. आक्षेप कपड्यांना नाही, तर दिग्दर्शकाच्या धंदेवाईक दृष्टिकोनास! ('निःशब्द' मध्ये कॅमेरा विषय-आशयापेक्षा नायिकेच्या अंगप्रत्यंगांचा वेध घेत राहतोय, हे ठळकपणे जाणवते.)

चित्रपटातील लैंगिक दृश्ये समग्रतेने, संदर्भासह पाहणे आणि सुटी सुटी, संदर्भाशिवाय पाहणे, यांत खूप मोठा फरक आहे.

समग्रतेने, संदर्भासह पाहताना त्यातून कथानकाविषयी, आशयाविषयी- राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, मानसिक, जैविक, धार्मिक, वंशीय, प्रादेशिक अशा अनेक वा काही अंगांनी पदर उलगडतात आणि परिणामात लैंगिकतेचे अस्तित्व, तसेच आणि तेवढेच एकात्मिक राहते जसे आयुष्यात!

सुटी सुटी, संदर्भाशिवाय पाहताना मात्र लैंगिक दृश्ये केवळ लैंगिक कृती म्हणूनच उरते. काहीसे पोर्नोग्राफिक स्तरावरचे उरते. चित्रपट कसा पाहावा, हे न कळलेल्या मंडळींना मग अशा कलाकृती बीभत्स वाटू शकतात; तर काही जण लैंगिकताग्रस्ततेनेच दृश्यांचा उपभोग घेऊ लागतात. एकदा आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात भेटलेला एक जण पाहिलेल्या फिल्म्समधील विषय, आशय, तंत्र, तंत्रज्ञान, कॅमेरा, संकलन, ध्वनी, अभिनय, दिग्दर्शन, चित्रपटाची भाषा याबद्दल अवाक्षरही न काढता, तो फक्त लैंगिक दृश्यात्मक तपशिलाविषयीच बोलत वा चौकश्या करत राहायचा. लैंगिकतेबद्दल सहजपणे वाटणारे कुतूहल समजून घेता येतेही; पण केवळ लैंगिकताग्रस्तता..? शेवटी मी त्यास वैतागून म्हटलेही- केवळ हेच पाहायचं तर महोत्सवात कशाला येतोस? पोर्नोग्राफीच पाहत राहा ना! चित्रपट महोत्सव/ सोसायटी वर्तुळात सेन्सॉरची अट शिथिल असल्याने आणि मोठ्या पडद्यावर पाहण्याची संधी म्हणून अशी काही आंबटशौकीन मंडळी इकडे फिरकतातही; पण तो या अवकाशाचा दोष नाही. दिग्दर्शकाच्या दृष्टिकोनातून चित्रपटाचा आस्वाद घेण्यासाठी, अभ्यासण्यासाठी या अशा अवकाशांची गरज असतेच. पौगंडावस्थेत मसालापटांचे वेड भरात असताना 'चक्र' सारखी समांतर फिल्म स्मिता पाटीलच्या उघड्या पाठीच्या लैंगिक आकर्षणातून दूरदर्शनवर जागरण करून पाहिली खरी; पण हे आकर्षण दुय्यम स्थानावर गेले आणि हे काहीतरी ऑफबिट आहे हे ध्यानी येत मी समांतर प्रवाहाकडे वळलो. चित्रपटांनी मला सर्वांगाने आणि सर्वार्थाने समृद्ध केले!

'हिरोशिमा माय लव्ह' ची सुरुवात होताना राखाडी पार्श्वभूमीवरील श्रेयनामावली संपता संपता एकमेकांत गुंतलेली, राखेने माखलेली दोन नग्न शरीरे एक्स्ट्रीम क्लोजअपमध्ये दिसतात. हळूहळू राखेचा थर निघून जातो अन् प्रणयक्लांत दोन जीवांची एकमेकांत विसावलेली शरीरे दिसू लागतात. त्यांची ओळख प्रस्थापित न करताच संवाद ऐकू येऊ लागतो. हिरोशिमासंदर्भात तिच्या बोलण्यादरम्यान इंटरकट होत माहितीपटसदृश फुटेज पडद्यावर दिसते. तिला हे सारे माहितेय, तिने हे सारे पाहिलेय, असे ती सांगतीये. आणि तो म्हणतोय- तू काहीच पाहिलेले नाहीयेस, तुला काहीच माहीत नाहीये. 'हिरोशिमा माय लव्ह' चा असा विलक्षण १५ मिनिटांचा आरंभप्रसंग. व्यक्तिगत लैंगिकतेचे आलंबन पकडून वैश्विक आशयसूत्रांना कवेत घेणारा! लीना वर्टमुलर या इटालियन दिग्दर्शिकेच्या 'स्वेप्ट अवे' अशा कलाकृतींमध्ये येणारी संभोगदृश्ये व्यक्ती ते संस्था पातळीवरचे सत्ताकारण दाखवत तिचा राजकीय विचारही मांडते.

लैंगिकतेतून लैंगिकतेपल्याड पोचविणाऱ्या अशा फिल्म्स केवळ दृश्य पातळीवरून समजून घेऊन चालतील...?

सेन्सॉर बोर्ड हे वरकरणी जरी लैंगिक/ हिंसक/ प्रक्षोभक दृश्य आणि आशय नियंत्रित करण्यासाठी असले तरी त्याचा खरा उद्देश हा राजकीयविरोधी सूर दडपण्याचाच असतो. म्हणून तर सॉफ्ट पोर्न बीभत्सपट सेन्सॉरच्या कचाट्यातून मोकाट सुटतात; पण लैंगिक दृश्य असणाऱ्या चित्रपटातून जर प्रस्थापित मूल्यव्यवस्थेविरोधात भाष्य असेल, तर मात्र अशा फिल्म्स सेन्सॉरच्या जाचात अडकवल्या जातात. लोकशाही व्यवस्थेत अभिव्यक्तिस्वातंत्र्याचे महत्त्व लक्षात घेत, मुळात सेन्सॉर बोर्डचे अस्तित्वच मला खटकते. पण या संस्थेचे घटनात्मक व्यवस्थेतील स्थान लक्षात घेता, चित्रपटांसाठी प्रेक्षक वयोगट निर्धारण म्हणून समजून घेता येईलही; पण बंदी वा कट्स मात्र अभिव्यक्तिस्वातंत्र्याला आडकाठी आणते. अर्थात स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदारीचेही महत्त्व आहे, ती कलावंतांनी स्वयंसेन्सॉर पातळीवर निश्चितच निभवायला हवी!

**डॉ. अनमोल कोठाडिया**
cineanmol@yahoo.co.in

# ।। साकडं ।।

। प्रा. डॉ. आनंद पाटील ।

भैरीच्या निबिड अरण्यात रंगा सुतार आपल्या कामात दंग होता. रविवारचा सुट्टीचा दिवस. एकटाच एक गाय नि म्हैस चाराय तो गावपाड्यापासून पाच मैलांवरच्या जंगलाच्या मध्यभागी घुसला होता. तिथं गुहेजवळ जायला लोक घाबरायचे. अशा निर्मनुष्य जागी रंग्या गेल्या पंधरा दिवसांपासून सवड मिळेल तेव्हा गुपचूप येत होता. त्याला अलीकडं वेगवेगळी स्वप्नं पडायची. शाळेतल्या गोष्टीतील देव स्वप्नात दिसायचे. त्याला एक जगावेगळं कारण होतं. लहानपणापासून बनूआत्या त्याला 'जावईबापू' म्हणायची. तिची नकटी काळीढूस पोरगी त्याला मुळीच पसंत नव्हती. गावभर हे लगीन ठरल्यात जमा झाल्यालं. त्यात मराठी शाळेतील लोहार गुरुजींनी लाकूडतोड्याची ती सुप्रसिद्ध गोष्ट सांगितली होती. लाकूडतोड्याची कुऱ्हाड विहिरीत पडते. तो गरीब लाकूडतोड्या देवभक्त असतो. देव त्याला विहिरीत उडी मारून आधी सोन्याची कुऱ्हाड काढून दाखवतो. प्रामाणिक लाकूडतोड्या ती नाकारतो. अशा लागोपाठ चांदी व तांब्याच्या कुऱ्हाडी घेत नाही. अखेर त्याची पोलादी कुऱ्हाड देवानं काढताच तो आनंदानं हात पुढे करतो. त्याचा खरेपणा बघून सर्व कुऱ्हाडी देव त्याला भेट देतो. सद्गुणी माणसाला देव नेहमी मदत करतो.

बनूआत्याच्या थोरल्या पोरीचं नाव सोनी. रंगा मॅट्रिक व्हायच्या आधीच आपल्या दारात भाच्यावर तांदूळ टाकायचा तगादा तिनं भावांच्या मागं लावला होता. पोरगं जादा शिकल्यावर आपली पोर पत्करणार नाही, हा तिचा साधा सरळ हिशेब होता. ही बातमी रंग्याच्या जोडगाण्यासाठी नवी नव्हती. गेल्याच गौरी-गणपतीला बनूआत्या सोनीला सजवून घेऊन आली होती. रंगराव आपला नवरा आहे असंच सोनी समजून चालायची. अजून सातवी पास झाली नव्हती. आई सांगेल तसं वागायची. गणपतीपुढं पत्ते खेळाय आलेल्या रंगाच्या दोस्तांच्या नजरेतून हे 'लफडं' सुटलं नाही.



दुसऱ्याच दिवशी गावठाणात जनावरं चारताना त्यांनी रंगाला घेरलं. सोनीवरनं त्याच्या फिरक्या घ्यायला सुरुवात केली. बेरकी बाप्यानं सगळ्यांना खडकावर निवांत बसवलं. रंगरावासाठी खुमासदार कहाणी सांगाय सुरुवात केली. आता हा चालू गडी गावातलं कुणाचं लफडं फोडतो याची उत्सुकता सगळ्या पोरांना लागली. त्यानं गंभीर होत सूर लावला.

'एक होता लाकूडतोड्या. तो भैरीच्या जंगलात त्याची कुऱ्हाड नव्हे –'

'ये ती गोष्ट सांगाय बालवाडीत जा भडव्या,' रघू तळप आडवा पडला.

'रघ्या, बेन्या जरा गप्प.' म्हणून त्याला झापून बाप्यानं देव कसा त्याची बायको काढाय आला, हे रंगवून सांगितलं. बुडी मारून देव विहिरीच्या तळाला बराच वेळ बायकोचा शोध घेत राहिला. त्यानं पहिल्या झटक्यात लाकूडतोड्याची काळी नकटी नऊवारी साडीतली बायको बाहेर काढली. देवानं त्याला विचारलं,

'विहिरीत बुडालेली तुझी बायको हीच का?'

'नाही नाही देवा, तिला जाऊ दे!' लाकूडतोड्या.

मग देवानं एका डोळ्यानं आंधळी बाई विहिरीतून काढली. तीदेखील लाकूडतोड्यानं नाकारली. हे सारं आपल्या व सोनीच्या लग्नावर बेतल्याचं रंग्याच्या ध्यानात आलं. तो उठून चटकन पळायच्या बेतात होता. त्याचा हात पकडून बाप्या म्हणाला,

'ल्येका रंग्या, गोष्ट ऱ्हायलीय. तुज्या भल्यासाठी सांगतोय. त्या लाकूडतोड्यागत काळी बायकू हिरीत ढकलशील.'

'तू बी देवाला असाच साकडं घाल.' बाज्या.

'ती काळुंद्री सोबत न्हाय तुला. सांग बाप्याफुडं.' राज्या.

'मग देवानं एक हात मोडकी; पण देखणी बायको पाण्याच्या वर आणली.'

'ती पण लाकूडतोड्यानं आपली बायकू न्हाय म्हंटलं.' गणपा.

'मग शेवटी ऐश्वर्या रायसारखी देखणी बाई देवानं विहिरीच्या तळातून शोधून आणली.'

'लाकूडतोड्या तिच्या गळ्यात पडला असणार?' बाज्या ओरडला.

'कुठलं नशीब एवढं चांगलं रं त्येचं. त्यो म्हंटला हीच माजी बायकू. बाप्या.

'मग दिली तिला देवानं?' राजा.

'तसा कसा दील... खोटं बोलला हे समजताच ऐश्वर्या रायबी गुल.'

'बसा बोंबलत! हक्काची काळी हुती, तीबी गेली.' बाज्या

'तिच्यासाठी बसला लाकूडतोड्या देवाला साकडं घालीत,' बापू.

'पदरी पडलं पवित्र झालं,' राजा.

'देवाला दया आली. लाकूडतोड्याला मूळ बायको मिळाली. ते सुखानं संसार करू लागले.' बापू.

'ही साठा उत्तराची कहाणी सफळ संपूर्ण. रंगराव ढोरं आडवाय चला...'

सारं आठवत रंगा किकरं नाजूक हातानं फणसाच्या लाकडावर चालवित होता. गेले दीड वर्ष त्याचा भल्या मोठ्या लाकडात देवाची मूर्ती कोरायचं काम गुपचूप चोरून चाललं होतं. एकलव्यानं द्रोणाचार्यांची कावंची मूर्ती केली आणि धनुर्विद्या शिकला. देव स्वप्नात दिसतो. आज ना उद्या भेटेलच. संत तुकाराम महाराजांना नामदेवानं स्वप्नात येऊन अभंग रचाय सांगितलं. एकट्याला जागचा हलवता येणार नाही, एवढा मोठा तो ओंडका होता. आता देवाचं पाय तेवढं कोरून झालं होतं. तो बाप्याची गोष्ट संपताच डोकं खाजवत उठला होता. हत्यारं गोळा करून ती नेहमीच्या जागेवर घळीत नेऊन ठेवली. ती जमवताना त्याला बरीच यातायात करावी लागली होती. त्यानं गाय-म्हैशीला बसल्या जाग्यावरनं उठवलं. अंधार पडायच्या आत घरात पोहोचायचं होतं. श्री बजरंग हायस्कूल, चिखलपाड्यात नापासांच्या यादीत जायचं नव्हतं.

मॅट्रिकच्या वर्गाचे क्लासटीचर श्रीरंग ओतूरकर छान गंध लावूनच वर्गात यायचे. त्यांचं टोपणनावच 'पूज्य-आरी' पडलं होतं. ते नेहमी चांगल्या संस्कारांविषयी बोलायचे. बोधामृताचे डोस जरा जादाच व्हायचे. पण ते रंगाला फार आवडायचे. ते देवादिकांच्या चमत्कारांच्या गोष्टी रंगवून सांगायचे. अशा वेळी जंगलात देव प्रकटला तर काय मागायचं हे रंगानं आधीच ठरवलं होतं. आधी सोनीपासून सुटका आणि नंतर भ्रष्टाचारमुक्तीचा लढा, हा क्रम त्यानं निश्चित केला होता.

काल रात्रीचीच गोष्ट. भैरीच्या जंगलात भलताच चमत्कार घडला. रविवारची सुट्टी म्हणजे रंगराव दिवसभर भैरीच्या जंगलात एकटाच मूर्ती कोरायच्या कामात दंग. त्यात पावसानं उघडीप दिल्याली. दुपारी गडी पार भेंडाळला. आता देवाचं तोंड कोरायचं अवघड काम सुरू होतं. ते कॅलेंडरात राम, कृष्ण, इंद्र दाखवत्यात तसलं नव्हतं. त्याच्या स्वप्नात येणारा देव आजवर टीव्हीवरबी दिसला नव्हता. त्याला बसायला विमानापरास येगळं यंत्र होतं. गरुड म्हणावा तर ते पाखरू वाटत नव्हतं. त्याच्या तोंडावर भलतं तेज होतं. त्याचा रंग काळा-निळाच होता. धारदार नाक, मोठं डोळं, लांब केस. परग्रहावरचा पीकेच? त्याचं नाव व्हीआर व्हिक्टरीसाठी व्ही आणि आर साठी रंगाचंच ठेवायची आयडिया त्याला सुचली होती. पण आमिर खानचा पीके देवाचा शोध घेणारा माणूस होता- परग्रहावरचा. इथं रंगा आरआरएसला साक्षात देव सापडला होता. आरएसएसच्या पुढं तो एक पाऊल गेला होता. या देवासाठी त्याला नवं नाव सुचलं नव्हतं. शिणून तो मूर्तीजवळ झोपला होता आणि एक आगळं स्वप्नं भर दिवसा पडलं.

त्याच्या वर्गातील सुमन थोरात आज गुरं चारीत भैरीच्या जंगलात आली. चिखलपाड्याच्या जमीनदाराची एकुलती लेक. एसबीइसीची ब्यूटी क्वीन. 'सोनीला सोडून दुसरी कसली बायको चालेल?' असा प्रश्न देवानं विचारला तर तो ऐश्वर्या रायचं नाव घेणार नव्हता. सुताराच्या तासणी नि पातळीला तसली नाजूक बया टिकणार नाय. गरिबाच्या घरात तिला गमायचं न्हाय. 'लई देखणी

बायको दुसऱ्याची' म्हंत्यात, त्या परास सुमनच बरी. वर्गात सारखं लक्ष जातं तिच्याकडं. हिची वाट चुकली का काय? आयला हिच्याशी बोलाय पोरं लई टरकत्यात. बंदूकवाला बाप सरपंच. गावाला रस्ता खडीचा. पर ही कारमधनं येती. आज चक्क गुरं चाराय आलीय. जीजी 'गुड गॉड्स ग्रेसच म्हणायची.' जी..जी.. रंजी छान टोपणनावच सुचलं अचानक त्या मूर्तीसाठी. आजवर लपवलेली मूर्ती आज पहिल्यांदाच सुमनच्या नजरेला पडली. कसली जादू झाली कुणाला ठावं. ती मंत्रानं भारल्यासारखी थेट मूर्तीजवळ आली. काही न बोलता तिनं रंगाला मागून मिठी मारली. पटापट त्याचं मुकं घेत म्हणाली, 'ग्रेट.. सिंपली ग्रेट'.. आणि 'गाईड' सिनेमातल्या देवानंद वहिदा रहमानसारखी दोघं गवतात लोळत पडली. रोमान्स रस्टिक रोमान्स...

'तर मी काय सांगत होतो? नव्या सरकारनं योगा दिन जगभर साजरा केला. लहान वयात योग शिकून घ्या. विचारांना शिस्त लागते. या वयात नको ती स्वप्नं पडतात. त्यामुळे अभ्यासावरचं लक्ष उडतं...' ओतूरकर सर शुद्ध मराठीत सांगत होते आणि रंगरावची मान शरमेनं खाली गेली होती. भर दुपारी अशा प्रकारे चड्डी कधीच ओली झाली नव्हती. जंगलात सुमनच काय कुणीच त्याची मूर्ती बघाय फिरकलं नव्हतं. 'जीजी रंजी'चा चमत्कार अजून दिसलाच नव्हता. त्यानं 'जीजी रंजी' याच अक्षरांचा नवा मंत्र जपायला सुरुवात करायची प्रतिज्ञाच ओतूरकर सरांचं भाषण ऐकून केली. त्यांनी सरकारी सर्क्युलरच वाचून दाखवलं होतं. गणेशोत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करावा. त्यानिमित्त ग्रामस्वच्छता अभियान राबवावं. क्रीडा, वक्तृत्व, निबंध अशा स्पर्धा घ्याव्यात. क्लासटीचर ओतूरकरांकडेच सांस्कृतिक खातं होतं. जिल्हा स्तरावर गणेशोत्सव साजरा करणाऱ्या हायस्कूल्सच्या स्पर्धा सरकार घेणार होतं. श्री बजरंग बली हायस्कूलचं नाव पहिल्या तीन नंबरांत- टॉपला आणायची प्रतिज्ञाच श्रीरंग सरांनी जाहीरपणे व्यक्त केली. सर्व मुलांना या उत्सवात कसं कसं सहभागी होता येईल याचा आराखडाच संपूर्ण तासात सांगितला. त्यात कला प्रदर्शन सोडलं, तर रंगाला कशातच रस नव्हता. पण सरांनीच त्याला विचारलं,

'काय रंगराव, व्हा सेक्रेटरी या उत्सवाचं! सजावट छान करा. कलावंताच्या गुणांना वाव द्यायसाठीच हे उपक्रम आहेत.'

'आम्ही आमच्या मूर्ती आणू का प्रदर्शनात मांडायला?' आदिवासी लकडूनं विचारलं.

'व्हय सर आमालाबी प्रवेश द्या.' उत्साहानं प्रत्येक जाती-धर्माची पोरं विचारू लागली. सर गोंधळात पडले. कोणत्या वस्तूंचं प्रदर्शन हे त्यांनी स्पष्ट केलं नव्हतं. गणेशाच्या मूर्तीसारख्या इतर देवांच्या मूर्तींचं प्रदर्शन, असा अर्थ मुलांनी घेतला होता. ओतूरकरांनी रंगाला हातानं खूण करून घाईत खाली बसवलं आणि पुढं म्हणाले,

'मी मुख्याध्यापकांना विचारून हस्तकला वस्तूंची यादी बोर्डावर लावेन. उगाच कसल्याही मूर्ती आणू नका. फुकट कटकटी वाढतील. आधीच गावात जात-धर्मवार आरक्षणासाठी मोर्चे वाढले आहेत. असल्या राजकारणात पडून स्वतःचं नुकसान करून घेऊ नका. हे वर्ष महत्त्वाचं आहे. अभ्यास नीट करा- सिन्सिअरली. श्री गणेश तुमच्या पाठीशी आहे...'

रंगाला वाटलं, सरांनी सेक्रेटरीपदी निवड केली ही जीजी रंजीचीच कृपा आहे. गणेशमूर्तीची स्थापना व्हायच्या आधी 'जीजी रंजी'ची मूर्ती तयार झालीच पाहिजे. अद्‌भुत शक्ती माणसाच्या अंगात येते. दर वर्षी बनूआत्या गौरी अंगात येणाऱ्या बाईकडं गाऱ्हाणं घालते. यंदा ती सोनीच्या लग्नाची 'इंती' घालणारच. म्हणूनच जीजी रंजीकडं आगळ्या शक्तीचं वरदान मागायचं. आभाळातला ढग थांबवता आला पाहिजे. भुईचा दगड आभाळात घालवायचा. 'जीजी रंजी' मंत्र म्हणताच वाटेल तो चमत्कार घडेल. आपलं नाव कुणालाच कळणार नाही. रंगा स्वतःशीच हसत वर्गात दिवास्वप्न बघत मंत्र जपत होता. तासाची बेल झाली हेच त्याला कळलं नव्हतं. बाप्यानं पाठीत रट्टा घातला आणि तो दचकून भानावर आला. त्यानं पटकन विचारलं.

'गणपती दूध पितो हे खरं का रं?'

'व्हय, नसला पीत तर त्याला काय बी गावठी पाजू चल' म्हणून बाज्यानं त्याला हाताला धरून ओढत वर्गाबाहेर काढला.

गुरुवारचा चिखलपाड्याच्या बाजारचा दिवस. गौरी-गणपतीच्या तयारीसाठी स्थानिक सुट्टीच मिळाली होती. परवाच डॉ. कुलकर्णींच्या अनिरुद्धनं रंगाला हॅरी पॉटरचा एक भाग आपल्या घरी दाखवला होता. तशी जादू आपणाला का येणार नाही? त्याच्या डोक्यातला किडा वळवळायचा थांबला नव्हता. तो रंगाचा डबा ठेवलेली शाळेची पिशवी झुलवत जंगलाकडे गुरांच्या मागे निघाला होता. दुष्काळ वाढतच चाललेला. कडक ऊन पडलं होतं. मराठवाड्यात कृत्रिम पाऊस पाडायचा प्रयोग फसला होता. चिखलपाडा पश्चिम घाटात असल्यानं दुष्काळाची तीव्रता कमी होती. हॅरी पॉटरलाच का बोलवत नाही सरकार? त्याला प्रश्न पडला. 'जीजी रंजी' करेल हे काम? ढगात ग्रेनेडनं द्रव सोडणाऱ्यांनी भ्रष्टाचार केला असला तर? टँकरनं पाणी पुरवणाऱ्यांना दुष्काळ हवाच असतो ना? प्रश्नांच्या भोवऱ्यात गरगरतच तो ग्रेट गॉडच्या मूर्तीजवळ आला. 'जीजी रंजी' मंत्र जपतच त्यानं मूर्ती रंगवायला सुरुवात केली. त्यानं मुद्दाम सोनेरी रंग विकत आणला होता. देव काळा-निळाच का दाखवायचा? गोऱ्यांची भेसळ सगळीकडं नाही का? अर्धा भाग सोनेरी नि अर्धी डावी बाजू काळीकुट्ट केली तर? ही आयडिया भन्नाट होती. कुणावरच अन्याय नको. सोन्याच्या श्रेष्ठत्वाचा गंडही नको. त्यानं अर्धी उजवी बाजू सोनेरी कराय मापं टाकून आखून घेतली. फक्त सोनेरी रंगच आणला होता. अर्धी बाजू काळ्या रंगासाठी सोडून तो फार काळजीनं रंगकाम करू लागला. 'जीजी रंजी'चा जप चालूच होता. सुताराची पिढीजात कला कसाला लागली होती.

आता पांढऱ्या ढगांची गर्दी वाढत होती. वारा पडला होता. किर्रऽऽ झाडीत पाखरं शांत झोपली होती. एरवी हुडहुडी भरवणारा गारवा कमी झाला होता. पडलेल्या पानांच्या राशीत घुसणाऱ्या

किड्यांची खसखस तेवढी कानी पडायची. कड्यावरच्या धबधब्याचा आवाज आता लई बारीक झाला होता. तगडा रंगा आता दुपारची भाकरी खाऊन नेहमीप्रमाणे आडवा झाला होता. 'जीजी रंजी'ची धून आज फारच चांगली लागली होती. आतून तीव्रतेनं 'फील' येत होता. श्रीरंग सरांचा 'फील' हा आवडता शब्द होता. चांगल्या किंवा वाईट गोष्टी घडण्याआधी माणसाला अंतरंगातून 'फील' येता, असं ते म्हणायचे. मूर्ती कोरायचा खुळा नाद लागल्यापासून एक-दोन वेळा वेगळाच 'फील' आल्याचा भास रंगाला झाला होता. आज तर तो मंत्रानं भारावल्यासारखा झाला होता. रंग देण्यात हात कसा चालला, भाकरी कधी खाल्ली, भाजी कसली होती, रंग्याला यातलं काहीच आठवत नव्हतं. खरोखरच देव प्रकटला तर काय मागायचं, या एकाच प्रश्नानं त्याला पछाडलं होतं. अशा वेळी स्वार्थीपणानं स्वतःसाठीच वर मागितला तर राजा मिडाससारखी रडायची पाळी येते. जनकल्याणाच्या कामात रमावं; फळाची अपेक्षा ठेवूच नये, अशा ऐकल्या/वाचलेल्या बऱ्याच गोष्टी त्याला आठवत होत्या. आयत्या वेळी गडबड होऊ नये म्हणून तो काळजी घेत होता. सगळीच स्वप्नं खरी होत नसतात. अलीकडे त्याचा एकलकोंडेपणा वाढला होता. घरच्यांनी सांगितलेली कामं तो विसरू लागला होता. रानात गुरं चारून वेळेवर परतत नव्हता. सारखं काहीतरी पुटपुटत असतो म्हणून ते विचारायचे, 'खूळ लागलंय का?' पण मॅट्रिकचं वर्ष हे सबळ कारण कामी येत होतं. घरात फार गहजब होत नव्हता. रंगा अर्धवट झोपेत काही चमत्कार आठवू लागला. सत्यसाईबाबा हवेत हात फिरवून अंगठी व विभूती कसे काढत होते? आसारामबापू पुराव्याशिवाय तुरुंगात खितपत पडणं कसं शक्य आहे? देव आहे यात संशय बाळगाय नको, असा विचार मनात येताच 'जीजी रंजी' मंत्र म्हणून डोळे मिटून झोपणार, एवढ्यात साक्षात देवच त्याच्यापुढे उभा ठाकला. तो धडपडत उठून नमस्कार करणार तोच देवानं हात उंचावून आशीर्वाद दिला. रंगराव होते त्या कुशीवरच जखडून राहिले. जागचं हलता येईना. अर्धी रंगीत मूर्ती पूर्ण रंगीत कशी झाली... नेमका काळा रंगच कुणी दिला... चेटूक झालं की काय... कोकणी लोक चेटकावर विश्वास ठेवतात. त्याला हातही जोडणं जमेना की तोंडातून शब्दही फुटेना. हसत देवानंच विचारलं,

'बाळ तू पडून राहा. फार कष्ट घेऊन तू मला घडवलंस. चांगला कलावंत होशील. तुला हवं ते माग.'

'दुसरं काही नको. सोनीपासून सुटका देवा!' म्हणून रंगानं जीभ चावली. जे मागायचं नव्हतं तेच मागितलं. तो तोंड उघडणार एवढ्यात देव म्हणाला,

'सुटकाच ना, ती होईल. दुसरं काही?'

'समाजाला साकडं पडलं की सोडवायचा जादूचा मंत्र द्या देवा.'

'दुसऱ्या मंत्राची गरज नाही पुत्रा. आता जो मंत्र म्हणतो आहेस, तोच माझं स्मरण करीत म्हणत जा. तुझं काम होईल...'

रंगा डोळं चोळीत उठला. आजूबाजूला कुणीच नव्हतं. मग देव गेला कुठं? लाकडी मूर्ती मूळ जागीच होती. तिचा अर्धा रंग ठाकठीक होता. स्वप्न खरं की खोटं...देवाकडे काय मागितलं...ते पण त्याला नीट आठवेना. तो स्वतःवरच चिडला. काडी नि पिशवी उचलून जनावर शोधाय निघाला. आज जरा लवकरच घरी निघाला. घरातल्या गणपतीची सजावट त्यालाच करावी लागणार होती.

गणेश चतुर्थीचा शुक्रवार उजाडला.

श्रीरंग ओतूरकर आणि सर्जेराव निंबाळकर यांनी गणेशमूर्ती रत्नागिरीहून मागवली होती. मोठी मिरवणूक चिखलपाड्याच्या वेशीपासून गावभर निघणार होती. भाड्याचं झांज पथक, स्काऊट - एनसीसीची मुलं, मुलींचं झांज पथक आणि सर्वांत पुढं बॅन्ड असं नियोजन होतं. रंगा कडक इस्त्रीचे एन.सी.सी.चे कपडे घालून वेळेवर हजर होता. त्याला भिंतीआडची दृश्यं दिसू लागल्याचं परवा लक्षात आलं होतं. धनगरांचा आरक्षणासाठीचा मोर्चा ग्रामपंचायतीच्या दारात आला. भिंतीपलीकडचा सरपंच निवेदन घ्यायला तयार नव्हता. त्यांना निवेदन द्यायला तालुक्याला जायला भाग पाडलं. उलट थोड्याच वेळात ॲट्रॉसिटीचा कायदा व आरक्षणं ब्राह्मणांसाठी असावी, या पुरोहितांच्या मागणीला पाठिंबा द्यायला दलित सरपंच ऑफिसमध्ये हितगुज करीत बसला. हे सगळं रंगरावला जंगलात असूनही दिसलं होतं. त्यानं पूर्ण रंगवलेली मूर्ती आता त्याच्याशी बोलेल, असं त्याला वाटू लागलं होतं. हळू हळू चमत्कार घडवाय भक्ती वाढवायची होती.

आता तर कळसच झाला. ग्राऊंडवर तो एन.सी.सी.च्या मुलांच्या रांगेत उभा होता; पण दोन नंबरच्या गल्लीतल्या बोळातून बाप्या इसाकच्या मुन्नीला खुणावताना दिसत होता. इकडं गणेशाची मिरवणूक आणि तिकडे शाळेत त्यांची गौरी-गणपतीची झिम्मा फुगडी कशी रंगणार, याची चित्रफीतच त्याला दिसत होती. बाप्या साला निर्लज्ज. शेतात अमकीला कशी धरली, कसं काय केलं याचं मसालेदार वर्णन करायचा. तो काहीच करत नसावा. मोकळा भाव खातो भडवा, असंच वाटायचं. पण त्या सगळ्याच बढाया नव्हत्या हे रंगाला आता पुराव्यानिशी पटलं. 'सणवार म्हणजे अशा भानगडींसाठी सुवर्णसंदी' असं हराम बाप्या म्हणायचा. 'पंढरीची वारी नि धंद्याला बरकत भारी!' ही म्हणच त्यानं रचली होती. आता थोड्याच वेळात बागेच्या कुंपणाजवळच्या खोलीजवळ तो घुटमळत होता. मुन्नी कुंपणाआडून लपतछपत खोलीत घुसणार. हा साला तिला अंधाऱ्या कोनाड्यात रेटणार आणि कुकुची ऽ कुई ऽऽ

निंबाळकर सरांची शिट्टी वाजली. एन.सी.सी.चा बॅन्ड सुरू झाला. परेड सुरू झाली. वेशीत ड्रेसातील लहुजी वस्ताद बॅन्डवाले तयारच होते. गावात अशी हायस्कूलची गणेश मूर्तीची हीच पहिली मोठी मिरवणूक होती. मुख्याध्यापकांनी पोलीस खात्याची परवानगी काढली होती. अजून पोलिसांचा पत्ता नव्हता. ट्रक गणेशमूर्ती घेऊन सकाळी नऊला पोहोचला. गावच्या यात्रेसारखी माणसं जमू लागली. चौकात सदा चऱ्हाटेच्या मल्लखांबावरील पकडींचा खास खेळ ठेवला होता. त्याला नुकताच तालुक्याला पहिला नंबर

मिळाला होता. त्याचा सत्कार सरपंच करणार होते. चिखलपाड्यात आगळ्या उत्साहाचं वारं संचारलं होतं. घरचे गणपती लवकर बसवून लोक मिरवणुकीत दाखल होत होते. मुंगीच्या पावलानं मिरवणूक वेशीतून गल्लीत सरकली. अचानक मुसलमानांच्या दर्ग्याच्या बाजूला फटाके वाजले. मिरवणुकीवरच कुणी बॉम्ब फेकला की काय म्हणून सगळेच हबकून गेले. तसं काही झालं नव्हतं. मुसलमानांचा ताबूद मिरवणुकीत मिसळाय आला. तेवढ्यात बाजूच्या बोळातून आदिवासी व भटके आपापल्या देव-देवतांच्या शेकडो मूर्ती घेऊन आले. सगळ्यात पुढे चाललेल्या ट्रकच्या पुढे घुसायचा प्रयत्न कुणी केला नाही, हे बरं झालं. तसं कुणी केलं तर हाणामारीला वेळ लागणार नाही. परगावचा साधूंचा जथ्था कसा टपकला?

रंगराव मनातल्या मनात 'जीजी रंजी' पुटपुटत लेफ्ट-राईट करीत होता. पण 'ग्रेट गॉड रंगराव ग्रेस' म्हणण्यात सारखा अडथळा येत होता. तिकडं शाळेच्या खोलीत बापूचा खेळ रंगात आलेला त्याला दिसत होता. बापू घामानं निथळत होता आणि मुन्नी कुक्कुऽची कुईऽऽ करून दमत नव्हती. रंगराव पुरता चाळवला होता. त्यानं मंत्र म्हणायचा बंद केला. न जाणो गावातील सगळीच लफडी अशी दिसाय लागली तर? कुणीतरी घोषणा दिली 'भारत माता ऽ की ऽऽ' तो 'जय' मध्ये जोशात सामील झाला. मिरवणुकीलाच दहशतवाद्यांनी टार्गेट केलं तर?

मिरवणुकीच्या मागे मुख्याध्यापक सर्वच जाती-धर्मांतील देवदेवता घेऊन आलेल्यांची समजूत घालीत होते. मिरवणुकीतच यायचा सर्वांचा हट्ट होता. 'हिंदूचाच देव का?' या प्रश्नाला मुख्याध्यापक व शिक्षकांकडे उत्तर नव्हतं. या आगीत सरपंचविरोधी गटानं तेल ओतलं. ख्रिश्चनांना पुढे करून दलित, ओबीसी वगैरे कॅटेगरीप्रमाणे हजारो मूर्ती घेतलेली मुलं व मोठी माणसं मिरवणुकीच्या आडवी आणली. ते मुद्दाम पुढे रांगेत उभे राहिले. गणेश मध्येच अडकला. इन मिन दोन पोलीस आले होते. त्यांना मॉब आवरेना. मिरवणूक शाळेत न्यायची तर एवढ्या मूर्ती ठेवायला पुरेशी जागाच नव्हती. प्रश्न शिस्तीचा होता. सर्वधर्मसमभाव सांभाळणं ही तारेवरची कसरत होती. प्रत्येक गटाच्या स्वतंत्र वाजपानं कानठळ्या बसायची वेळ आलेली. मुख्याध्यापकांचं बी.पी वाढलं. त्यांना चक्कर आली. कुणीतरी त्यांना उचलून जीपमधून घरी पाठवलं. आता शिक्षकांना एवढी मोठी मिरवणूक आवरणं कठीण होतं. ते भीतीनं कापायची वेळ आली. इंग्रजीचे शिक्षक संकपाळ डी.वाय.एस.पींना फोन लावाय पळाले. मिरवणूक ठप्प झाली होती. मेहतर, लिंगायत, जैन, बौद्ध वगैरेंचे जथ्थेही दाखल झाले. प्रत्येकाच्या वेगळ्या घोषणांनी गाव दणाणलं.

एकूण रागरंग बघून सरपंच आणि त्यांचे पाठीराखे कुठंतरी गुल झाले. कोण कुठे कसा डाव टाकेल याचा थांगपत्ता लागेना. श्रीरंग ओतूरकर सर घामानं डबडबले होते. माईकवरून ते विनवण्या करीत होते; पण त्यांचा आवाज कापरा झाला होता. खरा धोका मुसलमानांच्या दर्ग्यावरून मिरवणूक जाताना वाद्यं वाजली तर घडणार होता. कुणाचं वाद्य नेमकं वाजलं, हे कळणं शक्य नव्हतं. पोलीस कातडी बचावण्यासाठी गर्दीपासून अंतर ठेवून होते. दोघांचा निभाव लागणं शक्यच नव्हतं. त्यांनीच जिल्ह्यात डी.एस.पींना कळवाय बानवडे सरांना बाहेर पाठवलं होतं. मिरवणूक मुंगीच्या पावलानं पुढे सरकत होती. ती कुणीच अडवली नव्हती. पण भिंतीच्या पलीकडच्या हालचाली रंगाला दिसत होत्या. दर्ग्यात दगड-विटांचा ढीग वाढत होता. शस्त्रं जमा होत होती. सरपंचविरोधी गटाचे चलाख गडी हलगी टिमक्या लपवत दर्ग्याशेजारच्या मराठ्यांच्या घरात जागजागी लपत होते. बाकी उरलेल्या जाती-धर्मांतील लोकांची अस्मिता पेट घेत होती. सगळे पुढे गेले; आपला देव का नाही? देवांची मूर्ती वेळेवर मिळेना, ते साधू-संतांचे फोटो घेऊन आले. गुलाल, खोबरं आणि नैवेद्याचे पदार्थ प्रत्येकाचे वेगळे. गुलाल मुसलमानांच्या अंगावर फेकला तरी दंगल पेटाय वेळ लागणार नव्हता. दारू पिऊन ल्हास झालेली तालमीतली पोरं बॅन्डमध्ये नाचाय लागली. पीरवाडीच्या पोरांचा करंड्याचा खेळ रंगात आला. सदा चऱ्हाटे दोरी व उसावरच्या पकडी करू लागला. असं दृश्य गावाच्या इतिहासात कधीच बघायला मिळालं नव्हतं. पण ही वादळापूर्वीची शांतता होती. राष्ट्रीय ऐक्य सर्क्युलरपलीकडं साधत होतं; पण लोकमान्य टिळकांच्या गणेशोत्सव फंड गुंडांच्या ताब्यात गेला होता. इथं वर्गणी लाटायचा धंदा बुडाला म्हणून काही जण चिडले होते.

भूकंप व्हायच्या आधी मेंढरं व पक्षी अस्वस्थ होऊन थयथयाट करतात तसं रंगाला झालं. त्याचा पाय जागचा उचलेना. आता मिरवणूक दर्ग्याच्या दारात जायला तीनच मिनिटं बाकी होती. अजून पोलीस बंदोबस्ताचा पत्ता नव्हता. पंच कुणीच नव्हते. पोलीस पाटील आधीच परगावी पळालेला. दंगलखोर तयारीतच होते. हे सगळं रंगाला दिसत होतं. काय करावं, हेच त्याला कळेना. 'जीजी रंजी' तो म्हणत होता; पण साकडं कोणतं घालावं हेच उमगेना. काही झालं तरी दंगलीची ठिणगी न पडू देता सगळं यशस्वी व्हायला पाहिजे. त्याला आठवलं. त्यानं भुईची वस्तू आभाळात पाठवायचं वरदान मागितलं होतं. त्यानं 'जीजी रंजी'ला विनवलं. गणेशासकट सर्व मूर्ती अलगद आभाळात जाऊ देत. जीजी रऽ जीऽऽ जीजी ऽ र ऽऽ जी ऽऽ

आणि काय आश्चर्य ! क्षणार्धात सर्व मूर्ती आकाशाकडे आपोआप खेचल्या जाऊ लागल्या. हे कसं घडलं तेच कुणाला कळेना. मिरवणूक जिथल्या तिथं ठप्प झाली. संक्रांतीला पतंग उडवावेत तसं दृश्य दिसू लागलं. ते बघायला स्वर्गातील देवही आले. देवदेवता आनंदानं त्या मूर्तींवर पुष्पवृष्टी करू लागल्या. पण खाली येणारी सर्व फुलं पाण्याची धार पडावी तशी एकत्र येऊन रंगाच्या अंगावर पडू लागली. पण आडदांड लोकांनी ती पकडायला एकच गर्दी केली. रंगा जवळच्या गटारात कोलमडला नसता तर, पायदळी तुडवला गेला असता. थोड्याच वेळात पोलिसांच्या गाड्या आल्या. त्यापूर्वीच मूर्ती अदृश्य झाल्या होत्या.

लोक तोंडात बोटं घालीत शांत झाले होते. पोलीस बघताच गर्दी पांगली. खळं उलगडल्यावर पाखरं उडावी तसं झालं. उपमुख्याध्यापकांनी मिरवणूक रद्द झाल्याचं जाहीर केलं. शिक्षक घरी जायच्या आधी गल्लीत एकत्र जमले. आता शिक्षण खात्याला काय कळवायचं, यावर चर्चा सुरू झाली. पण संकट टाळावं कसं हेच कळायला मार्ग नव्हता. ते संशोधन करायला दुसऱ्या दिवशी खास बैठक सायंकाळी पाचनंतर घ्यायचं ठरलं. सुटकेचा श्वास टाकत सगळे सुखरूप घरी गेले. सर्वांत शेवटी राडेराड झालेले कपडे सावरत रंगा घराकडे निघाला. गटारात त्याचा हात-पाय मोडता मोडता थोडक्यात वाचला होता. बाप्या नि बाज्या त्याला धरून न्यायला वेळेवर हजर होते. हॅरी पॉटर झाल्यामुळे रंग्या मात्र भलताच खूष होता. खरचटलेला पाय सुजत चालल्याचं भान त्याला नव्हतं.

मे महिना सरत आला होता. उन्हाळी सुट्टीत रंगानं ग्रेट गॉडला गुहेत लपवायला छान जागा शोधली होती. तो गणेश चतुर्थीच्या चमत्कारानंतर जीजीच्या भजनीच लागला होता. वडील आणि चुलत्याच्या हाताखाली घरांच्या बांधकामावर मदत करायला जावं लागायचं. लहान भावंडांना जनावरं पाण्यावर सोडायचं काम दिलं होतं. जीजीचं दर्शन नियमितपणे होत नव्हतं. नवीन चमत्कारही घडला नव्हता. देखणी सुमन पुन्हा स्वप्नात आली नव्हती. काळी सोनीच सारखी गळ्यात पडताना दिसायची. दिवसभर उन्हाच्या रकात कामानं तो किकून जायचा. त्यात ही साडेसाती मागं लागलेली. काहीतरी चमत्कार व्हावा आणि शहरात कॉलेजला जायला मिळावं, ही त्याची इच्छा होती. 'जीजी रंजी' मंत्र जपण्याचा एक फायदा झाला होता. दहावीचं पेपर सोपं गेलं होतं. नक्की पहिला वर्ग मिळायची आशा होती. 'जीजी' पावलाच पाहिजे अशी त्याची साधना सुरू होती; पण तिची लय बाप्या-बाज्या आणि कंपूच्या तावडीत सापडल्यावर बिघडायची. बाप्या रोज नव्या लफड्याच्या बाता मारायचा. कधी कधी मोठ्या गड्याच्या झेंगटांची वर्णनं तपशीलवार करायचा. धनवट्याची चांगी म्हैस चाराय भर उन्हाची हुंबर ओढ्याला जायची. दोन पोरांची आई. कुणालाच संशय यायचं कारण न्हाई. लई साळसूद बाई. ठरल्यासारखा काळा सख्या काठी खांद्याला मारून घुलरत जायचा; ओढ्याच्या झाडांच्या आडोशानं ओसाड माळावरच्या जाळ्यात घुसायचा. म्हशीला पाण्यात डुंबाय सोडून चांगी उलट दिशेनं त्याच जाळीत घुसायची. काळ्या घोंगड्यावर द्वेचं काम निवांत सुरू. बेरकी बाण्यानं एक दिवस त्यांचा पाठलाग गुपचूप केला. सगळा घाणा जसा बघितला तसा सांगीत बसला. पोरांना असलं टॉनिक आवडायचं. मग रंगाच्या स्वप्नात वर्गातील एखादी परी यायची. दोघं कॉलेजात जायची स्वप्नं रंगवायची. आंतरजातीय विवाहाचं फॅड त्याच्या डोक्यात चांगलंच घोळत होतं. कारण सुताराची पोर त्याच्या वर्गात नव्हती. तो वरच्या जातीतील देखण्या पोरीशीच लगीन लावायचं ठरवून बसला होता. त्यासाठीच 'जीजी'ची आराधना सुरू होती. चिखलपाड्यात जैन कृषी अधिकाऱ्याची पोर मुसलमान सलमान खानबरोबर पळून गेली होती.

रविवारचा दिवस बांधकामाला सुट्टी होती. सकाळी गुरं घेऊन जंगलात जायच्या तयारीला तो लागला. आज 'जीजी'जवळ दिवसभर बसायचं होतं. दहावीच्या निकालाला अजून दहा दिवसांचा अवकाश होता. त्याला पुढं शिकवायचा विषयच कुणी घरात काढीत नव्हतं. बनू आत्या घाईत येऊन गेल्यानं त्याचा संशय बळावला होता. त्यात देवरशाला आपल्या घरचं भविष्य कळत नाही अशी माहिती बाबूराव अर्नाळकरांच्या 'काळा पहाड'मध्ये त्यानं वाचली होती. बाप्या साला असल्या धमाल कादंबऱ्या वाचायला आणायचा. तो बायको टाकलेल्या एका लफडेबाज पंचाचा चमचा होता. त्या पंचाची शिकवणी त्याला होती. तो नापास होणार हे त्यानं आधीच जाहीर केलं होतं. जमीनदार बाप त्याला सरपंच करणार ही काळ्या दगडावरची रेघ होती. या कामात पंचाची शिकवणी त्याला फार उपयोगी पडणारी होती. पंच रंगेल पुस्तकं त्याला द्यायचा. तीच पोरांत फिरत राहायची. रंगा चुकून कधीतरी त्या साथीत सापडायचा. आज काकोडकरांची 'श्यामा' त्याच्या हाती लागली होती.

तो जनावरांच्या गोठ्याकडं वळणार एवढ्यात आबानं त्याला मोठ्यानं हाळी दिली,

''आरं ये रंग्या, आज बंडूला ढोरं सोडाय सांग. तू नवी कापडं करून घरातच थांब.''

''का? कसला समारंभ हाय आबा?'' त्यानं चमकून विचारलं.

''आरं बाबा तुजी सुपारी फोडायची. लगीनसराई सरत आली.'' आईनं बट लावली. रंगाची वाचाच बसली. आत्ती येऊन गेल्याचं रहस्य त्याला आता उलगडलं. संताप तळपायापासून टाळूपर्यंत सरकला. तो चरफडत कसाबसा बोलला.

''मला म्होरं शिकाईचं हाय. लगीन नको आत्ताच.''

''मग शीक की हावस फिटंस्तवर'' आबा.

''ल्येकरा बड्या घरात घरजावाई हुतोयास. दोगंबी जावा की शहरात शिकाय.'' आई.

आई-बाबांचा ठराव पक्का झाला होता. त्यात कसलाच बदल होणार नव्हता. 'जीजी रं जी'नं सुटका होईल म्हटलं होतं. याचा अर्थ 'मूळ घरातून सुटका' असा होता. हा उलगडा त्याला आता झाला. 'लग्नं स्वर्गात ठरतात आणि पृथ्वीवर साजरी होतात,' असं इंग्रजीचे संकपाळसर म्हणाले होते एकदा. तो आईजवळ जात हळू आवाजात कळवळून म्हणाला,

''आई, मला नकं ती काळी–''

''त्वाँड आवार. आबाचं टाळकं सरकलं तर काय हुईल ठावं हाय तुला. गोरं कातडं चाटाईचं नसतं. गुणी पोर नात्यातली हाय. घरजावाई पदर जुळवून करत्यात. नशीब समज. ती आमच्या गळ्यात पडत्यात.''

आईचं लेक्चर सुरू झालं. तो मधघराच्या अंधाऱ्या कोपऱ्याकडं वळला. हुंदका आवरीत कोनाड्यात भिंतीला पाठ लावून रडत बसला.

बनूआत्यानं आपल्या दारात त्याच दिवशी साखरपुडा आणि दुसऱ्या दिवशी लग्नाचा बार उसळायची सारी तयारी केली होती. धंद्याच्या रेट्यात अलीकडं सगळं मोबाईलवर सावरायची प्रथाच पडली होती. लग्नपत्रिका छापायला वेळच मिळत नव्हता. नात्यातली पोर हक्काची. बालविवाहाचा कायदा पांढरपाणी पाड्याला लागू नव्हता. रंगाच्या घरच्यांनी त्यारी करायचा प्रश्नच नव्हता. रंगाच्या चुलत्यानं सकाळीच भावकीला आवातण दिलं होतं. बळी गुरव गाववाल्यांना निमंत्रण द्यायला फिरत होता. रंगालाच काय त्याच्या मित्रमंडळींना या बातमीचा सुगावा पांढरंपाणीपाड्याच्या दोन जिपा, एक टेम्पो नि तीन ट्रॅक्टर रंगाच्या दारात थडकल्यावर लागला. हे लग्न कावपाड्याच्या लोकांनी परंपरेचा भाग म्हणून आधीच गृहीत धरलं होतं. बनूआत्याला मुलगा नव्हता. तिच्या दोन्ही पोरी उचलायची ईर्ष्याच सर्व नातेवाइकांत लागली होती. त्यात रंगाचा नंबर पहिला लागला. ही देवाचीच करणी होती. सगळे देव काळेच आहेत. त्यात बनूआत्याच सर्वांत श्रीमंत होती. तिनं जावई विकत घेतला होता. मोटरसायकलवाल्या चिखलपाड्या भागातल्या एक नंबरच्या बँडवाल्यांना तिनंच सुपारी दिली होती. त्या महागड्या ग्रुपचं नावच मोटरसायकलवाले बँडवाले पडले होते. ते कावपाड्यात पूर्वी कधीच आले नव्हते. त्यांनी रंगाच्या परड्यात गाड्या लावल्या. पहिल्या दणक्यालाच नव्या सिनेमातलं गाणं लावलं. 'ले जाएँगे ले जाएँगे जमाइ ले जाएँगे ऽऽ'

सगळ्यात आधी रिकामटेकडा बापूच टपकला. त्याला आबानं टोकला आणि जवळ बोलवला.

'बापूराव या! आवंदा तरी सुटनार का परीक्षेतनं जाधव? बसा पान खावा आधी दोस्ताच्या लग्नातलं.'

बैतीबलुती आपणाला मानाय लागली याचा आनंद बापूरावला झाला. नापास पोरगं लागलं पंचगिरीमागं. मरण आणि तोरण प्रचाराचं साधन. पान-तंबाखू मजी नेत्याची जनाधाराची साधनं. दारू, गांजा, नाच गाणं मजी संजीवनी. सावध लफडेगिरी मजी जनाधारासाठी रसद. हे सारं त्याचा लफडेबाज गुरू बाबूराव सणगरनं त्याला चांगलं पढवून ठेवलं होतं. त्यामुळं तो ऐटीत पानाला चुना लावाय बसला. आता दोन दिवस लग्नात लाईन मारायची संधीही चालून आली होती. मुन्नी आली तर प्रश्नच नव्हता. पण ती नाही आली तरी डबल फायदा होता. तसा परवानाच आता रंगाच्या आबानं दिला होता. लाकूडतोड्या नि ऐश्वर्या रायची गोष्ट सांगून रंग्याला चिडवण्याचे सारे प्रसंग त्याला आठवले. मनातल्या मनात तो खजील झाला. दैव जाणिले कुणी? त्यानं आबाला पानाची फेड कराय म्हटलं,

''आबा तुमी लई चांगलं केलं. रंगाचं नशीब उघडलं.'

'ही समदी देवाची करणी. त्येनं भनीला ही बुद्धी दिली.'

'तिलाही हुशार देखणा जावाई मिळाला.' बापू

'आजकाल हुशारी नि गोऱ्या रंगाला कुत्रं ईच्यारीत न्हाई. शहरातला नोकरीवालाच पायजे म्हंत्यात पोरी. मग त्यो हाटीलात कपबशा का धुईना. बनीच्या मागं आमचं लई पावनं लागलं हुतं.' आबानं थेट दोन नावं घेतली. एवढ्यात कांबळ्याचा सद्या जवळ सरकत म्हणाला,

'त्यात सड्यावरच्या पांडू सुताराचा कोल्हापूरला बस कंडक्टर पोरगाबी हुता म्हणं.'

'तशी बोलवा हुती. पर तसऱ्या घाणीत पोर द्यायला बनी तयार नव्हती. कडबस्नं तिचं ध्यान रंगावरच हुतं.' म्हणून आबानं रक्ताच्या नात्याचं महत्त्व सांगाय सुरुवात केली. एवढ्यात त्याचं चार जोडीदार आले. दारात नावाला छोटा मांडव घालायचा होता. आबा चकाट्या पिटीत बसल्याचं बघून ते खवळले. आबा बटवा सावरीत उठला आणि दारात गेला. जाता जाता रंगाला नवी कापडं घालून तयार करायची जबाबदारी बापूराव आणि कंपूवर सोपवली. इकडं मंत्रपठणामुळं 'जीजी' लग्न कसं मोडेल याची रंगा वाट बघत होता. फार बेसावध राहिल्याचा पश्चात्ताप त्याला होत होता. पळून जायचा विचार आला तरी अंधाऱ्या कोपऱ्यात रंगा गुडघ्यात मान घालून अजून बसून होता. रडून त्याचं डोळं सुजलं होतं. 'जीजी रं जी'चं मंत्रपठण आणि धावा करून कसलाच चमत्कार घडत नव्हता. सगळी हॅरी पॉटर कथानकं आणि पुस्तकातल्या चमत्काराच्या गोष्टी खोट्या वाटू लागल्या. तो भलताच तापला होता. पळून जायचं कुठं? मोटरभाड्याला पाच पन्नास रुपये जवळ नव्हते. परगावी कुणाचा आधार नव्हता. आबाचा राग त्याला माहीत होता. ठरलेलं लग्न मोडलं तर त्याचं डोकं फिरणार. लहान भावंडांचं काय? रोजंदारीवर घर चाले. भावंडं भिकेला लावणार काय? 'जीजी रं जी' अजून कसा काहीच करीत नाही? अपघातच घडवावा की नको?

प्रश्नांनी भांबावलेल्या रंगाच्या खांद्यावर हात ठेवीत बापू त्याच्या जवळ बसला. त्याचं दोन्ही हात पकडून हसत म्हणाला,

'अभिनंदन रंगराव. बेस्ट लक'

'आमच्या हार्दिक सदिच्छा!' बाजीराव.

'नात्यात लग्न सुरक्षित. आजकाल घटस्फोट फार.' कांबळे.

'अरे ही लहानपणापासूनची लिव्ह इन रिलेशनशिपच असते.

'आता तांदूळ टाकून सप्तपदी फक्त शिक्का मारायसाठी.' बापू

'पण तुझी लाकूडतोड्या नि ऐश्वर्या– ' बाज्याचं बोलणं मध्येच तोडत बापू त्याला दमात काढीत बोलला,

'तू गप साल्या. पुराणातली वांगी पुराणात. असल्या चमत्कारांवर विश्वास ठेवायचा नसतो. कपड्याच्या आत सगळ्या पोरी सारख्याच! सगळं देव काळंच असत्यात न्हवं?'

'व्हय गा. पर सोनी त्याला पसंत नसता ही बळजबरी–' बाज्या.

'नात्यात चालती. नसली पसंत तर तोंडावर रुमाल टाकून काम चालू.' बापूचा आगावूपणा आवराय कांबळेनं त्याच्या तोंडावर हात ठेवला.

'रस्ता बंद... नाही नाहीच' म्हणून जोरात हसत कांबळेनं बापूला टाळी दिली. बापूच्या मदतीला आणखी दोन पोरं आली.

तो चटकन रंगाच्या आईकडं गेला. पेहराव तयारच होता. बनूबाईनं जुन्या कपड्यांची माप देऊन ए-वन सफारी सूट, बूट, फेटा आणि रुमाल वगैरे उंची माल आणला होता. कशातच कसर सोडली नव्हती. बाप्या चारचौघांत नागडा करून नवी कापडं कशी चढवील याची रंगाला चांगली कल्पना होती. त्याचा विरोध लुळा पडला. आबानं सावधगिरीनं चांगला पुढारी निवडला होता.

लवकरच सारी तयारी झाली. आठ-दहा वाहनांत वऱ्हाड गच्च भरलं. त्यात बैलगाडी नावाला नव्हती. नवरदेवासाठी सजवलेली कार पाचच मिनिटांपूर्वी आली होती. बापू आणि कंपनीनं नवरदेवाला उत्तम सजवून तिच्यात बसवला. करवल्यांची दाटी झाली. त्यांना रेटीत बरेच वरदावे जमेल तसे खेटाखेटी करीत दिसेल त्या वाहनात घुसले. गावकरी जमले. दारात दोन्हीकडच्या पाहुण्यांची भेट झाली. शेजारणीनं नवरदेवावरनं लिंबू आणि दहीभात ओवाळून टाकला. बँडवाल्यांनी ठेका धरला आणि नवरदेव लग्नासाठी वाजतगाजत निघाला.

रंगाचं मंत्रपठण सतत सुरू होतं. पण कसलाही चमत्कार घडला नाही. कार्य निर्विघ्न पार पडलं. त्या रात्री काय 'घडलं' हे रंगाला सांगाय बापूला संधी तेवढी मिळाली नव्हती. ही साठा उत्तरीची कहाणी, पाचा उत्तरी अपूर्णम्....

**प्रा. डॉ. आनंद पाटील**
dr_anandpatil@rediffmail.com



# ।। गुरुत्वाकर्षणाचे अध्यात्म ।।

। राहुल बनसोडे ।



शूज घालून आलोप ऑफिसला जायला तयार झाला आणि तितक्यात कामवालीने डोअरबेल वाजवली. इतका वेळ आवरासावर करताना काळजीपूर्वक पाळलेली शांतता बाटलीसारखी फुटली आणि आता या आवाजाने प्रयंक उठला तर आपल्याला विचित्र परिस्थितीला सामोरे जावे लागणार, या विचाराने आलोप अवघडला. वास्तविक पाहता, विड प्यायल्यानंतर सौम्य पश्चात्ताप होईल, अशा कितीतरी घटनांतून आलोप अगोदर गेला होता. काल रात्री घडलेला प्रसंग तसा विशेष असा म्हणता येणार नाही. काही एक कारण नसताना बुधवारच्या सकाळच्या अपॉइंटमेंट कॅन्सल करून त्यांनी जॉइंटस ओढले होते. वास्तविक तसे काही करण्याचे दोघांच्याही मनात नव्हते; पण बीबीसीवर आर्किऑलॉजीची एक छान डॉक्युमेंटरी लागली आणि ती संपल्यानंतर सहज चर्चा करता यावी म्हणून त्यांनी मेंदू जागेवर असताना दोन दोन पफ घेतले. मग मेंदू हरवल्यानंतर दहा किंवा वीस. आकडा काही का असेना- त्यांचे संभाषण बरेच लांबले होते आणि त्या संभाषणातले बहुतांश मुद्दे दोघांनीही लिहून ठेवले होते, नंतर संदर्भ म्हणून तपासण्यासाठी. आलोपने कुतूहल म्हणून टेबलावर ठेवलेली दोघांचीही नोटपॅड्स पाहिली. त्याच्या नोटपॅडमध्ये काढून ठेवलेले बरेचसे मुद्दे प्रयंकच्या नोटपॅडमध्येही होते. काही ठिकाणी त्याच्या मुद्द्यांच्या बरोबर विरोधी मुद्दे प्रयंकने लिहून ठेवले होते; काही

तळटीपादेखील होत्या. प्रयंकला नोटसचा आधार जास्त वाटतो; कारण नशेत काय झाले होते हे त्याच्या कधीकधी अजिबात लक्षात राहत नाही किंवा मग काही मुद्दे विस्मरणात जातात. प्रयंकच्या नोट्स चाळत असताना त्याला प्राचीन अर्थव्यवस्था आणि त्यासंबंधित समुद्र व्यापाऱ्यांच्या प्रवासाचे सगळे मुद्दे व्यवस्थित दिसत होते. हे संभाषण समलैंगिकतेकडे कसे गेले ते प्रयंकलाही आठवत नसणार. चर्चा चालू असताना दोघांचे कपडे शरीरावेगळे झाल्याचे मात्र आलोपच्या व्यवस्थित लक्षात होते. त्यानंतर झालेला प्रयोग आलोपला आठवत असला तरी त्याने ट्रिक करून तो मेंदूत कुठेतरी झीप करून टाकला होता. विडचे पश्चात्ताप विड प्यायल्यावरच अनुभवावेत, अशी काहीशी आलोपची थिअरी होती. गंमत म्हणजे विड प्यायल्यानंतर आदल्या सेशनमध्ये केलेल्या कृत्याचा पश्चात्ताप होण्याऐवजी नव्याने आणखी शोध लागतात, असा आलोपचा अनुभव होता. नशेनंतर शून्याच्या जवळपास जाणाऱ्या त्याच्या वैश्विक व्यक्तिमत्त्वात आणि एरवी कडक उन्हाळ्यात एसी ऑफिसमध्ये जॅकेट-सूट घालून बसणाऱ्या त्याच्या कॉर्पोरेट कम्युनिकेशन्स हेडच्या व्यक्तिमत्त्वात पूर्णतः फरक होता. प्रयंकच्या बाबतीत हा नियम कसा असेल, हे मात्र अजून कोणालाच कळलेले नाही. प्रयंक नशेत असताना घडाघडा बोलतो, एरवी त्याच्यातला माणूस मात्र फक्त आणि फक्त फॉर्मल बोलतो. त्याच्या या फॉर्म्यालिटीतही एकप्रकारचा नम्रपणा आहे- कॉन्व्हेंटच्या आज्ञाधारक शाळकरी वयाच्या मुलात असतो तसा. निदान त्याच्या गर्लफ्रेंडचे तरी हेच मत आहे. कृतंतीला त्याची गर्लफ्रेंड कितपत म्हणता येईल याबद्दलही बरेच प्रश्न पडू शकतात. कृतंतीच्या एका मैत्रिणीने एकदा पार्टीत प्रयंकला थेट 'फकटॉय' म्हणून चिडविलेले आलोपला आठवतेय. प्रयंकला याचा राग येण्याऐवजी ती संज्ञा आवडली असावी; कारण त्याने लगेचच कृतंतीच्या ॲड्रेसबुकमध्ये त्याचे नाव बदलून 'फकटॉय' ठेवले होते.

कृतंतीने ते नाव तसेच ठेवले असेल का, याचा विचार करीत आलोप लिफ्टमधून बाहेर पडला. पॅरेडाईज टॉवर्समधला अकरा महिन्यांचा वाढीव करार संपत आला होता. भार्गवचे लग्न होऊन आता एक वर्ष होत आले होते. त्याने रूम सोडल्यानंतर बरेच दिवस आलोप आणि प्रयंक दोघांतही रूम सोडण्याबद्दल एकमत होत नव्हते. शहराच्या दोन वेगवेगळ्या टोकांवर दोघांनीही स्वतःचे फ्लॅट घेतले तरी येण्याजाण्याचा वेळ वाचतो म्हणून त्यांनी अजून त्यांच्या स्वतःच्या फ्लॅटमध्ये शिफ्टिंग केले नव्हते. शिवाय एकटेपणाचा प्रश्नही होताच. भार्गवने इतक्या लवकर लग्न करून टाकावे याबद्दल दोघांचाही फिडबॅक फार चांगला नव्हता. पण बोलूनचालून हे तिघेही रूम पार्टनर्स, कित्येक तास एकत्र राहूनही आयुष्याचे महत्त्वाचे निर्णय कुणी रूमपार्टनर्सला विचारून घेत नसतो. आलोपही लग्नाच्या निर्णयाच्या जवळपास पोहोचला होता. प्रयंक कधी लग्न करील याबद्दल त्याला फार काही चिंता नव्हती. हवे तर तो पाच वर्षे अजून एंजॉय करू शकतो असे आलोपला वाटायचे. शिवाय कृतंती ही त्याच्या मते लग्न करायची गोष्ट नव्हती. तसे पाहता, एकत्र बसून डॉक्युमेंटरी पाहण्याइतकीही ती प्रगल्भ नव्हती. प्रयंकला अशीच मुलगी का आवडावी, याचा उलगडा आलोपला अद्यापही झालेला नव्हता. पॅरेडाईज एफ मधून तो आता रिक्षाने डिजीलाईफ बी विंगच्या आपल्या ऑफिसकडे निघाला होता.

'ब्रेकअप मानवलाय हं तुला.' शाल्मलीची मैत्रीण फोनवर बोलत होती.

'तसा वाईट नव्हता; पण हो- फार काळ टिकवून ठेवता येण्यासारखाही नव्हता. जितका जास्त वेळ दिला असता तितके डिपॉझिट वाढत गेलं असतं. नंतर इन्वेस्टमेंट जास्त रिस्की झाली असती.' शाल्मली बेडवर बसून सहजतेने बोलत होती.

'हाउ वॉज ही इन बेड? कसा होता?'

'असायला हवा तसा होता गं. ही वॉज गुड इनफ ॲण्ड वॉज केअरफुल टु. म्हणजे काही वेळा मला प्रायोरिटी द्यायचा. नुसतेच घेत राहणे वगैरे नव्हते.'

'काही फॅन्टसी मागितलेली का? माझा मागतोय.'

'आजकाल सगळ्या माणसांना तोच छंद लागलाय गं. अमेरिकन सिरीयल्स आणि पिक्चर पाहून काहीही डिमांड करीत राहतात. तुझा काय म्हणतोय?'

'थ्रीसम.'

'अय्या छान हं. म्हणजे त्याची दुसरी मैत्रीण, तो आणि तू; की त्याचा मित्र, तो आणि तू?'

'तोच तर प्रॉब्लेम आहे. त्याचा मित्र आणि तो.'

'श्शी! काय काय डोक्यात येत असते यांच्या. तू काय ठरवलेस. डंप करण्यासाठी चांगले रिजन आहे.'

'काही समजतं नाहीये गं. म्हणजे मी स्पष्ट 'नाही'म्हटले; पण शांतपणे. तर त्याला अजूनही तो नकार कळत नाहीये. हा एक घाणेरडेपणा सोडला तर एरवी बराच चांगला आहे. तुला काय वाटतेय?'

'मी नाही असल्या फंदात पडणार. म्हणजे माझ्याच्याने होणार नाही असे काही. पण 'स्टेट'समधून परतलेल्या बऱ्याच जणांकडून ऐकलेय. माझ्या बुद्धीला नाही पटत गं असं काही. ए चल. मला बाहेर जायचंय. नंतर फोन करते. बाय.'

बाजार कोसळला. बाजारात मंदी आलीये. बाजारातल्या मंदीचे स्वरूप आता जागतिक महामंदीत झालेय. खूप महिने किंवा खूप दिवस गेले असावेत. आलोपचे लग्न झाले, प्रयंकला लग्न करावे इतपत चांगली गर्लफ्रेंड मिळाली, पेइंगगेस्ट कम मित्र कम स्मोकर मित्र मिळाले, आलोपने विड सोडली, प्रयंकची विड वाढली नाही पण एकाच वेळी जास्त पिण्याची सवय लागली. आणखी काही वर्षे गेली. बाजार वधारला. बाजारात तेजी आलीये. बाजारातली तेजी आता श्रीमंती आणतेय. त्यानंतरही खूप महिने किंवा खूप

दिवस गेले असावेत. आलोपने कामापासून ब्रेक घेऊन बुद्धिवंत नवश्रीमंतांच्या आवडत्या छंदांपैकी एक- आर्किओलॉजीला वेळ द्यायचे ठरविले. प्रयंकला पैसे कमविणे बंद करणे योग्य वाटत नाही, तो नुकताच नॉर्वेला जाऊन नॉर्दन लाईटस पाहून आलाय. तिकडून आल्यानंतर त्याचा ब्रेक अप झाला. प्रयंकला सेक्सचा कंटाळा आला होता. कुठल्याही स्त्रीबद्दल सेक्शुअल न वाटणे हे आध्यात्मिक आहे असे त्याला वाटू लागले. ॲसेक्शुअल म्हणजे काही टर्म असते का, याबद्दल तो शोध घेतोय. आलोप आणि प्रयंक फक्त भार्गव भारतात आल्यावरच भेटतात. भार्गवचे इकडे येणे आता वरचेवर व्हायला लागलेय. तिघांना एकत्र जगण्यासाठी म्हणून हक्काची जागा नाहीये, त्यामुळे ते बाहेर तुटक तुटक पण जास्त वेळ भेटतात. यापेक्षा वेगळा म्हणून आलोपला वेळ देण्याची प्रयंकला गरज वाटत नाही. लग्न झालेल्या मित्राने बॅचलर मित्राशी जसे वागावे तसा आलोप प्रयंकशी वागतो.

मुखमैथुन. शाल्मलीच्या डिक्शनरीतला नवीन मराठी शब्द. रिलेशनशिप टिकविण्याच्या अनेक पॅरामिटर्सपैकी ‘ब्लो जॉब’ देणे, हा भाग अतिमहत्त्वाचा आहे हे शाल्मलीला मंदीच्या दिवसांत अस्पष्टसे जाणवू लागले. नवीन रिलेशनशिपच्या फंदात न पडता महामंदीत शाल्मलीने ‘सेक्स’ या विषयावर रीतसर अभ्यासच केला. हा अभ्यास करूनही बाजारात तेजी परतली तेव्हा शाल्मलीच्या वाट्याला आलेले एकदोन उडते टाईमपास उथळच निघाले. शाल्मलीने हा नवा ट्रेंड स्वीकारलाय. त्याला ‘ब्लो जॉब’ न म्हणता मुखमैथुन म्हटले की झाले. शिवाय शाल्मलीचा सध्याचा बॉयफ्रेंड सहजसहजी गमावण्यासारखा नाही. तेजीच्या काळात तर नाहीच नाही.

ऑफिसमधले लोक एक एक होऊन घरी जायला लागले तसा प्रयंकही निघाला. आठड्यातला अजून एक दिवस संपला होता. कुठला ते प्रयंकला आठवावेसे वाटले नाही. घरात शिरताना त्याने फोनवरून पिझ्झा ऑर्डर करून ठेवला होता. परवाचा पिझ्झा जवळजवळ थंड झाल्यावर डिलिव्हर झाला होता; निदान आजचा गरमागरम यावा, असे प्रियंकला मनोमन वाटले. तसा तो थर्टी मिनिट्स गॅरंटी मागू शकत होता; पण प्रयंकने घड्याळाशी आपले नाते जवळजवळ तोडले आहे. नव्या घरात त्याने बरेच फर्निचर घेतले; पण भिंतीवरचे घड्याळ घेतले नाही. घरी असताना फोन अथवा कॉम्प्युटर वापरणे त्याने बंद केले होते. याशिवाय किती वाजले आहेत ते कळेल असे त्याच्या घरात काहीच सामान नव्हते. स्लो मुव्हमेंट नावाच्या एका नव्या लाइफस्टाईलशी तो जुळवून घेण्याचा प्रयत्न करीत होता. आलोप प्रयंकपेक्षा फक्त पाचेक वर्षांनी मोठा असेल. असे असले तरी त्याच्यात आणि आलोपमध्ये पूर्ण एका पिढीचे अंतर होते. आलोपला दोनही काळांत जगता आले. प्रयंकला जग समजू लागले तोपर्यंत सगळ्या गोष्टी वर्तमानकाळात आल्या होत्या. आलोपची अख्खी पिढी समजावून घेताना प्रयंकची दमछाक होत होती. पण त्याच्या प्रश्नांची उत्तरेही हीच पिढी देत असल्याने त्याला हे सगळे शिकायचे होते. वॉश बेसिनमध्ये तोंड धुवत असताना प्रयंकचा कधी न वाजणारा फोन वाजला. कॉल अर्थातच आलोपचा होता.

‘काय रे झोपलायेस का?’

‘नाही’ सरसावून प्रयंक म्हणाला.

‘ओके. बरा आहेस ना?’

‘हो रे. तू सांग’

‘मला वाटतंय, या शनिवारी नवापूरला जावे.’

‘चालेल. मला सुटी आहे. जमेल. काही विशेष?’

‘मॅप फायनल करून टाकू.’

‘बॉस मला फक्त शनिवार मिळेल हा. रविवार जमणार नाही’

‘शनिवारीच काम फायनल होईल. पण मी कॅम्पिंगचे सामान कारमध्ये ठेवतोय. मार्शमेलोज पण’

‘कसले बाईले धंदे रे तुझे. मार्शमेलोज कशाला? अंडी-पाव आणि चहापुरती साखर-दूध असलं की झालं’

‘लेट्स नॉट टॉक शीट स्टफ, तू येतोयस. कपीश?’

‘कपीश.’

‘चल. शनिवारी सकाळी फोन करतो. लॅपटॉप आणि मागची ड्रॉईंग्ज घेऊन ये. आणि जमले तर अयोवास्कासाठी मातीचे भांडे आण.’

‘मिळालीये?’

‘हो. पण भांडी सगळी तुझ्याच घरी आहेत.’

‘भांडी आणतोय रे. त्याची चिंता करू नको. मी काय म्हणत होतो; आपण शुक्रवारीच जाऊ या की. तीन दिवस मस्त टाईमपास होईल.’

‘भेंचोद. आत्ताच तू शनिवारपुरतंच बोलत होता. अयोवास्का म्हणतो तं भिकारीपण आलं अंगात.’

‘ओके. शनिवारी नक्की. चल ठेव आता. बोर नको करू’

‘बाय.’

पिझ्झा आला. डिलिव्हरी घेऊन मयंकने सुटे पैसे परत न मागता पिझ्झावाल्याला स्माईल देऊन दरवाजा बंद केला. पेपरोनीचा वास प्रलयच्या डोक्यात साठलेल्या दुसऱ्या एका वासाची आठवण काढू लागला.

नवापूरशी प्रयंकला काही एक घेणे देणे नाही. मुख्य म्हणजे जिथे आलोप काम करतोय, तिथे जाताना ज्या कच्च्या सडकेवरून जावे लागते, तिथले सगळ्यात जवळचे गाव म्हणजे नवापूर. डोंगराच्या त्याच्या पुढच्या भागाचे काही नाव नाही. पायथ्याशी तळे, त्यानंतर एक छोटा, एक मध्यम आणि एक मोठा, असे एका मागोमाग एक तीन डोंगर. त्यांपैकी मधला डोंगर हा डोंगर म्हणता येणार नाही. कारण एकदा तिथे गेले म्हणजे एक मोठा सपाट भूभाग आहे. वर जाण्याचा रस्ता मात्र डोंगर चढून जाण्यासारखाच आहे. वरती अशी सोयीची सपाट जमीन असताना गावाच्या लोकांनी तिथे जाण्यासाठी रस्ता का बांधला नाही याबद्दल

प्रयंकला आश्चर्य वाटते. कदाचित जागा फक्त सपाट असून उपयोगाची नाही, ती वेलकनेक्टेड असावी लागते. त्या पठारापर्यंत पोहोचण्यास कधीकधी दोन तासांहूनही जास्त वेळ लागतो.

त्या पठारावर तीन मंदिरे आहेत आणि त्यांना कसलासा शाप आहे- काही लोक बोलतात. यातले एक मंदिर हे सद्यःस्थितीतल्या कुठल्या धार्मिक प्रतिमांशी जुळणारे नसल्याने, त्या मंदिरात कुठल्या देवाची पूजा केली जाते याबद्दल लोक साशंक असल्यानेही कदाचित ते दूर राहत असावेत. दुसऱ्या दोन मंदिरांत मुख्य प्रतिमा काहीच नाहीत. भिंतींवरती कोरीव काम मात्र आहे आणि ते कोरीव काम बरेचसे लैंगिक स्वरूपाचे असल्यासारखे वाटते. पण त्यावर पहारीने वा कसल्याशा हत्याराने बरेच आघात झाल्याने, कोरीव काम स्पष्ट राहिलेले नाही. शिवाय मुख्य प्रतिमाही नाहीत. त्या प्रतिमा नंतर कधीतरी काढल्या गेल्या असाव्यात असे आलोपला वाटते.  अर्थात त्या काढताना विटंबना न करता विधीवत मानसन्मानाने काढलेल्या आहेत, असे वाटायला मंदिरांच्या भिंतीवरती बराच वाव आहे. मंदिरातील मूर्ती अथवा शिल्प थेट भिंतीतच कोरले गेले असल्याने ते नंतर त्यातून कोरून काढून घेणे शक्य झाले. आणि मुख्य भिंती थेट कोरल्या गेलेल्या असाव्यात असे वाटते. तिसरा डोंगर फक्त डोंगर नसून, एक विशाल कातळशीला आहे, जी नंतर कोरून एक छोटेच परंतु सुंदर नगर निर्माण केले होते, असे आलोपला वाटते. हा दावा केल्यानंतर पहिली दोनेक वर्षे आलोप वेडा झाला आहे असे बऱ्याच लोकांना वाटले. नंतर कधीतरी नवापूरमधल्याच एका वृद्ध म्हाताऱ्याने याला दुजोरा दिला, अशी काहीशी दुर्मीळ कथा त्यानेही त्याच्या लहानपणात ऐकल्याचे त्याने सांगितले. त्या म्हाताऱ्याच्या सांगण्यात फार काही तथ्य असल्यासारखे वाटत नव्हते; पण तो म्हणतोय तसे तिथे पुरातन काळी एखादे शहर असण्याची शक्यताही एकदमच नाकारता येण्यासारखी नव्हती.

तीन हजार वर्षांपूर्वीचे ते नगर कसे राहिले असेल? त्याला नगर म्हणणे योग्य ठरणार नाही. कारण त्या काळची प्राचीन भारतीय शहरे विस्तृत पठारांवर वसलेली होती- स्वतःची अशी पाणी वितरणाची आणि सांडपाण्याची व्यवस्था घेऊन, शक्यतो नद्यांच्या काठी. इथली नदी जवळजवळ पाच किलोमीटर दूरवरून वाहते. नाही म्हणायला वरच्या मोठ्या डोंगरावरून एक झरा उगम पावून तो मधून पास झालाय; पण त्याला म्हणावे असे पाणी फक्त पावसाळ्यातच असते. शिवाय तो झरा पुढे कुठेतरी जाऊन अदृश्य होतो. अदृश्य म्हणण्यापेक्षा कोरडा पडतो, असे म्हणता येईल किंवा मग त्याला जमिनीतून कुठूनतरी फाटा असावा. आपण या झऱ्याचा माग घेतला आहे असे आलोपने एकदा अस्पष्टसे प्रयंकला सांगितल्याचे आठवले. हा विषय तसा बंद होऊन आता तीनेक वर्षे झालीत; त्यामुळे नवापूरच्या त्या अर्धवट संशोधनाला प्रयंकच्या लेखी फार महत्त्व नाही. ते फक्त एक सेटिंग आहे.

आयोवास्का प्यायल्यानंतर कनेक्ट होण्याचा रस्ता. टेंटमध्ये पडून राहावं, वरचा फ्लॅप खोलून तारे बघावेत आणि चंद्राचा उजेड असेल तर आजूबाजूची झाडी. या सेटअपशी पहिले कनेक्शन व्यवस्थित बनले की, मग जास्त चिंता नाही. किंबहुना नंतर कधी अयोवास्का प्यायली तर कसलीच चिंता नाही. एक शास्त्रीय आध्यात्मिक भावना, आपण एका मोठ्या अगणित विश्वाचे भाग असल्याचा. हा अनुभव प्रयंकने आलोप आणि भार्गवबरोबर मोजून तीनदा घेतला आहे. मग एकदा ब्राझीलमध्ये असताना, दोनदा इंडोनेशियात. ब्राझील आणि इंडोनेशियातली पद्धत पूर्णतः वेगळी होती. शिवाय अनेक लोकांबरोबर असल्याने काय झालेय वा चाललेय, यात गोंधळ होता. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दोनही वेळा डोके प्रचंड दुखले होते आणि फार त्रास झाला होता.

प्रयंकने ड्रॉवरमधून हार्डडिस्क काढून लॅपटॉपला कनेक्ट केली. कोपऱ्यात दिसणाऱ्या घड्याळाकडे दुर्लक्ष करीत त्याने डिझाईन प्रोग्रॅम चालू केला. त्या जुन्या दिवसांत करून ठेवलेली काही थ्रीडी ड्रॉइंग्ज खोलली. एकूण संभाव्य मंदिरे पाच. एकामेकांपासून एका विशिष्ट अंतरावर. सगळ्यात कमी अंतर चारशे मीटर, तर सगळ्यात जास्तीचे तीन किलोमीटर. पाचही मंदिरांचे डॉटस एकमेकांशी रेषेने कनेक्ट केल्यानंतर येणारा आकार धनुराशीच्या धडासारखा. याच्या पायाशी असलेल्या दोन बिंदूंपाशी दोन मंदिरे असावीत म्हणून आलोप आणि प्रयंकने पूर्वेकडचा सगळा परिसर पालथा घातला. झुडपे तोडून एखादा भग्नावशेष दिसतो का, यासाठीही प्रयत्न केले. भग्नावशेष तर दिसले नाहीत; पण एके ठिकाणी मोठा साप दिसला. दुसऱ्या एका ठिकाणी लहान लहान सापांची मोठी पलटणच दिसली. आलोपला सापांची भीती वाटते; पण कामाचा भाग म्हणून तो सापांबरोबर डील करायला शिकलाय. प्रयंकला सापांचे एक विलक्षण आकर्षण आहे. सापाला माणूस दिसला म्हणजे साप पळून जायच्याच मार्गावर असतो, क्वचितच तो समोर थांबून सामना करायचे ठरवितो. अशा नेमक्या वेळी सापांच्या डोळ्यातले भाव पाहायला प्रयंकला आवडते. त्यात एक प्रकारची हतबलता आणि जिवावर बेतले तरी आता मी लढणारच या दोनही भावनांचा एक सुरेख संगम असतो.

मागच्या वेळी पायथ्याची दोन मंदिरे न सापडल्याने आणि त्यामुळे आलोपची  थिअरी चुकीची वाटल्याने काम थांबले. तसेही हे काम फार सिरीयस होते अशातला भाग नाही; पण मजा येत होती. शिवाय दोन-तीन दिवस शहरांच्या कोलाहलापासून दूर राहायला मिळणे, ही प्रयंकच्या दृष्टीने चांगली गोष्ट होती. आलोप पायापाशी असलेल्या मंदिरांचा पुन्हा शोध घेणार आहे की मग थिअरी बदललीये? एकदा एक मकरसंक्रांतीची रात्र त्यांनी त्या पठारावरच घालविली होती. सूर्याची किरणं बरोबर पहिल्या मंदिराच्या पायथ्याशी पडली. पुन्हा २१ मार्च आणि एकवीस सप्टेंबरलाही ते रात्री तिथेच होते. गणिते सगळी बरोबर होती. ही

सगळी मंदिरे  एकत्र येऊन धनू राशीच्या ताऱ्यांसारखा आकार बनवितात, हा सिद्धान्त म्हणून तर परफेक्ट होता; पण त्यातली हरवलेली मंदिरे सापडत नसल्याने त्यावर खात्री होत नव्हती. ड्रॉईंग्जकडे पाहताना प्रयंकची नजर धनुर्धाऱ्याच्या हातात असलेल्या धनुष्यावर गेली. त्याच्या बाणावर. तो झरा  उत्तरेकडच्या मंदिरापासून सरळ पुढे वाहत जातो. त्या बाजूचे जंगल आपण पाहिलेले नाही. त्याने अंदाजे माप लावून रेषेच्या शेवटी येऊ शकणाऱ्या मंदिराचा डॉट काढून पाहिला. तो थेट मोठ्या डोंगराच्या मध्ये जात होता. तिथे मंदिर असणे कसे शक्य आहे? प्रयंकची उत्सुकता ताणली जाऊनही उत्तर काहीच न आल्याने त्याने अस्वस्थ होऊन सिगारेट पेटवली.

या वेळी नकाशा पूर्ण कसा होईल ती जबाबदारी आलोपची होती. प्रयंकला फक्त डिझाइन्सवर काम करायचे होते. तोपर्यंत सापडलेल्या पहिल्या पाचपैकी तीन मंदिरांचे व्यवस्थित थ्री डी मॉडेल प्रयंकने पूर्ण केले होते. यानंतर त्या मंदिरांच्या भिंतींवर असलेले कोरीव कामही व्यवस्थित वेगळे डॉक्युमेंट करून ठेवले होते. सर्व नक्षीकामाचे फोटो काढून त्यावरही थोडेफार काम सुरू केले होते. प्रयंकने आता पूर्ण पठाराचेच एक थ्रीडी मॉडेल बनविण्याचे ठरविले. त्या पठारावरचा एकूण एक भाग आणि एकूण एक कोपऱ्याचे डिजिटलायझेशन. हॉलिवूडच्या सिनेमात दाखवितात तसे ग्राफिकल मॉडेल. काम मोठे होते; पण अशक्य नव्हते. सतत वेळ दिला तर एक-दोन दिवसांत होण्यासारखे होते. एक-दोन दिवस हा हिशेब जरा विचित्र होता. प्रयंकने उद्याचा विचार बंद केला. सॉफ्टवेअर खोलून त्याने काम सुरू केले. सावकाश एक सिगारेट पेटवून तो अर्धा तास काम करीत राहिला. सगळे बिंदू आखून झाल्यानंतर आता त्याच्या मेंदूचा आय.क्यू. दहा टक्क्यांनी वाढविण्याची गरज होती. त्याने ड्रॉवरमधून बाँग काढला. त्याच्या पाईपमधे विड भरून त्याला लायटरने जाळ लावला. शक्य तितका खोल जाणारा पहिला कश घेतल्यानंतर प्रयंक त्याच्या आय.क्यू.चे गणित विचारात आणू लागला. मेंदू हाताबाहेर जाणे म्हणजे काय? मुळात एखादी गोष्ट हाताबाहेर जाणे म्हणजे ती हाताच्या कंट्रोलमधून जाणे म्हणजे मुळात मेंदूच्याच कंट्रोलमधून जाणे. म्हणजे मेंदू स्वतःवर असलेले नियंत्रण स्वतःच हरवू शकतो. मॅरीयुआनात नियंत्रण हरविते असे होत नाही, किंबहुना मेंदू जास्त नियंत्रित होतो. अडचण फक्त हीच की, या काळात घडलेल्या गोष्टी स्मृतीत टिकवून ठेवता येत नाहीत. हे तात्पुरते साक्षात्कार होत असताना लिहून ठेवावेत, किंवा मग तिथल्या तिथे साक्षात्काराचा आनंद मिळाला हे समाधान मानून पुढचे विचार करीत राहावेत...? झोप येईल तेव्हा झोपून जावे...? या काही विचारांत दोन-चार मिनिटे गेली आणि बाँग बराचसा संपला. प्रयंक शांत बसून होता. डोक्यातल्या नशेने त्याची पकड घेतली आणि तसाच दहा मिनिटे बसून राहिला आणि त्याच्या तात्पुरत्या बदललेल्या मेंदुसंरचनेने मग पूर्णतः वेग घेतला. तो परत कामाला लागला. काम कुठपर्यंत पूर्ण झाले आणि कसे दिसतेय, हे त्याला आत्ता कळणार नव्हते. त्याच्या मेंदूतही काम करतानाची कुठलीच आठवण राहणार नव्हती. त्याचे हात झरझर टचपॅडवर फिरत राहिले, कितीतरी वेळ तो ड्रॉईंग्ज काढत राहिला; आता शक्य नाही म्हणून जागेवरच लवंडला, मग उठून मिळेल त्या जागेत झोपून गेला.

फोन वाजल्याने प्रयंकची झोप मोडली. फोन शोधताना त्याला थोडे कष्ट घ्यावे लागले. कॉल रिसीव्ह करून कानाला लावताना मानेतून मेंदूच्या उजव्या बाजूला एक असह्य चमक गेली. सवयीने प्रयंकने फोन घेतला.

'बोल आलोप.'

'ड्रॉप बॉक्समधले ड्रॉइंग अपडेट केलेय?'

'हा. ह्म्म'

'अरे भेंडी, ड्रॉइंग अपडेट केलेय. तू मी टाकलेली फाईल पाहिलीस का?'

'बघतो' डोक्यात येणारी मोठी कळ, दोन्ही खांद्यातल्या कळा, चुरचुरणारे डोळे आणि कपाळाच्या केसांतला घाम पुसत प्रयंक म्हणाला.

'तुला बरं नाहीये का?'

'हो'

'हँगओव्हर'

'हो'

'तरीच. रात्रभर काम करीत होता ना? पाहिजे तर परत झोप. पण ड्रॉइंग फारच छान झालंय. लव्ह यू फॉर दॅट. इथं असता तर ओठ चोखले असते तुझे'

'चल नंतर फोन करतो'

सर्वांगात वेदना घेऊन प्रयंक उठला. लॅपटॉपकडे जाऊन ड्रॉपबॉक्स खोलले. पाच जीबीच्या फाईल्स डाऊनलोडला लावल्या. पाच जीबी हा आकडा त्याला कमालीच्या आश्चर्यात पाडायला पुरेसा होता. डाउनलोड व्हायला एक तास लागेल असे पाहून त्याने लॅपटॉपकडून आपले लक्ष बाहेर केंद्रित केले. मग सावकाश दुखऱ्या अंगाने तो बाथरूमकडे गेला. शॉवरमधून निघणाऱ्या पाण्याच्या असंख्य सुया त्याच्या चेहऱ्याला टोचू लागल्या. अंगावरून निथळणारे पाणी खांद्यातल्या वेदना कमी करू लागले. मानेच्या वरच्या भागातून डोक्यात जाणारी अस्वस्थ कळ थांबली. मान वळवली तर ती अजूनही येत होती; पण स्थिर उभे राहिल्यास डोके आणि शरीर बरेचसे नियंत्रणात आले होते. तो स्वतःच्याच नागड्या शरीराला कितीतरी वेळ प्रेमाने कुरवाळत राहिला.

गुरुत्वाकर्षण हा फक्त शब्द वापरणे एक आणि गुरुत्वाकर्षणाचा स्थिरांक घेऊन गणित मांडणे, त्या गणिताला धरून बांधकाम करणे दुसरे. नवापूरजवळच्या त्या पठारावरचे सगळे भग्नावशेष आणि दुर्लक्षित मंदिरे सटीक गणित मांडून बांधण्यात

आली होती. असे असले तरी त्यात कुठलीही भव्यता नव्हती. ३ हजार वर्षांपूर्वी तिथे एक १००० लोकसंख्येचे गाव असण्याची शक्यता होती; पण सगळे १००० लोक मंदिरकार्यात गुंतण्याची शक्यता नव्हती. असेही असू शकेल की त्या मंदिरावर तीन पिढ्यांनी कैक वर्षे काम केले... किंवा असेही असू शकेल की हजारो लोक एकत्र येऊन त्यांनी ती मंदिरे वेगाने बनविली आणि त्यानंतर ते पुन्हा आपल्या गावांना परत निघून गेले... किंवा मग ते एक एंटरटेन्मेंट सेंटर असेल? आज भव्य मॉल आणि त्याभोवती मल्टिप्लेक्सेस असतात तसे? किंवा मग एखाद्या मोठ्या राजाचा व्हेकेशन स्पॉट असेल? लॅपटॉपसमोर विवस्त्र बसून फाईल्स डाउनलोड होत असताना प्रयंक पुन्हा विचार करीत होता. या शक्यता तपासणे आणि त्यातल्या खऱ्या शक्यतेच्या जवळ जाणे, हा प्रयंक आणि आलोपचा उद्देश असायला हवा होता. पण त्यांना या शक्यता कुठल्या आहेत यावर जास्त वेळ घालवता येणे शक्य नव्हते. याशिवाय तीन हजार वर्षांपूर्वीच्या मागे जास्त काही अवशेष न उरलेल्या इतिहासाबद्दल त्यांच्या देशाला काही जास्त आस्था नव्हती. इतिहास जुना असला तरी तपासून पाहता येईल इतका ताजा पाहिजे. त्याच्या शाब्दिक कथेपेक्षा तलवारी, चिलखतं, बाण अशा असंख्य दिसणाऱ्या गोष्टी असायला पाहिजेत. सर्वांत मोठी गोष्ट अशा इतिहासाचा सद्यःस्थितीतल्या अस्मितांसाठी वापर करता आला पाहिजे. ज्या प्रकारचे संशोधन आलोप करतोय त्या प्रकारच्या संशोधनाने कुठल्याही अस्मितेला तेजःपुंज करण्यासाठी वंगण मिळणे शक्य नव्हते. भारतात दुसऱ्या अनेक ठिकाणीही 'सेक्स' या विषयाला वाहिलेली छोटी-मोठी मंदिरे आहेत; पण उगीच तिकीट खर्चून फक्त एक-दोन मूर्ती पाहण्यासाठी चार दिशांना खर्च करीत वणवण फिरण्याइतका अटेंशन स्पॅन आणि त्या शिल्पांबद्दल फारशी आस्था त्यांच्या देशाला नव्हती. शिवाय एकच मूर्ती पाहायची असल्यास ती देवाचीच असावी आणि नवसाला पावणारी असावी, असाही एक खूप जुना नियम होताच. त्या काळी लोक आस्थेची देवळे बांधत असताना मधूनच कामुक शिल्पे असणारी मंदिरे का बांधत असावेत? मुळात 'मंदिर' हा शब्द फक्त देवाशीच जोडला गेल्याने बराच गोंधळ झाला आहे. मंदिर म्हणजे एक व्यवस्थित बांधली गेलेली इमारत, एक सार्वजनिक प्रकल्प, उत्तम उत्पन्न देणाऱ्या शेतीवर आधारभूत अर्थव्यवस्थांनी मनोरंजनासाठी वा आध्यात्मिक शांती मिळविण्यासाठी बांधलेली कार्यस्थळे. तीन हजार वर्षांपूर्वीच्या काही भव्य मंदिरांमध्ये कुठलीही मूर्ती नाही. कधी काळी एखादी मूर्ती तिथे असेलच असेही स्पष्ट म्हणता येणार नाही. नंतर नंतर यांतली काही मंदिरे ही प्राचीन ग्रंथालये होती, असे काही निष्कर्ष समोर येऊ लागले; आणि मग मात्र आलोप आणि प्रयंकचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बराचसा बदलला. जुनाट मंदिरे मोठ्या संख्येने असणाऱ्या स्थळांना भेटी देऊन विकेंड सगळा तिथेच घालवायचा, असा नवा कार्यक्रम त्यांच्या आयुष्यात आला होता. प्रयंक आणि आलोप दोन आयुष्ये जगायचे. एक एकविसाव्या शतकातले आणि दुसरे इसवीसनपूर्व काही शतकांचे. अर्थात हे इतके सरळ नव्हते. काळ असाच फॅन्टसाईज करून चालत नाही. ज्या ठिकाणी हे दोघे जायचे, तिथे बऱ्याचदा दाट जंगले वाढलेली असायची. कित्येकदा नकाशांमध्ये असलेली ठिकाणे आणि अस्तित्वातल्या दगडांच्या राशी यांत बरीच तफावत असायची. शिवाय आलोपला न आवडणारे सापही असायचे. त्यांचा मुक्काम त्या मंदिरांजवळ वा स्थळांजवळ असेल असेच नाही. कित्येकदा आलोप थोडा दूर टेकाडावर जाऊन पाही आणि तिथून कल्पनेनेच हजारो वर्षांपूर्वीची गावे आणि त्यांचे मंदिरांशी असणारे संबध इमॅजिन करी. हे इमॅजिनेशन प्रयंकला कधी लगेच समजायचे नाही, आलोपलाही पूर्णपणे शब्दांत व्यक्त करून सांगता यायचे नाही; पण हे विस्कटलेपण टेंट लावून आणि जेवण तयार होईपर्यंतच. टेंटमधले जेवण आटोपून नोटस काढल्यावर ते दोघे गांजाची नशा करायचे. सुरवातीच्या एक-दोन राउंडनंतर आलोप बोलू लागे आणि प्रयंक ऐकू लागे.

अर्ध्या पाकळ्यांचे रहस्य. फक्त लोखंडाचा बाह्यभाग पाहून ते कुठल्या शहरात बनले असेल त्या शहराची नावे. जगाला भारताने शून्य दिल्यानंतरही बरेच काही दिले. कधी काळी भारतात बनणारे हे लोखंड जगाच्या इतर कितीतरी निर्माणकार्यांमध्ये वापरले जात होते. अर्थात हा अवजड धातू; त्यामुळे काही ठिकाणी वाहून न्यायला अवघड. अशा वेळी ते लोखंड बनवू शकणारा कारागीर व्यापाऱ्यांबरोबर जाई. त्यावर तयार होणारे पॅटर्न जागेप्रमाणे आणि कारागिरागणीक बदलत जात. नंतर नंतर तर अमुक एक प्रकारचे लोखंड अमुक एक कारागीरच बनवू शकतो, इतपर्यंत ही मोनोपोली वाढली होती. कुठल्याही पेटंट प्रोटेक्शनविना संस्कृती भरभराटीला येत होती. आज जग जितके जोडलेले वाटते, त्यापेक्षा जास्त भावनात्मक आणि बौद्धिकरीत्या ते तीन हजार वर्षांपूर्वी सागरी मार्गांनी जोडलेले होते. कित्येक मोठमोठी मंदिरे आणि वास्तू राजाच्या मदतीऐवजी व्यापाऱ्यांच्या एकत्रित सहकारातून तयार होत होत्या. मानववंशाच्या एकूण सहा सुवर्णकाळांपैकी हा एक महत्त्वाचा काळ. इतर काळांसारखा आला तसा गेलादेखील. सुवर्णकाळ मागे सरल्यानंतर पडणारे दुष्काळ आणि सभ्यतेचा नाश माणसाला जवळजवळ पुन्हा आदिम बनवित होता. कित्येक संस्कृती, शहरे, देश त्यांच्या नष्ट होण्याच्या परिस्थितीबद्दल काहीच उल्लेख मागे न ठेवता विरून गेल्या, नष्ट झाल्या. भरभराटीस आलेल्या दिवसांबद्दल भरल्या पोटाने हजारो इतिहासकार लिहितात; या ऱ्हासाची कथा कुणी लिहावी?

निर्माणकलेत अध्यात्म आले, दैनंदिन जीवनांचे संदर्भ आले आणि अर्थात सर्वांत जवळचा विषय सेक्सही आला. कुठलाही समाज प्रगतीच्या अंतिम टोकावर जेव्हा उभा असतो, तेंव्हा तो सगळ्यात जास्त ऐहिक सुखांच्या मागे असतो. हे विधान तसे तर प्रचंड निगेटिव्ह अर्थाने घेतले जाते; पण खरंच समाजातल्या एकूण

एक माणसाला दुसऱ्याला इजा न करता त्याला हवे ते ऐहिक सुख मिळविण्याचा अधिकार जेव्हा मिळतो, तेव्हा तो संस्कृतीचा परमबिंदू असतो. यात हवे ते खाण्याची, हवे तसे कपडे घालण्याची, हवे ते बोलण्याची आणि हवा तसा सेक्स मिळविण्याचा अधिकार प्राप्त झाल्यानंतर एखादा माणूस जसा काही वागेल आणि अशी अनेक माणसे एकत्र येऊन जो काही समाज घडवतील, तो त्या संस्कृतीच्या इतिहासाचे एकूण संचित असावे. ऐहिकता ही सुखाच्या मागे लागल्याने निर्माण होते आणि सुखाच्या मागे लागलेला समाज आपल्या कोसळण्याच्या बिंदूपर्यंत सुखाने जगत राहतो. सदासर्वदा अगणित काळासाठी सुखाने जगत राहणे माणसाला शक्य नाही; कारण निसर्गाचे स्वतःचे एक अर्थशास्त्र असते. अर्थाचे शास्त्र. या निसर्गाच्या अर्थशास्त्रात कधी वेगाने तर कधी अत्यंत संथ पण सतत काही ना काही बदल होत राहतात. निसर्गाला आपल्याला माकडापासून माणूस बनविण्यात काही खास इंटरेस्ट नव्हता; पण त्याच्या एका अर्थशास्त्रीय बदलात आम्हाला झाडावर अन्न मिळणे अवघड झाल्याने जमिनीवर उतरावे लागले. असुरक्षित वातावरणात अन्नान्न दशेत फिरत असताना इतर वाघ-सिंह वा हिंस्र श्वापदांनी मांस सफाचट खाऊन मागे उरलेल्या कोरड्या हाडांना फोडून त्यातली मऊ कुर्चा खावी लागली. त्या कुर्चेत जी काही प्रथिने होती, ती खाल्ल्याने आमचा मेंदू वाजवीपेक्षा मोठा होत गेला. वाढलेला मेंदू मग अधिकाधिक अन्न शोधत गेला, केवळ अन्न शिजवून खायच्या एकमेव शोधाने आम्हाला निसर्गातल्या शंभरपट अधिक गोष्टी खाणे शक्य झाले. एरवी नुस्तेच कच्चे गहू आम्ही कितपत खाऊ शकलो असतो आणि कितपत पचवू शकलो असतो, हा प्रश्न मोठा आहे. खाणे वाढले तसा मेंदू मोठा होत गेला, नंतर नंतर मेंदू फक्त मेंदूला आवडणाऱ्या गोष्टी करायला लागला. माणसातला रानटीपणा जाऊन त्याची आवड निर्माण झाली. त्याला 'चॉईस' मिळाला. समलिंगी संबध कुठल्या प्रजातीत नसतात? फक्त ते अतिशय क्षीण असल्याने लगेच दिसून येत नाहीत. माणसाच्या मेंदूने केलेली प्रगती मात्र त्याची समलैंगिकता जास्त ठळकपणे दाखवू शकते. माणसाचा घाम, माणसाची बोटे, माणसाची बेंबी जशी इतर प्राण्यापेक्षा फार ठळक दिसून येते, तसेच माणसाचे हसणे, माणसाचे रडणे आणि माणसाचा सेक्स फार स्पष्टपणे दिसून येतो. एरवी दुसऱ्या एखाद्या प्राण्याला वा पक्ष्याला आपण घामाघूम झालेले बघत नाही, हसताना वगैरेही बघत नाही. जितका मोठा मेंदू, तितकी एखादी भावना ठळक आणि अशा असंख्य भावनांच्या कमी-अधिक मिश्रणातून तयार होणारा आमचा स्वभाव, आमचा मेंदू. तुम्ही खूप गोड खाणाऱ्यांना फार नावे ठेवणार नाही, कारण तो त्याचा स्वभाव आहे. एखाद्याला दिवसातून दहा वेळा आख्खे सुपारीचे खांड खायची सवय असेल तर एक वाईट व्यसन म्हणून तुम्ही त्याच्याकडे दुर्लक्ष कराल. तुम्ही त्याचे व्यसन स्वीकारताना त्या त्या व्यसनाचे वाईटपणही स्वीकारता. क्लोरोफिलीया या एका डिसऑर्डरमध्ये तर माणसे हिरवीगार झाडी बघून उद्दीपित होतात. लुसलुशीत कोवळी मेथीची पाने पाहिल्यानंतर वा ताजा कोवळा सोललेला मटार पाहिल्यानंतर येणारी आनंदाची भावना दहापट वाढविल्यास, मग एखाद्या माणसाला झाडे बघून सेक्शुअल भावना येत असतील, तर त्यात त्याचा काय दोष? तो त्याचा स्वभाव आहे. समलैंगिकतेबद्दलही असेच काहीसे म्हणता येईल. एखाद्याला आपल्याच लिंगाच्या माणसाबद्दल आस्था वाटत असेल, आणि त्याच आस्थेला सूक्ष्म आकर्षणाने गुणून दहापट मोठे केले तर? कुणीही समलिंगी होऊ शकतो, जन्मापासूनच समलिंगी असू शकतो

प्रश्न समलैंगिकतेची वकिली करीत बसण्याचा नाहीच प्रयंक. पण सद्यःस्थितीतल्या सेक्समधल्या पाप समजल्या जाणाऱ्या गोष्टींची एकदा यादी करायला हवी. आपला मेंदू प्रगत झाल्यानंतर लोकांच्या सेक्स करण्यामध्ये नेहमीच काहीना काही विनोदी आणि विचित्र गोष्टी राहिल्या आहेत. याबद्दल मंडईत काकड्या विकणारे अधिक चांगले सांगू शकतील. तर आपल्याला फक्त एखाद्या संस्कृतीचा सुवर्णकाळ धरून त्यांच्या विचारस्वातंत्र्याच्या परमोच्च बिंदूवर त्यांचा सेक्स त्यांनी कसा रेकॉर्ड करून ठेवला, ते पाहायला हवे. म्हणजे कल्पना कर की, आणखी दोनेक हजार वर्षांनी तुझा माझा लॅपटॉप कुणाला सापडला आणि चालू करता आला तर त्यात सध्याच्या काळातले संगीत, व्हिज्युअल कला हे जसे पाहायला मिळेल, तसेच पोर्नही पाहायला मिळेल. त्यावरून तोही आजच्या काळाचा काहीतरी तर्क काढेल. सेक्सच्या नोंदी अशा सर्व काळासाठी नोंदल्या जात राहतात. पुढच्या लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी.

मला वाटते नवापूरच्या या हजारो वर्षांपूर्वीच्या छोट्या वास्तू आणि इमारती सेक्स आणि इतरही बऱ्याच कलांसाठी वाहिलेल्या आहेत. हे नेमके कशासाठी शोधायचे हे आपल्याला नशा केल्यानंतर माहिती असते; पण सकाळी नशा उतरून जाते आणि आपण आपल्या सध्याच्या वर्तमानकाळाच्या समाजाचे नियम आणि सुखाच्या संज्ञा जगायला लागतो. आपल्याला दोन वेगवेगळ्या वर्तमानकाळांमध्ये जगता आले तर काय मजा येईल? आयुष्य एकच असते. मेंदू आणि हृदयही एकच असते. हृदयाचे आणि मेंदूचे एकमेकांशी कोऑर्डिनेशन व्यवस्थित चालू राहणे म्हणजे जिवंत असणे. या एक गुणिले एकचे उत्तर मग एकच येते. अजून त्याला खूपशा एकने गुणत राहिले तरी आयुष्य एकच राहते. आपण सध्या हा 'एक'च काळ जगतो आहोत. रिसर्च आपल्या आपल्यापुरता जरी पूर्ण झाला तरी निदान आपल्या दोघांना किंवा मग भार्गवसहित आपल्या तिघांनाही असे 'दोन' काळ एकत्र जगणे शक्य राहील. मजा येईल.

बोलताना आलोप कधीकधी प्रचंड भावुक होऊन जाई. त्याचे शारीरिक वय तीस-पस्तीस... जे काही असेल; पण त्याचे

मानसिक वय कमीत कमी एक लाख वर्षे तरी जुने असावे. 'माकडाचा माणूस बनला हे वरदान की शाप?' हा त्याचा निबंधाचा विषय होता. त्याचे शाळेतल्या निबंधस्पर्धामध्ये असल्यासारखेच टायटल कधीकधी हशा निर्माण करी. आलोपला त्याच्या एकट्याच्या आयुष्याचा अर्थ शोधायचा नव्हता. त्याला सबंध मानवजातीच्या दुःखाचे रहस्यच शोधून काढायचे होते. सायंटिफिक गणिते आणि कॉग्निटिव्ह सायन्सची मदत घेत. विज्ञानाच्या अध्यात्माचे हजारो वर्षांचे व्यक्त, अव्यक्त समीकरण. आलोप कदाचित नवा धर्म बनवू पाहत होता, कदाचित गत काळातल्या धर्मांमधले सर्वोच्च कालबिंदू शोधून त्याची मीमांसा करू पाहत होता; पण याहीपेक्षा आलोप प्रयंक आणि भार्गवला एकत्र आणून कुठल्याशा युटोपियात राहण्याची स्वप्ने पाहत होता.

फाईल डाउनलोड झाली. प्रयंकने फोल्डर्स व्यवस्थित मूव्ह करून त्याचा थ्रीडी प्रोग्रॅम सुरू केला. त्यात ती फाईल खोलली. फाईल खोलल्यानंतर टु.डी.त दिसणारी ड्रॉइंग्ज बरीच दाट झालेली होती. त्यावर असंख्य ऑब्जेक्ट्स ॲड झाली होती. हे काय असू शकेल याची थोडीफार कल्पना प्रयंकला येत असताना त्याने 'प्लेस कॅमेरा' आयकॉन दाबला. पूर्वेकडून त्या पठाराचे थ्रीडी मॉडेल कॉम्प्युटरवर हळू हळू उमटायला लागले. पठाराच्या एका तटावरून ते नगर सुरू होत होते. एका भल्यामोठ्या दगडी प्रवेशद्वारातून आत गेल्यानंतर एक अरुंद वाट दुसऱ्या एका दरवाजातून पुढे गेल्यानंतर विस्तीर्ण होत होती. नगरात गेल्यानंतर सर्वप्रथम चबूतऱ्यावर एका उभ्या सिंहाचा पुतळा होता. या सिंहाच्या पुढच्या उजव्या पायाखाली एक गोल दगडी गोळा होता. सिंहाची प्लेसमेंट चहूबाजूंनी बरोबर दीड किलामीटर अंतर सोडून बनविण्यात आली होती. ही जागा एक भलामोठा चौक होता, ज्यात लोक निरनिराळ्या सार्वजनिक कामांसाठी एकत्र येत असावेत. जत्रा भरण्याचा परिसरही हाच असावा. त्या चौकाच्या चहूबाजूंनी वेढलेल्या भिंतीवर कलाकुसर होती, मशाली आणि दिवे ठेवण्यासाठी खोबणी होत्या, सर्वांत महत्त्वाचे चारही बाजूंनी चौकाकडे येणासाठी मध्यांतरावर सुंदर एकसारखे चार दरवाजे होते. या भव्यतेने गांगरून न जात प्रयंकने कर्सर सरळ पुढच्या दरवाज्यातून पास केला. इथून शहराची सुरवात होत होती. विटांची आखीव चौकोनी घरे एकामागून एक ओळीने रचून ठेवलेली होती. विटा अर्ध्याकच्च्या होत्या. कुठेही दगडाचा वापर केलेला नव्हता. कर्सर आणखी पुढे गेला तसे त्याला पुन्हा एक मोकळे पटांगण लागले. या पटांगणात बाजार भरत असे. सॅम्पलसाठी तिथे काही दुकाने बनवून ठेवलेली होती. या दुकानांमध्ये अर्थातच कपड्यांची, मसाल्याच्या पदार्थांची आणि अन्नपदार्थांची दुकाने होती. पुढे गेल्यानंतर उजवीकडे प्राण्यांची कत्तल करण्यासाठी केलेली एक वधशाळा होती. आजच्या काळातल्या एका मोठ्या गावच्या आठवडेबाजाराचे वाटावे असे एकूण चित्र होते. बाजाराच्या मध्यभागी एक मंदिर होते. प्रयंकने मंदिरावर कर्सर दाबून धरत त्याचे प्रवेशद्वार पुढे वळविले. गाभाऱ्यातून आत जाण्यासाठी डबलक्लिक केले. दुसऱ्या क्षणाला प्रयंकची नजर मंदिराच्या आत होती. तिथे भिंतीत एक स्त्री आपले दोनही हात खांद्याच्या रेषेत उंचावून कसलेसे अभिवादन स्वीकारत आहे, असे चित्रशिल्प होते. शिल्पाच्या स्तनांचा आणि कटीभागाचा आकार अत्यंत रेखीव असला तरी तो अवास्तव वाटत नव्हता. त्या शिल्पाच्या पायाशी दोन्ही बाजूंनी दोन घुबडे आणि एक मांजर होते. स्त्रीच्या अवयवांखेरीज त्या शिल्पाला पंखही दाखविण्यात आले होते. हे पंख जास्त मोठे नव्हते. त्यामुळे त्या पंखाचा अर्थ अर्थातच प्रतिकात्मक होता. प्रयंक राईटक्लिक दोनदा दाबून मंदिराच्या बाहेरच्या व्ह्यूमध्ये आला. सवयीने त्याला इतर दोन मंदिरे कुठे आहेत ते माहिती होते. त्याने लगोलाग तिकडे कर्सर नेऊन त्या मंदिरांचे बाह्यभाग पाहिले. दुसऱ्या मंदिरात एक समोर चेहरा असलेला पुरुष आणि एक पाठमोरी स्त्री समोरून प्रणयक्रीडा करीत असून, त्यांच्या शेजारी एक पुरुष उभा असल्याचे दाखविले होते. तिसऱ्या मंदिरात एक स्त्री जमिनीवर बसून, तिच्या उभ्या असलेल्या पुरुष साथीदाराच्या कमरेला विळखा घालीत आहे, असे दृष्य होते. यात त्या पुरुषाचे लिंग त्या स्त्रीच्या तोंडात होते.

अंदाजातल्या पाच मंदिरांपैकी सापडलेल्या तीन मंदिरांची सर्व डिटेल्स आलोपने थ्रीडीमध्ये उभी केली होती. महत्त्वाचे म्हणजे ही मंदिरे ज्या कल्पित नगरीचा भाग होता, ती नगरीही आलोपने उभी केली होती. यात वास्तवतेचा, ऐतिहासिक सत्याचा, ऐतिहासिक असत्याचा आणि इतर पुरातत्त्व संशोधकांनी केलेल्या संशोधनातील पुनर्वापर करता येईल अशा बऱ्याच इलेमेंटसचा समावेश होता. प्रयंकच्या समोर एक व्हिज्युअल परीकथा उभी होती. अशी परीकथा, जी फक्त फॅन्टसी नसून कधी काळी तशीन् तशी अस्तित्वात असण्याची शक्यता होती. एका अद्‌भुत आनंदाने प्रयंकचे शरीर थरथरायला लागले. न राहून तो जोरात ओरडला. 'फक्क या! वी डीड इट'

.........

'भेटायच्या स्पॉटवर मुलगी उशिराने येते. समजा मी तशी आले असते तर? केवळ माझी बाईक न्यायची म्हणून मी अगोदर आले. अरीत असे करू नको. प्लीज. दोन महिने झालेत आपण शहराच्या बाहेर गेलेलो नाही. माझा जीव घुसमटतोय रे सिटीत.' शाल्मली फोनवर बोलत होती.

'बेबी सेंटी मत मार बॉस अभी. मै बोला था प्रोजेक्ट का लफडा हो गया है. मै अभी तक ऑफीसमेही हुं. अब तेरा नेटवर्क का लफडा था तो मेरा क्या गलती? और नंबर पोर्ट करनेको किसने बोला था? आत्ता पोहोचलो तर गाडी चालवणे तर छोड; पण मागे बसलो तरी झोप येईल. मेरेको हॉस्पिटल लेके जानेसे अच्छा है आजका प्लॅन कॅन्सल कर देते है.' अरीत तिकडून म्हणाला.

'वेल, आय हेट यू फॉर दॅट. ट्रायपॉड कुणाकडे आहे? मै इतनी सुबह नया ट्रायपॉड नही ले सकती'

'म्हणजे? तू काय एकटीच जाणारेस? वेडावलीस का? अगं ते काही सापुतारा नाहीये. आणि एकटीच जाऊन काय करणार? आर यू जस्ट गिव्हिंग मी मोर गिल्ट?'

'गिल्ट गया भाड मे. मी एकटीच जाणार आणि तिथे एखादा आदिवासी बॉयफ्रेंड पाहून मजा पण करणार. आय ॲम शुअर दे विल लास्ट लॉंगर.'

'शाल्मली, माझ्याजवळ तुझ्या फालतू जोक्ससाठी वेळ नाहीये. आय हॅव टू गो. प्लीज एकटी जाऊ नकोस. मी कट करतोय. बाय'

फोन कट झाला. शाल्मली शहारातल्या बाहेरच्या रस्त्यावरच्या त्या चहाच्या टपरीत शांतपणे बसून राहिली. तिथे टपरीची मालक/चालक मध्यमवयीन बाई होती. वेळ पुढे सरकायला लागली तशी अजून येतीजाती गिऱ्हाईकं, आजूबाजूला काम करणारे किरकोळ वाटणारे पुरुष, एखाद दुसरा पेपरवाला यांची वर्दळ वाढू लागली. हा फरक शाल्मलीला टिपत राहणे आवश्यक वाटले. पिवळा रेसर टॉप आणि टाईट हॉटपॅंट घातलेल्या श्रीमंत वाटणाऱ्या मुलीला तसे काही ॲनालिसिस करणे भाग असावे. वेळ सकाळची साडेसहाची आहे. आठ-नऊ वाजता तिथे जनरल गर्दी राहिली असती, त्या जनरल गर्दीतल्या सगळ्या पुरुषांची नजर तिच्या सर्वांगावर फिरली असती, काहींची जरा जास्तच फिरली असती. ती स्वतःच असे शरीर उघडे ठेवतेय म्हटल्यानंतर गर्दीतल्या काहींना निर्लज्ज होण्याचा थेट अधिकार प्राप्त होतो. अरीत येणार नाही असे काही तिच्या डोक्यात शिरले नव्हते. शाल्मलीने अनेकांना डिच केलेय; पण ती कधी जास्त डिच झालेली नाही. तिच्या नव्या फोनकंपनीच्या ढिल्या कारभारामुळे शाल्मली कुठल्याशा एका टपरीवर सिगारेट पीत एकटीच बसलेली होती. अरीतला आपण एकटे जाण्याची खोटी धमकी दिली तर खरी; पण त्याचा काही उपयोग झाला नाही. शाल्मली तुटक्या बाकावरून उठली, चहा-सिगारेटचे पैसे देऊन तिने बाईकला सेल मारला. हेल्मेट घालून हाफ पॅंटवर सुसाट वेगाने जाणारी ती शाल्मली रस्त्यावरच्या इतर गाड्या हाकणाऱ्या लोकांना ॲडव्हर्टाईजमधले एखादे मॉडेल वाटत होती. अर्थात बदललेल्या परिघात दर किलोमीटरवर अशा एक-दोन तरी मॉडेल दिसतच असतात. शाल्मली वेगाने ड्राईव्ह करीत होती. आजूबाजूचा ट्रॅफिकही वेगात होता. असे असले तरी त्या वेगाला एक सुसंगती होती, दोन सर्कल्स पार केल्यानंतर शाल्मलीला ती सुसंगती पुन्हा जाणवली. बाईक वेगाने चालविताना वाजलेल्या थंडीने तिची स्तनाग्रे ताठर केली होती. गाडी चालविताना तिसरे सर्कल लागले तसे त्या सुसंगतीचा कानातला आवाज एकदमच तोडायचे ठरवून बाईक घराच्या दिशेकडे न नेता शाल्मलीने तिला उजवीकडे वळविले. दहा मिनिटे चालवून पुन्हा एकदा उजवीकडे, मग शहराच्या त्या सुसंगतीचा बोअरिंग पॅटर्न तोडून कुठल्याशा मध्यम आकाराच्या रस्त्यावरून शाल्मलीची बाईक वेगाने पुढे जात होती. वाटेत एक गंजलेली मोडकी साईन पास झाली. जवळजवळ पुसलेला 'न' आणि अर्धवट राहिलेला 'वा' अशा अक्षरांसह ती पाटी 'नवापूर १९ कि.मी.' असे दाखवीत होती.

'सिगारेट दे.' कारमध्ये लावलेला लायटर पुश करता करता आलोप प्रयंकला म्हणाला.

'सिगारेटी संपल्या रे सकाळी. वाटेत थांबतोय ना आपण?'

'ओके.' आलोपने लायटर पुन्हा पुश केले. तो मधल्या लेनमधून मध्यम वेगात गाडी चालवित राहिला.

'आयोवास्का कुठे मिळाली?' प्रयंकने प्रश्न केला

'कृतिका दार्जिलिंगला गेली होती, तिकडून आणली. बाकी तिकडे कॅम्पस जोरात चाललेत हा. गुरू लोकं दीक्षा देतात, शामीन बनून वगैरे; पण एकाजवळही ट्रॅडिशनल रेसिपी नाही. लोक रात्रभर तळमळत राहतात, वेड्यांसारखे ओरडत राहतात आणि शामीन लोक त्यांच्यावर झाडाचा पाला फिरवतात. ते फकीर लोक नाही का मोराच्या पिसांचा झाडू फिरवतात तसे'

'ट्रेंडय रे तो. च्यायला आपल्याला पण फसवलेच होते की पहिल्या-दुसऱ्यांदा.'

'मला रेसिपीचा शोध लागला नसता तर तुम्ही असेच पोपट बनून हिंडत राहिला असतात,'

'तुस्सी ग्रेट हो जहापनाह. तोहफा कबुल करो'

'ग्रेट आहेच भौ आपण. प्राचीन काळच्या सोमरसाचे पुनुरुज्जीवन केलेय. तुला सांगतो हा फॉर्म्युला लिक केला ना तर मी महान संशोधक म्हणून प्रसिद्ध होईन.'

'मग कर की'

'कसा काय कर? त्या दुसऱ्या दोन सालींचे नाव-गाव-पत्ता काहीच सापडले नाही. ते साधुमहाराज पण नंतर कधी भेटले नाहीत, स्टॉक अर्धा संपलाय.'

'अरे पण नंबर वगैरे घ्यायचा ना.'

'साधू लोकांना कुठून आलाय नंबर. शिवाय ही वल्ली वेगळी होती. इतके अस्खलीत इंग्लिश बोलणारा ब्राउन साधू तसा विरळच.'

'स्टॉक संपल्यावर काय?'

'ते संपल्यावर पाहू. आपण असेही सहा महिन्या-वर्षांतून कार्यक्रम करतोय. अजून दोन-तीन वर्षे मरण नाही'

'तोपर्यंत कुणीतरी सोमरस पण शोधून काढेल.'

'पळंय! म्हणे शोधून काढेल. खाऊ है का? .... बघ बर इथं आहेत का.' एक टपरी पाहून आलोपने गाडी थांबवली. प्रयंक बाहेर जाऊन त्या टपरीवरून सिगारेटचे पाकीट घेऊन आला.

'दोनच आहेत रे तिच्याकडे'

'शीट! आत्ता ही पेटव. पुढच्या पुढे पाहू.'

पुरेशा सिगारेट न मिळाल्याने आता नवापूरच्या आगोदर टर्न न घेता नवापूरमधून जाणे भाग होते. तिथेही त्यांच्या ब्रॅंडच्या

सिगारेटस मिळतील याची कुठलीही शाश्वती नव्हती. आलोपने गाडी डावीकडे वळविली. पुढे आलेल्या फाट्यावर थोडे पुढे गेल्यानंतर गाडीला खराब रस्त्याचे धक्के बसायला लागले. नवापूर आता बारा किलोमीटर होते.

नवापूर आता चार किलामीटरवर होते. सिगारेटचा प्रश्न अजूनही सुटलेला नव्हता. गाडी पुढे जात असताना  डोंगरांकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला एक टपरीवजा हॉटेल होते. आलोपने गाडी टपरीसमोर लावली. दोघेही गाडीतून उतरून परिसराचे सर्वेक्षण करू लागले. उजवीकडे दूर शेतीपलीकडे थोड्या अंतरावर एक टेकडी आणि वाईड लेन्समध्ये सुंदर दिसावा इतका मोकळा परिसर होता. आलोप टपरीवर गेला. तिथल्या बाकावर एक शहरातली तरुण मुलगी प्रोफेशनल कॅमेऱ्याची लेन्स साफ करीत बसलेली होती. मुलीचा पेहराव आधुनिक होता. उच्चभ्रू श्रीमंत बापाच्या पोरांच्या महागड्या बाईक्सवर मागे बसून जंगलांच्या रस्त्यात टाईमपास करणाऱ्या मुलीचे सगळे गुण त्या मुलीत असावेत, असे आलोपला दिसत होते. शिवाय तशी एक महागडी बाईकही बाजूलाच पार्क केलेली होती. तिचा हिरो लघवी करायला गेलेला असावा, असा अंदाज करीत आलोपने एकूण दृश्याकडे तीन सेकंदांत दुर्लक्ष केले.

'लाईट्स है का बाबा?'

'व्हाेय. किती पायजे?'

'केवढ्याला?'

'वीस रुपये'

म्हातारा सिगारेटचे डबल पैसे घेतोय, हे आलोपला कळले होते. म्हाताराही या आडरानात त्याचा ब्रँड त्याला देऊ करतोय म्हणून चेहऱ्यावर भाव वरचढीचे ठेवून होता.

'एक पाकीट द्या आणि दोन सुट्ट्या पण द्या. पाकिटाचे काही कमी नई व्हायचे का?'

'सुट्ट्या एवढ्या चारच हैत माह्याकडं. पाकीट व्हतं ते त्या ताईंना दिलं' मुलीकडे निर्देश करीत म्हातारा म्हणाला.

'बरं द्या, चार द्या'

एव्हाना दूर लघवी करून प्रयंक तिथे पोहोचला होता. म्हाताऱ्याने दिलेल्या चार सिगारेटच्या पाकिटातली एक सिगारेट घेऊन तिच्यावर तो टिचक्या द्यायला लागला.

'आलोप. सिगारेट जुनाट झालीये.'

'बाबा सिगरेट सादळल्यागत वाटतीये'

'इथं चार म्हैन्यानी एक गिऱ्हाईक है बाबा हो. एवढ्याच शिगरेटी हैत. होत्या त्या दिल्या'

'अरे यार सील्ड पॅकेट था; पर वो मोहतरमा ने लिया है.' आलोपने प्रयंकला माहिती पुरवली. आलोपला त्या मुलीशी काही बोलावे हे प्रशस्त वाटेना. शिवाय लघवीसाठी गेलेल्या आणि अजून न परतलेल्या, न पाहिलेल्या तिच्या शहरी हीरोबद्दल आलोपच्या मनात आगोदरच तिरस्कार निर्माण झाला होता. माणसांविषयीचे पूर्वग्रह आणि स्वभावविशेष आलोपच्या डोक्यात आगोदरच तयार असतात. भेटणाऱ्या प्रत्येक नव्या माणसाशी तो जुजबी संभाषण साधून त्यांची दोन मिनिटांत  आपल्या पूर्वग्रहांमध्ये प्रतवारी करून मोकळा होतो. आलोप माणूसघाणा आहे असे म्हणता येईल; पण सुरुवातीच्या संभाषणात प्रतवारी न झाल्यास कित्येकदा तो विचित्र माणसांबरोबर आपुलकीचे संवादही साधतो. आयोवास्काच्या रेसिपीमधल्या दहा-बारा वनस्पतींपैकी काही दुर्मीळ वनस्पती त्याने याच संभाषणकलेने मिळविल्या आहेत. त्या तरुणीचा हीरो परतून आल्यानंतर कदाचित त्याला विचारून अर्धे पाकीट घे, असे त्याला वाटले. पण तो त्याच्याशी बोलेलच याची खात्री नव्हती. विचार करता करता तो प्रयंकला म्हणाला,

'विड्या घेऊ यात की मस्त कडक!'

'अरे पण जॉईंटस?'

हे संभाषण खासगी असले तरी त्याचा आवाज सार्वजनिक मोठा होता. त्या तरुणीला प्रयंक आणि आलोपच्या सिगारेटीचा प्रश्न बराचसा कळला होता. जॉइंट म्हणजे गांजा टाकलेली सिगारेट, हे तिला तिच्या व्यापक अनुभवातून माहिती होते. प्रयंक थोडा वेळ थांबला आणि त्याने मोर्चा त्या सुंदर मुलीकडे वळवला. सुंदर हे विशेषण प्रयंक लगेच पकडू शकतो. त्याच्या सौंदर्याच्या मापदंडात अर्थात रंग, चेहरा, दात, केस, फिगर, हाताची नखे व्यवस्थित फाईल केलेला, असे काही क्रायटेरियाज आहेत. तसे अवघड, तसे सोपे. पटकन सुंदर कॅटेगरीत वर्गवारी झालेल्या त्या मुलीशी काय बोलायचे हे प्रयंकला ठाऊक असावे.

'हे, हाय! मायसेल्फ प्रयंक.'

'ओ, हाय!'

'हाय!'

'हाउ डु यू डु?'

'नॉर्मल'

ती तरुणी फाईन, गुड, वा ग्रेट असे न म्हणता 'नॉर्मल' म्हटल्यानंतर चटकन ओल्ड हिप्पी प्रोटोकॉल जमून आला. जगातल्या कानाकोपऱ्यात फिरताना हाउ डु यू डु? चे उत्तर 'नॉर्मल' असे देणाऱ्यांची एक वेगळी जमात आहे. अननोन प्लेसेसला फिरणारी, जिवावर बेतणारे ॲडव्हेंचर्स करणारी आणि जगात कुठेही जाऊन 'बनाना पॅनकेक्स' खाणारी.

'ट्रेकिंग?' प्रयंकने संभाषण पुढे सरकवले.

'अम्म्म! नॉट शुअर. ॲक्चुअली माय पार्टनर हॅज डिच मी. इथे फोटोज काढते थोडे; ॲन्ड देन विल रिटर्न बॅक'

'मराठी?'

'व्हय सायेब' त्या मुलीने पहिला फ्रेंडली जोक क्रॅक केला.

'वेल आम्हाला सिगारेट पाहिजे होत्या.'

तिने सिगारेटचे पाकीट खोलून प्रयंकसमोर धरले.

'आत्ता लगेच प्यायची नाहीये. ॲक्चुअली पाकीट विकत हवेय'

यू गॉट विड, या?'

'येस! होप यू डोंट अरेस्ट अस फॉर दॅट' अलोप गमतीने ओशाळल्यासारखे करून म्हणाला.

'नाही. हियर.... हॅव इट' त्या मुलीने पूर्ण पाकीट प्रयंकला देऊ केले.

'थँक्स अ लॉट' म्हणत प्रयंकने खिशातून पाचशे रुपयांची नोट काढून तिला देऊ केली.

'डोन्ट प्ले दॅट. किप इट बॅक. तुम्हीपण ट्रेकला चाललायेत की नवापूरच्या धरणावर?'

'नाही. आम्ही मागच्या साईडला चाललोय. यू नो दोज टेम्पल्स?'

'ओ ती मंदिरं ना? मी पाह्यलीयेत. म्हणजे तिथे नुस्तीच दगडंयेत. नॉट व्हेरी इंटरेस्टिंग. इट्स जस्ट ॲन एम्प्टी टेंपल्स'

'हाऊ अबाउट धिस?' प्रयंकने ड्रॉइंगमधल्या काही सेव्ह केलेल्या जेपीजी फोनवर उघडून तिच्यासमोर धरल्या. तिने फोन सावकाश स्क्रॉल करायला सुरवात केली. दोन-एक मिनिटांनंतर वर पाहत तिने औपचारिक आदराने विचारले.

'तुम्ही लोक कोण आहात?'

'मी प्रयंक. हा आलोप. ॲक्चुअली आलोप आर्किओलॉजिस्ट आहे. नॉट स्पेसिफिकल; बट ही क्लोज अ लॉट. सो द थिंग इज, तिकडे अजून काही मंदिरं आहेत. आम्ही शोधायला चाललोय. धिस इज जस्ट अ पिक्चर ऑफ हाऊ थिंग्ज मस्ट हॅव बीन इन दॅट टाइम'

'इंटरेस्टिंग आहे हां. ....कॅन आय जॉईन यू गाईज?'

या प्रश्नानंतर प्रयंकने आलोपकडे पाहिले. आलोप प्रयंकला परवानगी देण्याऐवजी संभाषणात आला.

'ॲक्चुअली आम्ही कॅम्पिंग करणार आहोत. आल्सो इटस नॉट अ व्हेरी सेफ प्लेस'

'हाय. आय ॲम शाल्मली.' आलोपच्या बोलण्याच्या अर्थाकडे दुर्लक्ष करीत ती तरुणी म्हणाली.

'शामली?'

'शा ल्म ली'

'ओके नाईस नेम. पण आम्ही ट्रेकसारखे जात नाहीये. तिथे थांबावे लागेल. वि वोन्ट बी एबल टु ड्रॉप यू. तू हवं तर बाईकने फॉलो कर; पण संध्याकाळी एकटेच यावे लागेल.'

'मी अशीही एकटीच आले इथवर. सो डोंट वरी. मे बी वि कॅन किप द कार हियर ॲन्ड ऑल टेक माय बाईक?'

तिचा प्रस्ताव तिच्या मते चांगला होता. बाईकवर ट्रिपलसीट गेल्यास दोघांमधल्या एकाला तिचा शारीरिक स्पर्श मिळण्याची शक्यता पाहता, पुढचे सगळे सहजच जुळून यायला हवे, असे तिला वाटले.

'ॲज आय सेड वी आर कॅम्पिंग देअर. लॉट ऑफ स्टफ इन कार'

तिने पुन्हा एकदा प्रयंकच्या फोनमध्ये पाहत विचार सुरू केला. डोक्याने कॅम्पिंगचे चित्र रंगविणे सुरू केले. दोन अज्ञात पुरुषांबरोबर एक स्त्री या समीकरणातल्या निरनिराळ्या रिस्क तिच्या डोक्यात येत होत्या. तिचा आगोदरचा ग्रुप कॅम्पिंगचा अनुभव बराच मोठा होता. पण ते पैसे भरून घडवून आणलेले प्लॅन्ड कॅम्पिंग, एखाद्या रिसॉर्टच्या जवळ. हे दोन पुरुष इंटरेस्टिंग होते. या कँपमध्ये थ्रिल होते. शाल्मली कन्सेंटबद्दल काहीतरी जुळवाजुळव करीत राहिली. बलात्काराच्या शक्यता होत्या, त्याहूनही जास्त खून होण्याच्या शक्यताही होत्या. तिने प्रयंककडे पाहिले. प्रयंकचा सिव्हिलायझेशन स्कोर बराच जास्त वाटला. हे दोघेही सिरियस वाटत होते. डोक्यात तयार झालेल्या संशयाच्या हजार शक्यता सेकंदाला शंभर या वेगाने मावळू लागल्या. तिने प्रयंककडे वर बघेपर्यंत तिचा त्यांच्याबरोबर जाण्याचा निर्णय जवळजवळ पक्का झाला होता.

'इज धिस थिंग वॉर्थ डाइंग?' तिने प्रयंकला फोन परत देताना त्या फोनकडे पाहत दोघांनाही विचारले.

'इट्स वॉर्थ लिव्हिंग,' प्रयंक म्हणाला. 'अल्सो डोंट वरी..... वि वोन्ट रेप यू.' प्रयंकचा हा टोकाचा विनोद रियालिटी म्हणूनही घेण्यासारखा होता.

'सो लेट्स गो?' शाल्मली म्हणाली.

'कुछ खा लेते है ना पहले. बाबा खायला काही मिळेल का?'

'बटाट्याचे भजे काढून देतो. संग ब्रेड है'

बाबाने भजी काढायला घेतली. पोटभर गरम गरम भजी-पाव आणि त्यावर दोन ग्लास चहा पिऊन ते तिघे डोंगराकडे निघाले. सिगारेटी मिळाल्याने आता नवापूरला जायची गरज नव्हती. आलोपने जवळजवळ उखडलेल्या ओबडधोबड रस्त्यावरनं गाडी पुढे घेतली. ती टपरी अद्यापही आरशात दिसत होती. तो टपरीवरचा माणूस लास्ट कॉंटॅक्ट, इथून पुढे माणूस भेटणे तसे अवघडच.

पायथ्याला कार लावून नंतर डोंगरावर पोहोचून त्या तिघांना आता दोन तासांहून जास्त वेळ झाला होता. कँपसाठी मोकळ्या जागा भरपूर होत्या; तरीही नेमका इथेच टेंट लावावा यावर काही एकमत नव्हते. मार्च बराचसा उलटून गेलेला असला तरी या भागात रात्री तापमान बरेच कमी होऊ शकत होते. कँपफायरसाठी आणि बाकी गरजांसाठी म्हणून जमेल तेवढी लाकडं प्रयंकने जमवून ठेवली. आलोपने इतर वस्तू हाताशी येतील या बेताने कारमध्येच अनपॅक करून ठेवल्या. एव्हाना तिघांची एक एक स्वतंत्र सिगारेट पिऊन झाली होती. अजून थोड्या वेळाने आलोपने स्वतःसाठी पेटविलेली सिगारेट शाल्मलीने मागून दोन-तीन झुरके

घेतले, सहजच प्रयंककडे पास केली आणि आणखी दोन राउंडमध्ये तिघांनी चौथी सिगारेटदेखील फिल्टरपर्यंत नेऊन पोहोचवली. जळत्या सिगारेटबरोबर त्यांच्यातले अंतर कमी होत होते. मी पुरुष आहे हे प्रयंकच्या आता खास लक्षात नव्हते; मी स्त्री आहे हे शाल्मलीच्या खास लक्षात नव्हते; आपण कोणी आहोत हे आलोपच्या तर अजिबातच लक्षात नव्हते.

थोडा वेळ गोष्टींची जुळवाजुळव करून आलोप शांत बसला; मग कुठल्याशा निर्धाराने उठला आणि चालू लागला. शाल्मलीने तिच्या कॅमेऱ्याच्या लेन्सवर हूड चढविले आणि प्रयंकने आपल्या शूजच्या लेसेस टाईट केल्या. त्या दोघांनी एका अलिखित नियमाने आलोपच्या मागे चालायला सुरुवात केली. आगोदर ज्ञात असलेल्या तीन मंदिरांचाच व्यवस्थित अभ्यास करायचे ठरले होते; पण त्याही अगोदर आलोपने मागे अर्धवट सोडलेल्या वाटांचे नीट निरीक्षण होणे आवश्यक होते. तिघे उत्तरेकडे थोडा वेळ चालत राहिले. झाडी वाढायला लागली, वाट सरळ न राहता काही वेळा थोडे उंचवटे चढून, तर काही वेळा खोलात उतरून चढावे लागत होते. फोटो घेताना एव्हाना शाल्मलीच्या उघड्या मांड्यांना बरेचसे काटे आणि कीटकांनी भेट दिली होती. तिचा बॉयफ्रेंडबरोबरचा वाईल्ड हॉट रोमँटीक आउटफिट या खऱ्याखुऱ्या वाईल्ड एरियात प्रचंड गैरसोयीचा ठरत होता. आलोप तसाही अलिप्तच चालत होता; पण प्रयंकलाही तिचे सौंदर्य वा तिच्या सौंदर्यावर येणाऱ्या ओरखड्याशी तसे काही घेणेदेणे असल्यासारखे वाटत नव्हते. जंगलात एकाच प्रजातीचे तीन जीव एकमेकांना जितके सहकार्य करतील तितके सहकार्य तिथे होते. जितकी प्रायव्हसी असेल किंवा मग जितके दुर्लक्ष असेल तितके दुर्लक्ष तिथे होते. या घडीला शाल्मलीला त्या दोघांचा आधार होता आणि जंगलाकडून भीती. इथे येण्याच्या निर्णयात तिने स्त्री-पुरुष संबंधावर विचार करण्यापेक्षा धोक्यांवर विचार केला असता तर जास्त चांगले झाले असते, असे आता तिला वाटायला लागले. फोटोग्राफ घेण्याच्या संधी तर भरपूर होत्या; पण लेन्समधून जे दिसत होते, तशा प्रकारचे फोटो तिथे अतिमेहनत न घेता बरेच घेतलेले होते. कुठलाही स्पेशल फोटोग्राफ मिळण्याची शक्यता इथे नव्हती. ते तिघे फोटोग्राफीच्या हिशेबाने चालत नव्हते, तर काहीतरी शोधण्याच्या हिशेबाने चालत होते. प्रयंकच्या फोनवर पाहिलेले ड्रॉइंग शाल्मलीला आवडले तर होते; पण त्याची व्हॅलिडिटी किती, हा नवा प्रश्न तिच्या डोक्यात रुंजी घालू लागला.

विचार करताना आपण भरकटलो आहोत हे शाल्मलीच्या अजून लक्षात आलेले नव्हते. आलोप आणि प्रयंकही एकमेकांपासून भरकटलेलेच होते; पण त्यांचे बाँडिंग म्हणा किंवा अजून काही स्वर्गीय नाते म्हणा- त्यांना भरकटणे कधी जाणवायचेच नाही. हरवल्यासारखे वाटावे, तोवर दुसऱ्याच क्षणी ते एकमेकांसमोर असायचे. त्यामुळे संशोधन करताना वेगवेगळे पॅरामीटर वाटून घेत एकाच जागेत वेगवेगळ्या मार्गांनी जाऊन रस्ते शोधणे दोघांना शक्य व्हायचे. शाल्मलीचे तसे नव्हते. तिला भरकटून दहा मिनिटे झाली होती आणि एक न समजलेला, चुकीचा अंदाज घेत घेत ती चालत होती. मग पुढे एक छोटेसे तळे लागले. तळ्यात तरंगणाऱ्या पानांच्या काही वनस्पती होत्या. कमळ वगैरे काही नव्हते; पण जंगलातल्या प्राकृतिकरीत्या साचलेल्या तळ्यांमध्ये जे काही म्हणून असायला हवे ते सगळे होते. स्वच्छ पाणी, लक्ष लगेच वेधून घेणारा एखाद-दुसरा नाजूक पाणसाप, करंगळीएवढे मासे आणि तळाशी हिरवट शेवाळाचे थर साठलेले मोठमोठे दगड. काही दगडांचा आकार विचित्र होता- नैसर्गिक न वाटणारा. शाल्मलीला ते तळे पाहून बराच जास्त आनंद झाला. पूर्ण हरवून जाण्यासाठी तिने कॅमेरा डोळ्याला लावला आणि वेगाने फोटो घेणे सुरू केले. मनासारखे फोटो काढण्याचे काम पूर्ण सहा मिनिटे चालले. सातव्या मिनिटाला- अर्थातच इतर गोष्टींची जाणीव आठवून शाल्मलीने आजूबाजूला पाहिले. दुसऱ्याच क्षणाला काळजात चर्र होऊन आपण कदाचित भरकटलो आहोत, याची तिला जाणीव झाली.

'प्रयंक!'

तिने सावकाश आवाजात हाक मारली. त्या हाकेला अर्थातच प्रतिसाद मिळाला नाही. तळ्याभोवतीचे अडथळे पाहता, पुढे जाण्याचा मार्ग तसा सोपा नव्हता. त्यामुळे प्रयंक आणि आलोप या वाटेने पुढे जाण्याची शक्यता नव्हती. भीती शक्य तेवढी कमी करून शाल्मलीने आलोय त्या मार्गाने परतायचे ठरविले. ती ज्या मार्गाने आली होती, त्यावर लक्षात ठेवण्यासारखी विशेष काहीच नव्हते. सर्व बाजूंना दाट झाडी होती; पण पायाखाली खडकांची एक व्हिजिबिलिटी स्पष्ट पुढे जात होती. शाल्मली दगडांचा पॅटर्न आठवण्याचा प्रयत्न करीत तिच्या कल्पनेतल्या परतीच्या रस्त्याने निघाली. चालता चालता मग थोड्या वेळानंतर पायाखालच्या खडकांचा एक पॅटर्न बनला. ते खडक एखाद्या रस्त्याचा भाग आहेत असे वाटायला लागले. थोडा वेळ चालल्यानंतर तो काल्पनिक रस्ता एखाद्या खेड्यातला मुख्य रस्ता असावा इतपत सोयीस्कर वाटायला लागला. न राहून शाल्मलीने जोरात आवाज दिला.

'प्रयंक! आलोप! हॅलो!'

प्रयंक आणि आलोप शाल्मलीपासून फक्त तीनशे मीटर लांब होते; पण काटकोनात चालत असल्याने त्या दोघांचे अंतर शाल्मलीपासून लवकरच पाचशे मीटर इतके वाढले. शाल्मलीकडे आता दोन पर्याय होते- एक आहे तिथेच थांबून त्या दोघांतला कुणी येतोय का याची वाट पाहणे, किंवा मग या नव्या रस्त्यावर चालत राहणे. भीती आता वाढत चालली होती. मुख्य मार्ग सोडून तिने आडबाजूला पाहण्याचा प्रयत्न केला. त्या दोघांचा मागमूस दिसेना म्हणून मग पुन्हा ती त्या मुख्य मार्गावर आली. असे एकूण तीन वेळा करून पाहिले तरीही काही उपयोग झाला नाही. मग ती सरळ झपझप चालायला लागली. तिचे शरीर आता भीतीने

थरथरायला लागले होते. एखाद्या ड्रगची नशा केल्यानंतर वाटणारी सगळी भीती तिला वाटायला लागली. तिने आपला एक हात छातीवर डाव्या बाजूला ठेवून आपल्या हृदयाचे ठोके जाणवून घेण्याचा प्रयत्न केला. तिला लहानपणी शाळेच्या कंपाउंडमधली घसरगुंडी, एकदा झोक्यावरून पडल्याने फुटलेला गुढघा आणि दहावीला असताना खाल्लेले साखरफुटाणे अशा असंगत आठवणी येऊ लागल्या. एका विचित्र भीतीने ती नखशिखान्त हलू लागली. तितक्यात डोळ्यांभोवती अंधारी येण्याच्या शक्यतेअगोदर तिला कसलासा कपडा झुडपांमध्ये दिसला. तिथे आलोप आरामात लघवी करीत होता. शाल्मलीला पाहून त्याने सहजवेगाने तोंड दुसरीकडे फिरविले.

'यू ओके?' पँटची झिप लावत आलोप बोलला.

'फक्क!'

'काय झाले?'

उत्तरादाखल शाल्मलीने बोलण्यासाठी तोंड उघडले पण तिच्या तोंडातून शब्द बाहेर पडेना. थरथरल्या ओठांनी ती आलोपकडे पाहत होती. काय बोलावे सुचत नव्हते. आजूबाजूला नजर गेली आणि मग उजवीकडे पाहिले तर तिला झाडांच्या पलीकडे उभारलेला टेंट दिसला. भीती वेगाने ओसरू लागली. त्या टेंटकडे पाहीपर्यंत तिचा श्वासही बराचसा आटोक्यात येण्यास सुरवात झाली. अजून थोडा वेळ गेला तशी तिला जाणीव झाली, ती बेसपाशी पोहोचली होती- पूर्णतः नव्या रस्त्याने.

प्रयंकने प्यायला पाणी दिल्यानंतर शाल्मली बरीचशी शांत झाली. आलोपच्या हातातून पेटती सिगारेट घेऊन दोन-तीन पफ घेतल्यानंतर तिला अजूनच हुशारी आली. तिच्या वाट चुकण्याची कथा मोठी असणार होती; पण प्रयंक वा आलोपला ती ऐकण्यात जास्त इंटरेस्ट नव्हता. ती तासभर हरवली होती आणि परत सापडली, इतकी माहिती त्यांना पुरेशी होती. सापडली नसती तर मात्र अडचण झाली असती. अर्थात त्यांना तिला शोधून काढणे फार अवघड गेले असते असे नाही; पण ते तितके सोपेही नव्हते. याहूनही महत्त्वाचे म्हणजे- ते दोघे शाल्मलीबरोबर लपाछपी खेळायला आलेले नव्हते. थोडा वेळ शांत बसल्यानंतर आलोपचे लक्ष शाल्मलीच्या एकूण विस्कटलेल्या अवताराकडे गेले. तिचा टॉप धुळीने मळला होता, हॉटपँटला काही होण्याइतपत तिची साईज मोठी नव्हती; पण शाल्मलीच्या उरलेल्या उघड्या त्वचेवरचे पांढरे ओरखडे जाऊन त्यांची एकूण खोली जाणवत होती. आलोपने फर्स्ट एडमधून शाल्मलीला डेटॉल आणि कापूस देऊ केला. तो शांतपणे जखमांवर लावत असताना खाली बघत बघतच शाल्मली बोलली.

'त्या तिथं एक तळं आहे.'

'कुठे?'

'मी मघाशी रस्ता चुकले होते तिथं'

'काही विशेष दिसलं का?'

'नाही. म्हणजे विशेष वाटत नाही. कॅममध्ये फोटो आहेत.'

थोड्याफार कुतूहलाने आलोपने कॅमेऱ्याचे प्ले बटन दाबून फोटो पाहायला सुरुवात केली. पाना-फुलांचे काही फोटो गेल्यानंतर त्याला त्या तळ्याच्या पाण्याचा पहिला फोटो दिसला. संथ, एकसमान खोलीचा आणि बांधीव असण्याची शक्यता असणारा. कुतूहलाने मग तो एका मागोमाग एक फोटो पाहू लागला. त्या फोटोजमधून त्याच्या डोक्यात एक चित्र तयार होऊ लागले. कॅमेरा तसाच ऑन ठेवून त्याने प्रयंककडे फोन मागितला. फोनमध्ये असणाऱ्या काही ड्रॉइंगच्या स्क्रिनशॉटशी तो फोटोतले काही इलेमेंट्स पडताळून पाहत होता. फार काही क्ल्यू लागला नाही; पण आता त्याला ते तळे पाहणे आवश्यक वाटू लागले. एरवी फक्त फिरताना पाहण्याइतके ते तळे इंटरेस्टिंग होतेच, शिवाय त्याची एकसमान खोली आणि दगडांचा आकार पाहता, कदाचित तिथे पुढचा क्ल्यू असण्याची थोडीफार शक्यताही होती. आलोपने कॅमेरा बंद करून बॅगेत नीट ठेवला. फोन लॉक करून प्रयंककडे परत दिला; आणि शाल्मलीकडे पाहत म्हणाला,

'तू आत्ता जिथून बाहेर पडली त्याच्या आजूबाजूला काय होते?'

'म्हणजे?'

'आय मीन तू त्या साईडने डोंगराकडून उतरून आलीस का?'

'नाही रे. सरळ रस्ताच होता. म्हणजे झुडपं होती मध्ये मध्ये; पण एक सरळ दगड असल्यासारखे वाटले. मध्येच मोठे झाड पण होते.'

तिच्या शाब्दिक दारिद्र्याची आलोपला चीड आली; पण काहीतरी शब्दांचा- संवादाचा निरनिराळ्या मार्गांनी अर्थ काढणे आता शक्य होते. तो सरळ रस्ता असण्याची शक्यता तशी फार कमी होती. जंगलातल्या अत्यंत कठीण दगडावरही हजार-दोन हजार वर्षांत माती बनून झाडे उगवून येतीलच, अर्थात जमिनीची धूप होतांना अध्येमध्ये ते दगड पुन्हा उघडे पडू शकतात; पण एखाद्याला पूर्ण रस्ताच जाणवावा, हे कधीच शक्य नव्हते. शाल्मलीने कारमध्ये प्रयंककडून ऐकलेल्या माहितीची तिच्या सध्याच्या कथानकात सरमिसळ होत असावी. लॅपटॉप कारमध्येच ठेवलेला असल्याने, खालपर्यंत चालत जाऊन तो कारमधून घेऊन येणे आलोपला गरजेचे वाटू लागले. दरम्यान शाल्मली आणि प्रयंक बरेचसे कम्फर्टेबल झाले होते. शाल्मलीचे कँप सोडून परत जाण्याचे कन्फ्यूजन कधीही सुरू होण्याची शक्यता होती. पण तिने आलोपचा मूड पाहून बोलण्याचे ठरविले. थर्मासमधला चहा आणि दोन बिस्किटं खाऊन झाल्यानंतर पुढचा प्रश्न जेवणाचा होता. आलोपने एव्हाना तिथे दगडांभोवती चूल मांडून त्यावर पाणी उकळायला ठेवले होते. त्या जाळापाशी बसून आलोप कसलासा विचार करीत बसला, तोपर्यंत प्रयंक बोलला.

'क्या करनेका? खानेसे पहले एक राउंड हो जाये?'

'हो. तेवढ्यासाठीच तर आलायेस तू. ॲसहोल.'

'बनवतोयेस?'

'हो. मी आत्ता घेणार नाही. तुला सपोर्ट करीन. शाल्मलीला विचार'

'काय?' शाल्मली बोलली.

'आयोवास्का' प्रयंक उत्तरला.

'व्हॉट इज दॅट'

'चहा असतो. कडू लागतो. चक्कर वगैरे येतात. किक बसते; पण पंधरा-वीस मिनिटेच'

'जेवणाचे काय?'

'जेवण आलोप बनवतोय. ॲक्च्युअली पॅकेज्ड फूड गरम करतोय. पनीर-पालक, बिर्याणी आणि खीर.'

'हँगओव्हर येतो का?'

'अजिबात नाही. पण नशाच हँगओव्हर असल्यासारखी वाटते'

'विल आय डाय?'

'येस यू विल. अँड वी विल बरी यू हिअर; समाधी पण बांधू तुझी.'

'गुड. देन गिव्ह मी सम ऑफ दॅट'

आलोपने आत्ताच तोडून आणलेल्या कुठल्याशा डहाळीची ताजी पाने खुडून एका प्लॅस्टिकच्या पिशवीत घेतली. मग सॅकमधून आदराने दालचिनीचे मोठे तुकडे वाटावेत अशा कसल्याशा साली काढल्या. याशिवाय त्याच्याकडे कसलासा काथ्याही होता. तोही घेतला. अगोदर त्याने काथ्या पाण्यात टाकला, मग दोनेक मिनिटांनी उरलेल्या साली आणि सगळ्यात शेवटी तो हिरवा पाला. त्यानंतर बराच वेळ तो काढा हलवत राहिला. मग त्यावर झाकण ठेवून तो प्रयंक आणि शाल्मलीजवळ येऊन बसला.

'रेडी गाईज?'

'येस सर.' प्रयंक बोलला

'ह्म' शाल्मली बोलली

'डोंट वरी. आय विल बी हिअर.' आलोप बोलला.

ओके. टेक पोझिशन्स. भांड्याकडे जात आलोप बोलला. प्रयंक गुडघ्यावर नमन करतो आहे अशा पोझिशनमध्ये बसला. त्याचे पाहून शाल्मलीही तशीच बसली. आलोपने भांड्यातला काढा दोन मातीच्या वाडग्यांमध्ये ओतला. तपकिरी खिरीसारखा तो घट्ट द्रव अजून बराच गरम होता. ती वाडगी त्याने दोघांजवळ दिली. मग शांतपणे बोलू लागला,

'शाल्मली, ही तुझी पहिली वेळ आहे. तू नशा करते आहेस असे काही वाटत असेल तर ते मनातून काढून टाक. तुला नशा येणार नाहीये. तू एक प्राचीन औषध पितेयस. प्यायल्यानंतर काय होईल हे शब्दांत सांगता येत नाही; पण दुःख ॲम्प्लिफाय होत नाही, कसला आनंदही होत नाही. आनंदाच्या आणि दुःखाच्याही पलीकडे काहीतरी आहे. काय आहे ते शब्दांत सांगता येणे शक्य नाही. ते फक्त अनुभवता येईल. अनुभव काही काळ राहील. किती मिनिटे की तास हे मी तुला सांगू इच्छित नाही. गणिताच्या तर्काच्या पलीकडे एक मोठे विश्व आहे. कसे आहे, काय आहे ते दिसणे ज्याच्या त्याच्या नशिबाचा भाग. मी तुला घाबरवू इच्छित नाही; पण तुला हवे तेवढे घाबरून घे. डोक्यात हजार शंका असतील तर त्याही चालू देत. शांत मनन वगैरे करण्याची काहीएक आवश्यकता नाही. घोट-दोन घोटांनंतर तू आपोआपच स्थिर होशील. तरीही जमत असेल तर चित्त शांत करून घे.

योगाच्या अभ्यासामुळे शाल्मलीला चित्त शांत करणे शक्य होते. ती हळूहळू ब्लँक होऊ लागली. एका क्षणाला तिला कुठलीही शंका उरलेली नव्हती. आलोपने कुठलेसे शब्द म्हणायला सुरुवात केली. ते शब्द असण्यापेक्षा निरनिराळे आवाज होते. त्यानंतर त्याने प्रयंक आणि शाल्मलीला वाडगे तोंडास लावायला सांगितले. याचबरोबर त्याने जवळ असलेले जुने दहा पैशांचे नाणे काढून दात आणि ओठ यांच्यामध्ये धरले. त्यातून कुठलासा 'म्चू म्चू' असा आवाज काढायला लागला. शाल्मलीने वाडगा तोंडाशी लावला. तिला इथे कुठलीही चव अपेक्षित नव्हती; पण तो काढा फारच विचित्र चवीचा होता; तो कडू नव्हता. त्याला कसल्याशा मातीचा आणि दिवाळीतल्या उटण्याला असतो तसा मातकट वास येत होता. सुंगध की दुर्गंध हे शाल्मलीला लगेच सांगता येणे शक्य नव्हते. पण जसजसा तो वाडग्यातला द्रव संपायला लागला, तसतशी त्याची चव अधिकाधिक मातकट होत गेली. इतकी की ती थेट माती खातेय असे तिला वाटायला लागले.

दोन मिनिटे गेली असावीत आणि शाल्मली जमिनीवर उकीडवी बसून आता खरीखुरी माती खाण्याचा प्रयत्न करीत होती. हे प्रयत्न काही मिनिटे चालले असावेत; मग एकदमच शाल्मलीला भडभडून आले. ती ओकायला लागली. तिचे ओकणे तिला इतके तीक्ष्ण वाटत होते की, पोटातला एखादा अवयव बाहेर येईल की काय, अशी भीती तिला वाटली. ओकण्याचा हा भाग अजून वीस मिनिटे चालला. या वीस मिनिटांत शाल्मलीला बऱ्याच दिवसानंतर तिची आई आठवली, तिचा काका आठवला, लहानपणी त्याने बनवून दिलेली बाजरीच्या तुसातली बैलगाडी आठवली. ती बैलगाडी मोठी व्हावी असे शाल्मलीला कल्पनेत वाटायला लागले; पण तसे काही होईना. मग एकदमच शाल्मलीला आपण खूप लहान होतोय, असे वाटायला लागले- त्या बैलगाडीत बसण्याची कल्पना करताना कल्पनेतल्याच बाहुलीएवढे. लवकरच शाल्मलीला आपण त्या तुसाच्या बैलगाडीत बसलो आहे असे वाटले; पण ती जागची हलेना. हेही थोडा वेळ. मग बैलगाडी वाऱ्याने आपल्यासह उडते आहे असा भास तिला व्हायला लागला. तो भास म्हणणे शक्यच नव्हते; कारण उडताना खाली शाल्मलीला तिचा आजोळचा गाव स्पष्ट दिसत होता. गुगल अर्थवरून दिसावे असे सगळे आराखडे पक्के दिसत होते. हा इतका सुंदर आभास तुटू

नये म्हणून शाल्मलीने गाडीला पक्के धरले; पण ज्या क्षणाला आपण गाडीतून पडू अशी शंका तिला आली, त्याच क्षणाला ती गाडी अदृश्य झाली, आणि शाल्मली पटकन मोठी होऊन अस्तित्वाच्या भानावर आली. तिला पुन्हा भडभडून आले. थोडा वेळ शांतता आणि मग शाल्मलीला आता आपल्याला आयुष्याची शेवटची उलटी करावीशी वाटली. आपल्या अंगातले असेल नसेल तेवढे सगळे त्राण आणि शक्ती लावून तिने उलटी केली. त्यात अपेक्षित होते ते सर्व बाहेर आले. या अपेक्षित पदार्थांपैकी एक होते तिचे हृदय. तिला मातीत विरत जाणाऱ्या तिच्या स्वतःच्या उलटीत स्वतःचेच हृदय दिसत होते. ते हृदय तिथे बघूनही तिला भीती वाटली नाही. हृदय शरीरात न राहणे म्हणजे मरणे. ज्या हृदयाला बाहेर पडू देणे तर काय, पण आतमध्ये धडकतानासुद्धा आपण इतके जपतो, ते असे बाहेर पडूनही आपल्याला भीती का वाटत नसावी? मग पटकनच उत्तर सापडले. हृदय बाहेर पडलेले असले तरी अस्तित्व जाणवत होते. याचाच दुसरा अर्थ- जगण्याचा दुसरा कुठला तरी अर्थ तिला लागत होता. हृदय जर बाहेर पडले तर त्याच्या जागी आत्ता काय आहे, या जाणिवेसाठी तिच्या मेंदूने हृदयाच्या जागच्या संवेदना स्थिर केल्या. तिथे काहीतरी होते, हृदयाच्याच आकाराचे, पवित्र आणि असीम ऊर्जेने भरलेले. ही ऊर्जा काय असावी... ही ऊर्जा काय असावी... ही ऊर्जा काय असावी... शाल्मलीचा मेंदू लूपमध्ये अडकला. त्यात फक्त एकच वाक्य वारंवार उमटू लागले... ही ऊर्जा काय असावी... ही ऊर्जा काय असावी... विचार करताना तिने डोळे घट्ट मिटून घेतले. प्रश्न जितक्या वेळा उमटत होता तितक्या वेळा ती डोळे अधिकच घट्ट मिटून घेत होती. मग अचानक तिला ॲनिमेशन चित्रपटात दिसते तसे एक जंगल आणि त्यातून सोनेरी सूर्यप्रकाश येताना दिसला. प्रकाश एका पटलावर स्थिरावला. सिनेमाचा एक मोठ्ठा पडदा आकार घेऊ लागला. लवकरच त्या पडद्याने आकाशाचे स्वरूप धारण केले, त्यावर निरनिराळे आकार उमटायला लागले. वेली, बेलबुट्ट्या, मोरपंख, अगणित आकार...हे आकार कॅलिडोस्कोपमधून पाहिल्यासारखे निरनिराळी नृत्ये करू लागले. यानंतर शाल्मलीला एक जाणीव झाली- ती एका अफाट विश्वाचा भाग असल्याची, अस्तित्व नगण्य असले तरी ते शून्य नसल्याची, जिवंत असणे म्हणजे काय या प्रश्नाची. मग तिला मघाचा प्रश्न पुन्हा आठवला. ही ऊर्जा काय असावी? या वेळी मात्र उत्तर स्पष्टपणे तयार होते. ही ऊर्जा म्हणजेच प्रेम. विश्वाच्या अखंडतेवर केलेले प्रेम, आकाशगंगेच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत असलेल्या अमाप पसाऱ्यातला एक बिंदू असल्याचे शाश्वत सत्य. या प्रेमाची व्याख्या माणसाने माणसावर केलेल्या प्रेमाच्या व्याख्येपेक्षा अतीव मोठी. या ऊर्जेचा एक थेंब एखाद्याला आयुष्यभर जगवून नेण्यासाठी पुरेसा आहे. त्याचा एक मोठा कॅनच हृदयाच्या जागी बसविला आहे, असे तिला जाणवले. इतके जास्त प्रेम- हवे त्यांना हवे तितके देता येईल आणि देऊन झाल्यानंतरही बरेचसे शिल्लक राहील, आणि जितके शिल्लक राहिले तितके आपल्याकडे शिल्लक आहे म्हणून छान वाटत राहील किंवा मग दुसऱ्याला देऊ केले तर कुणाला तरी प्रेम देता आले, या भावनेनेही सुखच वाटेल. प्रेमाचा अमर्याद साठा. दिला तरी छान, सांभाळून ठेवला तरी छान. या ऊर्जेचा अर्थ प्रेम आहे, असे मेंदूला सांगितल्यानंतर आलेल्या त्या विचित्र अवस्थेतले इतर अनुभव घेण्याची इच्छा शाल्मलीला झाली. तिच्या मेंदूसमोर निरनिराळी व्हिज्युअल्स उमटायला लागली. स्फटिकशुभ्र पाण्याचे झरे, हिरवीगार वनराई, समुद्राखालचे निरनिराळे आकार, आकाशात खूप सारे पतंगासमान उडणारे पक्षी, गुलाबीसर त्वचा असणारी असंख्य माणसे, समुद्राशेजारी असणारे पर्वत, बोलके मासे... खूप काही. मग सावकाश कुठलासा एक ढग तरंगत आला आणि त्यावर शाल्मली झोपली. ढग तरंगत पुढे पुढे चालला, आता एक निर्वात अवकाशाकडे प्रवास सुरू झाला होता. कुठल्यातरी शांत प्रवासाला शाल्मलीचा आत्मा चालला होता.

शाल्मलीचा आत्मा आहे तिथेच होता, हृदयही अजून शरीरातच होते आणि तोंडावर प्रचंड माती लागलेली होती. पिवळा रेसरटॉप उलटीने माखलेला होता. ती आता हळूहळू शुद्धीवर येत होती. लवकरच तिची शुद्ध जणू काही झालेच नव्हते इथपर्यंत ताळ्यावर आली. आपण स्वप्नातून उठलोय अशी काहीशी जाणीव तिला होती; पण इतके लांबलचक स्वप्न तिने कधीच पाहिले नव्हते. स्वप्न तुटले म्हणून तिचा भ्रमनिरास झाला. शांतपणे समोर पाहताना तिची नजर आलोपकडे गेली. कोण आहे हा माणूस? माझा देव, की देवदूत... की ज्याने मला जन्म दिलाय तो बाप...की माझा गुरू... की माझा भाऊ... की माझा आयुष्यभराचा मित्र? कोण आहे कोण हा? याचे पाय धरावे... की याला मिठी मारावी? की मग सगळे कपडे काढून त्याच्या पुढ्यात जाऊन बसावे? की त्याच्या पायाच्या अंगठ्याचे चुंबन घ्यावे? याला काय माहिती आहे आपल्याबद्दल? काहीच नाही! पण मग आपण आत्ता कुठल्या अनुभवातून परतलोय हे माहीत असेल का याला? कुठलाही शब्द न उच्चारता डोळ्यांत हजार शक्यता घेऊन तिने आलोपकडे पाहिले. आलोप तिच्याकडे पाहून स्मितहास्य देत म्हणाला,

'डोंट वरी. रात्री अकराला दुसरा राउंड होणार आहे. यू डिड इट माय स्वीटहार्ट! नाऊ यू आर मी.'

'सो डू आय' सावकाश उठत प्रयंक म्हणाला. त्यालाही उलटी झाली होती. पण त्याने ती व्यवस्थित मातीत केल्याने, त्याचे कपडे खराब झाले नव्हते. तोंडात मात्र बरीच माती होती; पण त्याला ती थुंकावीशी वाटली नाही.

'येस माय होमी' छानसे हसत आलोप म्हणाला. 'नाऊ प्लीज गो टु कार ॲण्ड चेंज. आणि उरलेल्या सगळ्या गोष्टी घेऊन या. जेवण करून टेंट व्यवस्थित लावू यात आणि सॅमीच्या अड्ड्यात जाऊन येऊ यात. सॅमी. डु यु लाईक दॅट नेम?'

'येस! बाकी आता कुठलेही नाव माझेच असेल असे वाटते. आय लव्ह यू आलोप! थॅंक्स फॉर एव्हरीथिंग '

'येह येह. बट आय कांट लव्ह पीपल विथ डर्टी क्लोथस, सो नाऊ प्लीज शट अप ॲन्ड कम बॅक सुन आफ्टर चेंजिंग.'

प्रयंक आणि शाल्मली कारकडे निघून गेले. आलोपने पॅकेजफूडची पाकिटे उकळत्या पाण्यात टाकली. सोबत असलेले कुलचे वाफेवरती धरले. खीर किती खावी याचा विचार करीत तो शाल्मली आणि प्रयंकच्या परतण्याची वाट पाहू लागला.

पोटभर जेवण संपवून, शांत सिगारेटी पीत बसेपर्यंत संध्याकाळचे चार वाजले होते. बरेचसे अंधारून यायला लागले. जंगलात रात्र लवकर होते असे म्हणता येईल; पण ती व्हायची तेव्हाच होते. घड्याळ हा माणसाने माणसाच्या सोयीसाठी लावलेला शोध. प्रयंक आता नायलॉनसारखे मटेरियल असलेल्या काळी स्पोर्टस् पँट आणि काळ्याच टी-शर्टमध्ये होता. शाल्मलीने आडव्या लाईन्स असलेला आलोपचा टीशर्ट आणि एक कॉटनची राखाडी ट्रॅकपँट घातली. ही पँट गेली पाचेक महिने आलोपकडे आहे; त्याआगोदर काही आठवडे प्रयंककडे होती; त्याही आगोदर रूमवरती होती. रूम सोडताना भार्गव ही पँट मागे सोडून गेला आणि त्यावरची नेमकी मालकी कुणाची, हे अजून स्पष्ट झाले नव्हते. रूमवर एकाला चुकून स्टे करावा लागला तर मजबुरीने ही पँट घालावी लागते. त्यामुळे तिला प्रयंकने 'मजबुरी' असेच नाव दिले आहे. तर ही मजबुरी आणि टी-शर्ट घालून शाल्मली पुढे चालत होती आणि तिच्या पाठीमागे प्रयंक आणि आलोप. वेळ तसा कमीच होता; पण पॉइंट सापडणे हा एकूण मूळ उद्देश असल्याने, कुठलीही तक्रार न करता ते त्या दाट झाडांमधून पुढे सरकायला लागले. शाल्मलीला त्या असून नसल्यासारखा आणि नसून असल्यासारख्या रस्त्याची सुरवात वा अंत माहीत नव्हता; पण त्याचे एकूण स्वरूप तिच्या लक्षात होते. थोडा वेळ इकडे तिकडे फिरल्यानंतर आपण त्याच ठिकाणी परत आलो आहोत, हे शाल्मलीला जाणवले.

'ओके. स्ट्रेट फ्रॉम हियर. आय डोंट नो, हाऊ लाँग दो'

सरळ चालत राहणे शक्य होते. अधेमध्ये झाडांमुळे गोंधळ व्हायचा तरीही पायाखालच्या जमिनीचा कडकपणा साथ देत होता. रस्ता हजारो वर्षे तसाच राहणे शक्य नाही; पण जवळजवळ अदृश्य होणाऱ्या रस्त्यावरून दर पंचवीस वर्षांनी एक दिवस जरी चार-पाच लोक एकामागोमाग चालले, तर रस्ता थोडाफार पुन्हा आकारास येतो. हे शक्य होते की, ते नगर निर्मनुष्य झाल्यानंतरही कितीतरी लोक तिथे अधूनमधून येत होते. कुणी सांगावे, या ऐतिहासिक वास्तूबद्दल खूप जणांनी लिहिलेलेही असेल; पण ते वर्णन नेमके याच जागेचे आहे, असा शोध कुणाला अजून लागला नसेल. अंधार जास्त वेगाने पसरायला लागला किंवा मग झाडी खूपच दाट झाली. मिनिटभर याचा विचार करीत असतानाच ते तिघे त्या तळ्यापाशी येऊन पोहोचले. एखाद्या लहान मुलीच्या निरागसतेने शाल्मलीने पाण्याकडे बोट करून ही तीच जागा आहे, असे सांगितले.

प्रयंक आणि आलोप जमिनीवर टाचा उंच करून उकीडवे बसले. मृगशीर्ष नक्षत्राच्या धनुर्धाऱ्याच्या बाणामधला हा पहिला तारा असेल का, असा विचार ते करू लागले. तो पहिला तारा अर्थातच नव्हता. तळ्याच्या पलीकडे अजूनच अंधार जाणवत होता. त्या तळ्याला वळसा घेत त्या अंधारलेल्या झुडपांकडे आलोप गेला. त्याचे अस्तित्व जाणवेना. मग एकदमच त्याने मोठा, पण शांत आवाज दिला.

'गाईज कम फास्ट'

वेळ न दवडता शाल्मली आणि प्रयंक वळसा घालून धावत त्या झुडपांकडे गेले. झुडपांपलीकडे एक मंदिर होते. पूर्णतः व्यवस्थित, समोर खडकांवर अधूनमधून फक्त गुडघाभर गवत असलेले. सुबक ठाशीव. मंदिरांचे स्वतःचे एक व्यक्तिमत्त्व असते. त्या मंदिराच्या वास्तुकलेत कुठलासा एक नम्रपणा होता. व्यवस्थित चाचपणी करीत ते तिघे मंदिरात पोहोचले. मंदिराला आत गाभारा असण्याऐवजी बरोबर केंद्रस्थानी चबूतरा होता आणि त्यावर एक सुंदर शिल्प होते. एक स्त्री-पुरुष संभोग करीत असल्याचे. भिंतीवरती अजूनही बरेच कामुक कोरीवकाम होते. सर्व शिल्पकलेचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात अवास्तवता नव्हती. मुख्य शिल्पातली स्त्री सुंदर वाटत असली तरी तिचा कटीभाग अति अरुंद नव्हता, स्तन अतीव मोठे नव्हते. याहीपेक्षा महत्त्वाचे- त्या शिल्पाचा एकूण आकार माणसांच्या एकास एक प्रमाणात होता. असे म्हणता येईल की कुठल्यातरी समागम करीत असणाऱ्या एखाद्या जोडप्याला दगड होऊन जाण्याचा शाप मिळाला असावा आणि त्यांचे तसेन् तसे शिळेत रूपांतर झाले असावे. भिंतीवरच्या कोरीव कामात समलैंगिकता होती; पण तिही अवास्तवतेकडे झुकत नव्हती. हजारो वर्षांनंतर त्या मंदिरात कुणीतरी जिवंत माणसांनी प्रवेश केला होता, किंवा मग फक्त काहीशे वर्षांनी इथे अलीकडे कुणीतरी येऊन गेले असावे हेही शक्य होते; पण तिथे माणसे पोहोचत असल्याच्या कुठल्याही खाणाखुणा नव्हत्या. गेली कितीतरी वर्षे चाललेली आलोपची एक तळमळ आता अर्धी थांबली होती. एक शोधाचे काम पूर्ण होण्याच्या मार्गी लागले होते. समोरचे दृश्य कितीजरी सुंदर असले तरी वेगाने ढळणाऱ्या सूर्याने त्यांना तिथून काढता पाय घेण्यास भाग पाडले. परतताना अंधार पडण्याच्या आत जर त्या रेषेवरल्या सुरुवातीच्या मंदिराचा शोध लागला तर आणि तरच आलोपची थिअरी पूर्ण होणार होती. वेगाने तो आणि त्याच्यामागोमाग प्रयंक आणि शाल्मली बाहेर आले. पूर्ण अंधार व्हायला अजून वीसेक मिनिटे होती. ते तिघे झपझप परतीच्या मार्गावर चालू लागले- कुठलेही संभाषण न करता. चालताना आलोप चौकस नजरेने आजूबाजूला आणि पायाखालच्या जमिनीकडे पाहत होता. सरळ रेषेत तीन ताऱ्यांनी मिळून बनणारा बाण. त्यातला मधला तारा सापडला आहे. सुरुवातीचा तारा कुठे असेल? हे मंदिर सापडले तसे योगायोगाने तेही मंदिर लगेच

सापडावे किंवा मग क्ल्यू तरी मिळावा, अशी प्रचंड आशा घेऊन आलोप चालत होता; पण यांतले काही झाले नाही. दोन-चार पावले पुढे चुकून आणि दोन-चार पावले परत मागे येऊन, ते पुन्हा एकदा कँपसाईटवर आले होते. आनंद, आश्चर्य, गर्व, चुटपुट, ब्लडप्रेशर या सगळ्याच भावना त्यांच्या अंगप्रत्यंगात खेळत होत्या. त्या क्षणी त्या तिघांतल्या प्रत्येकाला दुसऱ्या दोघांना एकत्रित मिठी मारावी असे वाटत होते. काय म्हणातात बरं याला? हो 'थ्रिसम'. शाल्मली स्वतःशीच मनातल्या मनात बोलली. दिवस अगोदरच मावळून गेलेला...आता मागे उरलेली संध्याकाळ वेगाने मावळून रात्र बनायला लागली होती. कँपसाईटवर परत गेल्यानंतर ते तिघे काही वेळ बाटल्यांमधले पाणी पीत शांत बसून राहिले. आलोपला सेलिब्रेशन म्हणून शँपेनची बाटली वगैरे जवळ असायला हवी होती, असे वाटायला लागले. शँपेनवरून त्याचे डोके बियर पिण्याच्या इच्छेकडे धावू लागले. पोटात भूक भरपूर होती; पण डोक्यातल्या आनंदाने तिची स्पष्ट जाणीव अजून होत नव्हती. लाकडे न टाकल्याने समोरचा जाळ नुसताच धुमसत विझायच्या वाटेवर होता. प्रयंक समजुतीने तिकडे जाऊन त्यात लाकडे आणि काथ्या घालून पुन्हा पेटवायला लागला. आग व्यवस्थित लागली आणि त्यावर त्याने पाणी गरम करायला ठेवले. ते पाहून शाल्मली स्वतःच म्हणाली,

'आय कॅन मेक कॉफी. सामान असेल तर!'

सामानात कॉफीचे रेडीमिक्स होते. सोबत आणलेल्या स्टीलच्या पातळ कपांमध्ये तिने एक एक पाउच रिकामे केले आणि त्यात गरम पाणी टाकून तिघांसाठीही कॉफी बनवली.

'सकाळी मात्र चहा बनवू यात हां.' आलोप म्हणाला.

'दूधपावडरचा नको.' प्रयंक म्हणाला.

'मग कोरा पी की सोंड्या. पोरगी पाहिली तर स्टाईल मारतोस.' - आलोप

दोघे सौम्यसे हसले.

'तुम्ही दोघं रूमपार्टनर होता ना? असेच भांडायचात?' - शाल्मली

'नाही. तेव्हा हा रूमची सुनबाई होता. तो बनवायचा आणि मी आणि भार्गव गुपचुप तक्रार न करता खायचो. क्यो डार्लिंग?' - आलोप

'आलोप स्टॉप बिइंग जर्क.' प्रयंक उसना राग आणून म्हणाला.

'जेवायचं काय?' शाल्मलीने साळसूदपणे विचारले

'कहो ना प्यार है' सारखा मॅकडॉनल्डसमधून बर्गर आणू या की! नाहीतरी तू आमिषा पटेलसारखीच दिसतेस,' आलोप पटकन.

'दोन दोन रुतिक. का हृतिक?' प्रयंक थट्टेने.

'स्टॉप इट गाईज. खरंच काय बनवायचंय; मी मदत करते,' शाल्मली.

'वेल, टेक सम रेस्ट इन टेंट. मी एग्ज करी आणि राईस बनवतो. सोबत नानपाव आहेत.' आलोप

''डेजर्ट?'' प्रयंक न राहवून लगेच

'आलास ना जातीवर गोडघाश्या. फोनवर बोललो मार्शमेलोज घेतो तर म्हणे बाईलपणा,' आलोप

'ते काय असते?' शाल्मली

'स्पाँजी गोड वड्या असतात. विस्तवावर धरल्या की वितळतात. मग चॉकलेट ठेवून बिस्किटात सँडविच करून खायच्या,' प्रयंक

'साउंडस इंटरेस्टिंग. ओके, मी जाऊन येते.'

शाल्मली नैसर्गिक विधीसाठी आडोशाला गेली. ती गेल्यानंतर उरलेल्या दोघांना तशी प्रायव्हसीची गरज वाटली नाही. त्यांनीही कार्यभाग उरकून घेतला. शेकोटीपासून थोडा दूर जाऊन प्रयंक हात डोक्याशी घेऊन जमिनीवर पडून आकाशाकडे पाहत राहिला. शाल्मली परतून टेंटमध्ये जाऊन थेट झोपी गेली. आयुष्यात ती इतकी जास्त कधी थकली नव्हती. आलोप सावकाश जेवण बनवू लागला. त्याला खरे तर मदतीची गरज होती; पण या क्षणाला त्याला प्रयंकला उठवावेसे वाटेना. प्रयंकने रूमवर असताना भार्गव आणि आलोपची बरीच काळजी घेतली. दोघांतले कुणी जास्त आजारी पडले तर तो ऑफिसातून लवकर यायचा. स्वयंपाक करता करता आलोपच्या डोक्यात 'या क्षणाला प्रयंक काय विचार करीत असेल?' हा प्रश्न आला.

प्रयंक शांतपणे आकाशाकडे पाहत बसला होता. आजच्या दुपारच्या सेशनमध्ये त्याला अतीव चमत्कार दिसले नव्हते; पण जे काही दिसले ते वास्तवाच्या बरेच जवळपास होते. आकाश, नेहमीच्या आकारांपेक्षा दहापट मोठे तारे, जवळ आलेली आकाशगंगा, एका क्षणाला आपल्यात ओढून घेईल असा निळसर शांत प्रकाश. तो प्रकाश तसाच दिसत राहिला. निरनिराळ्या शिल्पांचे आकार दिसले. त्या निळ्या रंगाच्या अवकाशात हिरवट होऊन पाचूप्रमाणे अनेक शिल्पे. त्यांतली बरीचशी शिल्पे पाना-फुलांची नक्षी आणि निरनिराळ्या जनावरांचे आकार होते. माणसांचा कुठेच मागमूस नव्हता. चित्रे फक्त फिरत होती. मागच्या वेळेस आलेल्या अनुभवांचे पुन्हा व्हॅलिडेशन होत होते. नॉर्मल झाल्यानंतर विसरलेल्या गेलेल्या मागच्या अनुभवांच्या सगळ्या स्मृती चेतवल्या गेल्या होत्या. या वेळी त्या नॉर्मल झाल्यानंतरही व्यवस्थित लक्षात राहिल्या. प्रयंक दमलेला नव्हता किंवा मग खूप ताजातवानाही नव्हता; तो फक्त शांत होता. आलोपला बाणाच्या टोकाशी असलेले तिसरे मंदिर सापडून जावे, आणि त्याचा शोध पूर्ण व्हावा, इतकीच इच्छा त्याला होती. स्वतःकडून वा आयुष्याकडूनही त्याला फक्त हा रिसर्च पूर्ण व्हावा, अशी इच्छा होती. या रिसर्चचा वैयक्तिक फायदा तसा कोणालाच नव्हता; पण आतापर्यंतचे अनुभव पराकोटीचे सुंदर होते. आज शेवटून दुसरे मंदिर सापडल्यानंतर त्यात आणखीनच भर पडली होती. आता शेवटचे मंदिर सापडले नाही तरी मिळालेल्या खजिन्याच्या

आठवणी वर्षभर पुरू शकत होत्या. शेवटचे मंदिर सापडू नये असाही एक विचार प्रयंकच्या मनाच्या कोपऱ्यात कुठे तरी चालू होता, का? याचे उत्तर मात्र त्याच्याजवळ नव्हते. शाल्मलीला झोपेतून उठवून मग आलोपने तिला प्लेटमध्ये जेवण देऊन ते शाल्मलीला प्रयंककडे देण्यास सांगितले. ती त्याच्याकडे गेली तसा तो आहे त्या जागी उठून बसला, आणि प्लेट हातात धरून शाल्मलीला थँक्स म्हणाला. प्रचंड गैरसोयीच्या वाटणाऱ्या अंधारात, नेहमीपेक्षा पूर्ण वेगळ्या वातावरणात ते तिघे शांतपणे जेवत बसले. सोबत रातकिड्यांची किरकीर, दूर टिटवीसारखे पक्षी आणि अधूनमधून काही काजवे आपल्या अस्तित्वाची जाणीव करून देत होते.

जेवण संपवून सगळ्या गोष्टींची आवरसावर करता करता साडेनऊ वाजून गेले. एव्हाना आलोपच्या डोळ्यांवर थकवा जाणवायला लागला होता. शाल्मलीने थोडा वेळ झोप घेतली असल्याने, ती बरीचशी ताजीतवानी होती. प्रयंक नेहमीसारखा निर्विकार होता. शेकोटीच्या तिन्ही बाजूंना समान अंतरावर बसून ते सावकाश एक एक गोष्ट बोलायचा प्रयत्न करीत होते. वाऱ्याने आच एकाच बाजूला जायला लागली तशी शाल्मली उठून प्रयंकच्या शेजारी जाऊन मांडी घालून बसली. तिचा गुडघा सहजपणे उलटं उकिडव्या बसलेल्या प्रयंकच्या कमरेला स्पर्श करीत होता. अवघ्या बारा तासांत औपचारिकतेच्या भिंती, स्त्री-पुरुषांचे लैंगिक राजकारण आणि बौद्धिक क्षमतेचे भेदभाव गळून गेले होते. अर्थात यामागे दुपारच्या आयोवास्काच्या सेशनचा बराच मोठा हात होता. पण त्याहूनही मोठे सुख होते ते नवीन मंदिर सापडल्याचे. असा काही भव्य शोध लागण्याच्या संधी शाल्मलीसारख्या अपटाउन मुलीला कधी जन्मात शक्य होत्या का? ती फोटोग्राफर तर चांगली होती; पण फोटो मिळवावेत म्हणून असली रिस्क तिने कदाचित कधीच घेतली नसती. जवळच्या कॅमेऱ्यातल्या डिस्प्लेवर ती आपणच काढलेल्या फोटोंचे प्रिव्ह्यू पाहत बसली.

'मंदिर सुंदर आहे ना?' समोर आलोपकडे पाहत ती म्हणाली.

'इट्स ब्यूटीफुल. उद्या जर फायनल मंदिर मिळाले तर आयुष्य सार्थकी लागले असेच म्हणीन,' आलोप

'कदाचित आजचे मंदिरच शेवटचे मंदिर असेल?' प्रयंक

'मनहूस, पनौती, काली जबान... बोलता येते तर बोलायलाच हवे का?' आलोप

'नाही म्हणजे, ते दुसरे मंदिर असेल तर पहिले कुठे आहे? त्याच्या सरळ रेषेत अजून गेलो तर तिसरे मंदिर सापडेलच कशावरून?'

'येडझव्या! आपण ज्या रस्त्याने गेलो तीच बाणाची सरळ रेष असायला हवी अशी काही अट नाही.' आलोप

'बट देन व्हेअर इज द लाईन ऑफ ॲरो?' शाल्मली न राहून बोलली. तिलाही त्या दोघांइतकीच तिसऱ्या मंदिराची उत्सुकता होती. तिसरे मंदिर जर सापडले तर आयुष्यभर कुणालाही एक मोठ्ठी कथा रंगवून रंगवून सांगायला ती मोकळी होती. त्याहीपेक्षा तो जिवंत अनुभव आणखी वेगळा होता. आणि फोटोग्राफ्सचे तर विचारणेच नको. कुणीतरी या शोधासाठी बक्षीस पण देत असेल. कोण ते मात्र शाल्मलीला माहीत नव्हते.

'मला वाटते तो वाहता झरा आहे ना, तो ॲरो असेल,' आलोप

'तो सरळसोट वाहत नाहीये.' प्रयंक

'वेल, तो आत्ता नैसर्गिक झालाय; पण कधी काळी बांधीव कॅनॉल राहिला असेल,' आलोप

'बांधीव कॅनॉलच असला तर मग तो अत्यंत हुशारीनेच बांधतील. कॅनॉल असा मध्येच वेडावाकडा कसा होईल?' प्रयंक

'प्रयंक तो दोनेक हजार वर्षांपूर्वीचा तरी कॅनॉल आहे. त्याचा उगम नैसर्गिकच राहणार; उगीच कुणी बोअरवेल करून किंवा धरण बांधून आर्टिफिशियली कालवे काढणार नाही. सो पाण्याचा उगम नैसर्गिकच होता; पण त्याला व्यवस्थित पुढे नेण्यात आलं. शक्य आहे की बाणाच्या आकृतीतून पुढे जाणाऱ्या कालव्याला जोडून चौकोनी तटबंदीतला उपकालव्यांचाही आकार असेल?'

'मिन्स? काही समजत नाहीये,' शाल्मली म्हणाली

'इटस लाईक फोकस ॲण्ड आउटफोकस. म्हणजे धनुर्धाऱ्याचा बाण तर बनतोय; पण असे नाही की कालवा एकच आहे. शक्य आहे की ती एक रेष एका चौकोनाची एक बाजू आहे आणि उरलेल्या तीन रेषांचे मिळून एका चौकोनाचेही नेटवर्क बनत असेल,' आलोप

'ते लोक इतकी अवघड कामं कसे करायचे? इतके हुशार होते तर तारकासमूहांच्या हिशेबाने जमिनीवर देवळे बांधण्याची श्रद्धा का जोपासायचे?' शाल्मली

'प्रश्न नुसता श्रद्धेचाच नाहीये. प्राचीन काळात ॲक्युरसीसाठी तारकासमूह आणि घटिकापात्र घेऊन अचूक गणितीय प्रमेय मांडता यायची. त्यामुळे मग भव्य निर्माणकार्य शक्य व्हायचे. याशिवाय अवकाश हे खरे विश्व आहे. नुसतेच थ्रीडीमध्ये काम करण्यापेक्षा फोरडीमध्ये काम करायची वेगळी मजा आहे. विश्व हे किमान फोर डायमेंशनल आहे, नव्या थिअरीमध्ये तर त्याला एकूण बारा मिती आहेत.'

'तू काय बोलतोयस व्यवस्थित समजत नाहीये. इट्स गोइंग ऑल टँजेंट फॉर मी,' शाल्मली.

'यू नीड ॲन अनदर डोस ऑफ सोमरसा.' प्रयंक हसत म्हणाला.

'वॉव, द नून वॉज ऑस्सम! हे आयोवास्का कुठे मिळते रे,' शाल्मली

'भारतात कुठेच मिळत नाही. ब्राझीलच्या जंगलामध्ये क्लासेस चालतात याचे सेवन करण्याचे- औषधासारखे,' प्रयंक

'केवढ्याला असते?'

'फाय के, टेन के'

'रुपीज?'

'नो. डॉलर्स!'

'बापरे इतके महाग? पण एक्स्पिरियन्सही वेगळा आहे. आय मिन आय हॅव डन विड अँड अदर ड्रग्ज; बट धिस वॉज टोटली डिफरंट.'

'तू बाबा के दरबार में है डार्लिंग ! तेरेको हम आक्खे युनिवर्सकी सैर करा सकते है. मोरपाडा मे घुमने के माफिक. काय म्हणतो आलोप?'

'तुम्ही सेशन करणार आहात का? नायतर मार्शमेलोज काढ.' आलोप

'सेशन पण करू मार्शमेलोज पण करू,' प्रयंक

बॅगमधून प्रयंकने मार्शमेलोज काढले. जवळ पडलेल्या हातभर लांबीच्या काडीला खोचून समोरच्या जाळावर थेट जळणार नाही या बेताने उंच धरून तो ते वितळण्याची वाट पाहत बसला. दुसऱ्या हाताने बॅग शाल्मलीकडे दिली. तिनेही प्रयंकचे व्यवस्थित पाहून अनुकरण केले. आलोपने आपल्या काडीला एकदम दोन मार्शमेलोज लावले. ते वितळण्याची वाट पाहत पुढच्या गप्पा सुरू झाल्या.

'सो व्हॉट युअर बॉयफ्रेंड डज?' प्रयंकने सहज शाल्मलीला विचारले.

'तो 'डेलोक्रॉइक्स'मध्ये आहे. सिनीअर कंसल्टंट.' शाल्मली

'आणि तू?' प्रयंक

'मी 'निपुण'ला आहे. अगेन प्रोसेस मॅनेजर.' शाल्मली

'लग्न कधी करतेयस?' प्रयंक

'आय रियली डोंट नो दॅट. वन थिंग बॉदर्स मी अ लॉट. आत्ताच्याबरोबर लग्न करता येणार नाही; बट ही इज ए गुड गाय.'

'हाउ लाँग यू हॅव बीन टुगेदर?'

'ईट्स बीन मोर दॅन अ इयर नाउ.'

'गुड. होल्ड धिस फॉर मी' असे म्हणत प्रयंकने आपल्या हातातली शाल्मलीला दिली. मग बॅगमधले मोठे क्रॅकर बिस्किट काढले. त्यावर कॅडबरी चॉकलेटचा एक मोठा तुकडा ठेवला. मग ती काठी शाल्मलीकडून परत घेऊन त्यावरचे लाहीसारखे फुगलेले आणि आतमध्ये वितळायला लागलेले मार्शमेलो ठेवले. त्यावर पुन्हा एकदा क्रॅकर ठेवून त्याचे सँडविच केले. मग व्यवस्थित ॲडजस्ट करून ते शाल्मलीकडे देत तो म्हणाला,

'फॉर यू, माय फ्यूचर एक्स गर्लफ्रेंड!'

त्या वाक्यातला विनोद शोधत तिने थँक्स म्हणून ते सँडविच हातात घेतले. आलोप म्हणाला

'ते हातात जे काही आहे त्याला समोर्स म्हणतात. समोर ॲक्च्युली; पण शब्द इंग्रजी वाटला नसता. इट्स एस एम ओ आर ई एस' ऑर... वेल डु द विकीपीडिया फॉर दिस वन.'

'विकीपीडिया....!' प्रयंक मध्यम मोठे हसला.

'इट्स सो टेस्टी. कसलं भन्नाट लागतंय हे.' समोर्सचा पहिला घास खाऊन शाल्मली म्हणाली.

'ग्लॅड, यू लाईक्ड अवर वेस्टर्नाइज स्टुपिडिटी.' आलोप उत्तरला

'कसले वेस्टर्नाइज रे. 'भारत एक खोज'च्या सिरियलचे ॲक्टर वाटतायेत मला तुम्ही दोघे. रादर 'अमर चित्रकथा'मधले.'

'एनिवे फिनिश फास्टर. अजून औषध घ्यायचंय' प्रयंक तिरकसपणे म्हणाला.

'प्रयंक तू घेणार आहेस परत?' आलोप

'नाही. नको. म्हणजे दुपारचा इफेक्ट मस्त होता. उगीच वाढवून घ्यायचे नाही. शिवाय माझं पोट दुखतंय. जास्त नाही. पण मी रादर तुम्हा दोघांना सांभाळतो'

'देन कुक द स्टफ फॉर अस'

'चालेल. प्रमाण तेच आहे ना?'

'हो. पण थोडी पानं वाढव'

'ऑलराईट' एवढे म्हणून प्रयंक पुन्हा भांडी आणि साहित्य आणायला गेला. आलोपने फोनवर 'व्हेअर यू गो माय लव्हली' शांत आवाजात लावले. समोर्स खात खात तो आणि शाल्मली काही न बोलता शांतपणे जंगलाचा आवाज ऐकत बसले. वरच्या आकाशाचा फिकट करडा रंग जाऊन आता ते पारदर्शी निळसर काळे दिसायला लागले होते. एका कोपऱ्यात ओरायन तारकासमूह आता स्पष्ट दिसायला लागला होता. थोडा वेळ गेला आणि प्रयंकने काम पूर्ण करून शाल्मली आणि आलोप दोघांना बोल्स दिले.

'होप, यू डोंट वाँट फ्राईज विथ दॅट,' प्रयंक चेष्टेने म्हणाला.

'वेल सम केचप कुड डू' शाल्मली पटकन बोलली. तिघेही छान हसले.

शाल्मलीने बोल ओठांना लावला. त्यातले मिश्रण सावकाश घोटाघोटाने पीत ती विचार करीत होती. या दोघांना भेटून आता बरोबर बारा तास झाले होते- सातशे वीस मिनिटे. पण यातल्या एकाही मिनिटात शाल्मलीला आपल्या शहरातल्या आयुष्याची आठवण झाली नाही, फोनमध्ये डोकावून पाहावेसे वाटले नाही किंवा मग उगीच शाब्दिक कसरतीही कराव्या लागल्या नाहीत. जंगलातल्या दोन झाडांविषयी एखाद्याला जे वाटेल तशी काहीशी भावना शाल्मलीच्या डोक्यात या दोघांबद्दल तरळत होती. माणसे आणि झाडे एकच असू शकतात, हे नवे तत्त्वज्ञान अर्थात दुपारच्या सेवनाचा परिणाम होता. शाल्मली आता विरघळून गेली होती. तिला स्वतःचे असे काहीही वेगळे अस्तित्व जाणवत नव्हते. आपण विरघळून गेलोय ही जाणीव मात्र होती; आणि हीच जाणीव मग एका वेगळ्या अस्तित्वाच्या व्याख्येबद्दल काही सांगत होती. बाराच तासांत आयुष्य बदललेय. या दोघांच्या शोधकार्यात आपण सहभागी आहोत; पण आपण तिघेही शहराच्या सुरक्षिततेत परत जाणार आहोत, म्हणून आरामात थांबलोय. इथेच राहावे लागले तर मात्र बरीच अडचण होईल. एरवी इथेच राहायच्या कल्पनेने

भीतीही वाटली असती; पण आज भीती का वाटत नाहीये? परत तर जायचेय, जावे लागणार हे गृहित आहे; पण इथे आलेले अनुभव आणि दृष्टान्ताचे काय? ते आपण दुसऱ्या कुणाला सांगू काय? सांगता येईल? सांगावेत? इथून निघून गेल्यानंतर या दोघांच्या टचमध्ये राहायचे का? इतके मित्र आहेत त्यात आणखी दोघांची भर पडेल; पण हे दोघेही विचित्र आहेत. एरवी मुलगी म्हणून मी कुठेही ॲक्सेप्टच केली जाणार; पण हे दोघे मला ॲक्सेप्ट करतील असे वाटत नाही. हळूहळू विचारमग्नता क्षीण होऊ लागली आणि त्या द्रव्याचा अंमल सुरू झाला. या वेळी मातीचा वास येण्याऐवजी जळकट चॉकलेटचा वास जाणवायला लागला. एकदमच लहानपणी रेहान नावाच्या दोन वर्षांच्या मुलाच्या वाढदिवसाला त्याच्या अम्मीने चहापावडरपासून बनविलेली मेंदी हाताला लावल्याचे आठवले. दुसऱ्या सेंकदाला एक बाभळीचे झाड ज्याची साले निघालीयेत आणि ते झाड काही सांगू पाहतेय, मग पहिलीत सायकलवर मागे बसलेली असताना त्याच्या चाकात गेलेला पाय आणि त्यामुळे सोलवटल्याने त्यावर शेकायला म्हणून डॉक्टरने दिलेली बर्फाची पिशवी... एकदमच त्या पिशवीतला बर्फ आभाळाएवढा मोठा झाला. त्याचे खूप मोठेमोठे वजनदार खंड तिच्यासमोर चमकू लागले. मग त्या खंडांनी एक आकार बनवायला सुरुवात केली. व्यवस्थित आकार. त्या आकारांतून राजवाडा बनावा, असे शाल्मलीला वाटत होते; पण तसे झाले नाही. बर्फांचे खूप मोठे खंड एकमेकांवर सावकाश येऊन आदळायला लागले. प्रत्येक आदळण्यागणीक त्याचा स्फटिकी निळा रंग जाऊन स्फटिकी हिरवा बनू लागला. अजून काही सेकंद गेली आणि प्रत्येक मोठा चौकोनी ठोकळा आता चार ठोकळ्यांमध्ये विभाजित होऊ लागला. पुढच्या काही मिनिटांत त्यांचा आकार अजून लहान होत होत एका बिस्किटाएवढा होऊ लागला. एक-दोन बर्फाचे तुकडे आता थेट बिस्किटाच्या आकाराचे दिसू लागले. त्यांचा आकार बिस्किटाचा होता आणि रंग पाचूचा हिरवा, शिवाय त्याच्या आरपार आणि कडेला साचलेला वेगवेगळा प्रकाश.

'विश्व म्हणजे आई' शाल्मलीच्या कानात आवाज झाला. 'हे विश्व म्हणजे तुझी आई माझ्या लेकरा. ये, अशी झोप माझ्या मांडीवर.' डोळ्यांसमोर एक गादीसारख्या ढगाचा आकार तयार झाला आणि कुठलासा आवाज शाल्मलीला बोलवायला लागला. 'ये बाळ झोप.' शाल्मलीचे शरीर उचलले जात आहे असे तिला वाटले. त्या ढगाच्या दिशेने तिचे शरीर सावकाश उडत चालले होते. मग ते मध्ये थांबल्यासारखे झाले. वाटेत कुणीतरी उभे आहे. कोण? शाळेतल्या एक शिक्षिका- जिला शाल्मली अजिबात आवडायची नाही. त्या हातात एक जाडसर छडी घेऊन उभ्या होत्या. त्या छडीवर टाचण्या आणि रक्त लागलेले होते. 'मॅडम मला जाऊ द्या' शाल्मलीच्या शरीराने उठून बसण्याचा प्रयत्न करीत म्हटले. पण शरीर उठले नाही. शाल्मलीला शरीरात अडकून पडल्यासारखे वाटायला लागले. आता तिचा श्वास कोंडायला लागला आहे असे वाटायला लागले. मग एकदमच त्या स्त्रीने तिच्या पोटावर मारायला छडी उगारली. ती छडी आपल्या पोटावर लागणार आणि त्याच्या टाचण्या आपल्या पोटात खुपसणार म्हणून शाल्मलीने आपले दोन्ही हात पोटावर घेतले. हालचाल झाली आणि ती स्त्री अदृश्य झाली. शाल्मलीचे शरीर त्या ढगावर जाऊन बसले. मग तो ढग तरंगत पुढे जाऊ लागला. वेगाने. तो वेग आपल्याला खाली पाडेल अशी शंका मात्र एकदाही येऊ द्यायची नाही, असे शाल्मलीने मनोमन ठरविले. मग तो ढग पुढे जात राहिला. अजून काही वेळाने त्याचा वेग कमी कमी होऊ लागला. एका ठराविक लयीनंतर आता तो संथ चालत होता. शाल्मलीला आपण एखाद्या विमानात एकटेच बसलो असून, ते पूर्ण काचेचे आहे आणि बरेच खालून उडतेय, असे काहीसे वाटू लागले. त्या विमानात खालच्या काचेतून दिसणारे दृश्य बघत बघत मग तिला झोपून घ्यावेसे वाटले.

तिचे वास्तवातले शरीर सावकाश उठवीत प्रयंकने टेंटमध्ये नेऊन ठेवले. ती एका झोपेमधून दुसऱ्या झोपेमध्ये गेली. आईच्या कुशीत, खुशाल आश्वस्त होऊन.

आलोप अजूनही प्रभावाखाली होता. निरनिराळे अनुभव आणि चित्र पाहत पाहत त्याच्या भावनांचा प्रवास वेगाने उर्ध्व दिशेला सुरू झाला. समोरच्या शेकोटीतून एक सर्पिल मार्ग तयार होत तो आकाशाकडे जात होता. आलोप लक्ष देऊन त्या मार्गाकडे पाहत राहिला. त्या मार्गाचा आणि एकूण सर्व दृश्यांचा रंग विस्तवासारखा पिवळसर नारिंगी होता, उष्ण होता. असे असले तरी त्यात हिरव्या तेजःपुंज पुंजक्याची रांगोळी एका निश्चित अंतरावर पुन्हा पुन्हा उमटत होती. त्या पुंजक्यांची जागा आता मानवी चेहऱ्यांनी घेतली होती. पुष्कळसे चेहरे- ज्याची आलोप पूजा करीत असे. नासामधले अनेक शास्त्रज्ञ, इजिप्तमधले इतिहास संशोधक, लायब्ररीच्या अर्कायवलमध्ये जुनाट पुस्तकात दिसलेली लेखकांची नुसतीच रेखाचित्रे, आणि सकाळी टपरीवर दिसलेला म्हातारा- या सर्व चेहऱ्यांकडे अनेक उत्तरे होती. सर्व उत्तरे निष्कर्षाकडे पोहचणारी होती; पण आलोपला काही प्रश्नांची व्यवस्थित उत्तरे हवी होती. या वर्तुळाकार रांगोळीतल्या कोणत्या चेहऱ्याचा सल्ला घ्यावा, ते त्याला समजत नव्हते. सर्व गोल रिकामे करायला हवेत, या उद्देशाने तो एक एक चेहरा पुसून टाकू लागला. चेहरे अदृश्य व्हायला लागले तसे तिथे पूर्ण भरीव गोल आकाराऐवजी मोकळ्या रिंग्ज दिसायला लागल्या. शेकडो कंकणाकृती ग्रहणे लागल्यासारखे रंगीबेरंगी अनेक सूर्य अवकाशात रुंजी घालायला लागले. एक विशाल माकड एका माणसासमोर गुडघ्यावर बसून कसलीशी मागणी करीत असल्यासारखे वाटायला लागले. त्या माणसाकडे मक्याची चमचमती कणसे होती. त्यातल्या टपोऱ्या दाण्याचे रंग क्षणाक्षणाला बदलत होते. आलोपने पुन्हा जमिनीकडे समांतर पाहिले. आकाशाकडे जाणारा तो सर्पिल मार्ग त्या विस्तवात सुरू न होता आपल्या डोक्यावरून सुरू व्हायला हवे, असे त्याला

वाटले. हे घडून येण्यासाठी एकतर त्याला विस्तवात उभे राहणे भाग होते, किंवा मग काहीतरी करून तो मार्ग आपल्या डोक्यावर आहे असे भासण्यासाठी त्याला छोट्याशा चक्री वादळात रूपांतर करून जवळ आणायचे होते. त्या जाळात एक सोनेरी साप दिसू लागला. तो साप आडवा चालण्याऐवजी उभा चालला होता. त्या सर्पिल मार्गाची शिडी असल्यासारखा. साप जसजसा वर जाऊ लागला तसतशी त्याची मागे वळवळणारी शेपटी जास्त जोराने हालचाल करू लागली. आलोपने त्या शेपटीच्या अंतिम टोकाशी मक्याच्या कणसातले काही दोरे गुंतत जाताना पाहिले. हे दोरे आता आलोपच्या भुवयांना बांधले गेले होते. आलोप थोडासा मागे झुकत तिरपा होऊन आता त्या सर्पिल्या मार्गाच्या तळाच्या केंद्रस्थानी होता. हळूहळू सरळ होत ते नारिंगी आकाश त्याने आपल्या डोक्याच्या बरोबर केंद्रभागी आणले. मग मान पूर्णतः मागे झुकवून नाकपुड्यांच्या रेषेत त्या अवकाशाकडे पाहण्यास सुरुवात केली. क्षण दोन क्षण गेले आणि त्या चित्रांच्या रांगोळ्यांचा रंग चमकदार निळा बनू लागला. आणखी थोड्या वेळाने त्याची चमक अल्पशी कमी होऊन त्यात हिरव्या रंगाची उधळण होऊ लागली आणि मग एकदमच त्याला ओरायन तारकासमूह जवळ आल्यासारखा भासू लागला.

तिथल्या मंदिराचे गणित बरोबर दहा हजार चारशे वर्षे जुने होते. मंदिरे नंतरच्या काळात बांधली गेली असली तरी त्यांचे स्थापत्य दहा हजार चारशे वर्षांपूर्वीच्या ओरायन तारकासमूहाच्या एका विशिष्ट स्थितीबद्दल भाष्य करणारे होते. धनुर्धारी आकृतीच्या हातात बाण सुरू होण्यापूर्वी त्याच्या खांद्याच्या जागी होते आज सापडलेले मंदिर. बेलाट्रिक्स, बेलाट्रिक, बेलाट्रिक्स. शब्द पुन्हा पुन्हा ऐकू आला आणि आलोपला पुढची गणिते मांडण्याची गरज वाटू लागली. पण त्याच्या मेंदूची स्थिती कुठलेही गणित करण्याच्या स्थितीत नव्हती. पायची व्हॅल्यू ३.१४ हे एक गृहितक त्याने आठवून ठेवले. मग आलोपला एकदमच भडभडून आले.

डोळ्यासमोरची दृश्ये दूर जाऊ लागली, वितळू लागली, डोक्याच्या उजव्या बाजूला कळा येऊ लागल्या. तो जमिनीवर बसला. त्याला उलटी करावीशी वाटत होती; पण तसे झाले नाही. कोरडे प्रयत्न करून मग तो जमिनीवर उकिडवा झोपला. त्याने आकाशाकडे पाहिले. आता तिथे काहीही असामान्य उरलेले नव्हते. ओरायनचे सर्व तारे आपापल्या ठिकाणी लुकलुकत होते. बेलाट्रिक्स तारा जरा जास्त प्रखर वाटत होता खरा. कुठल्याशा प्रमेयाची सांगड घालताना त्याच्या डोळ्यावर प्रचंड झोप येऊ लागली, तसा तो टेंटमध्ये शिरला आणि त्याने टेंट आतून व्यवस्थित बंद करून घेतला. त्या पूर्ण सुरक्षिततेत डावीकडे शाल्मली झोपलेली होती, तर उजवीकडे प्रयंक. दोघांच्या मध्ये जाऊन आलोप पहुडला. प्रयंककडे पाहत कसलासा विचार करीत त्याने स्वतःला जागे ठेवण्याचा प्रयत्न केला; पण ते झाले नाही. झोपेने त्याच्यावर वेगाने पकड घेतली. सकाळी टपरीवर भेटल्यापासून या क्षणापर्यंत पंधरा तास उलटून गेले होते. टेंटमध्ये ते तीन निरागस जीव सुखाने झोपी गेले होते. उद्या आपल्या नशिबात काय वाढून ठेवलेय हे कळण्याइतपत संवेदना सध्या त्यांच्या झोपलेल्या मेंदूकडे नव्हत्या. वरचे आकाश आता पूर्णतः काळे होऊन त्यात हळूहळू हलकीशी लालसर छटा मिसळायला लागली होती.

'टाईम प्रेझेंट आहे का? वेळेची गणिते वेगवेगळी. काही ठिकाणी वेळ फार संथ वेगाने चालतोय. चटकन पाहिले तर काही घडत नाही; पण शांतपणे एखादी प्रोसेस चालू असते- जसे कळीचे उमलणे. उघड्या डोळ्यांना कळीचे उमलणे स्पष्टपणे दिसणार नाही. त्यासाठी तिच्याकडे एकटक आठ तास पाहावे लागेल. पण हे झाले फक्त उदाहरण. या जंगलात फिरताना हरेक गोष्ट वेगवेगळ्या वेगाने चाललेली असते. झाडे अत्यंत संथपणे वाढत असतात, तर बिबळे वेगाने पळत असतात. माकडे एका क्षणी शांत असतात, तर दुसऱ्या क्षणाला वेगाने उडी मारून दुसऱ्या झाडावर जाऊन बसतात. तलावाकाठच्या बेडकांना काळाचे काही अस्तित्वही नसावे, जोपर्यंत माणूस तिथे जात नाही. आणि मग एकदमच शेकडो बेडूक पाण्यात पटपट उड्या घेतात. एखादी प्रोसेस नियमितपणे शांत चालू असते, तर एखादी प्रोसेस एकदमच वेगात येते आणि पुन्हा शांत होते, तर एखादी प्रोसेस सदैव वेगातच असते. म्हणजे मुंग्याची एक अविरत रांग लांबून पाहिली तर संथच वाटेल; पण एकदम जवळून पाहिली तर मुंग्या प्रंचड वेगात इकडून तिकडे जात असतात; किंबहुना संथपणा हा शब्दच त्यांना लागू करता येणार नाही. फोटो घेताना कॅमेऱ्याचा शटरस्पीड किती असावा, हे त्या ठिकाणी कितपत प्रकाश पडतोय आणि ज्या गोष्टीचा फोटो घेतला जातोय ती गोष्ट किती दूर आहे यावर ठरवू नये. जिवंत गोष्टींचा एक आपला वेग आहे. जिवंत गोष्ट फोटोतही जिवंत पकडायची असेल आणि त्याच्या जीवनावरच भाष्य करायचे असेल, तर कॅमेऱ्याचा शटरस्पीड त्या जीवनाच्या व्याख्येत बसायला हवा.'

शाल्मलीचे स्वप्न आणखी पुढे सरकत होते. कुठलासा मोठा पुरुष फोटोग्राफर कुठल्याशा मोठ्या समूहाला शटरस्पीडबद्दल समजावून सांगत होता आणि शाल्मली प्रेक्षकांत बसून ते ऐकत होती. हे स्वप्न पुढे सरकण्याअगोदर शाल्मलीच्या पोटात अस्वस्थ दुखरी कळ सुरू झाली. या अस्वस्थतेमुळे तिची झोप वेगाने मोडू लागली. दहा सेकंदांत तिला उठावेसे वाटले. पंधराव्या सेकंदाला ती पूर्णतः उठून बसली आणि कळ ताब्यात आली. तिचे लक्ष उजवीकडे गेले. प्रयंक आलोपच्या कुशीत एकाच दिशेला तोंड करून झोपला होता. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव बापाच्या पोटात झोपल्यानंतर लहान मुलाच्या चेहऱ्यावर असणाऱ्या मुलासारखे होते की प्रियकराच्या कुशीत झोपल्यानंतर प्रेयसीच्या चेहऱ्यावर असतात तसे होते, याबद्दल शाल्मलीचे एकमत होईना. काही क्षण शांत बसून राहिल्यानंतर शाल्मलीच्या पोटात पुन्हा थोडी अस्वस्थता निर्माण झाली. शक्य तेवढे हळुवार पण शक्य होईल

तेवढ्या लवकर ती टेंटच्या बाहेर आली. शौचविधीसाठी टेंटपासून ती बरीचशी दूर झाडांच्या आडोशाला बसली. तिला प्रचंड वेगाने जुलाब झाले. इतके जास्त की, पोटात काही एक उरले नाही. सर्व प्रोसेस आटपेपर्यंत तिच्यात कसलेही त्राण उरले नव्हते. आपण परत टेंटकडे पोहोचू की नाही, इतपत भीती तिला वाटत होती. पण थोडे बळ एकटवून ती पुन्हा टेंटकडे परतली. तोपर्यंत आलोप आणि प्रयंक उठून शेकोटीवर हात शेकत सिगारेट पीत बसले होते.

'आर यू ओके?'

'आलोप.....'

'डायरिया?'

फक्त मानेनचं 'हो' करीत शाल्मली मटकन खाली बसली. आलोपने बाजूला काढून ठेवलेल्या बॅगमधून ओआरएसचे पाकीट काढले. ते बिस्लेरीच्या एका छोट्याशा सीलबंद बाटलीचे झाकण उघडून तिच्यात ओतले, पुन्हा झाकण लावून व्यवस्थित हलविले आणि पुन्हा झाकण खोलीत शाल्मलीकडे दिले. शाल्मली ते घटाघट प्यायली. तिच्याकडे थोड्याशा काळजीने आणि थोड्याशा आश्वासकतेने पाहत प्रयंक म्हणाला

'डोंट वरी! आयोवास्कानंतर हे होतेच. यू हॅव टु पे अ लिटल प्राईज. आय हॅव अ मॅजिकल सोल्युशन दो'

'व्हॉट इट इज'

'जस्ट गो इन टेंट अगेन अँड रिलॅक्स फॉर अ व्हाईल. आय विल कॉल यू'

शाल्मली टेंटमध्ये जाऊन नुसतीच असहाय पडून राहिली. जास्त हालचाल न केल्याने थोड्या वेळात तिला जरा शक्ती येऊ लागली. तोपर्यंत प्रयंकने शेकोटीत सोबत असलेल्या भांड्याचा जुगाड करून त्यावर काही ब्रेड भाजून घेतले. मग प्लॅस्टिकच्या कंटेनरमधले निरनिराळे ऐवज वापरून त्याने चीज सँडविच, जॅम बटर, ब्रेड बटर, न्युट्रेला स्प्रेड अशी नानाविध कामचलाऊ सँडविचेस बनविली. कंटेनरच्या झाकणात ते सगळे ठेवून तो टेंटमध्ये गेला. शाल्मलीला काही खावेसे वाटत नव्हते; पण समोर असलेली इतकी व्हरायटी पाहून पहिल्यांदा चीज सँडविच खाल्ले आणि नंतर न्युट्रेला सँडविच. या दोनवर तिची वासना भरली. पोट मात्र पूर्ण भरले नाही.

'तुला काही तिखट खावेसे वाटतेय का?'

शाल्मलीला नेमके उत्तर काय द्यावे ते माहीत नव्हते. पाणी पिऊन झाल्यानंतर तिचे तोंड वेगाने ओशट होऊ लागले होते. तिला काही खाण्यापेक्षा तातडीने ब्रश करावे असे वाटत होते.

'प्रयंक तुझ्याजवळ एक्स्ट्रा टुथब्रश आहे का?'

'सॉरी'

'तुझा ब्रश वापरला तर चालेल?' शाल्मली एकदमच गरजू आणि जवळची असल्याप्रमाणे बोलून गेली. प्रयंक याचे उत्तर काय देईल याची मात्र तिला अजिबात कल्पना नव्हती. प्रयंकने कोपऱ्यात ठेवलेल्या त्याच्या बॅगमधून पेस्ट काढून शाल्मलीकडे पास केली; मग दुसऱ्या कप्प्यातून इलेक्ट्रॉनिक टुथब्रश काढून त्याने तो ऑन केला आणि तसाच शाल्मलीकडे दिला.

'युज इट ओन्ली अॅज टुथब्रश' असा न समजणारा विनोद करून तो टेंटबाहेर निघून गेला. शाल्मली तो ब्रश ऑफ करीत सावकाश बाहेर आली. ती व्यवस्थित उभी राहू शकत होती. कोपऱ्यात जाऊन तिने दात घासले आणि परत येऊन कोपऱ्यात ठेवलेल्या पिण्याच्या पाण्याच्या बॉटलमधले थोडेसे पाणी घेऊन चूळ भरली. तिच्याकडे पाहून आलोप वा प्रयंक काही बोलले नाहीत, तसे भीड चेपून मग व्यवस्थित खळखळून तोंड धुवुन घेतले. तिला आता बरेचसे फ्रेश वाटत होते. तिच्याकडे पाहत मग आलोपही फ्रेश व्हायच्या कामाला लागला. प्रयंकने शाल्मलीकडून आपला उष्टावलेला ब्रश परत घेऊन पर्वा न करता वापरला. तोंड धुवून ताजेतवाने झाल्यानंतर तिघेही समोरच्या खडकावर जाऊन उभे राहिले. सूर्य क्षितिजाच्या एक फूट वर आला होता. दहा-पंधरा मिनिटांनंतर त्याच्याकडे थेट पाहणे शक्य नव्हते. तिघांनीही तो सहन करता येणारा सूर्य डोळ्यांत जमेल तेवढा साठवून घेतला. आलोपने शेवटच्या पाच सिगारेटमधली एक सिगारेट पेटवली. तिघे आळीपाळीने झुरके घेत थोडा वेळ तसेच उभे राहिले. मग प्रयंक नाश्ता बनवायला लागला. आलोप आणि शाल्मली झऱ्याकडे गेले.

झऱ्याचे पाणी वाहते होते; पण त्याला फारसा वेग नव्हता. घोटाभर पाय बुडतील एवढीच खोली होती. चुकून काही ठिकाणी प्रवाह जरासा अर्धा-एक फूट खोलवर होत होता. आलोप झऱ्याच्या काठाने कुठल्याशा शोधात चालत राहिला. त्याच्यापाठोपाठ शाल्मलीही चालली होती. अजून थोडे पुढे गेल्यानंतर एके ठिकाणी आलोप थांबला. तिथे त्या झऱ्याचे एका डोहात रूपांतर होत होते. पलीकडे परत उथळ होत होत तो झरा खोल जंगलाच्या दिशेने जात होता. आलोपने फोनमधले कंपास अॅप चालू करून दिशा व्यवस्थित मोजल्या. काहींचे स्क्रिनशॉट घेऊन अजून त्याभोवती वर्तुळे रंगविली. आलोप त्या मार्गाचा विचार करीत उभा होता, तोपर्यंत शाल्मली त्या पारदर्शी पाण्याच्या कडेला गुडघाभर उतरली आणि अगोदर तोंड, मग मान आणि हात-पाय खसाखसा धुवू लागली. तिचे लक्ष पाण्यात असतानाच आलोप म्हणाला

'डु यू माइंड इफ आय टेक माय क्लोथ्स ऑफ? मला पोहावेसे वाटतेय. शिवाय जरा फ्रेश वाटेल'

या प्रश्नाला एरवी अनेक उत्तरे आली असती; पण शाल्मलीने सहजच मानेने नकार दिला. एका सुलभ भावनेतून मग आलोप पूर्ण नग्न होऊन त्या पाण्यात डुंबू लागला. व्यवस्थित पोहता येईल इतपत पाणी खोल होते.

'वॉन्ना जॉईन?' आलोप सहजतेने काठावर उभ्या शाल्मलीला म्हणाला

'नो, नॉट नाऊ- आत्ता नको' असे शाल्मली सहजतेने म्हणून गेली. याचा नेमका अर्थ मात्र तिच्या लक्षात आला नाही. ती आलोपकडे पुरुष म्हणून पाहत होती की आणखी काय म्हणून, हे

तिला समजले नाही. पण कुठल्यातरी प्रतिक्षिप्त क्रियेने आपली उत्तरे येत आहेत, हे तिला जाणवले. एव्हाना सूर्य बराच वरती येत झाडांच्या मधून त्या तळ्याच्या पाण्यावर पिवळसर प्रकाशाचे तरंग निर्माण करीत होता. आलोपचे डुंबून झाले आणि सहजतेने तो पाण्याबाहेर आला आणि कपडे घालून शाल्मलीच्या मागे परत जायला लागला.  आलोप आणि प्रयंकला भेटून शाल्मलीला जवळजवळ चोवीस तास झाले होते. कालची हॉटपँट आणि रेसरटॉप घातलेली हॉट तरुणी आता ट्रॅक पँट आणि विटका ढगळ टी-शर्ट घालीत कुठलेही खोटे भान न ठेवता पटपट चालत होती. तिच्या स्पोर्ट शूजचा मात्र बराच फायदा झाला होता.

'नाश्ता ग्रँड झालाय हा अंकल' आलोप आणि शाल्मली परतून जवळ पोहचताना प्रयंक म्हणाला.

'लेट्स ईट' शाल्मली आतुरतेने म्हणाली.

नाश्ता बराच आकर्षक होता. अंडा भुर्जी, ओटमिल, ऑप्शनल ब्रेड आणि जॅम वगैरे. शिवाय रेडीमिक्स एकत्र करून प्रयंकने कॉफीदेखील छान बनविली होती. नाश्ता संपत आला तसा प्रयंक म्हणाला.

'वी आर आउट ऑफ रेशन. काही शिल्लक राहिलं नाही. दुपारी जेवायला काही खास बनणार नाही. मे बी संध्याकाळी परत जाऊ'

'तू खाण्याचाच विचार कर' अल्पशा रागाने आलोप म्हणाला.

'आय कॅन गो विदाउट फूड फॉर थ्री डेज. यू नो दॅट. इटस जस्ट....'

त्याचा रोख शाल्मली बरोबर असल्याने लवकर संपून गेलेल्या अन्नपदार्थांबद्दल होता. झऱ्यातले पाणी उकळून पिऊन मुक्काम वाढविणे शक्य होते. अजून बरेच काही करता येण्यासारखे होते. गरज पडली तर झाडांवर चढून पक्ष्यांची अंडी चोरून आणण्यातही आलोप बराच हुशार होता. पण सगळी अंडी चवीला चांगलीच असतील असे नाही; आणि सगळे सेफच असते असेही नाही. जंगलात एकदा जवळचे अन्नपदार्थ संपले तर शक्य तितक्या लवकर तिथून बाहेर  पडायचे हा मूलभूत नियम प्रयंक आणि आलोप दोघेही अनुभवाने पाळत होते. एका अर्थाने परिस्थिती थोडी वाईट होती; पण तुडुंब केलेला नाश्ता, अंगावर पडणारी उन्हे आणि कालचा शोध बराचसा आश्वासकच होता. आलोप  टेंटमध्ये जाऊन नोटबुक आणि पेन घेऊन आला. रात्रीची पायची व्हॅल्यू ३.१४ हा क्ल्यू त्याने व्यवस्थित लक्षात ठेवला होता. त्याने पेन्सिल घेऊन नोटपॅडमध्ये ओरायनची आकृती काढली. धनुर्धाऱ्याच्या पायापासले दोन तारे म्हणजे  सैफ आणि रिगेल यांची मंदिरे त्याला कधीच सापडली नव्हती. कंबरेच्या भागातली तीन मंदिरे अगोदर सापडली आणि खांद्यांच्या भागाकडचा एक बेलाट्रिक्स जर असला, तर तो काल सापडला होता. त्याने बाणाचे टोक कुठपर्यंत पोहोचेल  त्याचा अंदाज घेत सात डिग्री अंशांवर पायचा क्यूब घेऊन पाहिला. त्या अंतराच्या दृष्टीने परिसराचा अभ्यास केला तर त्या बाणाच्या टोकापाशी डोंगर संपून नवापूर लागेल, अशी शक्यता होती. सपाट भाग. नवापूरमध्ये ते मंदिर शिल्लक असण्याची शक्यता नव्हती. असले तर ते जगप्रसिद्ध होईल इतपत ते मंदिर सुंदर आणि मोठे असायला हवे होते. आलोप मग विरुद्ध दिशेला सात डिग्री अंशावर विचार करू लागला. खिशातला मोबाईल काढून मग त्याने  कंपासमधली आकडेमोड तपासली. 'बिटलगीज' तो मनाशी पुटपुटला. त्याने काल सापडलेल्या मंदिराची एक खूण ताऱ्याच्या ठिकाणी केली. काल तिथे दिसलेले तळे आणि आपण नेहमी पाहतो तो झरा एकाच मार्गावर असल्याचे  गृहितक त्याने मांडले. या हिशेबाने त्याला अपेक्षित असलेले मंदिर कँपसाईट किंवा अगोदर सापडलेल्या तिसऱ्या मंदिरापासून समान अंतरावर होते. अगोदर माहीत असलेल्या तीन मंदिरांतल्या पहिल्या मंदिरापासून तो सरळ आग्नेयेकडे चालत शेवटच्या मंदिरापर्यंत पोहचू शकत होता किंवा मग बेलाट्रिक्सपर्यंत जाऊन दक्षिणेकडे सरळ जात पोहोचू शकत होता. बेलाट्रिक्सच्या मंदिरापासून संभाव्य शेवटचे मंदिर तसे बरेच जवळ असणार होते; पण तिथे  जायला रस्ता मिळाला तर. अगदी सुरुवातीच्या निर्माणकार्यातही रस्ता धनुर्धाऱ्याच्या कमरेच्या तीन मंदिरांपैकी पहिल्या मंदिरापासून थेट बिटलगीजपर्यंत जात असेल तर त्यापासून बेलाट्रिक्सपर्यंत पोहचण्यासाठी वाट असायलाच हवी, असे बंधन  नव्हते. याहीपेक्षा महत्त्वाचे होते ते धनुर्धारी आकृतीचे शिर. त्या त्रिकोणी आकृतीच्या जागी समोर मोठा पर्वत होता. त्रिकोणीच. त्याला वर चढण्यासाठी कुठलाही ज्ञात रस्ता नव्हता. त्याच्या शिराशी जर ते मंदिर असेल, तर ते  शोधण्यासाठी अजून एक वर्षही गेले असते किंवा मग प्रोजेक्ट पुन्हा एकदा सोडून द्यावा लागला असता. रात्रीच्या अनुभवातला प्रखर तारा त्याला आठवू लागला. योगायोगाची शक्यता आणि नशिबाचा भाग असलाच तर तो  'बिटलगीज' ताऱ्यातच होता. सध्या हेच गृहितक धरून पुढे जाणे शक्य होते. थोडा वेळ आणखी विचार करून मग तो म्हणाला.

'ओके गाईज. कालच्या पॉइंटपासूनच पुढे जायचेय. मग त्या दोघांजवळ जाऊन त्याने त्यांना आकृती समजावून सांगितली. मूळ संशोधनातल्या शक्याशक्यता शाल्मलीला माहीत नसल्याने, आपण जातोय ते स्थळ असणारच असा  काहीसा विश्वास वाटला. आलोप अजूनही बराचसा साशंक होता. आवरसावर करून आणि टेंट व्यवस्थित बंद करून ते तिघे पुन्हा कालच्या मंदिराकडे जायला निघाले.

त्या तिघांना पुन्हा त्या मंदिरापाशी पोहोचायला आज एक तासाहूनही कमी वेळ लागला. पुढचे संशोधन अर्ध्यावर सोडून द्यावे लागले तरी पुढे कधीतरी या टोकापर्यंत येण्यासाठी काय काय करावे लागेल, याचे गणित आलोप असेही करीतच होता. कालच्या शोधानंतर आजची व्हिजिट तशी कमी उत्सुकतेची होती. ते तिघे

पुन्हा मंदिरात शिरले. ते कामुक शिल्प पुन्हा एकदा डोळाभरून पाहिल्यानंतर आलोप भिंतीवरच्या नक्षीवरून काही तर्क बांधता येतील का, याचा प्रयत्न करीत होता. एक एक गूढ उकलत जावे त्याप्रमाणे तर्कांचा एकरेषीय खेळ सुरू झाला. थोड्या वेळासाठी त्या मंदिराचे नगररचनेत स्थान काय असू शकेल याचा अर्थ आलोप लावत होता. मंदिर फक्त मनोरंजनासाठी बांधले गेले आहे असे म्हणणे तितकेसे बरोबर नव्हते. सेक्सच्या भावनेचे प्रचंड उदात्तीकरण केल्यास त्यातून प्रसवलेली कला ही अतिशयोक्तीकडे झुकणारी असते. या मंदिरातली शिल्पे वास्तव होती. त्यात मांडलेले वास्तव एरवी सभ्य समाजाच्या दृष्टीने अश्लील होते; पण त्यात पाळलेली सटीकता बघता, त्या काळात सेक्सकडे पाहण्याचा दृष्टिकोन सार्वजनिक निषेधाचा नव्हता. समोर असलेले शिल्प अर्थात पूजा करण्याची गोष्ट तर नव्हती; पण मग त्या शिल्पाचा त्या काळाच्या अध्यात्माशी काय संबध असेल, हा एकमेव प्रश्न मग आलोपला पडला. मंदिरे देवांची असतात, मंदिरे नैसर्गिक शक्तीला देवाची उपमा देऊनही बनविलेली असू शकतात. कोणार्कमध्ये सूर्याचे मंदिर आहे, चीनमध्ये चंद्राचे मंदिर आहे; पण आकाशातल्या राशिमंडलांवर आधारित जमिनीवरच्या भव्य निर्माणाला जगाने अजूनही स्वीकारलेले नाही. राशिमंडलाच्या एकाच ताऱ्याचे स्वतःचे असे व्यक्तिमत्त्व असू शकेल? विचार करता करता आलोप पुन्हा सेक्समधले प्राचीन तत्त्वज्ञान आठवू लागला. आशियात केवळ नग्नता हा विषय घेऊन कुणीही मंदिरनिर्मिती केली नव्हती. त्यामागचे अर्थ गूढ होते आणि त्या त्या काळातल्या सेक्सच्या व्याख्येशी निगडित होते. सेक्स आणि राशिमंडलांवर आधारित परस्परसंबंध असणारी एकाहून जास्त मंदिरे बनविताना त्याच्या मागे दैवी शक्तींचा विचार करण्यापेक्षा तत्त्वज्ञान हा महत्त्वाचा गाभा होता. ही सर्व मंदिरे सेक्सच्या तत्त्वज्ञानावर आधारित आहेत, हे स्पष्ट होते.

'मला जरा वेळ आत एकटे बसू देता का?' आलोप दोघांना म्हणाला.

'या शुअर!' असे म्हणून प्रयंक बाहेर गेला. त्याच्याबरोबर शाल्मलीही गेली. असाही प्रसंग सिगारेट पिण्यासाठी अतिउत्तम झाला होता. शाल्मली अधूनमधून सिगारेट पिणे पूर्ण बंद करते, क्वचित दर दोन दिवसांआड पिते; फिरताना मात्र भरपूर सिगारेट्स लागतात.

ते दोघे बाहेर गेले तसा आलोप जमिनीवर मांडी घालून शांत बसला. त्या शिल्पाकडे एकटक पाहत, अगोदर पाहिलेल्या मंदिराचे चित्र आठवू लागला. अगोदरच्या मंदिराची पडझड झाल्याने आणि अवस्था जीर्ण झाल्याने, त्यातला क्ल्यू सापडणे तितकेसे सोपे नव्हते. त्या विच्छिन्न दगडांच्या आठवणीत, स्वतः केलेल्या काही संभाव्य ड्रॉइंग्जमधून आणि अडीच हजार वर्षांहूनही अधिक काळ जुने स्थापत्यशास्त्र यावर विचार करताना त्याला एक एक गोष्ट आठवू लागली. अगोदरच्या तीन मंदिरांतल्या पहिल्या मंदिरात फक्त बाह्य सौंदर्यावर विचार केला गेला होता. दुसऱ्या मंदिरात स्त्री-पुरुष एकत्र येऊन एकमेकांसमोर मुक्त विहार करीत होते. म्हणजे त्यात फक्त दृष्टीने उपभोगता येऊ शकणाऱ्या सौंदर्याचा विचार केला गेला होता. तिसऱ्या मंदिरात अर्थातच स्त्री-पुरुष या दोन स्पष्ट लिंगांचा विचार झाला होता. त्यांची प्रणयचित्रेही होती. त्यातल्या एका भिंतीवरचे प्रणयचित्र आणि या चबूतऱ्यावरचे प्रणयचित्र बरेचसे सारखे होते. कला विस्तारित होत गेली की विषयाचा आवाका विस्तारत गेला, याबद्दल मात्र काही दुवा मिळेना.

मग अचानकच आलोपला साक्षात्कार झाला.

'प्रत्येक मंदिराच्या भिंतीवर असलेले सर्वांत सुंदर शिल्प हे पुढच्या मंदिरात असलेल्या मुख्य शिल्पाचे आहे. म्हणजे अगोदरच्या मंदिराच्या भिंतीवर पुढच्या मंदिरात काय असेल याचा ट्रेलर दाखविण्यात आलाय. या अंदाजाला लगेच पुरावा देणे मात्र शक्य नव्हते. आलोप मग मंदिरातल्या भिंतीवरच्या शिल्पांकडे पाहू लागला. यांतले सर्वांत सुंदर शिल्प कोणते? आणि मला जे सर्वांत सुंदर वाटतेय ते इतरांनाही वाटेल का? त्याने प्रयंक आणि शाल्मलीला हाक मारली. ते दोघे वेगाने आत आले.

'ओके गाईज. तर तुम्हाला सस्पेन्स असलेले ॲडव्हेंचर आवडेल की सर्व शक्यता आत्ताच सांगू?'

'तितका वेळ नाहीये. आपण पुढे निघू. चालताना सांग'

'ओके. पण त्या अगोदर तुम्ही दोघे या भिंतीवरचे एकूण एक शिल्प व्यवस्थित पाहून घ्या. त्यांतले जे सर्वांत सुंदर वाटेल, ते मनात ठेवा. कुणालाही सांगू नका. आपण एक अडीच हजार वर्षापूर्वीचा खेळ खेळतोय'

'कुठला?' शाल्मलीने विचारले.

'तू पत्त्याची एक जादू पाहिलीय का? ज्यात जादूगार वेगाने सारे पत्ते आपल्याला दाखवतो आणि कुठलाही पत्ता निवडायला सांगतो.' आलोप

'हो. आणि तो आपण कुठला पत्ता मनात ठेवला होता ते बरोबर ओळखतो. इन्फॅक्ट व्हीडीओ आणि पिक्चरमध्ये जरी ही ट्रिक केली, तर ती वर्क होते,' शाल्मली

'येस. तर असेच तुमचे शिल्प तुमच्या मनात ठेवा. जेव्हा लास्ट मंदिर सापडेल त्याचा सेंटरपीस ते शिल्प असेल'

'आणि नसले तर?' शाल्मली

'नसले तर काय? काही नाही. मंदिर तर शोधू यात. पटकन पाहून ठेवा'

तिघेही शांत होऊन त्या भिंतीमधल्या कोरीव कामाकडे पाहू लागले. थोडा वेळ गेला आणि तिघांनीही आपापले शिल्प मनात घट्ट साठवून घेतले. सावकाश बाहेर येऊन मग आलोप मंदिराच्या मागच्या बाजूला गेला. तिथून पुढे रस्त्यासारखे काहीही नव्हते. ज्या पद्धतीने सर्व जमीन होती ती हरविणाऱ्या जागेकडे जाणारी वाटत होती. दोन-तीन वेळा मंदिराला घिरट्या घातल्यानंतर

आलोप एके ठिकाणी थांबला. डावीकडून एकदम समजून येणार नाही; पण सौम्य असा एक उतार होता. सततच्या जमिनीच्या धुपेमुळे तिथे उघडी पडलेली माती आजूबाजूच्या मातीपेक्षा किंचित वेगळी होती. 'ओके गाईज धिस वे. स्टे टुगेदर' अशी सूचना देत आलोप त्या दोघांच्या पुढे सावकाश रस्ता काढत जायला लागला. त्याचा अंदाज बरोबर होता. पुढे तो उतार वाढून एका दरीच्या दिशेने जायला लागला. लवकरच ते एका अशा ठिकाणी येऊन पोहोचले, ज्याच्या पुढे जाणे शक्य नव्हते. त्यांच्या समोर खालच्या दिशेने एक दरी होती; पण तिचा अंतर्गत भाग सपाट होता. तो पाहिल्यावर आलोपच्या काळजात धस्स झाले; कारण ती सपाट दरी आजच्या काळातली एखादी शेती असू शकत होती. याचाच अर्थ, अडीच हजार वर्षांपूर्वीचे शेवटचे मंदिर शोधण्याच्या नादात त्यांनी सातबारावर असलेल्या एखाद्या शेतकऱ्याची जमीन शोधली होती. आलोपने आजूबाजूला पाहिले. तिथे मानव वस्ती अथवा इतर काही असण्याची शक्यता फार कमी होती. कारण पूर्ण परिसर पूर्णतः चिंचोळ्या डोंगरांनी वेढलेला होता. त्या सपाट दरीत थेट उतरणे मात्र शक्य नव्हते. दोघांना तिथेच थांबायला सांगून आलोप त्या कठड्याच्या कडेकडेने जात राहिला; पण त्याला काहीही रस्ता सापडेना. तो पुन्हा परत पहिल्या ठिकाणी येऊन थोडा विसावला. आलोपला खाली बसल्याचे पाहून नेमके काय करायचेय हे विनासंभाषण कळल्याने प्रयंक आलोप गेला होता त्याच्या विरुद्ध दिशेला कठड्याचा आसपास चालत शोधायला गेला. प्रयंकचा मार्ग आलोपच्या तुलनेत सोपा होता; पण ते प्रयंकला माहीत नव्हते. अजून थोडा वेळ गेल्यानंतर प्रयंकला पुन्हा उभा डोंगर लागला. तिथून पुढे जाणे शक्य नव्हते. शिवाय डोंगराच्या आकारात बऱ्याचशा नैसर्गिक गुहा तयार झालेल्या होत्या. त्यात विचित्र प्राणी दबा धरून असण्याची शक्यता असल्याने, प्रयंक अजून जवळ गेला नाही. एके ठिकाणी त्याला एक दरड आढळली, जी कधी काळी वरतून कोसळली असेल किंवा नेहमी त्याच ठिकाणी राहिली असेल; हे समजायला मार्ग नव्हता. दरडीच्या शेजारी वाळव्यांचे एक प्रचंड मोठे वारुळ होते. विशेष काही हाती न लागल्याने प्रयंक परतीकडे निघाला. चालताना मार्ग विसरून, छोट्या-मोठ्या चुका करून मूळच्या ठिकाणी परत आला. तो परत येईपर्यंत आलोप दुसऱ्यांदा जाऊन इतरही परिसर पाहून आला होता.

'काय मिळालं तुला?' पोहोचता क्षणी आलोपने प्रश्न विचारला.

'काही विशेष नाही. झाडी विरळ आहेत. पण पुढेही डोंगरच आहे. शिळा वगैरे पडलेल्या होत्या. डोंगरात गुहादेखील असाव्यात.'

'अजून?'

'अजून काही नाही.' इतके सांगून प्रयंक खाली बसला. आता त्यांच्याकडे तीनच सिगारेट उरलेल्या होत्या. प्रयंकने सावकाश त्यांतली एक काढली आणि एका अस्पष्ट अनुमतीसाठी आलोपकडे पाहिले. आलोपनेही अस्पष्ट संमती दिली. प्रयंकने सिगारेट पेटवली. दोन झुरके घेऊन ती शाल्मलीकडे दिली. तिने दोन झुरके घेऊन ती आलोपला दिली. सिगारेट पिताना शाल्मलीच्या हातावर आलोपला एक पांढरट कीटक दिसला. तो पाहून त्याने शाल्मलीला तो झटकायला लावले. हे पाहत असताना कुठल्याशा प्रतिक्षिप्त क्रियेत प्रयंक सहजच बोलला

'तिथे वाळव्यांचे मोठे वारूळ आहे. एंडला'

'एंडला?'

'हो म्हणजे डोंगर सुरू होतो तिथे'

'वाळवी शक्यतो पठारावर वारूळ बनवते रे; तू मुंग्यांचे वारूळ पाहिले असशील'

'कमॉन आलोप, वाळवी नाही का कळणार यार मला?'

सिगारेट शाल्मलीकडे देत आलोप जागचा उठला. 'लेट्स गो देअर.' तिघेही प्रयंकच्या पाठोपाठ तिकडे निघाले. पुन्हा काही चुका झाल्या; पण एका प्रयत्नानंतर त्यांना कडेपर्यंत जाता आले. मघाशी प्रयंक जिथे उभा होता तिथेच तिघेही उभे राहून पुन्हा एकदा त्यांच्या संपलेल्या आशेकडे निराशेने पाहत होते. शाल्मलीची त्या डोंगरावर चढून पलीकडे जाण्याची इच्छा होती. तिने ती आलोपला बोलून दाखवली. त्याकडे व्यवस्थित लक्ष न देता हातात एक काठी घेऊन आलोप त्या वारुळाकडे गेला. वारूळ जुने असू शकते. भुसभुशीत वाटत असले तरी पाचशे, हजार, तीन हजार वर्षेही जुने असू शकते; आणि त्यातल्या काही प्रजातींच्या मुंग्या वा वाळवी प्रचंड विषारी असू शकतात. आलोप वारुळापाशी पोहोचला. शक्य तेवढा पाय हलका ठेवून त्याने वारुळाच्या जमिनीवर चालणे सुरू केले. पायाखालच्या जमिनीतली मुंग्यांची जागा प्रत्यक्ष दिसणाऱ्या वारुळाच्या टोकापेक्षा कितीतरी मोठी असू शकते. आतल्या जिवांना चाहूल न लागू देता आलोप पुढे सरकून वारुळाच्या टोकांकडे बघत अंदाज घेण्याचा प्रयत्न करीत होता. मग अचानकच त्या वारुळाच्या कुठल्याशा छिद्रातून सूर्यप्रकाश येतो आहे असा भास त्याला झाला. नीट पाहिल्यावर आणखी एक-दोन ठिकाणांहून सूर्यप्रकाश येत असल्याचे दिसले. त्याने हातातल्या काठीने त्या छिद्रांची भोके मोठी केली. त्यात समोरचे निळे आकाश दिसेल इतपत मोठी केली. आतून वाळवीचा समूह बाहेर येऊ लागला. वाळवी विषारी होती; पण सौम्य विषारी. अंगाला लागली तर खूप खाज येईल अशी; पण ते तेवढेच. आलोप वेगाने मागे आला. हातातली काठी सोडून दोन-चार हातात बसतील असे दगड घेतले आणि पुन्हा मघाच्या ठिकाणी जाऊन त्या वारुळावर एका विशिष्ट ठिकाणी वेगाने मारले. ती पोकळ जागा फुटून त्यातूनही वाळव्या बाहेर यायला लागल्या. त्याच्याकडे पाहून प्रयंक आणि शाल्मलीही दगड घेऊन तिथे गेले, आणि त्यांनी त्या वारुळावर जणू राक्षसी हल्ला पुकारला. दहा मिनिटांच्या द्वंद्वानंतर त्यांच्यासमोर दहा फूट लांबीचे एक भगदाड होते. त्या भगदाडाच्या आजूबाजूच्या जागेत कोरीव काम केलेले

होते. आत्ता भुयारी मार्गासमान वाटणारा तो भाग पुढच्या मार्गाचा दरवाजा होता.

तिथून पलीकडे जाण्यासारखा रस्ता बनविण्यात जवळजवळ एक तास गेला. अंगावर चढलेल्या काही वाळवीमुळे खाजही यायला लागली; पण एका प्रचंड ध्येयाने ते तिघे भुयारी मार्गाच्या पहिल्या पायरीवर उतरले. एकूण तीन पायऱ्या होत्या. त्यानंतर वीस मीटरवर भुयार संपून फक्त उताराचा रस्ता लागला. अगोदरच्या मार्गांमध्ये रस्ता आहे की नाही याबद्दल एकमत होत नव्हते; हा रस्ता मात्र पूर्णतः रस्ताच होता. हजारो वर्षांपूर्वी बांधलेल्या त्या रस्त्यावरून काही दशके वा शतकांनी माणसे पुन्हा एकदा पायी चालत होती. अजून पुढे चालत राहिल्यानंतर एक सपाट भूभाग सुरू झाला. पुढच्या काही पावलांत त्या रस्त्याला समांतर जाणारा एक संथ वाहणारा पण पाणी बरेच असणारा एक प्रवाह येऊन मिळाला. कदाचित हा तोच प्रवाह होता, कदाचित नाही. प्रवाहाला लागून असणाऱ्या त्या रस्त्यावरून चालताना मघाशी पाहिलेले ते पठार आता डाव्या बाजूला दिसत होते. कुठलासा साक्षात्कार झाल्यागत आलोप मात्र पाण्याच्या दिशेने वेगाने चालत राहिला. मगे एके ठिकाणी येऊन त्या प्रवाहाचे एका मोठ्या तळ्यात रूपांतर झाले.

एक सपाट पठारावरचे तळे. त्याचा काठ बांधीव असल्यासारखा होता. आजूबाजूला झाडी नव्हती; पण पाण्यात बऱ्याचशा वनस्पती होत्या. चकाकणारे मासे होते; क्वचित लहानसहान पाणसाप आणि बेडूकही होते. त्यांना पाहून आलोपला पहिल्यांदाच भीती वाटली नाही. पृथ्वीवरच्या आदिम जीवसृष्टीची एका क्षणात कल्पना यावी, इतपत ते दृश्य मोहक होते. तो स्वर्ग होता का, या प्रश्नाचे उत्तर त्या तिघांच्या समोर होते. तळ्याच्या बरोबर मध्यभागी एक छोटेसे बेट दिसत होते आणि त्या बेटावर एक प्राचीन मंदिर होते- त्यांना अपेक्षित असलेले मंदिर त्या तळ्याच्या मधोमध कुठलेसे आदिम सत्य घेऊन उभे होते. जगातील सर्व तत्त्वांचे सार, वा मृत्यूचे रहस्य, वा जगतनियंत्याचे घर, किंवा मग सूर्यप्रकाशाचा अद्भुत खेळ करू शकणारी एखादी रचना... किंवा... किंवा मग त्यांनी मनात कल्पिलेले शिल्प...

त्या मंदिरात काय असेल हा प्रश्न विचारायला वेळ नव्हता. वेगाने अंगावरचे कपडे काढून आलोपने पाण्यात उडी मारली. त्या नितळ शांत हिरवट पिवळ्या पारदर्शी पाण्यात आलोप वेगाने पोहत त्या बेटाकडे चालला होता. अंगाला वरच्या भागातल्या कोमट झालेल्या पाण्याचा तर पोटाखाली आणि पायांना थंड पाण्याची जाणीव होत होती. तो मध्यापर्यंत पोहत गेल्याचे पाहून, मग प्रयंकने शाल्मलीकडे पाहिले. अवघ्या दोन सेकंदांत शेकडो सामाजिक प्रश्न तिथे तरळून गेले. नजरेला नजरेची भाषा कदाचित वेगाने समजली असावी, ज्यासाठी प्रयंक शाल्मलीकडे नजरेतून परवानगी मागत होता, ती क्रिया शाल्मलीने केली. आपले सर्व कपडे वेगाने उतरवून काठावर ठेवून तिनेही पाण्यात उडी घेतली; प्रयंकलाही मग वेळ लागला नाही. एकमेकांपासून पुढे-मागे एका अंतरावर पोहताना ते तिघेही सरळ रेषेत दिसणाऱ्या त्या बेटाच्या किनाऱ्याकडे पाहत होते.

किनारा जवळ आला आहे हे पाहून आलोपने पोहण्याचा वेग कमी केला. पायांना माती लागल्यानंतर मग तो सावकाश डुंबत हळूहळू उभा राहू लागला. मग काही क्षणांनी किनाऱ्यावरच्या उथळ पाण्यातून पळत तो जमिनीवर आला आणि जमिनीवर आल्यानंतर पळण्याचा वेग वाढवीत वेगाने त्या मंदिरात शिरला. काही क्षणांत तो मंदिराच्या आत होता. या वेळी मंदिराच्या भिंतीवर कुठलीही शिल्पे नव्हती; फक्त मजबूत भिंती होत्या आणि मध्यभागी एक चबूतरा होता. त्यावर माणसांच्या आकाराचे एक शिल्पही होते. एक स्त्री, एक पुरुष आणि आणखी एक पुरुष पूर्णतः नग्न होऊन संभोग करीत असल्याचे. आदल्या शिल्पाप्रमाणे त्यातही कुठेच अतिशयोक्ती नव्हती. त्या शिल्पात दिसणारी क्रीडा करता येण्यासारखी होती. जागच्या जागी थिजल्यासारखा उभा राहून आलोप त्या शिल्पाकडे एकटक पाहत होता. अगोदरच्या मंदिरात त्याला सर्वांत सुंदर भासलेले शिल्प हेच होते. त्या भव्य जादूच्या वातावरणात भारून गेल्यानंतर त्याची त्वचा प्रयंक आणि शाल्मलीची वाट पाहत होती. मिनिटभरानंतर प्रयंक मंदिरात शिरला. आणखी तीन मिनिटांनी शाल्मली. त्या शिल्पाकडे बघून ते दोघेही काही वेळ तसेच थिजले. मग सावकाश आलोप म्हणाला

'हेच होते का?'


'हो' प्रयंक आणि शाल्मली दोघेही एकदम उद्गारले.

या 'हो' नंतर दुसऱ्याच क्षणाला प्रयंक, आलोप आणि शाल्मली एकमेकांच्या बाहुपाशात स्थिरावले. अगदी समोरच्या शिल्पात दिसत होते तसेच!

**राहुल बनसोडे**
rahulbaba@gmail.com

# ।। द रोड ऑफ लॉस्ट इनोसन्स ।।

**सोमाली माम**
**अनुवाद : भारती पांडे**
**किंमत : ₹ १६०/-**




## । 'हा तुझा नवरा आहे' ।

सोच्छंदा -माम खोनची मोठी मुलगी आता शाळेची शेवटची परीक्षा देणार होती. आमच्या खेड्यात ही मोठीच कर्तबगारी होती. ती सतरा वर्षांची होती. ही परीक्षा म्हणजे साधारण जीसीएसई या परीक्षेच्या पातळीवरची होती असं म्हणायला हरकत नाही. (चौदा वर्षांची मी मात्र अजून प्राथमिक शाळेतच होते.) घरात मोठाच उत्साह होता. कारण सोच्छंदा जर ही परीक्षा उत्तीर्ण झाली असती तर पुढच्या शिक्षणासाठी जाऊ शकली असती. एका खेडवळ मुलीच्या दृष्टीने ही फारच मोठी गोष्ट होती.

ही राष्ट्रीय पातळीवरची परीक्षा होती. ती कामपाँग चाममध्ये- प्रांताच्या राजधानीमध्ये घेतली जात असे. थ्लॉक छ्रॅयपासून सायकलने गेलं तर साधारण तीन तास लागायचे. मग आम्ही सर्वांनीच आईबरोबर जायचं आणि रस्त्यात आईच्या एका मावशीच्या घरी रात्र काढायची असं ठरलं.

त्या रात्री या 'आजीच्या' घरी सोफन्नाने मला उठवलं आणि खालच्या मजल्यावर आई आणि आजीचं बोलणं चाललं होतं ते ऐकायला सांगितलं. आईचं नशीब चांगलं म्हणून तिला इतका चांगला नवरा मिळाला असं आजी म्हणत होती. पुढे आमच्या कानावर जे काही पडलं त्यानं आम्ही भांबावूनच गेलो. आई जेव्हा लहान होती तेव्हा तिच्या सावत्र आईने – बहुधा तिच्या वडिलांच्या नकळत किंवा त्यांना माहीतही असेल, तिला शहरात नेऊन एका वेश्यागृहात तिला विकून टाकलं होतं. आईला खूप दु:ख सहन करावं लागलं होतं. बाबा गरीब होते. तरुण होते, पण त्यांचं आईवर प्रेम होतं. त्यांचं शाळेचं शिक्षण संपल्यावर त्यांनी तिला कैदेत ठेवलेल्या वेश्यागृहातून शोधून काढलं आणि तिची किंमत चुकवून तिला तिथून बाहेर काढलं.

हे सगळं ख्मेर रूजच्या कितीतरी आधी घडलं होतं. त्या फार फार जुन्या काळात जेव्हा आई आणि बाबा दोघंही तरुण होती. मला वाटतं १९५० च्या आसपास घडलं असावं हे. हे सगळं ऐकून सोफन्ना आणि मी पुरत्या गोंधळून गेलो. आणि रडायलाच लागलो. आमच्या आईने तिच्या भूतकाळाबद्दल आम्हाला कधीच काही सांगितलं नव्हतं. शक्यच नव्हतं तिला हे आणि आजही शक्य नाहीये. आजही आम्ही त्या काळाविषयी बोलत नाही.

मला वाटतं बायकांना वेश्या म्हणून विकून टाकायची रीत कंबोडियामध्ये फार काळापासून चालत आली आहे. लोक कर्जात बुडतात. सोपं असतं – १० टक्क्यांपेक्षा जास्तच व्याज दर महिन्याला भरावं लागत असलं तर कर्जात बुडून जायला फार वेळ लागत नाही. सावकाराचे लागेबांधे ज्या वेश्यागृहाशी असतील त्या ठिकाणी घरातली मुलगी गहाण ठेवली जाते आणि ती पैसे फेडत राहते. जेवणखाण, कपडालत्ता, औषधपाणी आणि मुख्य म्हणजे रंगरंगोटीचं सामान यांचा खर्च अर्थातच तिच्या कमाईतून कापून घेण्यात येतो. शिवाय आईवडील आणखी कर्ज काढतच असतात.

काही वेळा आईवडील मुलीला सरळ विकूनच टाकतात. म्हणजे त्यांची मुलीवरची मालकी त्या वेश्यागृहाकडे जाते, बस! बाराएक वर्षांची मुलगी तिच्या कुटुंबाला ५० ते १०० अमेरिकन

डॉलर्स मिळवून देऊ शकते. ती चांगली उजळ असेल आणि आईवडील चांगले हुशार असतील तर याहून अधिक पैसेही मिळू शकतात. तिला आणखी कुठेही विकायचा हक्क वेश्यागृहाकडे जातो. काही कुटुंबं सरळसरळ आपल्या मुलीला हे काम करायला फर्मावतात आणि मुली त्यांची आज्ञा पाळतात. कुटुंबीय मंडळी दर महिन्याला त्या वेश्यागृहात जाऊन तिची कमाई ताब्यात घेतात. आपल्या आईवडिलांची आज्ञा पाळणं आणि त्यांची काळजी घेणं हे मुलीचं कर्तव्यच असतं.

या सर्वाची कल्पना करणं अवघड आहे हे मला माहीत आहे. पण इतक्या साऱ्या वर्षांनंतर मी हे स्पष्ट सांगू शकते की, अनेक आईवडिलांच्या दृष्टीने या व्यवहारात भावनेचा काही संबंधच नसतो. त्यांची मुलं म्हणजे चालतीबोलती संपत्ती असते. एक प्रकारची पाळीव जनावरंच!

* * *

कामपाँग चामहून परत आल्याला साधारण महिना झाला असेल. एक दिवस सकाळी मी आजोबाला पैसे द्यायला गेले होते. मी परत निघाले तेव्हा त्यांनी माझा हात पकडला आणि फर्मावलं, 'तुझं सामान आवर आणि रात्री इथे ये.' मी त्यांनी सांगितल्याप्रमाणे रात्री घरी गेले. त्याची अवज्ञा करावी असं माझ्या मनातसुद्धा आलं नाही. त्या संध्याकाळी मी घरी गेले तेव्हा तिथे एक माणूसही होता. त्याच्याकडे बोट दाखवून आजोबा म्हणाला, ''हा तुझा नवरा आहे.''

मी कसलाच विचार करत नव्हते. सुन्न राहण्यात आता मी चांगलीच तरबेज झाले होते. त्या काळात माझ्या आयुष्यात काहीही घडलं तरी त्याबद्दल काही वाटायचंच नाही मला. मुलींनी त्यांच्या वडीलधाऱ्यांचं ऐकायचं असतं आणि मी तर आजोबाचं देणंच लागत होते. आजवर माझ्या आयुष्यात कितीतरी घटना घडून गेल्या होत्या. तशीच ही आणखी एक घटना होती. कदाचित आजोबाच्या घरातून सुटका होणार म्हणून मला थोडं बरंही वाटलं असेल. पण मला 'या' माणसाबरोबर जावंसं वाटत नव्हतं. एका मालकाकडून मी दुसऱ्याच्या ताब्यात जातेय. हे मला जाणवलं होतं.

आम्ही देवळात गेलो. ख्मेर रूजने पाडून टाकलेल्या बुद्धिस्ट पगोडाच्या जागेवर गावकऱ्यांनी उभारलेलं एक लहानसं गवताचं खोपटं होतं ते देऊळ म्हणजे. तिथे एक भटजी होते. पण आम्ही काही विधी वगैरे केलेच नाहीत. खरं म्हणजे लग्न म्हणजे एक समारंभ असतो, मेजवानी असते पण आजोबा माझ्या लग्नासाठी पैसे खर्च करणार नाहीत हेही खरं होतं. मी माझ्या शाळेच्या गणवेशाच्या स्कर्टमध्येच होते. आम्ही देवळातल्या आत्म्यांना फुलं वगैरे वाहिली आणि आम्हाला त्रास देऊ नका अशी त्यांची विनयपूर्वक मनोभावे प्रार्थनाही केली. कंबोडियामध्ये मृतात्म्यांना सतत संतुष्ट ठेवावं लागतं, नाहीतर ते मृतात्मे तुमच्या घरात येऊन तुम्हाला खूप त्रास देतात. भटजी म्हणाले, 'झालं तुमचं लग्न' आणि आमचं लग्न झालं.

माझा नवा नवरा माझ्यापेक्षा बराच मोठा होता. मी चौदा वर्षांची होते -तो पंचवीस-सव्वीसचा असावा. तो सैन्यात होता. उंचापुरा, सावळा, कुरळे केस, पांढरे दात, दिसायला बऱ्यापैकी; पण अतिशय हिंसक. मला त्या माणसाचा विचारही नकोसा वाटतो. आजोबा त्याचं देणं लागत होता, असं त्यानं मला नंतर सांगितलं. माझ्या नवऱ्याचं नाव होतं 'थान'; पण मी त्याला नेहमीच 'पौ' काका अशी आदरार्थी हाक मारायची. अशी हाक मारणं म्हणजे आपण त्या व्यक्तीचं श्रेष्ठत्व मान्य केलं आहे असं होतं.

लग्नानंतरच्या पहिल्या रात्री मी आजोबाच्या घरीच झोपले. माझा नवरा दुसरीकडे कुठेतरी झोपायला गेला. दुसऱ्या दिवशी माझा आजोबा आणि माझा नवरा यांच्याबरोबर मी छुपला जायला निघाले. माझ्या नवऱ्याची पलटण छुपमध्ये होती. छुप हे गाव आमच्या गावापासून सुमारे १२० किलोमीटर अंतरावर आहे. या प्रवासासाठी आम्हाला सबंध दिवस लागला. पहिल्यांदा नावेतून कामपाँगपर्यंत आणि पुढे ट्रकमधून.

निघण्यापूर्वी मी माम खोनच्या घरी गेले आणि आजोबाने एका माणसाशी माझं लग्न करून दिल्याची बातमी आईच्या कानावर घातली. ती म्हणाली, 'कदाचित यातच तुझं भलं असेल. तुला त्याच्याबरोबर जायलाच हवं. कुणी सांगावं, तुझ्या आजोबांबरोबर राहाण्यापेक्षा त्याच्याबरोबर राहून तुला अधिक सुख लागेल.' आम्ही त्याबद्दल कधीही बोलत नसलो तरी आजोबा मला किती वेळा मारायचा हे बहुधा तिला आणि बाबांना कळून आलं असेल.

* * *

रबराच्या मळ्यामध्ये माझ्या नवऱ्याची एक लहानशी झोपडी होती- लष्कराने बांधलेली. एकच रिकामी खोली – लाल मातीने भरलेली, एक चूल आणि झोपण्यासाठी बांबूचा एक ओटा.

लग्न या गोष्टीचा मला संतापच येतो. लग्न म्हणजे बायकांना तुरुंगात डांबणंच आहे. लग्नाच्या दिवशी मुलगी आपल्या आईवडिलांचं ऐकते आणि समारंभ संपला की, तिच्यावर बलात्कार होतो. कंबोडियामधल्या एखाद्या लहान मुलीला लैंगिक संबंधांविषयी काय माहीत असतं? शून्य! मला एका घटनेने या संबंधाची जाणीव झालेली असली तरीही मला त्याबद्दल काहीही- अगदी काहीही माहीत नव्हतं. त्या चिनी दुकानदाराने माझ्या शरीरात काय घातलं होतं हेही मला कळलं नव्हतं. फक्त त्याच्या यातना जाणवल्या होत्या आणि लग्नात हे असंच घडत असतं हे तर मला अजिबातच माहीत नव्हतं.

माझं हे अडाणीपण इतर मुलींपेक्षा काही वेगळं होतं असं मला वाटत नाही. एकदा शाळेत सैनिकी शिक्षणाचा वर्ग चालू असताना एक मुलगा एका मुलीच्या पाठीवर पाय देऊन गेला तर तिनं रडायलाच सुरुवात केली होती. तिला भीती वाटली होती की, ती आता गरोदर राहाणार. आम्ही सगळ्याच तशा होतो. लोक आपल्या मुलींना शिकवायचेच की, तुम्ही एखाद्या मुलाच्या हाताला

स्पर्श जरी केलात तरी तुम्ही गरोदर राहाल.

त्या पहिल्या रात्री, त्या बांबूच्या ओट्यावरच्या बिछान्यावर माझ्या नवऱ्याने माझ्यावर अनेक वेळा बलात्कार केला. मी जेव्हा त्याला विरोध करण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्यानं मला मारलं. माझे केस धरून त्याने मागच्या भिंतीवर माझं डोकं आपटलं आणि मग इतक्या जोराने माझ्या तोंडात मारली की, मी तडमडत मागच्या बिछान्यावर कोसळले.

सकाळ झाली. मला उठून स्वयंपाक करावाच लागला. घरात कुठल्याही प्रकारचं स्पष्टीकरण नव्हतं, दया किंवा लाज तर नव्हतीच. कधीही. आम्ही एकमेकांशी बोलत तरी कुठे होतो म्हणा –

मी काही सामान आणायला गावात जायची तेव्हाच मला इतर माणसं दिसायची. मी भाज्या, टोळ, सुके मासे असं शिजवायची. मी जे वाढायची ते तो खायचा. त्याला आवडलं नाही तर मार पडायचा.

तो माणूस – माझा नवरा – मला खूप वेळा मारायचा. कधीकधी त्याच्या रायफलच्या दस्त्याने – म्हणजे दोन्ही हातानी दस्ता उचलून माझ्या पाठीवर आपटायचा आणि कधी नुसत्या हातांनी मारायचा. त्याने त्याच्या हाताची नखं लांब आणि टोकदार अशी ठेवली होती. त्या नखांनी त्याने एकदा माझ्या गालावर एक खोल जखम केली होती. त्याने असं का केलं – मी हसत नसे म्हणून! मी त्याचं स्वागत करत नसे म्हणून! मी कुरूप होते म्हणून! त्याच्या भाषेत मी मृत्यूचा कवटीसारखा चेहरा होते म्हणून!

तो फार फार भयंकर होता. अनेक सैनिक तसे असतात. तो जेव्हा संतापलेला असायचा तेव्हा मी श्वाससुद्धा हलका हलका घ्यायची. उगाच त्याचं लक्ष माझ्याकडे जायला नको. कारण त्याचं डोकं फिरायला मोठं कारण लागायचं नाही. कधीकधी तो त्याच्या सैनिकी रायफलने माझ्यावर गोळी झाडून मला घाबरवायचा. सुरुवातीला त्याची इच्छा पूर्ण झाली. त्याने असं केलं की मी खूप घाबरून जायची. पण नंतर नंतर मला त्याचं काहीच वाटेनासं झालं. मी मेल्यातच जमा होते. तो माझ्यावर बलात्कार करत असताना मी अदृश्य होण्याचा प्रयत्न करायची.

हे असं माझं आयुष्य होतं. घरातली गुलामगिरीच एक प्रकारची. मी याबद्दल कधीच कोणाशी बोलले नाही. आमच्या घराच्या आजूबाजूला इतरही घरं होती. त्या घरांमध्ये आणखी काही सैनिक आणि त्यांच्या बायका राहत होत्या. पण अशा गोष्टींविषयी कोणी कोणाशी बोलत नाहीच कधी. कंबोडियामध्ये एक म्हण आहे, घराबाहेरच्या आगीला घरात येऊ द्यायचं नाही आणि घरातल्या चुलीतली आग घराबाहेर जाऊ द्यायची नाही. घराच्या आत काय घडतं त्याबद्दल बाहेर बोलायचं नसतं. कदाचित इतर बायकांनाही अशीच मारहाण सोसावी लागत असेल. त्याचं प्रमाण कमी-जास्त असेल कदाचित; पण माझ्या देशात मारहाण अगदी रोजचीच गोष्ट आहे.

* * *

माझा नवरा ख्मेर रूजशी लढण्यासाठी बऱ्याच वेळा बाहेरगावी गेलेला असायचा. रबराच्या मळ्यांवरचं नियंत्रण हातचं घालवणं सरकारला परवडण्यासारखं नव्हतं. त्यामुळे त्या विभागात खूप सैनिक तैनात केलेले होते. तसा तो गेला की, लवकरच माझ्याजवळचे पैसे संपून जायचे. मला खायलाही काही नसायचं. तो परत केव्हा येणार याचीही काही कल्पना नसायची. थ्लॉक छ्रॉयला परत जाणं अशक्य होतं. आजोबाने तर मला चोपून काढलंच असतं आणि परत आल्यावर नवऱ्यानंही बेदम मारलं असतं हे मला पक्कं ठाऊक होतं.

छुप गावाचे दोन भाग होते. एक खुद्द गावाचा आणि दुसरा रबराच्या मळ्यांचा भाग. जिथे मी राहत होते आणि जिथे लष्करी आवार आणि दवाखाना होता तो भाग. दवाखान्यात जखमी सैनिकांची कायम गर्दी असायची. शिवाय शेतात काम करत असताना भूसुरुंगांचा स्फोट होऊन हात किंवा पाय जबर जखमी झालेले गावकरीही याच दवाखान्यात यायचे. भूसुरुंग तर सगळीकडेच होते. पूर्वी ख्मेर रूजने हे सुरुंग सगळीकडे पेरले होते. आता ख्मेर रूजचे लोक रबराच्या मळ्यांमध्ये येऊ नयेत म्हणून सरकारी सैनिकही भूसुरुंग पेरत होते. कदाचित व्हिएतनाम युद्ध संपलं तेव्हा अमेरिकेने कंबोडियावर जे बॉंबहल्ले केले त्यातले शिल्लक राहिलेले बॉंबही असतील ते. दवाखान्यात काम करायला कोणीही तयार नसायचं. विशेषत: रात्रीच्या वेळी तर नाहीच. तब्बल तेरा किलो तांदूळ महिन्याला मिळायचा पगार म्हणून तरी! मेलेली माणसं आणि शरीराच्या तुटलेल्या तुकड्याना स्पर्श करण्याची इच्छा कोणालाही नसायची. पण मला मात्र काम हवं होतं. हवंच होतं. मला मेलेल्या माणसांची भीती वाटायची नाही. मेलेलं माणूस आणि मी यांच्यात फरकच काय होता? दोन्ही सारखीच की! मात्र एकदा-दोनदा अंधारात माझा पाय तुटलेल्या पंजावर किंवा पावलावर पडला होता तो स्पर्श मात्र फारच भयंकर होता हे मी कबूल करते.

कधी भूसुरुंगाने जखमी झालेले लोक दवाखान्यात यायचे तेव्हा जखमी अवयव कापून टाकण्याशिवाय दुसरा पर्यायच आमच्यासमोर नसायचा. भुलीचं औषध नसलं आणि बहुतेक वेळा ते नसायचंच की आम्ही त्या जखमी माणसाला बांधून घालायचो. दवाखान्यात डॉक्टर असायचे, पण ते काही खरे डॉक्टर नव्हते. ख्मेर रूजच्या राजवटीत खऱ्या डॉक्टरांच्या हाताखाली काम शिकलेले लोक होते ते आणि तेही दवाखान्यात नसले तर मग आम्ही नर्स बायकाच जमतील तसे उपचार करायचो. आमच्यापैकी फक्त एकीला जुजबी वैद्यकीय प्रशिक्षण मिळालेलं होतं. आमची प्रमुख नर्स होती तिने नॉमपेनमध्ये काही महिन्यांचा एक अभ्यासक्रम पूर्ण केला होता.

चुका करायच्या आणि त्यातून शिकायचं या पद्धतीने आमचं काम चालू होतं. चुकाच जास्त असायच्या म्हणा त्यात. आमच्याकडचा औषधांचा साठा संपत आला की, आम्ही त्यात पाणी घालून तो वाढवायचो. लोक जखमा नासून मरायचे,

मलेरियाने मरायचे किंवा खूप रक्तस्त्राव झाल्याने मरायचे. माझ्या दृष्टीने सर्वांत वाईट होतं ते बाळंतपणात मरणाऱ्या बायकांचं मरण. तेव्हा मला खरीखुरी कणव वाटायची. एका बाईला जुळी मुलं होणार होती. तिच्या वेदना कितीतरी तास चालू होत्या. आम्हाला सिझेरियन शस्त्रक्रिया कशी करायची हे माहीतच नव्हतं. ती मेल्यानंतर मी इतकी थकले की, तिथल्या तिथे तिच्या प्रेताशेजारी जमिनीवर गाढझोपूनच गेले.

तरुण वयात आई होणाऱ्या मुलींना कधीकधी आतल्या आत रक्तस्त्राव व्हायला लागायचा. मग त्या आजारी पडायच्या, त्यांना खूप ताप चढायचा. पश्चिमेकडे या तापाला जखम नासल्यामुळे येणारा ताप म्हणतात. आम्ही या तापाचा अर्थ वेगळा करतो. त्या बाईच्या वेदनांचा फायदा एखाद्या मृतात्म्याला होऊन तो मृतात्मा त्या बाईच्या शरीरात प्रवेश मिळवतो आणि एक पारंपरिक नृत्य करतो. अनेक तरुण माता या तापाला बळी पडलेल्या आहेत. ज्या यातून जगून वाचून बाहेर पडतात त्या घरी गेल्या की, मुलग्याची लघवी पितात. तशी पद्धतच आहे. त्यांच्या बिछान्याच्या खाली कोळशाची शेगडी पेटवलेली असते. गेलेली ताकद परत मिळवण्यासाठी आणि काळवंडलेली त्वचा उजळावी म्हणून त्या भरपूर काळी मिरी खातात. साखरेच्या घट्ट पाकात शिजवलेलं आणि भरपूर काळी मिरी घातलेलं डुकराचं मांस आणि थोडी दारू असं त्यांना खायला घातलं जातं. आम्ही पारंपरिक उपचार करायचो. पण त्या उपचारांचाही कोणी तज्ज्ञ आम्हाला सापडलेला नव्हता. आम्हाला जसं जे सुचायचं तसं आम्ही करायचो.

हात धुण्याची सवय नव्हतीच. शिवाय साबणही संपून गेलेला असायचा. कितीतरी माणसं यातना सहन करत करत मरून गेली. अर्थात आता इतक्या वर्षांनंतर मला कळतंय की, आम्ही जे काही उपचार लोकांवर करत होतो ते भयानकच होते. पण आम्ही गरीब होतो आणि अडाणीही होतो. तो काळच भयंकर होता.

* * *

माझ्या लग्नानंतर साधारण सहा महिन्यांनी माझी पहिली मासिक पाळी आली. मी पंधरा वर्षांची होते. मला वाटलं, मला तळ्यातली एखादी जळू चावली असावी. हा असा रक्तस्त्राव का व्हावा हे मला कळतच नव्हतं. दिवसभर मी घरीच बसून राहिले. माझा नवरा बाहेरगावी लढाईवर गेलेला होता. मी जेव्हा परत दवाखान्यात कामाला गेले तेव्हा माझ्याबरोबर काम करणाऱ्या पौ नावाच्या एका नर्सला विचारलं. तेवढ्यात आमची प्रमुख नर्स आली. ती माझ्यावर रागावलेली होती. माझ्या कामावर न येण्याचं कारण तिनं विचारलं. 'माझ्या मायांगातून रक्त येतंय', असं मी तिला सांगितलं. आम्ही असंच म्हणतो. तेव्हा तिचा राग गेला नाही. पण तिनं मला काय ते समजावून मात्र सांगितलं. मग स्वच्छ कपड्यांच्या कपाटाकडे नेऊन तिने मला त्यातले काही कपडे दिले आणि सांगितलं, 'बायकांना हे असंच होतं.'

पौची मासिक पाळीही अजून सुरू झालेली नव्हती. ती काळी होती आणि दिसायलाही चांगली नव्हती. इतर नर्सबायांना ती आवडायची नाही, पण मला आवडायची. तीही साधारण पंधरा वर्षांची होती. माझ्यासारखीच अनाथ होती. तिच्या काकांबरोबर ती राहायची. ते तिला मारतात, तिच्यावर बलात्कारही करतात, असं तिनं मला सांगितलं होतं. मी तिला माझ्या नवऱ्याबद्दल कधीच काही सांगितलं नाही. पण या अशा परिस्थितीत सापडलेली मी एकटीच मुलगी नाहीये हे मात्र माझ्या लक्षात आलं. माझ्या मांड्यांच्या मध्ये माझा नवरा मला जे दुखवतो तेही सर्वच बायकांना सहन करावं लागतं हेही मला तेव्हाच कळून चुकलं.

दवाखान्यातले डॉक्टर आमचा गैरफायदा घ्यायला टपलेले असायचे. विशेषतः गोऱ्याभुरक्या मुली आणि ज्यांचं रक्षण करायला कोणीही नाहीये अशा अनाथ मुली यांच्यावर त्यांचा डोळा असायचा. त्यांच्या इच्छेला बळी पडण्यावाचून आमच्याकडे दुसरा काही मार्गच नव्हता. मी काळीकुरूप असल्यामुळे आणि विवाहित असल्यामुळे सुरुवातीला यातून वाचले. पण ही परिस्थिती फार काळ टिकली नाही.

एका रात्री मी रात्रपाळीच्या कामावर असताना दवाखान्याचे प्रमुख डॉक्टर दवाखान्यात आले. त्यांनी माझ्याबरोबर झोपण्याचा प्रयत्न या आधीही बऱ्याच वेळा केलेला होता. त्या रात्री त्यांनी बळाचा वापर केला. नंतर त्यांनी मला सांगितलं, 'तू इतकी कुरूप आहेस की, मी तुझ्याशी हे करतोय हे तुझं भाग्य समज.' त्यांच्या बलात्कारापेक्षा त्यांचे शब्द अधिक क्रूर होते. मला आवडणाऱ्या आणि माझं ज्याच्याशी पटायचं अशा एका डॉक्टरनंही मग या परिस्थितीचा फायदा घेतला. माझ्यासमोर दोनच तर पर्याय होते. जे घडतंय ते घडू द्यायचं किंवा नोकरी गमवायची. म्हणजेच उपाशी मरायचं. मला स्वत:चीच भयंकर किळस यायची. मी अगदी क्षुद्र माणूस आहे असं मला वाटायला लागलं. शिवाय नवऱ्याची भीती होतीच. कंबोडियामध्ये एखाद्या बाईने एखाद्या पुरुषाबरोबर संभोग केला तर तिने आत्महत्या करायची असा रिवाज आहे.

मी तोही प्रयत्न केला. याझिपॅम नावाचं रशियन बनावटीचं झोपेचं औषध मी भरपूर प्रमाणात प्यायले. दुसऱ्या दिवशी जाग आली तेव्हा डोकं सुन्न झालं होतं आणि काहीच नीटसं कळत नव्हतं. शिवाय जेव्हा मी परत कामावर गेले तेव्हां प्रमुख नर्सबाई भयंकर रागावल्या ते वेगळंच.

* * *

आजोबा पुन्हा एकदा हजर झाला. तो थ्लॉक छ्रॅयहून आला होता. त्याला पैसे हवे होते आणि त्याच्याजवळ माझ्यासाठी एक पत्रही होतं. पत्र – सोफन्नाचं लग्न ठरलं होतं आणि तिची करवली म्हणून येण्याचं तिनं मला आमंत्रण पाठवलं होतं. आजोबा गेल्यानंतर मी दवाखान्यातून रजा घेतली आणि एका माणसाला पैसे देऊन त्याच्या सायकलवरून मला गावी पोहोचवायची विनंती केली. लग्नाच्या आदल्या रात्री मी गावी पोहोचले. मी पोहोचले तेव्हा सोफन्ना तयार होत होती.

मी तिला विचारलं, 'तुझा नवरा कोणता?' तिला माहीत नव्हतं. लग्नाची तयारी पाहत घराबाहेर उभ्या असलेल्या तरुण मुलांच्या घोळक्याकडे हात करत ती उत्तरली, 'त्यांच्यापैकीच एखादा असेल.' मी तिला विचारलं, 'तू खूश आहेस का?'

या लग्नात भटजी येणार होते, बदलण्यासाठी अनेक कपडे होते, रंगरंगोटीचं सामान होतं. पक्वान्नं होती, मोठा समारंभ होता, पण तिनं रिकाम्या नजरेनं नुसतं माझ्याकडे पाहिलं. मी पंधरा वर्षांची होते, म्हणजे सोफन्ना कमीत कमी अठरा वर्षांची तर नक्कीच होती. तिला इतकी वर्षं थांबता आलं म्हणजे ती खरंच भाग्यवान आहे, असं माझ्या मनात आलं. गावातली काही माणसं माझ्या वडिलांच्या कुटुंबाचा उल्लेख 'त्या जून कुमारिकांचं घर' असा करायची हे मला माहीत होतं.

बाबा शिक्षक होते, बुद्धीवादी होते. आईही शिकलेली होती. त्यांनी सोफन्नावर जबरदस्ती केली नव्हती. आईने येऊन तिला विचारलं, 'तुला लग्न करायचं आहे का?' आणि सोफन्नाने उत्तर दिलं होतं, 'तुम्हाला योग्य वाटेल तसं करा.' चांगल्या मुलींनी असंच उत्तर द्यायचं असतं. हे वागणं तिला योग्य वाटलं होतं आणि मलाही.

लग्नानंतरच्या शारीरिक संबंधांबद्दल तिने मला काही विचारलं नाही आणि मीही काही सांगितलं नाही. अशा गोष्टी बोलायच्या नसतातच. तरी मी आईने सोफन्नाला सांगितलेलं ऐकलं, 'पहिल्या रात्री तू नवऱ्याकडे तोंड करून झोप. तू जर त्याच्याकडे पाठ केलीस तर तुमचा घटस्फोट होईल असा अर्थ होईल आणि त्याला तुझ्याशी काय हवं तसं करू दे.' लग्न म्हणजे हे असंच घडतं सगळीकडे हे माझ्या लक्षात आलं. लग्नाचा अर्थच मुळी हा आहे.

आजोबा गावात नव्हता. त्यामुळे त्या रात्री मी बाबांच्या घरीच राहावं असं ठरलं. सोफन्नाने माझ्यासाठी नवे कपडे बनवून घेतले होते. त्या समारंभामध्ये माझी ओळख सोफन्नाची बहीण म्हणून करून दिली जात होती, त्याचा मला खूप अभिमान वाटत होता. नवऱ्या मुलाच्या कुटुंबाला असंच वाटत होतं की, मी आईबाबांची खरी मुलगी आहे. नवरा मुलगा अठराएक वर्षांचा होता. शेजारच्याच गावात राहणारा होता पण सध्या तरुण मुलांना सैन्यात जबरदस्तीने भरती करून घ्यायला सुरुवात झालेली होती, म्हणून सरकारी सैनिकांपासून लपून राहाण्यासाठी तो थ्लॉक छ्रॉयला आलेला होता.

मी छुपला परतले. त्यानंतर थोड्याच दिवसांनी माझा नवरा पुन्हा बाहेरगावी निघून गेला. यावेळी तो फारच दूर जाणार होता. कंबोडिया आणि थायलंडच्या सीमेवर कोर ५ या ठिकाणी युद्ध आता जास्त जोरात सुरू झालेलं होतं. दर वर्षी कंबोडियावर नियंत्रण असलेलं व्हिएतनामी सैन्य आक्रमण करायचं आणि सीमेवरची छुपी केंद्रं नष्ट करायचं. पण उन्हाळा संपून पावसाळा सुरू झाला की, ख्मेर रूजचे लोक पुन्हा देशात घुसायचे. असं त्यांना घुसता येऊ नये म्हणून आता सरकार सीमेवर भूसुरुंगांची आणि माणसांना पकडणाऱ्या चापांची एक मोठी थोरली भिंतच उभारत होतं.

माझा नवरा त्याच्या पलटणीबरोबर सीमेवर निघून गेला. आठवड्यामागून आठवडे उलटले, पण तो काही परत आला नाही.

तो गेल्यानंतर सुमारे महिन्याभराने आजोबा पुन्हा एकदा आला. पहिल्या वेळी मी त्याला पैसे दिल्यावर तो निघून गेला होता. दुसऱ्या वेळी त्याला देण्यासाठी माझ्याजवळ पैसेच नव्हते. त्याने मला खूप मारलं. त्याच्या हातचा असा मार मी बऱ्याच दिवसांनी खात होते. मग तो म्हणाला, 'चल. तुझं सामान आवर. आपल्याला शहरात तुझ्या एका मावशीला भेटायला जायचं आहे.'

■



कॉन्व्हेंटमधील भ्रष्टाचार, प्रीस्ट आणि नन्स यांच्यातील लैंगिक संबंध,
तटबंदीआडचे आयुष्य यांबद्दलचे एका संवेदनशील ननचे प्रांजळ आत्मकथन
आमेन
द ऑटोबायोग्राफी ऑफ अ नन
सिस्टर जेस्मी
अनुवाद
सुनंदा अमरापूरकर
किंमत
१८०/-

नवे कोरे





प्रतिकूल परिस्थितीबरोबर मुकाबला करताना, आपल्या मनाची पकड घेणारी आणि चांगली कामे करण्यास उत्तेजन देऊन धैर्य व प्रतिष्ठा अबाधित ठेवणारी ही सत्य कहाणी. अन्यायाविरूद्ध उठवणारा फक्त एक आवाज किती किमया करू शकतो, याचा प्रत्यय देते.




मूळ लेखक :
**कॅथरीन बोल्कोव्हॅक** आणि **कॅरी लीन**
अनुवाद : **सिंधु जोशी**

नवे कोरे




एका धैर्यवान, चारित्र्यवान माणसाची त्याच्या अत्यंत प्रामाणिक व्यक्तिमत्त्वाची, विलक्षण उदार मनाची आणि मानवसुलभ मानसिक दुर्बल्याची, अनावर प्रेमाची, अटळ शोकांतिका वाचकाला थक्क करून टाकणारी एक विलक्षण कहाणी.




मूळ लेखिका : **यास्मीन प्रेमजी**
अनुवाद : **अंजनी नरवणे**

# ।। फॅन्टसी शृंगारातली ।।

। गीतांजली गोंधळे ।



कामो जनने प्रथमा - अथर्व वेद (९-२-१९)
अथर्व वेद सांगतो, सर्वांत प्रथम जन्म झाला प्रेमाचा. खरेही असावे ते. याचा प्रत्यय आपल्यालाही सतत येतच असतो. निर्मितिप्रक्रियेची पहिली पायरी किंवा आधारस्तंभच प्रेम. त्या भावनेपासून आरंभ होतो. त्याच्या तऱ्हा पुढे बदलत जातात. या प्रक्रियेला अनेक घटक जोडले जातात. शृंगार हा समागमातला सर्वांत महत्त्वाचा घटक. जोडीदाराला मिलनासाठी आकर्षित करण्यासाठी निसर्गातला प्रत्येक जीव थोड्या बहुत फरकानं शृंगाराचा आधार घेतोच.

शृंगारनायिका हा असाच एक प्रकार. ही नायिका म्हणजे प्रेमात पुढाकार घेतलेली स्त्री. ही नायिका प्रेमात वेगवेगळ्या भूमिका जगते. पुराणात अशा सात शृंगारनायिका भेटतात. खंडिका, अभिसारिका, विरहलब्जा आणि वसकसज्जा या त्यांपैकी काही. इतर नायिकांची पार्श्वभूमी प्रेमातील इतर भावनांना गोंजारणारी; पण वसकसज्जा मात्र प्रेमातलं सौंदर्य खुलवणारी. म्हणून तीच

खरी शृंगारनायिका. आपल्या प्रियतमाला भेटायला आतूर झालेली वसकसज्जा म्हणजे शृंगारशिल्प. तिचा शृंगार तिची आतुरता, तिच्या भावनांची तीव्रता आणि आसुसलेपण स्पष्ट करतो. शृंगारनायिका वसकसज्जा जणू शृंगाराचं समागमातलं महत्त्व स्पष्ट करणारी नायिका. ती शृंगार करून, सुंदर वस्त्रं आणि दागिने परिधान करून आपल्या प्रियकराची वाट बघत असते. त्याला भेटण्यास उत्सुक असलेली ती पुराणकथांमध्ये दागिन्यांनी मढून भेटीस येते. वसकसज्जा एकटी नाही; ती प्रतिनिधी आहे. पुराणापासून अगदी पोस्ट मॉडर्निजम काळातल्या प्रत्येक बाईची. तिच्यासारख्या कित्येक नायिका आपण वेगवेगळ्या ठिकाणी पाहिल्यात. पुराणातील वर्णनात, गुफांमधील कोरीव कामात, तर कधी एखाद्या कादंबरीमध्ये. सिंबॉलिक इंटरप्रिटेशन म्हणून त्या शिल्पामध्ये. बघणाऱ्याने मुग्ध व्हावे, आणि तिच्या कमनीय शरीराकडे आणि दागिन्यांकडे पाहत राहावे असे. मथुरेतील दुसऱ्या शतकातील तीन यक्षीही तिथंच एका दालनात अगदी सुरुवातीस मधोमध ठेवल्या आहेत. कमनीय बांध्याच्या शरीराची गोलाई आणि दागिने, वस्त्र म्हणून फक्त एक नाजूकसे उत्तरीय ल्यायलेल्या या यक्षी पाहताना भान हरपते. पायापासून केसांपर्यंत दागिन्याने मढलेली ही यक्षी आत्ताच्या कोणत्याही ब्यूटी काँटेस्टमध्ये सगळ्या ललनांच्या वरताण ठरावी इतकी कमनीय आहे. पायांत जाड कडे, कमरेला ल्यायलेले लहानसे अंतरीय आणि त्यावर सुंदर मण्यांची, फुलांची-पानांची मेखला, कोपऱ्यापासून मानेपर्यंत बांगड्या, बाजूबंद, प्रत्येकीचे अत्यंत कल्पकतेने चितारलेले वेगवेगळे हार, किंवा हल्ली ज्याला बॉडी ज्वेलरी म्हणतात इतके फॅशनेबल एका खांद्याकडून दुसऱ्या स्तनाकडे जाणारा तिचा अद्वितीय हार, स्टेटमेन्ट पीस आहेत. एकेकीचे हार आणि त्या वेळी जे बुद्धीचे लक्षण मानले जाई ते खोल गेलेले कानाचे छेद, आणि त्यात घातलेली मोठ्या घाटची कर्णफुले.

आपल्या प्रियकरास घाईने भेटायला जाणारी नायिका, हा सगळ्या पूर्वकालीन कलाकारवर्तुळाचा आवडीचा विषय होता. या नायिका बऱ्याच ठिकाणी आढळतात. कोलकात्याच्या म्युझियममध्ये एक अतिशय सुंदर शिल्प आहे. यात नायिका अत्यंत घाईमध्ये आपल्या नादात चाललेली आहे. तिच्या गळ्यातील माळ हवेत उडते आहे आणि त्याचे पदक तिच्या नाजूक कमरेला स्पर्श करते; वाऱ्याचा आवेग तिच्या चालण्यातही आहे. खरंतर तो तिच्या मनाचा आवेग आहे. तिच्या मांडीवरती नाजूक वेली दिसताहेत आणि त्यामध्ये एक विंचू प्रतिकात्मक रूपात आहे. विंचू हे पूर्वकालीन कलेमध्ये प्रखर प्रेमाचे प्रतीक मानले जायचे.

असेच एक सुंदर शिल्प आहे भुवनेश्वरच्या 'राजा-राणी' मंदिरात- जिथे नायिका तिच्या प्रियकराला भेटायला निघतेय. तिच्या पायातून पैंजण घसरू पाहते आणि ते सावरत घाईत निघतेय, ही अभिसारिका नायिका- शृंगारनायिका शृंखलेमधलीच नायिका.

भुवनेश्वर मंदिरात अजून एक शिल्प दिसते वासकसज्जा शृंगारनयिकेचे. ही आपल्या अंतरियाची गाठ बांधते आहे, आणि तिच्या चेहऱ्यावर लज्जामिश्रित हसू आहे. तिचे डोळे अर्धवट उघडे आहेत, यावरून नायिका आपल्या प्रियकराच्या प्रणयाच्या जुन्या आठवणीत रममाण झाली आहे असे जाणवते. हिचे दागिने आणि शृंगार बघणाऱ्याला मोहवून टाकते. अशा कितीतरी शृंगारनायिका वासकसज्जा, खंडिता, अभिसारिका, विप्रलब्धा, विरहकान्तिका आपल्याला अजंठाच्या चित्रांमधून, खजुराहो लक्ष्मण मंदिरात भेटत राहतात. या कधी प्रियकरास भेटायला आतुर असताना त्यांचे दागिने हवेत उडत असतात, किंवा शृंगार करताना आभूषणे परिधान करत असतात, आरशात स्वतःला निरखत असतात किंवा प्रियकराच्या आठवणीत विव्हल होताना शृंगार करून त्याची वाट पाहत असतात, गुडघ्यात डोके घालून विरहमग्न झालेल्या असतात.

लखनऊच्या संग्रहालयात एक अत्यंत सुंदर शिल्प बघावयास मिळते. नायक पुरुष त्याच्या नायिकेची केशरचना करून देतोय, प्रेमक्रीडेमध्ये विसकटलेले आपल्या नयिकेच्या केसांची रचना तिला परत करून देताना दोघांना नक्कीच खूप गम्मत वाटत असावी. प्रणय आणि शृंगार आणि दागिना यांभोवती अशी एक ना अनेक शिल्पं, कविता, नाटक, चित्र आणि गोष्टी आपणास पाहावयास, ऐकावयास मिळतात.

प्राचीन नाट्यलेखक शूद्रक यांच्या 'मृच्छकटिक' नाटकात दागिन्यांनी मढलेली नगरवधू वसंतसेना चोरांपासून लपून तिच्या महालाकडे जात असताना चुकून चारुदत्तच्या घरात शिरल्याचे वर्णन आहे. शूद्रकाने केलेल्या या वर्णनाचा आविष्कार आपण बऱ्याच जणांनी पाहिला तो गिरीश कर्नाड यांनी साकारलेल्या 'उत्सव'या सिनेमामध्ये. 'उत्सव'मध्ये रेखा वसंतसेना म्हणून दिसते. वसंतसेनेच्या भूमिकेत केसांपासून पायापर्यंत १६ शृंगार करून चारुदत्ताकडे पोहोचते. वसंतसेनेचे दागिने आपण कधीही न पहिलेला दागिन्यांचा एक भव्य आविष्कार आहे. एखादे शुंगकालीन शिल्प होऊन त्यातून सुरसुन्दरी किंवा मदनिका अचानक समोर यावी इतके सुन्दर दागिन्यांनी तिला मढविले आहे. वसंतसेना चारुदत्तास विनंती करते की चोरांपासून वाचण्यासाठी ती सगळे दागिने इथंच उतरवून ठेवू इच्छिते, ज्यास चारुदत्त मान्यता देतो, आणि मग एक एक दागिना उतरविताना ती चारुदत्ताची मदत मागते, आणि मग तोही तिच्या दागिन्यांमध्ये आणि पर्यायाने सुंदर वसन्तसेनेमध्ये अडकत जातो. गिरीश कर्नाड यांनी हा सीन अत्यंत परिणामकारक पद्धतीने चित्रित केला आहे. रेखा, तिचे सौंदर्य, दागिने, तो चारुदत्ताचा छोटासा महाल, शृंगार आणि काम हे परस्पर संबंधित घटक ठळकपणे एकत्र येतात. आभूषणे हा कितीतरी लेखक, शिल्पकार, चित्रकार यांच्या गोष्टींमधला महत्त्वाचा दुवा आहे.

'टायटॅनिक'मध्ये नायक त्याच्या प्रियतमेचे नग्न चित्र काढण्यास

उत्सुक असतो, ज्यात तो तिला फक्त एक अत्यंत मौल्यवान नीलम खड्याचा हार भेट देतो. चित्र काढताना तोच हार तिला परिधान करण्यास सांगतो, तो हार आणि तेच तिचे त्याने काढलेले चित्र 'टायटॅनिक' सिनेमाची सगळी गोष्ट उलगडत जाते.

आभूषणनिगडित अजून एक सुंदर संकेत प्राचीन काळात आपल्याला काही शिल्पांमध्ये सापडतो, ज्यांत पुरुष स्त्रीच्या पायाजवळ आहे असे दाखविले जाते. कृष्ण राधेला एका काव्यामधून सांगतो- तुझे जास्वंदीसारखे लाल पाय माझ्या मस्तकावर ठेव, तुझ्या प्रेमाचा लाल रंग माझ्याही हृदयात झिरपू दे, तुझ्या पायातील सुंदर पैजणांनी एक सोनेरी सूर्य बनव, आणि तो सूर्य आपल्या शय्येवर ठेव. या आणि अशा कैक गमती कृष्ण आणि राधेभोवती गुंफलेल्या कला माध्यमातून पाहायला मिळतात. कृष्ण आणि राधा राजस्थानातील कितीतरी मिनिएचर पेंटिंगमध्ये दिसतात. त्यात राधेच्या पायातील पैंजणांशी खेळणारा कृष्ण किती नटखट होता, हे वेगळे सांगायला नको. असाच एक यक्ष कालिदासाच्या 'मेघदूत'मध्ये यक्षीच्या पायाला स्पर्श करण्यास आतुर आहे. स्त्रीच्या पायाशी असणारा पुरुष पुराण कलेमध्ये बऱ्याच ठिकाणी आढळतो. पुरुष आणि स्त्रीचा समान दर्जा सिंबॉलिक पद्धतीने दाखविला आहे, असे मत काही इतिहासकार मांडतात. आताच्या सामाजिक स्थितीमध्ये कदाचित हा मोठा वादाचा मुद्दा होऊ शकतो. पण असे इंटरेस्टिंग कलासंदर्भ आहेत खरे. यक्षीच्या पायाजवळ असणारे यक्ष, कालीच्या पायाखाली असलेला शंकर, किंवा शेषशायी विष्णूच्या पायाशी असलेली लक्ष्मी हे त्यांच्यातील युगुलप्रेमाचे प्रतीक असावे, असे बरेच इतिहासकार मानतात. काही इतिहासकारांनी यास रतिक्रीडेचा किंवा प्रेमाचा पूर्वरंगदेखील मानले आहे. आणि यामुळे जेव्हा मी याकडे बघते, तेव्हा पैंजण, जोडवी, पायातली कडी यांतील असलेला सेन्शुअस फॅक्टर मला खुणावू लागतो. राधेच्या सोन्याच्या पैंजणात सूर्य बघणारा कृष्ण मला कवीच्या मानाचा थांग लावण्यास मदत करतो.

कलकत्त्याच्या म्युझियममध्ये असलेल्या मथुरेतील उत्खननात मिळालेल्या यक्षी- त्यांचे उन्नत स्तन, त्यांचा उभार दाखविणारे गळ्यातील हार, त्याचे पेन्डेंट्स, हाताच्या कोपरापर्यंत आलेल्या बांगड्या, बाजूबंद, बारीक कंबर, खालोखाल गोलाकार नितंब आणि त्यावर रुळणारी अत्यंत सुंदर मण्यांची अनेक पदरी किंवा नक्षीकाम केलेली जाड मेखला, पायात जाड आणि मोठी कडी किंवा मोठे फूलवेलीचे नक्षीकाम केलेले पैंजण आहेत, पायाच्या बोटांत जोडवी आहेत, बारीक कंबरेवर वस्त्र म्हणून फक्त अंतरीय आणि सर्वांगावर आभूषणे, अशा पाहायला मिळतात. यात काही यक्षींच्या पायाशी असलेला पुरुष, हे एक अचंबित करणारे दृश्य असले तरी, पायाशी पुरुष हे समानता समागम आणि प्रजननाचे द्योतकही मानले गेले आहे.

तसेच शालभंजिका ही यक्षी ही बऱ्याच वेळा झाडाजवळ उभी दाखवली आहे. झाडाला पायाने स्पर्श करणारी यक्षी, झाडाच्या फांदीला लटकणारी यक्षी, म्हणजे पुन्हा प्रजननाचे चिन्ह आहे. भारतीय संस्कृतीमध्ये बऱ्याच ठिकाणी झाड हे पुनरुत्पादन आणि प्रजनन याचे प्रतीक मानले गेले आहे. मातृत्व आणि प्रजनन हे यक्षीच्या जीवनाचे केंद्रबिंदू. प्रजनन प्रक्रियेतलं सौंदर्य खुलविणारे हे चिन्ह बघणाऱ्याला मुग्ध करतेच, पण ते खूप मार्मिक पद्धतीने मांडण्यात आले आहे. यक्षी बघताना सर्वांत प्रथम तिची कमनीयता आणि त्यावर तिच्या उन्नत शारीर सौंदर्याला उठाव देणारी आभूषणं लक्ष वेधतात. ही बहुतेक शिल्पं इसवी सन २ किंवा त्याच्या पूर्वीची मानली जातात. शुंगकालीन किंवा त्याच्याही आधीची. तेव्हाची बहुतेक स्त्रीशिल्पं नग्न वा अर्धनग्न स्वरूपातील आहेत. आभूषणं मात्र शरीराचा बराचसा भाग व्यापून आहेत, याचा अर्थ आस्थेटिक्स हा जगण्याचा महत्त्वाचा भाग होता. सौंदर्य हे फक्त कलेपुरतं मर्यादित न राहता, ते रोजच्या जगण्याचाही भाग होते, निसर्ग आणि निसर्गाचा सौंदर्य आविष्कार हा जगण्याचा एक सहज भाग होता.

आभूषणे कोरताना किंवा चित्रात उतरविताना काही अलिखित नियम कलाकार पाळत होते, ते म्हणजे प्रत्येक दागिना शरीराच्या रेषा, गोलाई यांना समर्पक असाच असावा. दागिन्याचा फॉर्म ठळकपणे दिसावा आणि तो दागिना त्या शरीरभागाला उठाव आणणारा असावा. दागिने शरीरभागांची जी मापे आहेत, त्याच्या प्रमाणात आणि त्याला उठाव मिळेल अशी असावीत. यातून एकूण शिल्पाचा अथवा कलेचा एकत्रित येणारा परिणाम बघणाऱ्याशी सुसंवाद साधता येईल इतका सुंदर असावा. ते कलाशिल्प आकर्षण आणि सौंदर्य यांचा आविष्कार असावे. आपण वरवर पाहिले तर नियम आणि त्यातून अभिप्रेत असलेला इफेक्ट, हे सोपे नव्हे. शुंग-कुशनकालीन कलाकारांनी या नियमांचे पालन करून अत्यंत सुंदर अशी शिल्पं निर्माण केली आहेत.

अर्थात मूर्तीवर दागिने दाखविणे, हे अत्यंत पुरातन काळातही दिसून येते. म्हणजे स्त्रीला उठाव देण्यासाठी दागिन्यांचा कलेमध्ये वापर शुंग-कुशन काळच्याही मागे नेतो. मोहेंजोदडोच्या उत्खननात मिळालेला नर्तकीचा पुतळा तिच्या एका हातात पूर्ण बांगड्या आणि दुसऱ्या हातात अत्यंत कमी बांगड्या आणि गळ्यात तीन लहान पेंडेंटसदृश हार दाखवितो. फॅशनबद्दलची त्या संस्कृतीची सजगता बरेच काही सांगते. मानवाची सुंदर दिसण्याची, आकर्षक दिसण्याची ओढ अनादि अनंत काळापासून आहे. गळ्यातील मोठे हार, किंवा त्यापेक्षा मोठे पेंडेंट स्त्रीच्या कामुक गोलाकार स्तनांना उठाव देतात. कामक्रीडेमध्ये सुंदर हार घातलेली प्रिया मुग्ध होत पाहत राहणे हा नक्कीच कितीतरी पुरुषांच्या फॅन्टसीचा भाग असू शकतो.

प्रणय आणि दागिना यांत बाजी मारणारी आहे खरंतर 'मेखला', जिचे दुसरे नाव कांची आणि रशना असेसुद्धा आहे. मेखला म्हणजे आज जिला आपण बेली चेन म्हणतो अशी ही मेखला, पुराण काळापासून कितीतरी महत्त्वाच्या लेखक, कवी, चित्रकार, शिल्पकार यांच्या निर्मितीस प्रेरक ठरली आहे. सांची स्तुपावरील शालभंजिका ते मथुरा उत्खननातील शुंग- मौर्यकालीन यक्षी किंवा नर्तकी, सुरसुन्दरी, मदनिका यांच्या सर्वांच्या आभूषणांत मला नेहमी सर्वांत महत्त्वाची वाटणारी आणि आता अत्यंत दुर्मीळ झालेली ही मेखला डोळ्यांचा आणि मनाचा ठाव घेते. उन्मादकता आणि सौंदर्य यांचा मिलाफ होतो अत्यंत सुन्दर मेखला परिधान केलेल्या सुन्दर स्त्रीकडे बघताना. मला मात्र ही मेखला परिधान केलेली नायिका आत्ता फक्त पुराण कलेमध्ये बघायला मिळतेय. शुंग-कुशन काळातील बरीच नग्न आणि अर्धनग्न शिल्पं मेखला परिधान केलेली दिसतात.

कवी कालिदास यांच्या बऱ्याच निर्मितींमधील सुंदर स्त्रियांनी मेखला परिधान केलीय. कालिदासाच्या एक विनोदी नाट्यामध्ये इरावती ही राणी तिचा नवरा राजा अग्निमित्र यावर संशय घेते, तेव्हा त्याला रागाने मेखलेने मारते. कालिदासाचे मेखलाप्रेम त्याच्या कविता आणि साहित्यामध्ये डोकावत राहते. स्त्री-पुरुषाचे गुंतागुंतीचे नाते आणि त्याभोवती घडणारे प्रचंड नाट्य आपण 'ओमकारा'मध्ये पाहतो, जिथं नायक त्याच्या नायिकेला मेखला पहिल्या प्रेमक्रीडेची आठवण म्हणून भेट देतो. तिच्याकडून ती मेखला हरवते आणि तिचा प्रवास, त्यातून मानवी नात्यांची गुंतागुंत, त्यातले राजकारण, संशय, प्रेम, विश्वास या सगळ्यांत मेखला एक अत्यंत खासगी दागिना प्रणय आणि रतिक्रीडा यांचे रूपक बनून जातो.

दागिन्यांमधून येणारे आवाज हासुद्धा प्रणयातील पूर्वरंग मानला गेलाय. नूपुर म्हणजे घुंगरू. या घुंगरांची किणकिण पौर्वात्य काळी आपल्या प्रियेच्या येण्याची वार्ता घेऊन येई. बांगड्या, पैंजण, मेखला यांची किणकिण प्रेमिकाच्या हृदयातील भावना उचंबळून येण्यास पुरेशी होई. कवी एका काव्यात लिहितो- राधा जेव्हा कृष्णास भेटायला काळोख्या जंगलात जाई, तेव्हा तिच्या पैंजणांची किणकिण तिच्या पोहोचण्याची वार्ता देई. दागिन्यांचे असे एक ना अनेक उल्लेख आपल्या रोजच्या जगण्यातील त्याचा सहभाग दाखवत राहतात.

कवी बिल्हन त्याच्या चारुपंचसिका काव्यामध्ये एक प्रेमिक त्याच्या रतिक्रीडेमध्ये पुढाकार घेणाऱ्या स्त्रीचे वर्णन करताना म्हणतो, मैथुनक्रियेमध्ये माझ्या वर असणाऱ्या माझ्या नायिकेचे वर-खाली होत असणारे मोत्याचे झुपकेदार कानातले माझ्या मनाचा ठाव घेत होते. प्रेमक्रीडेचा तो बहार आठवताना तिचे मोत्याचे झुमकेच मला विव्हल करतात.

दागिने तितकेच प्राचीन, जितका मानवाने लावलेला शस्त्रांचा शोध. सुंदर आणि आकर्षक दिसण्याची ओढही तितकीच आदिम. हीच ओढमलाही माझ्या दागिने घडविण्याच्या प्रवासामध्ये साथ देते. आकर्षक दिसण्याची ओढ मी प्रत्येक स्त्रीमध्ये पाहतेय.

**गीतांजली गोंधळे**
geetuag@gmail.com




**आयुष्याच्या हरेक टप्प्यावर अगदी सहज पायांखाली येत गेलेल्या अपरिचित वाटांचा, धडाडीनं शोधलेल्या नव्या दिशांचा आणि व्यक्तित्वाला आकार देणाऱ्या व्यक्तींचा वेध घेणारी पारदर्शक, सच्ची स्मरणयात्रा...**

सिलेक्टिव्ह मेमरी

(माझ्या आयुष्याची स्मरणयात्रा...)

मूळ लेखिका **शोभा डे** अनुवाद **अपर्णा वेलणकर** किंमत **४४०/–**

# ।। रंगारंग पॉलिटिक्स ।।

। प्रा. श्रीरंजन आवटे ।



Fantasy is hardly an escape from reality. It's way of understanding it !

- Lloyd Alexander

बाबरी विध्वंसनापासून ते अगदी अलीकडच्या व्यापम् घोटाळ्याबाबत बोलत असताना मित्र म्हणाला, ' अरे, आपली राज्यघटना हीच किती मोठी फॅन्टसी आहे!'

'सामना' चित्रपटात हिंदूरावचा (निळू फुले) एक कार्यकर्ता मास्तरांना (श्रीराम लागू 'गावात नीट राहायचं, शिस्तीत,' असं धमकावतो तेव्हा मास्तर त्याला विचारतात, 'तुमच्या या सुंदर बिनडोकपणाचं रहस्य काय?' कार्यकर्त्याला काही कळत नाही. मास्तर पुन्हा तोच प्रश्न विचारतात नि 'मारुती कांबळेचं काय झालं,' या प्रश्नाइतकाच हा प्रश्नही अंतर्बाह्य हलवून टाकतो !

कल्पित आणि वास्तव यांच्या सीमारेषेवर घुटमळणाऱ्या वर्तमानाला सामोरं जात असताना समोरचा प्रदेश धूसर दिसू लागतो. व्याख्यांकनाच्या नैमित्तिक अडचणींच्या पलीकडे असणाऱ्या वास्तवाचा अदमास घेता येत नाही. फॅन्टसीच्या संदर्भाने बोलण्यापूर्वी वास्तव लौकिकाचे स्थान निश्चितीकरण करावे लागते. समकालीन वास्तव अथवा वर्तमान याची नस पकडल्याशिवाय फॅन्टसीच्या ठोक्यांची वारंवारिता ध्यानात येणार नाही.

खरंतर पॉलिटिक्स आणि फॅन्टसी हे नेहमी वापरले जाणारे शब्द. पॉलिटिक्स हा शब्द भलेही Polis ( म्हणजे नगरराज्य) या ग्रीक शब्दावरून आला असेल; पण सध्या तो केवळ राज्यशास्त्राशी संबंधित आहे, असं म्हणणं चुकीचं ठरेल. 'एवरीथिंग इज पोलिटिकल,' ही गोष्ट आपण मान्य करतो तेव्हा या शब्दाची अतिव्याप्ती आपल्या ध्यानात येते. ढोबळमानाने पब्लिक-सार्वजनिकतेशी निगडित असणारी काहीएक प्रक्रिया असा अर्थ 'पॉलिटिक्स' या शब्दाभोवती आहे; मात्र सध्या 'षड्यंत्र', 'कूटनीती'..अशा नकारात्मक अर्थांनी पॉलिटिक्स शब्दावर सावली धरली आहे. रचनात्मक परिवर्तनाचं साधन या सकारात्मक अंगानं पॉलिटिक्स या शब्दावर प्रकाशझोत टाकून त्या संदर्भात 'पॉलिटिक्स' या शब्दाचं अर्थनिर्धारण करणं जरुरीचं आहे.

**फॅन्टसी हा शब्द भाषा-साहित्यात सातत्यानं वापरला जात असला तरी, मुळात साहित्य ही गोष्टच आपल्या जगण्याच्या सर्व क्षेत्रांतील अनुभवांशी निगडित असल्यानं फॅन्टसीची व्याप्तीही खूपच जास्त आहे. त्यातही आजच्या घडीला जी फॅन्टसी वाटते, ती उद्याचं वास्तव असू शकते. म्हणजेच आजचं वास्तवही कालची फॅन्टसी असू शकते.**

फॅन्टसी आणि ॲम्बिशन/ महत्त्वाकांक्षा यांच्यामध्ये गफलत करता कामा नये. महत्त्वाकांक्षेला काही अंशी का असेना, पण मातीसोबतची नाळ असते; फॅन्टसीला बहुतेक वेळा ती नसते. पण पारंपरिक मानसिक साच्याच्या, धारणांच्या संचांतूनच फॅन्टसीचा

जन्म होत असतो. महत्त्वाकांक्षा ही गतिशील आयुष्यासाठीची आवश्यक गोष्ट आहे. उर्ध्वगामी दिशेनं वाटचाल करण्यासाठी महत्त्वाकांक्षेची गरज असते हे अगदी निःसंशयपणे खरं आहे; पण अतिमहत्त्वाकांक्षेचा वारू जेव्हा उधळू लागतो, तेव्हा तो तुमच्या मूळ स्वभावालाच उधळून लावतो. तुमची अस्सलता त्यात लोप पावते. नितळ, आरस्पानी व्यक्तिमत्त्वाचे सारेच धागे त्यात विरून जातात. तुमचे स्फटिकी गुणधर्म ना त्यात विरघळतात, ना चकाकतात, अशी काहीशी विचित्र अवस्था त्यातून निर्माण होते. अर्थातच महत्त्वाकांक्षा आणि अतिमहत्त्वाकांक्षा यांतली सीमारेषा धूसर असते. या सीमारेषेचे निश्चितीकरण व्यक्तिपरत्वे भिन्न असले तरीही काही किमान मूलभूत मुद्द्यांसंदर्भात सहमती होऊ शकते. महत्त्वाकांक्षा तुम्हाला धावायला सांगते, ध्येय साध्य करण्यासाठीचे उपलब्ध इंधन पुरविते, त्यातून तुम्ही अस्वस्थ होता, असमाधानी राहता आणि यातून पुन्हा धावणे सुरूच राहते अव्याहत...! पण महत्त्वाकांक्षा तुम्हाला असुरक्षित बनवत नाही; ती कॉम्पिटिटिव्ह स्पिरिट निर्माण करते, जे की गरजेचं असतं- अनेक वेळा अनेक पातळ्यांवर. जगण्यासाठीचं आसुसलेपण निर्माण करण्यात महत्त्वाकांक्षा मोठी भूमिका बजावते. हे आसुसलेलं असणं किती महत्त्वाचं, किती गरजेचं असतं! पण हीच महत्त्वाकांक्षा जेव्हा तुमच्यावर अधिकार गाजवू लागते, तेव्हा तुमच्यातलं सत्त्व आणि स्वत्त्व यांचा क्षय होऊ लागतो. जी महत्त्वाकांक्षा जगण्याचं आसुसलेपण देते, तीच निराशेच्या गर्तेतही ढकलते; तीच वैफल्याच्या हिंदोळ्यावर झुलवतेही. एवढंच काय, आत्महत्यादेखील करायला भाग पाडते.

या चक्रात इतकी वळणं आहेत की समोरचा प्रदेश धुक्याचा, अस्पष्ट, संदिग्ध असणार, तिथं पाय फसणार; पण म्हणून नकारात्मक किंवा निराशावादी असण्याचं काहीही कारण नाही. मानसिक आंदोलनं समजून घेणं अजिबात सोपं नाही. स्वतःला स्वतःपासून वाचवणं कठीण आहे. 'मी' ला एकट्यानं एकांतात भेटणं धोकादायक, प्रचंड जीवेघेणं! पण 'मी'ला टाळणंही अशक्य! उत्तरं आहेत; शोधली पाहिजेत. मी'चा शोध पुलावरती घेतला पाहिजे, जो पूल तुला आणि मला जोडतो. ही मीटिंग आरोग्यदायी ठरू शकते. त्यातून काही सर्जनात्मक निष्कर्ष निघू शकतो. तोच तुम्हाला, मला... साऱ्यांना तारू शकतो, हे सातत्यानं ध्यानात ठेवलं पाहिजे. 'मी' हा अपरिहार्यपणे इतरांशी जोडला गेला आहे. त्याला चिकटलेली नाळ तोडता येणार नाही. ही नाळ तोडणं म्हणजे स्वतःच्या पायावर कुऱ्हाड मारून घेतल्यासारखं आहे; कारण त्यातून आपणच आपल्यापासून डिसकनेक्ट होत जातो. जगण्याचा एक एक तंतू तुटून पडताना होणाऱ्या वेदना रक्तबंबाळ करणाऱ्या असणार, यात शंका ती काय! त्यामुळे या पुलावर भेटणं अनिवार्य. आणि यातही स्वार्थ आहेच; पण हा स्वार्थ व्यापक आहे. तो तुमच्यासकट इतरांच्या हितसंबंधांची, गरजांची परिपूर्ती करतो आणि म्हणून अशा आरोग्यदायी स्वार्थाचं संवर्धन करणं आवश्यक ठरतं.

प्रश्न असा निर्माण होतो- काय दोन भिन्न व्यक्तींच्या ढोबळमानानं समान लौकिक / अलौकिक महत्त्वाकांक्षा परस्परांच्या स्वार्थाचं संवर्धन निःस्पृहतेनं करू शकतात का? हा प्रश्न स्थळ-काळ आणि बव्हंशी परिस्थितीजन्य असला तरीही विभिन्न परिस्थितीकीय घटकांचं अचूक व्यवस्थापन, ही त्या व्यक्तीची प्राथमिक आणि मूलभूत जबाबदारी बनते. नव्या घटकांच्या तीव्रतेनुसार ट्यून इन होणं क्रमप्राप्त ठरतं. अर्थातच इथं पुन्हा स्वत्वाच्या व्यवच्छेदकतेचा बळी देण्याची आवश्यकता नसते; पण हे स्वत्व हरवण्याचा धोका यात संभवतो; त्यामुळे हे स्वत्व टिकवून ट्यून इन होणं किंवा समष्टीशी एकरूप होणं मनोवेधक आव्हान ठरतं. यात त्या व्यक्तीची कुतरओढ अटळ आहे, अपरिहार्य आहे; पण हे सारे दोर कापून पुढे जाणं, हेच तर ध्येय असतं आणि त्यासाठीच महत्त्वाकांक्षेची गरज असते. पण अतिमहत्त्वाकांक्षा मात्र तुम्हाला स्पर्धेत उतरण्यापासूनच रोखते. सबब तिची विल्हेवाट यथायोग्य सम्यक आत्मपरीक्षणातून लावायला हवी. लौकिक संदर्भनांचं ओझं किती मर्यादेपर्यंत पेलायचं, हे आपणच ठरवायला हवं. जे. एम. बॅरे यांनी एके ठिकाणी म्हटलं आहे, Ambition- it is the last infirmity of noble minds" तर हेन्री बीचर म्हणतात "A man without ambition is just like beautiful worm- It can creep but it can not fly

त्यामुळे 'आसमानों को छुने की आशा' असलीच पाहिजे; पण त्याच वेळी मातीमध्ये घट्ट पाय रोवण्याची आवश्यकता आहे; कारण अतिमहत्त्वाकांक्षेच्या भयाण मोहक आवर्तनात शिरलं की परतीचा मार्ग सापडण्याची शक्यता कमी असते. सिकंदरासारखी जग जिंकण्याची महत्त्वाकांक्षा असण्यात गैर काहीच नाही; पण जग जिंकण्याविषयीच्या आपल्या धारणा तपासून घ्यायला हव्यात.

तर फॅन्टसी ही गोष्ट या महत्त्वाकांक्षेहून निराळी आहे. लौकिक यशोगाथा हे तिचं ईप्सित नाही. व्यक्तीच्या मनोरम्य कल्पना- ज्या मुळातच अशक्यप्राय आहेत अशा एका काल्पनिक प्रतलावर फॅन्टसीचा वावर असतो. अर्थात पूर्ण न झालेल्या/ होऊ शकत नाहीत असं वाटणाऱ्या महत्त्वाकांक्षा म्हणजे फॅन्टसी.

पॉलिटिक्सच्या संदर्भात फॅन्टसी हा शब्द बहुविध अर्थांनी नि अनेक पातळ्यांवर चिकटलेला आहे. म्हणजे २००५ मध्ये केजरीवालांनी दिल्लीचा मुख्यमंत्री बनण्याचा विचार करणं, ही फॅन्टसीच होती. किंवा १९८४ मध्ये कुणी २०१४ मध्ये बहुमतप्राप्त बिगरकाँग्रेसी सरकारचा विचार करणं, हेदेखील एखाद्या फॅन्टसीपेक्षा कमी नव्हतं. म्हणूनच मघाशी म्हटल्याप्रमाणे कालची फॅन्टसी हे आजचं वास्तव किंवा आजची फॅन्टसी हे उद्याचं वास्तव असू शकतं. म्हणूनच आजच्या घडीला एखाद्या तथाकथित अव्यवहार्य कल्पनेला ती फॅन्टसी आहे म्हणून निकालात काढणं कठीण ठरतं. त्यामुळे संबंधित विषयाचं विश्लेषण हे आजच्या घडीला असलेल्या लेखकाला आकळलेल्या वास्तवाच्या चिमूटभर प्रकाशात जे दिसतं ते मांडण्याचा हा प्रयत्न.

पॉलिटिक्स आणि फॅन्टसी या दोन्ही अतिव्याप्त एन्टीटींचा

सहसंबंध प्रस्थापित करताना भारतीय संघराज्यीय चौकट आणि लोकशाही या राजकीय कार्यप्रणालीच्या अंतर्गत विचार केला आहे. पॉलिटिक्सच्या संदर्भात असणाऱ्या फॅन्टसीज या भारतीय राजकीय प्रक्रियेच्या यशापशाची अपत्यं आहेत, असं म्हटल्यास वावगं ठरू नये. लोकशाही राजकीय प्रणाली स्वीकारूनही राजकीय प्रक्रियेतील विषम सहभाग, असमतोल प्रतिनिधित्व हे या फॅन्टसीजचं महत्त्वाचं कारण ठरावं.

'कालचा पाऊस आमच्या गावात पडलाच नाही
सदरहू पीक आम्ही आसवांवरती काढलं आहे'

असं म्हणण्याची वेळ यशवंत मनोहरांवर येते ती यामुळेच. सोशल, बहिर्मुखी असलेल्या मध्यम वर्गाला अधूनमधून सक्रिय राजकारणात उतरून परिवर्तन करण्याची जी अनिवार इच्छा निर्माण होते, ती यातूनच. अर्थात त्यात वैयक्तिक महत्त्वाकांक्षेचा अंश असतोच. दुसरीकडे विभूतिपूजेतून आकाराला येणारी एक फॅन्टसी असते. एक व्यक्ती/ नायक येईल आणि तो सारं काही बदलून टाकेल, अशी फॅन्टसी. तिसरी फॅन्टसी ही व्यक्तीच्या वैयक्तिक महत्त्वाकांक्षांमधून आकाराला आलेली असते. थोडक्यात, सर्वसाधारणपणे तीन प्रकारच्या फॅन्टसीज पॉलिटिक्सबाबत दिसतात :-

१. 'नरेंद्र' फॅन्टसी
२. 'योगेंद्र' फॅन्टसी
३. स्वकेंद्र फॅन्टसी

१. 'नरेंद्र' फॅन्टसी :-

सोळाव्या लोकसभा निवडणुकीच्या आधी निर्माण झालेल्या राजकीय वातावरणात विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी एखाद्या प्रेषितासारखे समोर आले. यापूर्वीचं सरकार अतिशय भ्रष्ट आहे, हे सरकार आश्वासक भवितव्याची हमी देऊ शकत नाही, अशा वैफल्यग्रस्त वातावरणात नरेंद्र मोदी हा एक माणूस हे सारं काही बदलून टाकेल, नवं आश्वासक काही घडवू शकेल, अशी वातावरणनिर्मिती झाली. 'मेक बिलिव्ह' तंत्र असो किंवा आणखी काही, नरेंद्र मोदी जादूची कांडी फिरवतील नि सारं काही बदलेल, अशी फॅन्टसी एका वर्गाची होती. या फॅन्टसीच्या मुळाशी विभूतिपूजा आहे. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते,

> "In politics, Bhakti or Hero-worship is a sure road to degradation and to eventual dictatorship."

विभूतिपूजन हा अधःपतनाचा निश्चित मार्ग असून, त्याचं शेवटचं स्थानक हुकूमशाही हे आहे, असा स्पष्ट इशारा बाबासाहेबांनी दिला होता; तरीही अशा पद्धतीची एक सामूहिक फॅन्टसी आकाराला येते नि त्यावर एक वास्तव रचलं जातं, याचं कारणच मुळी भारतीय समाजाच्या वैफल्यग्रस्त मानसिकतेत आहे. 'यदा यदाहि धर्मस्य..' म्हणणाऱ्या समाजाला अनागोंदी, अत्याचाराच्या एका पातळीनंतर एका अवताराची प्रतीक्षा असते. आपण एक व्यक्ती म्हणून फार काही साध्य करू शकत नाही, त्यामुळे कोणी एक नायक येईल नि तो आपलं नेतृत्व करेल, अशी धारणा आहे. या धारणेच्या मुळाशी स्वातंत्र्य पेलता येत नसल्याची असमर्थता आहे. एरिक फ्रॉम यांचं एक पुस्तक आहे 'फिअर ऑफ फ्रीडम'; त्याचा मराठी अनुवाद आ. ह. साळुंखे यांनी 'भय स्वातंत्र्याचे' या नावानं केला आहे. स्वातंत्र्य पेलता न आल्यानं निर्माण होणारं भय नि त्यातून आपल्याबाबतचं भलंबुरं ठरवणारा कोणी एक नायक असेल नि म्हणून त्याची प्रतीक्षा करणं / किंवा अशा नायकाला जन्माला घालणं, या गोष्टी घडतात. 'नरेंद्र' फॅन्टसी ही केवळ मोदींबाबतची गोष्ट नव्हे. इंदिरा गांधींच्या बाबतही या प्रकारची फॅन्टसी होती. कर्नाटकाचे माजी मुख्यमंत्री वाय. एस. रेड्डी यांचं अपघाती निधन झालं तेव्हा त्यांच्या काही भक्तांनी स्वतःच्या प्राणांची आहुती दिली. अगदी अलीकडेच जयललिता यांना भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अटक झाली, तेव्हा त्यांच्या भक्त-चाहत्यांनी आत्महत्या केली. आंधळे असल्याप्रमाणे एका व्यक्तीभोवती धावणारे भक्त पाहताना सारामगोच्या 'ब्लाइंडनेस'ची आठवण येते. एका व्यक्तीभोवती असलेली फॅन्टसी म्हणजे 'नरेंद्र' फॅन्टसी होय.

२. 'योगेंद्र' फॅन्टसी :-

पारंपरिक राजकीय व्यवस्थेच्या मूल्यव्यवस्थेला छेद देत नवी समाजरचना उभी करण्याची एक स्वप्नाळू आदर्श मांडणी करणारे ज्येष्ठ राजकीय विश्लेषक / नेते योगेंद्र यादवप्रणीत फॅन्टसी ही या प्रकारची फॅन्टसी आहे. मसल-मनी-मीडिया या बळाचा येनकेन वापर करून सत्तेच्या चाव्या आपल्या हाती ठेवू पाहणाऱ्या व्यवस्थेला शह देऊन नवा वर्गविहीन जातविहीन समाज निर्माण करण्याचं स्वप्न एका फॅन्टसीसारखंच आहे. साने गुरुजींच्या मनातही अशी एक फॅन्टसी होती. अप्राप्य स्वप्नांचं फॅन्टसीत रूपांतर होतं. त्यांच्या मनातही त्यांनी रचलेला असा एका इमला होता, जो साध्य करता येत नसल्याची खंत त्यांच्या आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना तीव्रतेनं जाणवू लागली. सामाजिक दुःख हे त्यांच्या आत्महत्येचं कारण असल्याचं बोललं जातं. समकालीन राजकीय मूल्यव्यवस्थेशी कम्पॅटीबल होता येत नसण्यातून हे सारं जन्माला येतं.

सामाजिक परिवर्तन/ आदर्शवाद हा या फॅन्टसीचा केंद्रबिंदू आहे.

३. स्वकेंद्र फॅन्टसी :-

'स्व' ला केंद्र मानून स्वतःच्या महत्त्वाकांक्षांमधून आकाराला येणारी ही स्वकेंद्र फॅन्टसी. यात समाजपरिवर्तन/ राजकीय परिवर्तन यांच्यापेक्षा स्वतःचं अस्तित्व अधिक महत्त्वाचं असतं. यात कुठल्याही प्रकारची वैचारिक निष्ठा अभिप्रेत नसते. प्रसंगानुरूप स्वतःची पत- प्रतिष्ठा वाढवण्याच्या संदर्भात असणारी फॅन्टसी. राज्यशास्त्र प्रामुख्यानं तीन बाबींविषयी मांडणी करतं- १. व्यक्ती २. समाज ३. राज्य संस्था

व्यक्ती-व्यक्तीच्या इच्छा-आकांक्षा, त्यांतला कलह, सामाजिक धारणा यांच्या नियमनासाठी असते राज्य संस्था. यांपैकी व्यक्ती म्हणजे ती स्वतः ; या केंद्राभोवतीचं लहान त्रिज्येचं वर्तुळ म्हणजे या फॅन्टसीचं क्षेत्रफळ !

राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यांकडे फॅन्टसीलेखन म्हणून पाहावयास हरकत नसावी. वेगवेगळ्या निवडणुकींसाठी जाहीरनाम्यांच्या माध्यमातून केलेलं विपुल फॅन्टसीलेखन अभ्यासाचा विषय ठरावं. पॉलिटिक्स आणि फॅन्टसी यांच्या घनिष्ठ संबंधात जाहीरनाम्यांनी मोठी भूमिका बजावली आहे. सर्वांना वायफाय, सर्वांना घरं, वीज, शिक्षण रस्ते असे कैक वायदे म्हणजे कल्पनेची भरारी! त्या प्रत्यक्षात आणण्याचा कोणताच रोडमॅप नाही. नुकतीच पॉप्युलर फॅन्टसी म्हणजे– 'अच्छे दिन' ! हे अच्छे दिन म्हणजे काय, कोणासाठी, या प्रश्नांच्या खोलात न जाता 'अच्छे दिन'चे डोहाळे लागतात जनतेला. 'वेटिंग फॉर गोदो' प्रमाणे वेटिंग फॉर अच्छे दिन! आणि गोदो काही येत नाही!

प्रत्येक स्त्रीच्या मनात 'अनिमस' (पुरुषाविषयी तिची कल्पना) फॅन्टसी असते. प्रत्येक पुरुषाच्या मनात 'अनिमा' (स्त्रीविषयी त्याची कल्पना) फॅन्टसी असते. तशीच राजकीय प्रक्रियेबद्दल, राजकीय नेत्याबाबत नागरिकांच्या काही धारणा असतात तर काही फॅन्टसीज.

सेक्शुअल फॅन्टसी आणि पॉलिटिक्स यांच्या सहसंबंधांचा अभ्यास हा तर स्वतंत्र संशोधनाचा विषय ठरावा. सेक्स आणि पॉलिटिक्स या दोन्ही बाबींविषयीचं आदिम आकर्षण त्याला कारणीभूत आहे. मध्यंतरी शरद यादवांनी जे विधान लोकसभेत केलं, त्यावरून राजकारणाला असलेला लिंगभावाचा पदर ध्यानात येतो. अगदी कुठल्याही दुकानात काउन्टरला स्त्रीला उभं करणं असो किंवा कुठल्याही साबणाच्या जहिरातीत स्त्रीला आंघोळ करायला लावणं (जणू काही पुरुष आंघोळ करतात की नाही, असा प्रश्न पडावा), या सगळ्यातून राजकीय फोरफ्रंटवर स्त्रीला उभं करून स्त्रीविषयीच्या धारणा, कल्पना, फॅन्टसीज या साऱ्याचा पुरेपूर उपयोग करून भांडवलवाद 'कोटीच्या कोटी' उड्डाणं मारत असतो. ब्रिटिश राजकारणावर मतदारांच्या सेक्शुअल फॅन्टसीजचा कसा परिणाम होतो, याचा अभ्यास करणारा जॉर्जिन्या रोस यांचा लेख मुळातून वाचायला हवा. आपल्या मनातले हे सौंदर्यांचे साचे, सेक्शुअल फॅन्टसीजचे इमले खूप काही बदल घडवत असतात आपल्याही कळत- नकळत! मुळात व्यवस्थेवर आरूढ होण्याची-तिच्या साऱ्या नाड्या आवळून आपल्या ताब्यात ठेवण्याची वृत्तीच 'डिझायर फॉर सेक्स'मधून येते. ही अर्धसामंती व्यवस्थाच जणू स्त्रीचं रूप धारण करते. तिच्यावर घट्ट पकड ठेवण्याची पुरुषी महत्त्वाकांक्षा आपल्याला अनेक राजकीय कृतींतून दिसत असते.

राजकीय परिवर्तनाच्या स्वतःच्या धारणांमधून वेगवेगळ्या प्रकारच्या फॅन्टसीज उदयाला येतात. त्या समग्र परिवर्तनाचं व्यापक आकलन आहे अथवा नाही, यावर तिचं स्वरूप अवलंबून असतं. लोकशाही व्यवस्थेच्या आत दडलेली अर्धसामंती व्यवस्था मानसिक पातळीवर अनुभवणाऱ्या भारतीय समाजाला म्हणूनच राजेशाहीचे, एकचालकानुवर्ती शासनप्रकाराची विलक्षण फॅन्टसी आहे. (हिटलरचे माइन काम्फ उगाच नाही पॉप्युलर!)

मात्र विधायक परिवर्तनासाठी अनेकदा स्वतःच्या वैयक्तिक श्रद्धा, विचार या संदर्भात तडजोड करावी लागते. तसं केलं तरच फॅन्टसीज प्रत्यक्षात उतरू शकतात. सामूहिक शहाणपण आणि राज्य संस्थेची प्रागतिक धोरणं यांना सुसंगत अशी धारणा बाळगून कृती-कार्यक्रम आखता आला तर, या फॅन्टसीला मुक्त करून वास्तवाच्या खुल्या मैदानावर येता येईल.

आपापल्या घर-संसाराच्या वैयक्तिक फॅन्टसीज असतातच; पण सार्वजनिक फॅन्टसीजचा विचार करताना साने गुरुजींची 'नवा प्रयोग' ही कादंबरी आठवते. जाती-धर्म-वर्ग-लिंगभेदाच्या पलीकडे एका समतापूर्ण समाजाच्या बाबतीतली ही फॅन्टसी रचनात्मक राजकारणासाठी आवश्यक आहे.

सगळ्याच फॅन्टसीज काही वाईट नसतात.

काही फॅन्टसी चांगल्याही असतात, काही स्वप्नं असतात म्हणून तर ब्रेख्त म्हणतो,

**काळोख असला तरीही गाणं असेल**
**काळोखाचं!**

म्हणूनच तर सारं काही पुसून टाकून, विरघळून जाऊन सारी व्यवस्था रिफ्रेश करण्याची भाषा कोलटकर 'शेवटचा अश्रू' आणि नामदेव ढसाळ 'माणसानं' कवितेतून करतात!

**प्रा. श्रीरंजन आवटे**
shriranjangl@gmail.com

# ।। धाडसानं लिहिणाऱ्या बाया ।।

। गौरी कुलकर्णी-फाटक ।



फ्रेंच राज्यक्रांतीनंतर मानवजातीवर झालेल्या मूलभूत परिणामांचं एक फलित म्हणजे स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या तत्त्वांची जनसामान्यांस झालेली जाणीव. त्यानंतर लगेचच मेरी वोल्स्टोनक्रफट या ब्रिटिश फेमिनिस्ट बाईने स्त्रियांचे मूलभूत अधिकार यावर पुस्तक लिहिले A Vindication of the Rights of Women. मेरी यांच्या मते, स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार असलाच पाहिजे; कारण त्या लहान मुलांमध्ये ते संक्रमित करू शकतात. याशिवाय त्या जर शिकल्या, तर नुसत्याच पत्नी न राहता पुरुषांच्या त्या उत्तम सहचारिणी ही बनू शकतात. एक माणूस म्हणून त्यांना पुरुषांप्रमाणेच काही मूलभूत अधिकार असायलाच हवेत.

सिमोन दी बोव्हा या फ्रेंच लेखिकेने 'दि सेकंड सेक्स' या ग्रंथातून स्त्रीवादी विचारपद्धतीची पायाभूत मांडणी केली. स्त्री ही जन्मतः स्त्री नसते तर समाजव्यवस्थाच स्त्रीला एक भूमिका प्रदान करते. ही भूमिका न्यूनत्वाची असते. तिचे बाईपण हेही पुरुषांनी ठरविलेल्या मूल्यांनीच घोषित केले जाते, त्यामुळे तिला एक व्यक्ती म्हणून अस्तित्व नसते. आणि म्हणूनच स्त्रीने या समाज व्यवस्थेने लादलेली बंधने झुगारून दिली पाहिजेत आणि एकूणच समाज व्यवस्थेत 'सक्षम माणूस' म्हणून वावरण्याचा आपला हक्क मिळवला पाहिजे, अशी आग्रही भूमिका सिमोन द बोव्हा यांनी घेतली.

स्त्रियांच्या व्यक्तिस्वातंत्र्याविषयी, त्यांच्या व्यक्ती म्हणून वावरण्याच्या प्रक्रियेविषयी जेव्हा आपण बोलतो, तेव्हा तिच्या सर्व हक्कांसोबतच तिच्या लैंगिक स्वातंत्र्याविषयी न बोलले गेले, तरच नवल ठरावे. पुरुषाला निसर्गानेच असे बनवले आहे की, त्याने एका स्त्रीशी एकनिष्ठ राहिले नाही तरी चालते. पुरुषच तो-जाणारच दहा जणांच्या मागे, असा जो एक सूर आपल्या सभोवताली उमटत राहिलेला असतो, त्यामध्ये व्यक्ती म्हणून स्त्रीलाही लैंगिक स्वातंत्र्य तितकेच महत्त्वाचे असू शकेल, असा विचार होताना दिसत नाही.

या विषयाला धाडसीपणे तोंड फोडणारे; किंबहुना त्या दिशेने भरीव काम करणारे समाजसेवक म्हणजे र. धों. कर्वे.

भारतात र. धों. कर्वे यांनी 'समाजस्वास्थ्य' या मासिकातून कुटुंबनियोजन, लोकसंख्यावाढीला निर्बंध, याचबरोबर स्त्रियांचे लैंगिक स्वातंत्र्य या महत्त्वाच्या मुद्द्यांवर आपली मते निर्भीडपणे व्यक्त करून सामाजिक मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. पण अशा कधीही न बोलल्या जाणाऱ्या विषयांवर मतप्रदर्शन केल्याने त्यांना आपल्या प्राध्यापकी पेशाला रामराम ठोकावा लागला. हीच संधी मानून त्यानंतर 'र. धों'नी या कार्यात स्वतःला वाहून घेतले. लोकसंख्या नियंत्रित राहिली तर समाज प्रगती करू शकतो, हे पटवून सांगण्यासाठी 'समाजस्वास्थ्य' या मासिकात सातत्याने चर्चा सुरू ठेवली. त्याचबरोबर स्त्रियांचे लैंगिक स्वातंत्र्य यावरही निश्चित अशी भूमिका मांडली. गर्भधारणेचा धोका टाळून स्त्रियांना विविध लैंगिक अनुभव घेता येण्यासाठी संततिनियमनाच्या साधनांचा वापर हा मुद्दा त्यांनी धाडसीपणे चर्चिला. तान्ह्या मुलांचे संगोपन पुरुषांनी करणे, हा विचारही त्यांनी त्या काळी लावून धरला होता, जो आज जरा कुठे प्रत्यक्षात उतरताना दिसत आहे. त्याचसोबत अजून एक महत्त्वाचा विचार त्यांनी मांडला, तो म्हणजे स्त्रियांना आपल्या कामेच्छा व्यक्त करण्याचे, त्या पूर्णत्वास नेण्याचे स्वातंत्र्य मिळायला हवे. स्त्रियांनी त्यांच्या कामपूर्तीसाठी पुरुषवेश्यागमन करणेही वावगे ठरू नये, असा अत्यंत धाडसी विचार 'र.धों.'नी मांडला. 'र.धों.'च्या पत्नी मालतीबाईनीही या कार्यात त्यांना मनापासून साथ दिली.

या विषयावर नेमकेपणाने कार्य जरी झालेले असले तरी समाज काही गोष्टी वर्ज्य मानतोच. स्त्रियांच्या लैंगिक स्वातंत्र्याविषयी असाच एक नकारात्मक सूर सभोवताली समाजात आळवला जातो. लैंगिक स्वातंत्र्य वगैरे तर दूरच; पण जन्मल्या जन्मल्याच मुलीचे चारित्र्य जपण्याची तथाकथित जबाबदारी समाज आपल्यावर ओढवून घेतो. तिच्यावर पारंपरिक रूढी-परंपरा लादल्या जातात. यातून निर्माण झालेले अनेक प्रश्न, योग्य काय अयोग्य काय याबाबत मनात सुरू असलेला सततचा संघर्ष, या साऱ्यातून निर्णयाप्रत पोहोचण्यासाठी सुरू असलेली घुसमट आणि मग त्यानंतर लपवाछपवी करून जोपासलेल्या विवाहबाह्य संबंधात झालेली परिणीता, हे चित्र आपल्यासाठी आता नवे राहिले नाही. वैवाहिक आयुष्याची चौकट अबाधित (?) ठेवून, सर्रास लग्नाबाहेर रिलेशनशिपचे समांतर विश्व उभे करणाऱ्या स्त्रियांना आपल्या लैंगिकतेचे भान आले म्हणावे तर त्या ते खरेपणाने उघडपणे व्यक्त करताना हेजिटेट होतात; किंबहुना लपवून ठेवणेच पसंत करतात, ही त्याची खुपणारी बाजू आहे. अर्थात असे संबंध उघडपणे व्यक्त करण्याला समाजाची मान्यता नसणे, समाजाच्या विरोधात जाण्याचे धाडस, बळ नसणे किंवा तो अग्रक्रमच नसणे, आणि एकंदरीतच 'बनी बनायी' आयुष्याची घडी कशाला विस्कटा, या भावनेतून अशा संबंधांचे समर्थन सर्व थरांतून होताना दिसतेय. पण अशा खोटेपणावर आधारलेल्या संबंधांमधून कोणाला किती काळ समाधान, आनंद मिळेल, हे शेवटी ज्याचे त्याने ठरविण्याचा प्रश्न आहे.

ही आजच्या मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय समाजाची वस्तुस्थिती असली तरी या विषयाचे अजूनही अनेक पैलू घेऊन मराठी साहित्यात यासंबंधी धाडसी लेखन झालेले दिसते. हा एकंदर आवाका मोठा आहे. 'स्त्रीमुक्ती चळवळींचा भारतीय साहित्यावर झालेला परिणाम' या विषयाची व्याप्ती खूप मोठी आहे. मानसिक, भावनिक व शारीरिक पातळ्यांवर पूर्णपणे स्वातंत्र्य अनुभवणे, मोकळा स्वच्छंद श्वास घेता येणे, व्यक्ती म्हणून जगण्याची माफक अपेक्षा पुरी होणे, या संदर्भात मराठी साहित्यात विपुल लेखन झाले आहे.

त्यातल्याच काही मनाला भावलेल्या, वैचारिक बैठक तयार होण्यामध्ये हातभार लागलेल्या साहित्याचा विचार पुढे केला आहे.

भारतात स्त्रीवादाच्या मांडणीला आपापल्या परीने सुरुवात झाली. त्यामध्ये सर्वप्रथम ताराबाई शिंदे यांचे नाव घ्यावे लागेल. त्यांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री-पुरुष तुलना हा ग्रंथ लिहून भारतीय स्त्रीवादी विचारसरणीचा पाया धाडसीपणे रचला. या निबंधातून त्यांनी स्त्री-पुरुष विषमतेविषयी चर्चा केली. उपरोध, विडंबन शैलीने पुरुषी दुटप्पीपणा उघड केला. रामायण, महाभारत यांसारख्या आर्य महाकाव्यापासून ते समकालीन मुक्तामाला, मंजूघोषा या कादंबऱ्या, मनोरमा नाटक व 'पुणेवैभव'सारखी वृत्तपत्रे यांतील दांभिकता उघड करून स्त्रियांच्या परावलंबित्वाला पुरुषनिर्मित मूल्यव्यवस्थाच कशी कारणीभूत आहे, जबाबदार आहे, याचा ऊहापोह केला. स्त्री म्हणजे लाजाळू, नाजूक, उपजत मूर्ख, निर्बल, अविचारी असते, या पुरुषी समजुतींना छेद देण्यासाठी त्यांनी झाशीच्या राणीचा दाखला दिला. स्त्रिया नसत्या तर पुरुष झाडांची पाने चघळीत रानोमाळ भटकत फिरले असते, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

अलीकडच्या काळात स्त्रियांच्या मानवतावादी हक्कांचा स्पष्ट पुरस्कार करणाऱ्या गौरी देशपांडे, मेघना पेठे, कविता महाजन, सानिया, प्रिया तेंडुलकर, शांता गोखले आणि परिवर्तनवादाचा पुरस्कार करणाऱ्या, माणूसपणाच्या दिशेने प्रवास करणाऱ्या प्रज्ञा

दया पवार या साऱ्यांनीच आपापल्या प्रकृतिधर्मानुसार स्त्रियांच्या प्रश्नांची मांडणी केली.

'नातिचरामी' मध्ये मेघना पेठे यांनी लग्न व्यवस्था, घटस्फोट आणि स्त्री-पुरुष नातेसंबंधांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे. मीराच्या ऑफिसमध्ये नेहमी येत असणाऱ्या एका जाहिरात व्यावसायिकाच्या प्रेमात मीरा पडते. तो लग्नाला नकार देतो. तरीही मैत्री राहते. मध्येच अचानक तो लग्नाला तयार होतो. लग्नापूर्वीच त्यांचे शरीरसंबंध येतात. त्याचे तंतोतंत वर्णन मेघनांनी केले आहे. फार गांभीर्याने विचार न करता मग दोघे लग्न करतात. खरे म्हणजे प्रेमविवाह असल्याने आधीपासून एकमेकांचा स्वभाव परिचित असणे आवश्यक असते; पण कुठल्यातरी प्रवाहात, भोवऱ्यात सापडल्यासारखे ते दोघे लग्न करून बसतात. मग बारीकसारीक तक्रारी आणि एकंदरीतच न जुळणाऱ्या केमिस्ट्रीमुळे मीराला एकटेपणा जाणवू लागते. सतत नवऱ्याच्या नाकारलेपणाच्या दुःखाला सामोरी जात असतानाच तिला एक मित्र भेटतो. तिच्या मानसिक संवेदनशील गरजा पूर्ण होऊ लागतात. मानसिक लेव्हलवर जुळलेल्या तारा मग शरीरसंबंधांपर्यंत पोहोचतात. मीरा नवऱ्याला स्पष्टपणे सांगते, अन् तिथेच घटस्फोटाची ठिणगी पडते. तिच्या शारीरिक गरजा नवऱ्याकडून पूर्ण होत असतानाही, मानसिक पातळीवर विसंवाद असताना केवळ शारीरिक पातळीवर संबंध ठेवणे योग्य न वाटून, चारचौघांना फारसा दोष सापडणार नाही अशा नवऱ्याला घटस्फोट देते. बारा वर्षे प्रियकरासोबत संबंध सुरू ठेवल्यानंतर प्रियकर पुन्हा बायकोकडे जातो. मीरा जरी स्वतंत्र असली तरी त्याच्या जाण्याने एक पोकळी तिच्या आयुष्यात निर्माण होते. हे चित्रण मेघनांनी अतिशय नेमकेपणाने, तरलपणे मांडले आहे.

बायका पुरुषाचा वापर कसा करतात, हे सांगताना मेघना लिहितात, 'गुलाम, नोकर, भडवा, खेळणं, बुरखा, आणि सांड हे सारे रोल्स किळस आल्यासारखे नाकारले खरे आपण, पण यातलं काहीच कधीच नको असतं आपल्याला? कागदावर नाही तरी प्रत्यक्षात पुरुषाचा असा वापर करीत नाहीत बायका? पूर्वी जेव्हा शरीर, फार तर जात आणि बाप देऊ शकेल देईल एवढा हुंडा इतकेच भांडवल असायचे बाईजवळ. तेव्हा ती सर्रास मालक किंवा यजमान नाही का पत्करायची? त्याची सुशोभित रांड म्हणून नाही का राहायची?

'हंस अकेला' मधल्या एकूण ७ कथांमध्ये मेघनांनी शारीरिक वा मानसिक अपूर्णता पूर्ण करण्यासाठी केलेली केविलवाणी धडपड सरळपणे मांडली आहे. 'समुद्री चहूकडे पाणी' मध्ये प्रौढ विवाहित स्त्रीची शारीरिक, मानसिक घुसमट, सुभद्रा-नेरुरकर यांचे विवाहबाह्य संबंध, नेरुरकरबद्दल आकर्षण वाटणारी नायिका मेघनांच्या विचारातून नेमकेपणाने व्यक्त झाली. 'अरे लग्नाशिवाय आयुष्यात येणारा प्रत्येक पुरुष म्हणजे गिऱ्हाइक नसतं, फार तर एखादा गरजू इसम असतो. तुमच्या गरजेचा आणि त्याच्या गरजेचा पोत जुळला आणि परिस्थितीनं साथ दिली तर कुठल्याही स्त्री-पुरुषात हे संबंध उगवू शकतात.' नेरुरकरविषयी आपल्याला वाटणारे हे आकर्षण निव्वळ शारीरिक आहे हे माहिती असूनही तिची त्याबद्दलची विचारप्रक्रिया स्पष्ट आहे.

'कोल्ह्याचं लगीन' मधल्या मोलकरीण मंजुळाबाई आणि घरमालक आशुतोष यांच्यात जुळलेले स्नेहाचे धागे आणि त्याचे त्यांच्या शरीरसंबंधात झालेले पर्यवसान असा प्रवास चित्रित केलाय. शांत, अबोल आणि एकटा असणारा आशुतोष एक दिवस ब्ल्यू फिल्म पाहत असताना त्याच्या शारीरिक भावनांचा उद्रेक होतो, नेमक्या त्याच वेळेस तिथे अचानक मंजुळाबाई येतात, ज्यांच्या मनात आशुतोषबद्दल आधीपासूनच प्रेम, जिव्हाळा असतो. दोघे अभावितपणे एकत्र येतात. यातला जिव्हाळा, ओलावा आणि शिवाय गरज हे खूप नेमकेपणाने मेघनांनी मांडलेय.

'आए कुछ अब्र'मध्ये एका प्रौढ कुमारिकेच्या संघर्षाची कहाणी आहे. मुलीला एकदा लग्न करून सासरी ढकलली की आपले उत्तरदायित्व संपले, या भावनेतून मुलांकडून आलेल्या नकारांबद्दल वडील मुलीचा राग राग करीत असतात. रोजच्याच कटकटी असह्य झाल्यावर ती स्वतःच घराबाहेर पडून नवरा शोधायला सुरुवात करते. तेव्हा तिला वाटते की, आपण रस्त्याच्या कडेला उभी असलेली कचराकुंडीच आहोत, 'युज मी' लिहिलेली. अशीच एकदा बघायला येणाऱ्या मुलाची वाट पाहत थांबलेली असताना तिला भेटलेला एक निरागस तृतीयपंथी, तिच्याकडे वाईट नजरेने पाहणारा एक मुस्लिम गृहस्थ यांतून तिला झालेली कटू सत्याची जाणीव, रस्त्यावर नटूनथटून उभी राहणारी बाई म्हणजे बऱ्याच वेळा वेश्या व्यवसाय करणारी... तिला एकदम जाणवून जाते, 'कुठल्या तऱ्हेने वेगळे आहोत आपण तिच्यापेक्षा? आपली गरज आणि दुसऱ्याची गरज जुळते का हे बघण्यासाठीच तर ती बाई तिथे उभी होती आणि आपणही. '

मनू, अकबर, सुलतान, एंडी, हरनाम यांच्याशी असलेली नायिकेची मैत्री आणि त्यातून स्त्री-पुरुष संबंधांचे गौरी देशपांडेंनी केलेले विश्लेषण नायिकेची माणूस म्हणून जगण्याची धडपड स्पष्ट करणारे आहे. एखाद्या स्त्रीला पुरुषाची गरज वाटणे किंवा पुरुषाला स्त्रीची गरज वाटणे, ही एक नैसर्गिक गोष्ट आहे. पुरुष आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी असतो; त्यामुळे त्याला स्त्रीची असणारी गरज ही शारीरिक स्वरूपाची असते. पण स्त्री मात्र सगळ्याच गरजांसाठी पुरुषावर अवलंबून असते. पण स्त्रियांच्या सगळ्याच गरजा दुय्यम ठरविल्या गेल्या किंवा सरळ नाकारल्या गेल्या. या गरजांची सरळ आणि स्पष्ट मागणी आणि पूर्तता ही गौरीच्या नायिकांनी धाडसीपणे केली आहे. 'कारावासातून पत्रे'म्हणजे आयुष्यात आलेले अनेक पुरुष अर्थात जेलर. मानसिक, शारीरिक गरज हीसुद्धा नायिकेला तुरुंगाप्रमाणे वाटते. शांत, समाधानकारक परिस्थिती येईल म्हणून दर वेळेस नव्या पुरुषाशी मानसिक,

भावनिक आणि शारीरिक संबंध प्रस्थापित केले तरी स्त्रीच्या वाट्याला आलेले भोग काही सुटत नाहीत. प्रियकराच्या सोडून जाण्याने अपमानित झालेल्या स्त्रीची मनोगते म्हणजेच कारावासातून पत्रे आहेत.

'मध्य लटपटीत' या लघू कादंबरीच्या निमित्ताने गौरी लग्न व्यवस्थेविषयी अनेक शंका उपस्थित करतात. लग्न व्यवस्था आणि त्यात अडकलेल्या जोडप्यांची दिशाहीनता या लघू कादंबरीत स्पष्ट केली आहे. समाजाने आखून दिलेल्या चौकटीत राहून धुमसते आयुष्य कंठणारी बहुसंख्य जोडपी आपल्याला भेटतात. संवाद नसलेल्या जोडप्याच्या आयुष्यात आलेले तात्पुरते पर्याय आणि मग त्यातून निर्माण झालेले मतभेद याबद्दल विस्ताराने आणि नेमकेपणाने गौरी लिहितात. रती-श्रीधर यांचे लग्न मोडण्याच्या वळणापर्यंत येण्याचे कारण म्हणजे रतीचा मित्र कांचन. कांचनशी असलेले संबंध कधी ना कधी संपणार आहेत याची खात्री रती आणि कांचन या दोघांनाही आहे. आपला नवरा हा एक आदर्श नवरा आहे, हेही रतीला माहीत आहे. रतीचे तिच्या नवऱ्यावर प्रेमही आहे. कांचन आणि रतीच्या संबंधांमुळे श्रीधर रतीपासून लांब लांब जाऊ लागतो, तिच्यापासून तुटत जातो.

राधा-माधव यांचे स्वयंपूर्ण सहजीवन आणि पारंपरिक विचारपद्धती अंगीकारलेली त्यांची मुले असे विचित्र कॉंबिनेशन 'एकेक पान गळावया'मध्ये गौरी साकारतात. माधवचा मृत्यू, राधाचे प्रॅक्टिकल वागणे, मित्र फरहदजवळ माधव गेल्याचे राधाचे दुःख उफाळून येणे, पारंपरिक विचारसरणीच्या मुलांची त्यावरची विचित्र प्रतिक्रिया, आणि एकंदरीतच आई-वडिलांविषयी मनात असणारी अढी याबद्दलचे वास्तववादी चित्रण गौरीने केलेय. 'गुदमरून टाकणारी माया, चढत्या आवाजात लावलेली शिस्त, हुतात्म्याचा आव आणून केलेले आणि मग जन्मभर तोंडावर फेकलेले स्वार्थत्याग' ही समाजाकडून अपेक्षित असणारी आणि सर्वत्र सर्रास अंगीकारली जाणारी नीती राधाला मान्य नाही. मुलांना त्यांच्या पद्धतीने वाढू देण्यावर राधा-माधवचा भर आहे.

तेरुओ पूर्णपणे काल्पनिक नाही, तर अनुभवावर आधारलेली आहे. पण आयुष्यातील एका काळाचा आलेखही समजू नये, अशी मिश्र नोंद सुरुवातीलाच देऊन गौरी वाचकाचे कुतूहल जागृत ठेवतात. तीन निरनिराळ्या पुरुषांवर आत्यंतिक उत्कट प्रेम असा तेरुओचा आकृतिबंध आहे. नवऱ्याच्या नोकरीच्या निमित्ताने देशीविदेशी फिरणाऱ्या नायिकेचे तेरुओ हे सर्वस्व आहे. त्यांचा संवाद भाषेच्या पलीकडला- अत्यंत उत्कट असा आहे. त्याच वेळेस तिचा 'जी'मध्येही जीव अडकलेला आहे. सुंदर स्त्री-पुरुषांच्या प्रेमात पडायची आपल्याला सवयच आहे, असा कबुलीजबाब नायिका देते. तिचा नवराही हे सहज मान्य करून जातो की, तिला लोकांच्या प्रेमात पडायची सवयच आहे. उत्कट प्रेमापुढे लैंगिक संबंधही निष्प्रभ ठरतात. तेथे एकमेकांबद्दलचा भाव इतका संपूर्ण असतो की, मग खुद्द प्रणयक्रियाही त्याचा एक भाग बनते, ते करणं न करणं याला फारसं महत्त्व उरत नाही, असं परफेक्ट विश्लेषण गौरी करतात. पारंपरिक लग्नपद्धतीविषयी इथे पुन्हा एकदा शंका उपस्थित केली आहे. एखाद्या कागदावर सही केली म्हणून लगेच लग्न झाले आणि लगेचच टिपिकल नवरा-बायकोसारखे वागणे नायिकेला पटत नाही. जनकलाही हे मंजूर आहे. भारतीय पुरुषासारखा तो सतत बायकोला धाकात ठेवणारा पुरुष नाही. तिच्या स्वातंत्र्याची कदर करताना त्याला स्वतःलाही स्वातंत्र्य हवे असते. नायिका म्हणते, 'वर-वर बघायला जनक वेगळा, तरी अखेर माझ्याच जातीतला! लग्न झालं म्हणजे स्त्रीची प्रत्येक भावना, अवयव आणि कृत्य नवऱ्याच्या मालकीचं होत नाही.' याचा पुरस्कार दोघेही करतात.

'दुस्तर हा घाट' मधल्या वनमाळीचे विविध स्त्रियांशी शारीरिक संबंध आहेत हे समजल्यावर नमूला धक्का बसतो. विवाहबाह्य संबंधांचे वावडे नसलेल्या गौरीच्या नायिकांची एक ठाम भूमिका याबाबत आहे, ती म्हणजे कुणाची फसवणूक होता कामा नये.

'थांग' मधल्या कालिंदीच्या आयुष्यात आलेले नंदन, इयन आणि दिमित्री हे तीन पुरुष. नंदन एक टिपिकल नवरा, तर इयन आणि दिमित्री हे कालिंदीला स्वप्रकाश अनुभवायला लावणारे मित्र, असे चित्रण गौरीने केले आहे. इयनकडून मिळालेले शारीरिक सुख आणि दिमित्रीवरील अपरंपार प्रेम तिला खऱ्या अर्थाने जगायला शिकवते. बंधनातून सोडवते. तेच खरे प्रेम याची प्रचिती दिमित्री आणि कालिंदी यांच्या प्रेमातून येते.

'मुक्काम' मध्ये 'थांग'मधली नायिका कालिंदीचा पुढचा प्रवास चित्रित केला आहे. स्वतंत्रपणे स्वतःच्या सामर्थ्यावर सगळे पेलून नेण्याचा तिचा निर्णय प्रखर आत्मजाणिवेचा प्रत्यय आणून देतो.

'भिन्न'मध्ये कविता महाजन यांनी एड्सग्रस्तांचे, लेस्बियन मुलींचे प्रश्न हाताळले आहेत. लेनिना एड्सग्रस्तांसाठी काम करत असल्यामुळे अनुभवांनी समृद्ध आहे; पण पुरुषांची अरेरावी लहानपणापासून पाहत आल्यामुळे तिच्या मनात पुरुषांविषयी आणि स्त्री-पुरुष संबंधांविषयी द्वेष आहे. पुरुष म्हणजे वापरून फेकून देण्याची गोष्ट, अशी तिची मनोभूमिका तयार झाली आहे.

शांता गोखले यांनी रीटा वेलिणकर या कादंबरीतून रीटाचे एका विवाहित पुरुषावरचे प्रेम, त्यानेही तिला दिलेले उत्तेजन, या प्रेमात बुडालेली रीटा, शेवटी त्याच्या बायकोकडे परत जाण्याने फ्रस्ट्रेशनमधून नर्व्हस ब्रेकडाउन झालेली पण पुन्हा सावरलेली रीटा, अशी व्यक्तिरेखा चितारली आहे. विवाहित पुरुषावर प्रेम व त्यातून मिळणारी वंचन, हे सारे अनुभवल्यानंतरच ती स्वतंत्र आयुष्याचा विचार करू शकते.

स्त्रियांच्या लैंगिकतेविषयी विचार करताना वंदना खरे यांचे

'योनीच्या मनीच्या गुजगोष्टी' या नाटकाचा उल्लेख व्हायलाच हवा. नाटकाच्या सुरुवातीलाच प्रेक्षकाची एक निश्चित अशी भूमिका तयार केली जाते. निवेदिका प्रेक्षकाला 'योनी' हा शब्द मोठ्याने उच्चारायला लावते. अगदी स्पष्ट आवाजात. कुजबूज, तोंडातल्या तोंडात वगैरे काही चालत नाही तिथे. प्रेक्षकात बसलेल्या प्रत्येकाला जाणवते की पारंपरिकतेचा किती मोठा प्रभाव आपल्या मनावर सतत कार्यरत असतो. दोन-तीनदा शब्द उच्चारला की मग मोकळ्या मनाने आपण एका वेगळ्या विषयाकडे वळायला सज्ज होऊन बसतो.

शीर्षकात स्पष्ट झाल्याप्रमाणेच, योनीला जर बोलता आले असते तर ती नेमके काय काय बोलली असती, असा नाटकाचा फॉर्म आहे. अनेक छोट्या छोट्या प्रसंगांतून, खुमासदार वर्णनातून स्त्रियांच्या लैंगिकतेविषयी नेमके भाष्य या नाटकाच्या निमित्ताने ऐकायला मिळते. मूळ इंग्रजी लेखिका इव्ह एन्सलर यांच्या 'व्हजायना मोनोलॉग्स' या नाटकाचा मराठी अनुवाद आणि सादरीकरण वंदना खरे यांना उत्तम साधले आहे.

स्त्रियांची लैंगिक अभिव्यक्ती याविषयी छाया दातार यांनी त्यांच्या लेखनातून सविस्तर चर्चा केली आहे. पुरुषप्रधान समाजव्यवस्था कधी आणि कशी उदयास आली यावर अभ्यासपूर्ण लेखन छाया दातार यांनी केले आहे. स्त्रिया ज्या वेळी रांधा, वाढा, मुलेबाळे या चक्रातून बाहेर पडून अर्थार्जनासाठी बाहेर पडू लागल्या आणि काही ना काही कारणाने एकत्र जमू लागल्या, तेव्हा पुरुष सहकाऱ्यांसोबत काम करताना येणाऱ्या अनुभवांविषयी मोकळेपणाने आपापसात बोलू लागल्या. पती-पत्नीच्या खासगी समजल्या जाणाऱ्या नात्यामध्ये त्यांना जाणवणारी विषमता, पुरुषी वर्चस्व वगैरेबद्दलही शेअरिंग होऊ लागले. पर्सनल समजले जाणारे हे प्रश्न किती व्यापक आहेत, पुरुषप्रधान समाजव्यवस्थेचा भाग आहेत, हे समजायला लागल्यावर यावर काम करण्यासाठी संघटित व्हावे लागेल, ही जाणीव आली. खासगीतल्या प्रश्नांचे राजकारण करायला हवे, हेही स्त्रियांना उमगले. यातूनच जन्माला आली ती 'पर्सनल इज पोलिटिकल' ही घोषणा. गर्भपाताच्या कायद्याच्या निमित्ताने स्त्रीचा स्वतःच्या शरीरावर अधिकार हवा, ही जाणीव आली. मग सुरू झाली ती समलिंगी संबंध मानणाऱ्या स्त्रियांची चळवळ. समलिंगी प्रवृत्ती आमच्यामध्ये जन्मजात होत्या; पण त्या दडपल्या गेल्या. पुरुषांशी लैंगिक संबंध असणे हेच नॉर्मल समजले जायचे. मानवी लैंगिकतेचे बरेच पैलू आहेत. स्त्री-पुरुष शरीरसंबंध हा त्यातील एक अनुभव आहे. समलिंगी संबंध हा दुसरा अनुभव आहे. ते नैसर्गिक आहे. बायसेक्शुअल व्यक्ती दोन्ही प्रकारचे अनुभव घेऊ शकतात. केवळ नर आणि मादी यापलीकडे वाटचाल सुरू होऊन माणसाची संस्कृतिक उन्नत्ती होत गेली आणि रक्ताची नाती इत्यादीमध्ये येणारे लैंगिक संबंध निषिद्ध मानले गेले, त्याचप्रमाणे समलिंगी संबंधांबाबतही झाले असावे. हल्ली हल्ली कुठे जरा त्यावर विचार होताना दिसतो आहे. त्याबद्दल कायद्यातही तरतुदी निघत आहेत. त्यालाही समाजातून प्रचंड विरोधी सूरच असला तरीही लोक निदान त्याबद्दल बोलू तरी लागले आहेत.

एकंदरीत व्यक्तिस्वातंत्र्यात स्त्रियांना आपल्या लैंगिक स्वातंत्र्याचा पूर्ण अधिकार मिळावा, असा सूर वरील सर्व साहित्यामधून उमटला आहे. स्त्री म्हणून बंधनात ठेवण्याचे प्रयत्न करू पाहणाऱ्या या पुरुषप्रधान संस्कृतीवर फेकलेला दगड म्हणून अगदी अलीकडे व्हॉट्सॲप वर व्हायरल झालेली ती व्हीडिओ क्लिप आठवते..

माय बॉडी...माय माइंड...माय चॉइस...

माझ्याच आवडीची वस्त्रे परिधान करेन... आणि शरीरावर कितीही कापडं चढवली तरी माझा आत्मा अनावृतच असेल... रेशमी काय किंवा सुती काय... कोणत्याही कापडाने माझा अंतरात्मा बंदिस्त होऊच शकणार नाही. कारण ती माझी स्वतःची निवड असेल. कापडाच्या तुकड्यांनी माझं विशाल, गहिरं मन जर कुणी बंदिस्त करू पाहत असेल तर, ते म्हणजे विश्वाचा विस्तार रोखण्याचा किंवा त्या तेजोगोलाचे तेज हातांच्या ओंजळीत बंदिस्त करण्याचा प्रयत्न करण्याचा खुळा विचार ठरेल. झीरो साइझ की साइझ पंधरा- माझे शरीर असल्या वेडगळ पिंजऱ्यात बंदिस्त होणारे नाही. लग्न करायचे- नाही करायचे; सर्वस्वी माझीच निवड असेल. लग्नापूर्वी सेक्स अनुभवायचा, लग्नबाह्य सेक्स करायचा, तात्पुरते प्रेम, चिरकाल टिकणारे प्रेम, पुरुषावर प्रेम, स्त्रीवर प्रेम; की दोन्हीवरही.... सारा सारा फक्त माझाच प्रश्न. एक लक्षात ठेव नीटच- मी तुला निवडलेय ते तुझ्या अधिकारात राहण्यासाठी नाही.. घरी पहाटे चार वाजता यायचे की 'सातच्या आत घरात' हा माझा निर्णय असेल. तुझ्या मुलांना जन्माला घालायचे की नाही, ते फक्त मीच ठरवेन. माझी स्वतःची निवड मला स्वतंत्र व्यक्ती बनवेल. एक अनोखी ओळख जी माझ्या हाताच्या बोटांच्या ठशांइतकीच माझी असेल. फक्त माझी. ती माझी अभिव्यक्ती असेल. दाही दिशांनी अनंत, अथांग विहरू पाहणारी मी एक विश्वरूप आहे. या अनंत ब्रह्मांडाचा अफाट पसारा सामावलाय माझ्यात...

**गौरी कुलकर्णी–फाटक**
gouri.phatak@gmail.com

वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने
क्रिकेटविश्वात पदार्पण केलं...
आणि पाहता पाहता
नवनवे उच्चांक गाठले...
जगात भारताचं नाव उंचावून
'लिटिल मास्टर' ठरला...
त्याच्या साध्या, प्रांजळ
स्वभावासारखाच
त्याचा जीवनप्रवास

सचिन तेंडुलकर

प्लेइंग इट माय वे

माझं आत्मचरित्र

अनुवाद
दीपक कुळकर्णी

किंमत : ६४० रु.



# ।। आदिवासींच्या कला-साहित्यातील फॅन्टसीज ।।

। प्रमोद मुनघाटे ।

एके काळी या पृथ्वीवर पाणीच पाणी होते. त्या पाण्यात कमळाच्या वेली आणि फुले होती. त्यांतील एका कमळाच्या पानावर देवाचा जन्म झाला. त्या देवाने आपला बाहू घासला तर कावळा उत्पन्न झाला. तो त्याच्या खांद्यावर बसला. त्याच पाण्यात खेकडाही निर्माण झाला व तो पोहत पोहत जाऊन पाण्याच्या बाहेर पडण्याचा प्रयत्न करू लागला. देवाने कावळ्याला जगात फिरून माती आणण्याचा आदेश दिला. कावळ्याने सर्वत्र फिरून मातीचा शोध घेतला; पण त्याला कुठेच माती दिसली नाही. मात्र त्याला समुद्राच्या तळावर एक पाय ठेवून विश्रांती घेत



असलेला खेकडा दिसला. फिर फिर फिरलेला कावळा थकला होता. खेकड्याच्या पाठीवर कावळ्याने घटकाभर विश्रांती घेतली. त्याचे पाय खेकड्याच्या पाठीवर उमटले. तेव्हा खेकडा कावळ्याला म्हणाला, 'देवाने माझी पाठ जरा कडक केली तर मला मातीचा शोध घेता येईल.' देवाने खेकड्याचे ऐकले व त्याची पाठ कडक केली. खेकड्याने मग समुद्राच्या तळाशी बुडी मारली. तेथे त्याला गांडूळ सापडले. गांडुळाने आपल्या तोंडातून माती काढली व खेकड्याने ती देवाला नेऊन दिली. देवाने ती माती समुद्रावर पसरविली व देव जमिनीवर चालू लागले.

ही गोंड जमातीची एक लोककथा आहे. लोककथांमध्ये अशा अनेक दंतकथा (मिथ) असतात. अशा कथांच्या निर्मितीची प्रेरणा कोणती असावी यावर समाजशास्त्रज्ञांनी भरपूर संशोधन केले आहे. पण एक गोष्ट मात्र निश्‍चित की, या कथांच्या निर्मितीमध्ये लोकप्रतिभा आहे. कारण त्यात 'फॅन्टसी' आहे. आदिमानवाला विश्‍वाच्या निर्मितीसंबंधी किंवा प्राण्यांच्या उत्पत्तीसंबंधी जे प्रश्‍न पडले त्यातून अशा फॅन्टसीजची निर्मिती झाली. त्यातून त्या त्या प्रदेशातील मानवसमूहाच्या सामूहिक नेणिवा जशा दिसतात, तशाच अद्‌भुत फॅन्टसीजची निर्मिती करणारी सामूहिक प्रतिभासुद्धा दिसते.

फॅन्टसी म्हणजे प्रत्यक्षात नसलेली अशी काल्पनिक गोष्ट किंवा परिस्थिती. थोडक्यात दिवास्वप्न असे म्हणता येईल. ही मानवी जीवनाचा अविभाज्य भागच आहे. बाह्य जगापेक्षा मनुष्याच्या मनाच्या आतील जग हे अधिक अमर्याद असते. तर्कातीत असते. या भावजीवनावर फॅन्टसीजचेच अधिराज्य असते. गंमत म्हणजे अवतीभवतीच्या वास्तवापेक्षा मनुष्याच्या फॅन्टसीवर अधिक विश्‍वास असतो. उदा. देव किंवा भूत. फॅन्टसीजची ही सर्वव्यापी उदाहरणे होत. स्वर्ग-नरक अशा फॅन्टसीज सर्वच मानवी संस्कृतींमध्ये आदिकाळापासून आढळतात. त्यांच्या निर्मितीमध्ये एका बाजूला लौकिक पातळीवरील वास्तव संदर्भ असतात, तर दुसरीकडे अलौकिक पातळीवरील फॅन्टसीज असतात. 'अतिवास्तववादी' भावविश्‍वाची निर्मिती अशा वास्तव-अवास्तवाच्या सीमारेषांवरील फॅन्टसीजमुळेच शक्य होत असते. आधुनिक साहित्यात अत्यंत प्रतिभावंत लेखकांनी फॅन्टसीजच्या आधारे मानवी जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला असे दिसते. पण आदिवासींच्या कला-साहित्याचा विचार केला तर अत्यंत कलात्मक फॅन्टसीज आढळून येतात.

भूत ही एक अद्‌भुत फॅन्टसी आहे. मानवी मनाने स्वतःशीच खेळलेला एक गंभीर खेळ आहे. आधुनिक काळात 'भूत' ही एक अदृश्य अशी संकल्पना बनली आहे. परंतु आदिवासींच्या कल्पनाविश्‍वात या फॅन्टसीला अत्यंत महत्त्व आहे, म्हणून भुताच्या फॅन्टसीमध्ये तपशिलाचे अनेक रंग ते भरतात.

**महाराष्ट्रातील ठाकर जमातीमध्ये भुताचे किती प्रकार आहेत पाहा : ठाकरांच्या फॅन्टसीमध्ये चार प्रकारची भुते आहेत. त्यांपैकी हडळ हे स्त्रीभूत आहे. काळ्या रंगाची हडळ डोक्याभोवती एक जाडेभरडे घोंगडे गुंडाळते. ती आपल्या मनाला येईल तसे स्वतःचे रूप पालटत असते. ( म्हणजे फॅन्टसीमध्ये फॅन्टसी !) आता इथे दिसते तर दुसऱ्याच क्षणी गायब होते व तिच्या ठिकाणी ज्वाळा दिसू लागतात. भुताचा दुसरा प्रकार म्हणजे 'खवीस' होय. हातात काठी घेतलेला हा नरभूत होय. त्याच्या पायाची बोटे उलटी म्हणजे पाठीमागच्या बाजूस असतात. तो चालताना त्याच्या काठीचा आवाज होतो. हडळीप्रमाणे खवीसदेखील आपले रूप बदलतो. एकदम उंच किंवा लहान होऊन जातो. तो कधी ससा, कुत्रा किंवा बैल अशी रूपे धारण करतो. त्याच्या अंगाला नेहमी मांसाची घाण येते, असे ठाकर मानतात. 'मुंजा' हा ठाकरांच्या फॅन्टसीमधील भुताचा तिसरा प्रकार. खवीस हा एकटा भटकतो तर मुंजा हा एकटा कधीच नसतो. त्याच्यासोबत पाच-दहा स्त्रीभुते असतात. मुंजा हा त्या स्त्रीभुतांचा पुढारी असतो. त्याची कातडी निळी असते आणि बरोबरच्या स्त्रीभुतांचेही वस्त्र निळेच असते. 'सड' हा ठाकरांच्या भुताचा चौथा प्रकार. तो धूमकेतूसारखा कुठेही कसाही उगवतो. अचानक दगड पाडणे व लोकांना जखमी करणे, हे सडाचे चाळे असतात, असे मानले जातात.**

थोडक्यात, ठाकरांच्या भुताच्या फॅन्टसीचा वेगवेगळ्या बाजूंनी विचार केला तर तो मोठ्या संशोधनाचा विषय आहे. अशा निर्मितीमागे शुद्ध कलानिर्मितीचा हेतू नाही. पण आदिम मानव एखाद्या फॅन्टसीचा तपशिलात जाऊन कसा विकास करीत असे ते लक्षात येते. आज अशा फॅन्टसीचा वापर करून आदिवासींना छळणाऱ्या प्रशासकीय किंवा भांडवलशाही शक्तींविरोधी उठाव करण्यासाठी एखाद्या नव्या लेखकाला नवी कलाकृती रचता येईल असे वाटते.

आदिवासींच्या गीत, नृत्य, चित्र आणि शिल्प या कलांमध्येही फॅन्टसीचा भरपूर प्रत्यय येतो. गोंडांच्या लोकगीतांमधील प्रतीके व प्रतिमा पाहिल्या तर त्या सदैव ताज्या कल्पनांनी समृद्ध अशा आढळतात. भुजंग मेश्राम या कवीने अशा गीतांमधील सौंदर्य उलगडून दाखविले आहे. मृगनक्षत्राच्या मुहूर्तावर गोंड लोक धरतीची ओटी कशी भरतात पाहा : 'सोन्याच्या तिफणीला चांदीच्या कासऱ्यांनी हिऱ्याची धुरा बांधली आणि लग्नाच्या माझ्या अर्धांगीने पेरणीची सुरुवात मोहरांच्या सरत्यातून करून मोत्यांच्या ओंजळीने धरतीमायची ओटी भरली.' जलदेवता ही गोंडांची निसर्गदेवता होय. पाझऱ्यापासून तर समुद्रापर्यंत जलदेवतेचा प्रवास कसा होतो त्याची एक सुंदर फॅन्टसी एका गीतात आहे. 'साठ पाझरांचा एक झरा. आठ झऱ्यांची एक नदी. आठ नद्यांचा एक समूह. साठही समुद्र जिने सामावून घेतले आहेत, तिथे आंघोळ करावी.' मिथ्स किंवा लोककथांचे वैशिष्ट्यच फॅन्टसी हे असते. लोककथेत स्थलकालातीतता असते. तर्कातीतता असते; पण त्या कथेचा आशयबिंदू कुठे तरी शाश्‍वत सत्यापर्यंत जाणारा असतो. ते

सामर्थ्य फॅन्टसीचेच असते. स्थल, काल, व्यक्ती, रंग-रूप याचे कुठलेही बंधन नसले तरी कोणतीही फॅन्टसी संपूर्ण मुक्त कधीच नसते. वास्तवाच्या जमिनीवर तिचा एक पाय असतोच.

आदिवासींच्या सगळ्या कलांमध्ये कल्पनांची भरारी दिसते. गीत, नृत्य, चित्र आणि शिल्प प्रत्येक गोष्टीत त्यांच्या आदिम समूहमनाने कल्पिलेल्या अप्रतिम फॅन्टसीज दिसतात. त्यांपैकी एक म्हणजे अंगावरील गोंदण. हाताच्या दंडावर, पाठीवर आणि कपाळावर नक्षी, फुले किंवा अस्तित्वात नसलेल्या प्राण्यांच्या आकृत्या यांमधून त्यांच्या फॅन्टसीज प्रकट होतात. गोंदण नसेल तर स्वर्गाची दारे बंद होतात, असा त्यांचा समज असतो. जन्म-मृत्यू किंवा स्वर्ग-नरकाबद्दलच्या आदिवासींच्या कल्पना त्यांच्या रोजच्या वापराच्या वस्तूंवरील चित्रातून व्यक्त होतात. घराच्या भिंतींवरील चित्रे, रांगोळ्या, भांडी, अवजारे, वाद्ये, आणि विवाहप्रसंगी अंगणातील खांबावर केलेले कोरीवकाम असंख्य काल्पनिक आकृत्यांनी भरून गेलेले असते. सौंदर्यनिर्मिती हा एक उद्देश तर असतोच; पण त्यांच्या संस्कृतीची ती सगळी मानचिन्हे असतात. विश्वाचा निर्माता आणि मानव यांच्या सहसंबंधातील ते सांकेतिक दुवे असतात आणि त्यांच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाची ती मूर्त चित्रलिपी असते.

विश्वाच्या निर्मितीइतकेच आदिवासींना मृत्यूचे कुतूहल असते. त्यामुळे आदिवासींच्या मृत्यूसंबंधी अनेक फॅन्टसीज असलेली कोडी- कूटप्रश्न यामध्ये आहेत. त्या संदर्भात दुर्गा भागवत यांनी बरेच संशोधन केले आहे. आदिवासी स्त्रियांच्या गाण्यांत मृतांसाठी मोरपंखी गवताची झोपडी उभारायची, त्यामध्ये मृताच्या नावाने मासोळी धरून आणून वर्षभर त्या झोपडीत ठेवायची, अशी वर्णने असतात. मृत्यूच्या प्रसंगी आदिवासी गाणी गातात. ती प्रश्नोत्तररूपी असतात. मृत्यूनंतर दहाव्या दिवशीच्या रात्री गावापासून दूर साग वृक्षाखाली मृताचे सगेसोयरे शेकोटीपुढे जमतात. सवाल-जवाबाच्या रूपात पुजारी गाणी म्हणतात. या गाण्यात मृत्यूचं वर्णन रूपकरूपात असते. या गीतात 'कळकी' ही एक बांबूची जात असते. कळकी ही चिरकुमारिकेचे प्रतीक आहे. 'कळकी'च्या सात पदरांतील कुमारिका ही एक अत्यंत गूढ अशी फॅन्टसी आहे. या कळकीला साठ वर्षांनी  फुले येतात. फुले आली की कळकी मरतो. या कळकीच्या सात पापुद्र्याच्या आत असलेल्या कोंभामध्ये भुंगा कोश करून असतो. तो कोश फोडून बाहेर पडतो. मुक्त होतो- तोच मृत्यू. असे हे गाणे टप्प्याटप्प्याने रात्रभर सुरू असते. 'अशिक्षित समजल्या जाणाऱ्या आदिवासींनी मृत्यूला तत्त्वज्ञानाच्या एका उच्च पातळीवर नेऊन ठेवलेय,' असे दुर्गा भागवत यांना वाटते.

आदिवासी हे अनार्य आणि त्यांचा निवास दंडकारण्यात असे मानले जाते. चंद्र-सूर्यप्रमाणेच त्यांच्या देवता म्हणजे, रावण व मेघनाद. मध्य प्रदेशात रावणाची मंदिरे आहेत, व गोंड त्याची पूजा करतात. विदर्भात मेघनादाच्या यात्रा अनेक ठिकाणी भरतात. मेळघाटमधील कोरकू यांची अनेक लोकगीते रावणाच्या पराक्रमाचे वर्णन करणारी आहेत. त्यातून कोरकूंच्या फॅन्टसीज व्यक्त होतात. रामायणात रावणाने सीतेला पळवून नेले असे असले तरी कोरकूंच्या गीतात सीता रावणाच्या रूपावर भाळून कशी पळून गेली, याचे चित्रण येते. तो एक प्रकारे फॅन्टसीचाच प्रकार म्हणता येईल. राम-रावण हा मोठा सांस्कृतिक संघर्ष आहे. आर्य-अनार्य असा अतिप्राचीन संदर्भ त्यामागे आहे. अनार्यांना पराभव पचवावा लागला होता. ती एक धग आणि गंड यांचा निचरा होण्यासाठी अशा फॅन्टसीज लोकमानसात तयार होतात.

लोकमानसातील फॅन्टसीजचे मोठे उदाहरण म्हणजे 'जांभूळ आख्यान' द्रौपदी ही एक आदर्श पतिव्रता. लोक महाभारतात मात्र द्रौपदीची वेगळीच कहाणी आहे, फॅन्टसीच्या अंगाने जाणारी. पाच पांडवांची पत्नी  द्रौपदी ही पतिव्रता. पण एकदा तिला मनातून कर्णाचे आकर्षण वाटते. पाच पांडवांसोबत हाही आपला पती झाला असता तर,  असा विचार तिच्या मनात येतो. अर्थात हे तिच्याकडून घडलेले पापाचरण होय. त्याचे क्षालन करण्याची जबाबदारी श्रीकृष्ण स्वीकारतो. पाच पांडव वनवासाला निघतात. एका जंगलात एकच जांभळाचे झाड असते. त्याला वर्षातून एक जांभूळ लागते. व त्या अरण्यातील एक ऋषी वर्षातून एकदाच ते फळ खात असतो. भीम ते जांभूळ तोडतो. अर्थात ऋषी कोपतो. ते जांभूळ पुन्हा झाडाला लावा अशी तंबी तो पांडवांना देतो. प्रत्येक जण जांभूळ झाडाला लावण्याचा प्रयत्न करतो; पण ते पडून जाते. कारण कधी ना कधी त्यांच्या हातून पाप घडलेले असते. धर्मराजासुद्धा आपले पावित्र्य पणाला लावतो; पण जांभूळ झाडाला चिकटत नाही. अखेर द्रौपदी पतिव्रता म्हणून द्रौपदी प्रयत्न करते; पण जांभूळ फांदीपर्यंत जाते व खाली येते. द्रौपदी खजील होते. मनोमन कृष्णाचा धावा करते. कारण तिच्या पातिव्रत्याची ती परीक्षा असते. कृष्ण म्हणतो 'तुझ्याही हातून जांभूळ झाडाला लागत नाही, कारण कृतीतून नाही तर तुझ्या मनात कर्णाबद्दल आकर्षण वाटले होते. द्रौपदी चूक कबूल करते. तेव्हा जांभूळ उलट्या देठी झाडाला लागते.

मुख्य प्रवाहातील मिथ्यकथांना अनेक पातळ्यांवर नाकारणारी ही लोककथा आहे. नैतिकतेच्या कल्पना, पावित्र्य आणि द्रौपदीचे सतीत्व. आर्य संस्कृतीमधील तात्त्विक आणि पौराणिक मानदंडांना आदिवासी अनार्य संस्कृतीने या पद्धतीने आव्हान दिले आहे. या कथा आदिवासी लोककथांमधूनच पुढे आल्या आहेत.

मुळात कोणत्याही संस्कृतीचे अलौकिकत्व फॅन्टसीवरच असते. संस्कृती ही भौतिक आणि दृश्य गोष्टींची जशी असते, त्यापेक्षाही कितीतरी अधिक ती अभौतिक व अदृश्य अशा संकल्पना, श्रद्धा व


प्रतीके-प्रतिमांची असते. त्या अदृश्य श्रद्धा-संकल्पनांमुळेच शिल्प, चित्रे आणि रोजच्या जगण्यातील प्रथापरंपरा दृश्य रूपात अस्तित्वात आलेल्या असतात. श्रद्धा-संकल्पना या केवळ फॅन्टसीज असतात. आदिम जमातीमधील देवदेवतांच्या कल्पना, त्यांच्या प्रतिमा, गोंदणचित्रे, नृत्य आणि काष्ठशिल्प या गोष्टी मानववंशशास्त्रात आणि समाजशास्त्रात महत्त्वाच्या मानल्या जातात. कारण त्यांच्या आधारे मनुष्याला मानवी वर्तनाच्या प्रेरणा आणि सामाजिक संस्थांच्या मुळाशी जाण्याचा मार्ग सापडू शकतो.

संदर्भ : १. महाराष्ट्रातील आदिवासी जमाती, गोविंद गारे, कॉन्टिनेन्टल, पुणे, २०००
२. आदिवासी विश्व, शैलजा-श. गो. देवगावकर, आनंद प्रकाशन, नागपूर, २००१
३. आदिवासी साहित्य आणि अस्मितावेध, भुजंग मेश्राम, संपादक - प्रफुल्ल शिलेदार, लोकवाङ्मय, मुंबई, २०१४
४. ऐसपैस गप्पा : दुर्गाबाईंशी, प्रतिभा रानडे, राजहंस, पुणे, १९९८

**प्रमोद मुनघाटे**
pramodmunghate304@gmail.com

नवे कोरे

मायकेल इ. जर्बर यांच्या 'ड्रीमिंग रूम'मध्ये सामील होऊन तुमच्यातल्या सुप्त उद्योगपतीला जागे करा.




लघु उद्योजकांचा मार्गदर्शक

**मायकेल इ. जर्बर**
अनुवाद : **शेखर जोशी**
किंमत : २६० रु.

अंडरवर्ल्ड म्हणजे पाताळलोक. सैतान अंडरवर्ल्डची देवता हेल हिला सहसा कधी भेटायला जात नसे. म्हणून सैतानाला तिच्याकडे येताना पाहून हेलला मनापासून आश्चर्य वाटले. पाताळजगात हेलचे राज्य असले तरी या लोकातच सैतानाचे स्वतंत्र राज्य होते. नरकावर सैतानाची व त्याचे चाकर म्हणजे भुते व पिशाच्चे यांची सत्ता होती. कारण इथे मृत व्यक्तींपैकी पापी-दुष्ट-नीच असे मृतात्मे चित्रगुप्ताकडून पाठवले जातात. नरकाला 'यमलोक' असेही नाव असले तरी Hell म्हणजे Abode of the dead souls हे सर्वांना माहीत असते. पाताळदेवतेला जसे मृतात्म्यांच्या नरक नावाच्या वस्तीशी कर्तव्य नव्हते, त्याप्रमाणे सैतानाला हेलच्या राज्याशी काही देणे-घेणे नव्हते.

म्हणून सैतानाला आपल्याकडे येताना पाहून ती चकित झाली. तिने सैतानाकडे पाहिले. सैतान विमनस्क होता. तो थोडा बुचकळ्यात पडला होता.

हेलने विचारले, 'सैताना काय झाले, तू नाराज आणि विमनस्क का दिसतोस?'

'पाताळदेवते, तुला तर माहीतच आहे की मरणोत्तर सर्व आत्मे पाप-पुण्याच्या नोंदी ऐकण्यासाठी चित्रगुप्तासमोर हजर केले जातात. त्यातल्या पुण्यात्म्यांना स्वर्ग मिळतो आणि पापात्म्यांना या अंडरवर्ल्डकडे पाठवले जाते. त्या मृतात्म्याला घेऊन येणाऱ्या



# ।। उघडले नरकाचे दार ।।

। अनंत मनोहर ।

सेवकाबरोबर त्याने आयुष्यात केलेल्या पाप-पुण्याचा हिशोबही पाठवला जातो.

'बरोबर. या छळभूमीत सात टप्पे आहेत हे तू जाणतेस. त्या त्या टप्प्यावर चाबकानं मारणं, कोरडे हाणणं, उकळत्या तेलात टाकणं, मलमूत्रात सडत ठेवणं, भाजणं, पोळणं वगैरे शिक्षा दिल्या जातात. प्रश्न तो नाही; चित्रगुप्तानं पृथ्वीवासीयांच्या पाप-पुण्याचा हिशोब ठेवायचा हे ठरल्यापासून गेली हजारो वर्षं हे काम केलं जातंय. मृतात्मे इथं येतात, त्यांच्या त्यांच्या पाप-पुण्यानुसार त्याचं भवितव्य ठरतं. पुण्यात्मा स्वर्गात प्रवेश करतात; पापात्मे इकडे आणले जातात. त्यानुसार त्यांचा इथं छळ केला जातो. शिक्षा भोगून झाली की त्यांच्या कर्मफलानुसार त्यांना पुढला जन्म लाभतो. नरकाला पाप नवं नाही; पण गेला काही काळ ज्या संख्येनं आणि ज्या नीच पातळीचे गुन्हेगार इथं येताहेत की त्यामुळे मी गोंधळून गेलोय.'

पाताळदेवता एकाग्रपणे ऐकत होती.

'हे दुरात्मे असतात तरी कोण? हे अशिक्षित असतात, का असंस्कृत असतात?'

सैतान काहीसं विकट हसला.

'मादाम हेल, या प्रश्नाचं उत्तर सोपं नाही. यांतले कित्येक पापात्मे उच्चशिक्षित असतात... चांगल्या घराण्यातले असतात.'

'सैताना, असं तर नसेल ना, जीझस एकदा म्हणाला होता तसं – 'आपण काय करीत आहोत, बोलत आहोत, हे त्यांना कळत नाही आकाशातील बाप्पा, तू त्यांना क्षमा कर' असं?

'देवते, आपण काय करीत आहोत हे त्यांना पूर्ण माहीत असतं. खरं तर आपल्याला काय करायला हवं हे त्यांना माहीत असतं आणि त्याप्रमाणे ते वागतात. आणि हेच मला सलतं आहे...'

'पण सैताना' पृथ्वीचं आरोग्य सांभाळणं हे आपलं काम नाही. देवाच्या कारभारात काही चुकत असेल तर तो सुधारणं, ही त्याची चिंता आहे. फारतर तू देवाच्या कानांवर हे तुझं असमाधान घाल. पण सैताना, आजच असं काय घडलं की, तुला एवढा ताप झाला?'

सैतानाला शोधत त्याचे आज्ञाधारक पिशाच्च तेवढ्यात तिथं आलं.

'हेल देवी, काय घडलं ते इंपला विचार.'

हेल ऊर्फ पाताळदेवीनं इंपकडे पाहिलं. इंप गोंधळला, म्हणाला, 'तो काय म्हणाला ते मी सांगेन पण त्याचा अर्थ मला कळलेला नाही.'

तो आपल्याबरोबर आणखी एकाला घेऊन आला. महाराजांना तो नवागत म्हणाला.

'महाराज, मी याचा वकील आहे, हा माणूस फार मोठा कलाकार आहे. दीर्घ काळ याला इथं आपण ठेवू शकत नाही. याला महत्त्वाच्या शूटिंगसाठी पॅरोल मिळाला पाहिजे. प्रोड्यूसर्स आणि फायनान्सर्स यांचे शेकडो कोटी रुपये गुंतलेले आहेत. आणि आमच्या देशाच्या घटनेप्रमाणे तुम्ही याच्या व्यवसायावर गंडांतर किंवा बंदी आणू शकत नाही.'

'असा इथं प्रघात नाही.'

'मग तो निर्माण करावा लागेल. तुम्ही एक लक्षात घ्या की, गेल्या काही वर्षांत पॅरोलवर यानं पाच-सहा सिनेमांत काम केलंय.'

'आणि याची शिक्षा?'

'हा भोगतो ना! पॅरोल संपला की नवा पॅरोल मिळेपर्यंतचा एक महिना हा तुरुंगात राहतो महाराज...'

देवता हेलनं सैतानाकडे पाहिलं.

'मग सैताना, तू काय म्हटलंस?'

'मी त्या वकिलाला म्हटलं– पृथ्वीवरचे कायदे इथं चालत नाहीत. इथल्या कायद्याप्रमाणे याला झालेली शिक्षा सलग भोगावी लागेल.'

इंप मान हलवून म्हणाला, 'मग तो वकील म्हणाला– अगदी आत्मविश्वासपूर्ण म्हणाला, 'अजून एक मार्ग आहे. पृथ्वीवर काही देश असे आहेत की इतरत्र गुन्हे करून गुन्हेगार या देशात आसरा घेतात. ओसामा बिन लादेन तर अबोटाबादला तिथल्या पोलीस स्टेशनजवळ उघडउघड राहत होता. तो सरकारला दिसत नव्हता. अमेरिकेनं हेलिकॉप्टर लादेनच्या बंगल्याच्या आवारात उतरवून त्याचा खातमा केला अखेर; पण इथं तसा हेलिकॉप्टरचा धोका नाही.'

सैतानानं दूतांबरोबर त्या पापात्म्याला रौरव नरकात रवाना करून वकिलाला विचारलं, 'पण पृथ्वीवरून तू त्याच्याबरोबर इथं आलासच कसा?'

वकिलानं नम्रपणे माहिती दिली. तो म्हणाला, 'अशिलाचे पेपर्स आरोपीच्या वकिलाला विकल्याबद्दल मला नरकाची शिक्षा झाली. ती मी भोगली. नंतर इथंच राहिलो. माझ्या लक्षात आलं की खालच्यापेक्षा इथंच आपली प्रॅक्टिस उत्तम चालेल; त्याप्रमाणे माझं इथं उत्तम चाललं आहे. तिसऱ्या जगातले आणि डेव्हलपिंग देशांतले एवढे अशील येतात की, मी त्यांची ब्रीफ्स दोन दोन हातानी नाकारतो.'

हे सांगून सैतान पाताळदेवतेला म्हणाला, 'आता या इंपबरोबर पृथ्वीवर जाऊन वस्तुस्थितीची पाहणी करून येण्याचं ठरवलं आहे. हा इंपही कंटाळला आहे. तेवढाच त्याला स्थानबदलही होईल. फक्त एवढंच कर पाताळदेवते, नाहीतरी तू अंडरवर्ल्डची देवता आहेस; काही दिवस तू माझा अतिरिक्त कारभार कर. पृथ्वीवर काही कार्यक्षम मुख्यमंत्री महत्त्वाच्या पाचपाच खात्यांचा कारभार सांभाळतात. तुला फक्त माझं खातं सांभाळायचं आहे.

पाताळदेवता हताशपणे मान हलवत असताना सैतान व इंप अंतर्धान पावले.

परीप्रमाणे पिसावरून तरंगत इंपसह वेताळ वेगानं पृथ्वीकडे निघाला. स्वत: वेताळ विचारात गढलेला होता; पण अंतराळातून खाली येत असताना इंपचा खोडकरपणा जागा झाला. इंपकडे वेताळाचं लक्ष नव्हतं. इंपला एकापेक्षा एक मजेदार कल्पना सुचत

होत्या. आता पृथ्वी जवळजवळ येत चालली होती. एक जेट अमेरिकेकडे झेपावत होतं. इंपनं जेटच्या दिशेनं 'फू' करून फुंकर मारली; तिचा झंझावात झाला. विमानानं एक पलटी मारली. आरामात बसलेले प्रवासी क्षणभर सुलटयाचे उलटे झाले. विमानात प्रचंड घबराट झाली. प्रवाशांनी किंकाळ्या फोडल्या. काहींच्या डोक्यावर, कोंबलेलं हँडबॅगेज कोसळलं. एअरहोस्टेस खोटं व कृत्रिम हसत सरबताचे ग्लास ट्रेमध्ये ठेवून 'आईल'मध्ये शिरत असताना ती उलटी झाली आणि सरबतानं तिचा युनिफॉर्म ओला व चिकट झाला. विमान पुन्हा गिरकी घेऊन सरळ झालं आणि काही घडलं नाही असं जात राहिलं. काळ्या घोड्याच्या पुतळ्याच्या रोखानं एक हजार लोकांचा मोर्चा विरोधी पक्षाचे पुढारी दगड झांगोजीच्या देखरेखीखाली सरकारच्या धिक्काराच्या व निषेधाच्या घोषणा देत चालला होता आणि मोर्चातला एक कार्यकर्ता तारस्वरात, 'सरकार मुर्दाबाद, तानाशाही नही चलेगी' वगैरे नारे देत होता. इंप त्याच्या कानात कुजबुजला, 'दगडू झांगोजी चोर है' 'दगडू झांगोजी मुर्दाबाद' भाड्यानं आणलेल्या मोर्चानं तारस्वरात घोषणा दिली, 'गली गलीमे शोर है दगडू झांगोजी चोर है, हायहाय दगडू झांगोजी मुर्दाबाद. मुर्दाबाद मुर्दाबाद दगडू झांगोजी मुर्दाबाद.'

हातात हात घालून एक जोडपं चौपाटीच्या दिशेनं जात होतं. त्यातही तरुण रंगानं उजळ होता आणि पणजीची त्याची मैत्रीण लोना दाट सावळ्या रंगाची होती. इंपनं एका आकर्षक व देखण्या मुलीचं रूप घेतलं. ती समोरून आली. तिनं लाघवी हास्य करून त्या तरुणाकडे पाहत विचारलं, 'जॉन, तू बंगलोरहून कधी आलास?' तिनं प्रेमानं जॉनचा हात हातात घेतला. त्याच्या नजरेत नजर गुंतली आणि मग एकदम भानावर येत म्हटलं, 'सॉरी डार्लिंग, आय डिडंट नो यू वेअर बिझी.' असं म्हणत ती तरुणी नाहीशी झाली. तो तरुण पार बावचळला. लोनानं तिखट सुरात विचारलं, 'ही बया कोण?' तो जॉन अजिजीच्या सुरात म्हणाला, 'नाही गं मी ओळखत नाही तिला.' 'असं? मग तिनं तुला तुझ्या, नावानं हाक कशी मारली? यू चीट...'

पण एव्हाना जॉनला इंप विसरला होता. त्याचं लक्ष सागरदर्शन घडेल अशा मोक्याच्या ठिकाणी बांधल्या जात असलेल्या अपार्टमेंटकडे गेलं. बावीस मजले बांधण्याची परवानगी मिळालेल्या धनदांडग्या बिल्डरनं पंचविसावा मजला बघताबघता चढवला होता आणि सव्विसाव्या मजल्यावर स्लॅब रिकामा ठेवण्याऐवजी कॅसिनो बांधावा का, याचा विचार करीत तो उभा होता. इंपनं टिचकी वाजवताच अनधिकृत मजले वाढवलेलं ते अपार्टमेंट बघता बघता कोसळलं. त्याचा केवढा मोठा आवाज झाला! प्रत्येक फ्लोअरवर काही ना काही कामं चालू होती. कोसळत्या अपार्टमेंटमध्ये सापडलेल्या कामगारांनी वरून किंकाळ्या फोडल्या; पण त्या ऐकायला इंप न थांबता सैतानाजवळ गेला. अजूनही सैतान विचारात व्यग्र होता. इंपचं लक्ष एका जुन्या चाळीतल्या तळमजल्यावरच्या दोन खणी जागेकडं गेलं.

भिंतीलगतच्या जुन्या खुर्चीवर एक थकलेला गृहस्थ पंचानं घाम पुसत बसला होता. त्याचे मुलगे त्याच्याकडे पाहत होते आणि थकलेली एक स्त्री हातात चहाचा कप घेऊन बाहेरच्या खोलीत येत होती. सर्वांचे चेहेरे विचारात गढले होते. कुटुंबप्रमुख म्हणाला, 'संपलं सगळं. निवृत्त झालो. छोटा समारंभ झाला. तीस वर्षांची अन्नोदक देणारी नोकरी संपली. आठ हजार पेन्शन बसलं. साहेबानं पेन्शनबुक दिलं. ग्रॅच्युइटी आणि फंडाचा चेक दिला. या तीस वर्षांची किंमत म्हणजे हा बावीस हजारांचा चेक. मोठा बँकेत प्यून म्हणून लागला, ही जमेची गोष्ट. धाकट्याचं अजून कुठं काही मार्गी लागत नाही, बी. कॉम असून, कसं व्हायचं लक्ष्मी आपलं?'

इंपचं लक्ष फोनकडे गेलं. त्यानं एक टाळी वाजवली. कधी नव्हे तर इंपच्या मनात दया उपजली होती. फोनची रिंग वाजू लागली. बाप उदास होता. मोठ्यानं फोन घेतला. एक क्षण ऐकून त्यानं धाकट्याकडे फोन दिला.

'धिस इज फ्रॉम बी. एम. सी. सिमेंट कंपनी. काँग्रॅच्युलेशन्स! पी. आर. ओ. डिपार्टमेंटला तुमचं सिलेक्शन झालंय. प्रोबेशन वन इयर वुइथ पर्क्स ॲन्ड अलावन्सेस. यू कुड बी गेटिंग ट्वेन्टीफाइव्ह. प्रोबेशन संपलं की रेग्युलर पे. इट वुइल कम टु रफली थर्टीफाइव्ह. यू आर सिलेक्टेड ॲज ए बॅट्समन. युवर जॉब लेटर इज रेडी. कम टुमॉरो टु जॉइन...'

धाकटा घळघळा रडू लागला. त्याला शब्द फुटेना. पी. आर. ओ. म्हणजे मॅच नसली तर थोडंसं काम असतं. जुजबी माहिती देण्याचं. मॅच असली तर परस्पर ग्राऊंडवर. कोणीतरी त्याला सुचवलं होतं म्हणून त्यानं या ऑफिसला अर्ज केला होता. ट्रायलसाठी दोनदा गेला होता. एकदा मुलाखतही दिली होती. आता त्याला तीन महिने होऊन गेले होते. निलॉन, ए.सी.सी., महिन्द्रा, स्टेट बँक वगैरेतून खेळाडूंसाठी कोटा असतो असं त्यानं ऐकलं होतं, एवढंच.

मग त्यानं जोरात श्वास घेत म्हटलं, 'बाबा, एक उत्तम बातमी आहे...'

पण एव्हाना इंपला स्वत:चा राग आला होता. आपण करुणेला बळी कसे पडलो? सैतानाला आता काय वाटेल, या विचारानं त्याला फार अपराधी वाटलं.

मग त्यानं ऐटीत चाललेल्या माणसाला सिग्नलचा रेड लाइट असताना सिग्नल तोडायला लावला आणि डाव्या लेनमधून सुरू झालेल्या ट्रॅफिकमध्ये तो सापडला. गाडीच्या धडकेनं तो खाली पडला आणि त्याचे दोन्ही पाय मोडले. गाडीमागून बस येत होती. ड्रायव्हरनं करकचून ब्रेक दाबले. गाडी भर वेगात थांबली. दहा-पाचांची टाळकी आपटली... दोघातिघांचे दात तुटले... पायरीवर उभा असलेला एक प्रवासी रस्त्यावर उपडा फेकला गेला आणि कंडक्टरच्या हातातल्या नोटा रस्त्यावर भिरभिरत गेल्या. बँकेतून बाहेर पडलेल्या ग्राहकानं पाकिटात नोटा नीट ठेवल्या आणि इंपनं रागानं पाहिल्यावर एका खिसेकापूनं ते पाकीट मारलं. रस्त्याच्या कडेला पहिल्या मजल्यावरच्या हॉलमध्ये गायनाचा

कार्यक्रम चालू होता आणि त्या गवयाचा घसा पूर्ण बसला. स्टेशनात उभ्या असलेल्या गाडीला त्याच ट्रॅकवरून आलेल्या गाडीनं जबरदस्त टक्कर दिली आणि तीन डबे उलटले.

सैतानानं इंपला हाक मारली, 'चल कुठेतरी काहीतरी कार्यक्रम चालू दिसतोय. टाळ्यांचा आवाज ऐकलास ना?'

सैतान इंपसह हॉलमध्ये आला. सत्ताधारी पक्षाच्या एका आमदाराचा षष्ट्यब्दीपूर्ती समारंभ रंगात आला होता. एव्हाना वक्त्यांची भाषणं संपली होती आणि सत्कार चालू होता. तो संपताक्षणी आमदारांची फळांनी, धान्यानं व नाण्यांनी अशा तुला करण्यात आल्या.

मग आमदारसाहेब सत्काराला उत्तर द्यायला उभे राहिले. इंपोर्टेड खादीचे कपडे आणि कोनात घातलेली इस्त्रीची टोपी. गळ्यात कमालखानी हार. चेहऱ्यावरून ओघळणारे साजुक तुपाचे नम्र हास्य. ते उभे राहिले, तेवढ्यात कोणीतरी त्याच्यासमोर माइक ॲडजस्ट केला. त्या क्षणी अदृश्य सैतानानं उडी मारली आणि आमदारांच्या डोक्यात सैतान शिरला. बोलू लागला.

'आपण आज माझा सत्कार केलात. खरं म्हणजे सत्कार चांगल्या माणसाचा करतात. गुणी माणसाचा– विद्वानाचा, थोर देशभक्ताचा, कलावंताचा सत्कार करतात. तुमच्यापैकी काही लोक मला त्यांच्या व माझ्या बालपणापासून ओळखतात.

'लहानपणापासून मी गुंड, उनाड व फुकट गेलेला मुलगा होतो. खरं म्हणजे मला जोडे मारून माझा सत्कार व्हायला हवा होता. मी आमच्या आळीतला एक गुंड मुलगा होतो. देवळातले पैसे चोरणं– कीर्तन संपल्यावर बुवा आरती म्हणायचे तेव्हा त्यांच्या हातात तबक असे आणि त्यात लोक पैसे टाकत असत. तबक भरत आलं की मी बुवांच्या पाया पडून उठताना खालून डोक्यानं धडक देऊन तबक पाडतं असे आणि खाली पडलेल्या नाण्यांवर डल्ला मारीत असे. परीक्षेच्या आदल्या दिवशी छपराची कौलं बाजूला करून आत शिरून हेडमास्तरांच्या कपाटातून परीक्षेचे पेपर्स चोरल्याबद्दल सहावीतून मला रस्टिकेट करण्यात आलं होतं, हे तुम्हाला माहीत नसेल!

'एक दिवस माझ्या लक्षात आलं की, आपली आपल्या गल्लीत वट असायला पाहिजे. म्हणजे आपली गँग आपण तयार केली पाहिजे. प्रयत्नपूर्वक मी गल्लीचा दादा बनलो. पुढे एक दिवस मला सत्य कळलं की मी माझ्या गल्लीत हीरो आहे; इतर गल्लीत मी झीरो आहे. हे चालणार नाही. आपल्या गावात आपली वट हवी. म्हणजे आपली गँग मोठी हवी आणि या सगळ्यांचे पोटपाणी-विडीकाडी-चैनचमन आपण चालवलं पाहिजे. म्हणजे पैसा पाहिजे. दहीहंडी - गणपती- शिमगा- गल्लीतली पूजा- रंगपंचमी या सणांमध्ये मिळणारा पैसा चणे–फुटाण्यांगत. स्टेडी इन्कम हवं. प्रत्येक दुकानाकडून, प्रत्येक व्यवसायातून आपल्याला प्रोटेक्शन मनी मिळायला हवा, पोलिसांचं कलम भागवायला हवं, एक हुशार वकील जोडायला हवा. जे मिळतं ते माझं एकट्याचं नव्हे. 'आपण सर्व भाऊभाऊ, जे मिळेल ते वाटून खाऊ' म्हणजे सगळं शांत असतं.....

'आतून संदेश आला. मी आतला आवाज ऐकणारा माणूस आहे. मला संदेश आला, खरा पैसा सत्तेत आहे. खरी ताकद राजकारणात आहे; ती मिळव. म्हणजे प्रथम ग्रामपंचायत... मग झेड.पी... मग आमदार... मग राज्यमंत्री... उपमंत्री... मंत्री... कॅबिनेट... मिनिस्टर. पैसा मिळवा. पैसा वाटा. दहशत बसवा. सत्ता मिळवा. पद मिळवा. पद पुढल्या पदाचा गुरू...

सैतानानं पुढाऱ्याची मोडस ऑपरेंडी मांडली. आपल्या मतदारांना सुरक्षित ठिकाणी कसं सांभाळून ठेवायचं, हे जसं महत्त्वाचं, तसे विरोधी पक्षाचे मतदार कसे फितवायचे, ते शिकून घेतलं.

त्या पुढाऱ्याचे अनुयायी चक्रावून गेले. सभागारात टाळ्यांचा कडकडाट होत होता. हास्याचे लोट उठत होते. पत्रकार, इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या लोकांना तर 'अनंत हस्ते कमलावराने । देता किती घेशील दोन कराने' असा प्रश्न पडला. मागून कार्यकर्ते पुढाऱ्याचा अंगरखा ओढत होते. समोरून खाणाखुणा करीत होते, पुढाऱ्याला चिठ्ठ्या पोचवत होते, पण पुढारी लाईन सोडायला तयार नव्हता.

सैतानानं पुढाऱ्याला सोडलं. लगेच पुढाऱ्याचा चेहरा सात्त्विक तुपाळ, जनता व सेवा याबद्दल अतीव प्रेम व करुणा असणारा झाला. तो हात जोडून म्हणाला,

'ही पदं ही बिरुदं नकोशी वाटतात. जनताजनार्दनाची सेवा ही एकच खरी गोष्ट आहे. माझं सगळं आयुष्य केवळ यासाठी मी खर्च केलं आहे हे आपण जाणता...'

आता मात्र लोकांचा राग अनावर झाला. कोणीतरी ओरडलं, 'हाणा रे त्याला...'

इथून पुढे सभा उधळली. हाणामाऱ्या झाल्या. पुढाऱ्याची धुलाई झाली. अनेक डोकी फुटली. त्या गदारोळात बाहेर पडताना सैतान इम्पला म्हणाला,

'हे पापं इथं करतात. यांना नरकात मी शासन देतो हे कोणाला कळत नाही, म्हणून मला वाटलं यांना याच पृथ्वीवर प्रथम शासन होऊ दे.'

सैतान सर्व पृथ्वीवर फिरला. त्याला माजलेले हुकूमशहा, लष्करशहा लोकनियुक्त मंत्री, दडपशाही, मुस्कटदाबी, अन्याय व जुलूम, अंतर्गत यादवी, शेजारी राष्ट्रांशी जुंपलेली युद्धं, श्रीमंत व बलदंड राष्ट्रांची एकाधिकारशाही, जात - धर्म - पंथ - तत्त्व काहीही नसलेले अतिरेकी पाहायला मिळाले.

पण मग पाताळदेवीनं एका दूताला पृथ्वीवर पाठवून सैतानाला निरोप धाडला. 'ताबडतोब इकडे परत ये. पृथ्वीचं काय व्हायचं ते पाहणं हे तुझं काम नाही. तुझं इथलं राज्य तू सांभाळ; तुझ्या गैरहजेरीत इथं अव्यवस्था माजल्येय.'

पाताळदेवीच्या संदेशामुळे सैतानानं पृथ्वीवरचा संचार आवरता घेतला.

ग्रीक देवताही सैतानाला भेटून म्हणाली,

'सैताना, तुला जगाची काळी बाजू दिसली. हा तुझा दोष नाही. तुझा जन्म त्यासाठीच आहे. पण सैताना, एक लक्षात घे; जीवनाला फक्त एकच बाजू नाही. नवनिर्मिती, आनंद, उल्हास, निरागसता, त्याग आणि तपश्चर्या ही पण जीवनाची एक बाजू आहे. ते स्मशान पाहिलंस? त्याच्या भिंतीतून पिंपळाच्या रोपट्यानं मूळ धरलंय पाहा. तो झरा पाहा. त्याचा स्पर्श घे. ते बघ या भागातल्या उन्हाच्या अंगारी तेजावर मात करणारं मऊ शीतल चांदणं कसं झरतं आहे. या पृथ्वीवरच गुणवंत माणसं जन्मतात. इथं ज्ञानाची उपासनाही चालते आणि बाळाचं दंतहीन निर्व्याज गोड हास्यही उमलतं. इथं कविता जन्माला येते आणि इथंच गोड प्रेमाची कूजितं गायली जातात. विकृती हाच पृथ्वीचा एकमेव धर्म नाही. इथं संस्कृती नांदते आणि नवनिर्मितीही होते. इथं कधी पाप माजतं आणि इथं दुराचाराला वेसणही घातली जाते. इथं खळाळते सागर आहेत आणि इथं लोकक्षोभही आहे. ज्यांचा न्याय इथं होत नाही, त्यांचा न्याय 'जजमेंट डे'ला होतो आणि तो नक्की होतो, हेही सत्य आहे. तुझा क्षोभ झाला आणि तो बरोबरही होता. म्हणून तर पापात्म्यांना शिक्षा देण्याचं काम तुझ्याकडे सोपवलं आहे. पण जे तुझ्यासाठी नाही, ते तू करू नकोस. नरकाचा तोल ढळला तर स्वर्गाचाही समतोल राहणार नाही. एक विसरू नकोस की, पाप, अन्याय, दुराचारही अमर नसतात. त्यांचा न्याय व निचरा करणाऱ्या सैताना ये; तुझं राज्य तुझी वाट पाहत आहे.'


**अनंत मनोहर**
ashamanohar@hotmail.com



नवे कोरे

# ।। फिफ्टी शेड्स ऑफ ग्रे ।।

ई.एल. जेम्स
अनुवाद : शोभना शिकनीस




माझ्या कपाळावर मृदू ओठ फिरत होते. फिरताना त्यांनी गोड, हळुवार चुंबनं घ्यायला सुरुवात केली. माझा एक भाग वळून प्रतिसाद देऊ इच्छित होता,

पण बहुतेक मला झोपून राहायचं होतं. मी कण्हले आणि उशीत डोकं खुपसलं.

''ॲनास्टॅशिया, ऊठ.'' ख्रिश्चनचा आवाज हळुवार, विनवणी करणारा होता.

''नाही,'' मी कण्हले.

''माझ्या आईवडिलांकडे डिनरला जाण्यासाठी आपल्याला अर्ध्या तासात निघायचंय,'' त्याला गंमत वाटत होती.

मी नाइलाजाने डोळे उघडले. बाहेर संध्याकाळ झाली होती. ख्रिश्चन माझ्यावर वाकला होता, माझ्याकडे उत्कटतेने बघत होता.

''कम ऑन, झोपाळू मुली, गेट अप,'' तो खाली वाकला आणि त्याने पुन्हा माझं चुंबन घेतलं.

''मी ड्रिंक आणलंय तुझ्यासाठी. मी खाली असेन. पुन्हा झोपू नकोस, नाहीतर मग अडचणीत येशील,'' त्याने धमकावलं, पण त्याचा स्वर मवाळ होता. त्याने माझं हलकेच चुंबन घेतलं आणि गेला. मी त्या थंड, कोरड्या खोलीत माझ्या डोळ्यांतली झोप डोळे मिचकावून घालवण्याचा प्रयत्न केला.

मी तरतरीत झाले होते, पण एकाएकी अस्वस्थही होते. होली काउ. मी त्याच्या लोकांना भेटणार आहे! त्याने नुकतंच मला रायडिंग क्रॉपने व्यायाम घडवला आणि मी त्याला विकलेल्या केबल टायने बंधनात ठेवलं होतं, देवा रे – मी त्याच्या आईवडिलांना भेटणार आहे. केटची पण त्यांना भेटण्याची पहिलीच वेळ असेल – निदान ती तरी आधारासाठी तिथे असेल. मी माझे खांदे फिरवले. ते आखडले होते. वैयक्तिक प्रशिक्षक ठेवण्याची त्याची मागणी आता एवढी अवाजवी वाटली नाही. वस्तुत: त्याच्या बरोबर टिकायची आशा ठेवायची असेल, तर ते आवश्यकच वाटलं.

मी सावकाशपणे बिछान्यावरून उतरले आणि माझ्या लक्षात आलं की, माझा ड्रेस वॉर्डरोबच्या बाहेर लटकत होता. माझी ब्रा खुर्चीवर होती. माझ्या पॅन्टीज कुठे आहेत? मी खुर्चीच्या खाली तपासल्या. काहीही नव्हतं. मग मला आठवलं – त्याने त्या त्याच्या जीन्सच्या खिशात गुंडाळून घालून नेल्या होत्या. मी त्या आठवणीने लाल झाले. मी त्याचा विचारदेखील करू शकत नव्हते, तो इतका – एखाद्या आदिमानवासारखा होता. मी कपाळाला आठ्या घातल्या. *त्याने मला माझ्या पॅन्टीज परत का दिल्या नाहीत?*

मी बाथरूममध्ये सटकले, माझ्याकडे अंडरवेअर नसल्याने मी गोंधळून गेले होते. माझ्या आनंददायी, पण अगदीच थोडक्यात आटपलेल्या स्नानानंतर माझं अंग पुसत असताना माझ्या लक्षात आलं की, त्याने ते हेतुपुरस्सर केलं होतं. मी लज्जित व्हावं आणि माझ्या पॅन्टीज परत मागाव्यात, असं त्याला वाटलं असणार. मग तो एकतर हो म्हणेल किंवा नाही. माझी अंतर्देवता माझ्याकडे बघून हसली. हेल... दोन लोक तो विशिष्ट खेळ खेळू शकतात. पॅन्टीजसंबंधी त्याला विचारायचं नाही आणि ते समाधान त्याला मिळवू द्यायचं नाही, असा तिथल्या तिथे मी निश्चय केला. मी त्याच्या आईवडिलांना पॅन्टीज न घालता जाऊन भेटेन, ॲनास्टॅशिया स्टील! माझं अर्धजागृत मन मला खिजवतं, पण मला त्याच्याकडे लक्ष द्यायचं नव्हतं – मी आनंदाने स्वत:ला जवळजवळ आलिंगनच दिलं, कारण ही गोष्ट त्याचं डोकं फिरवेल, हे मला ठाऊक होतं.

शयनगृहात परत आल्यावर मी माझी ब्रा घातली, माझा ड्रेस अंगावर चढवला आणि बूट पायात घातले. मी वेणी सोडली आणि घाईघाईत केसांना ब्रश केला. नंतर त्याने मागे ठेवलेल्या ड्रिंककडे नजर टाकली. ते फिक्कट गुलाबी होतं. हे काय आहे? क्रॅनबेरी

आणि बुडबुडे येणारं पाणी. हं... ते चवदार लागलं आणि त्याने माझी तहान भागली.

बाथरूममध्ये पुन्हा धाव घेतली, मी आरशात स्वत:ला न्याहाळलं. डोळे चमकदार, गाल थोडेसे लालसर, माझ्या पॅन्टीजच्या योजनेमुळे आलेला थोडासा लुक. मी खाली गेले. पंधरा मिनिटं. नॉट बॅड, ॲना.

ख्रिश्चन भव्य खिडकीच्याजवळ उभा होता. खिडकीतून शहराचं भव्य दृश्य दिसत होतं. मला आवडणाऱ्या करड्या रंगाच्या फ्लॅनेल पॅन्ट्स त्याने घातल्या होत्या, त्याच पॅन्ट्स ज्या त्याच्या नितंबांवरून अविश्वसनीय अशा सेक्सी पद्धतीने लटकतात आणि अर्थातच, सफेद लिननचा शर्ट. त्याच्याकडे दुसरे काही रंग नाहीत का? आजूबाजूला लावलेल्या स्पीकर्समधून फ्रँक सिनात्राचा हळुवार गाण्याचा आवाज येत होता.

मी प्रवेश केला तेव्हा ख्रिश्चन वळला आणि हसला. त्याने माझ्याकडे अपेक्षेने बघितलं.

''हाय,'' मी हळूच म्हणाले आणि माझं स्फिंक्ससारखं हास्य त्याच्या हास्याला भेटलं.

''हाय,'' तो म्हणाला, ''कसं काय वाटतंय?'' त्याचे डोळे गंमत वाटत असल्याने चमकत होते.

''छान, थँक्स. तुला?''

''मला खूप छान वाटतंय, मिस स्टील.''

मी काहीतरी म्हणावं म्हणून तो थांबला.

''तू फ्रँक सिनात्राचा फॅन असशील असा विचार मी कधी केला नव्हता.''

त्याने भुवया बघून उंचावल्या, त्याचा लुक विचारात गढलेला होता.

''अभिरुची, मिस स्टील,'' तो पुटपुटला. माझ्या पुढ्यात येऊन उभा राहीपर्यंत तो एखाद्या चित्त्यासारखा माझ्याकडे आला. त्याची नजर एवढी उत्कट होती की, तिने माझा श्वासच हिरावून घेतला.

फ्रँक सिनात्राने गायला सुरुवात केली... एक जुनं गाणं, रेच्या आवडत्या गाण्यांपैकी एक... 'विचक्राफ्ट'. ख्रिश्चनने आरामात त्याच्या बोटांची अग्रं माझ्या गालांवरून फिरवली आणि तो स्पर्श मला पार *तिथपर्यंत* जाणवला.

''डान्स विथ मी,'' तो पुटपुटला. त्याचा आवाज घोगरा होता.

त्याच्या खिशातून रिमोट काढत, त्याने व्हॉल्यूम वाढवला आणि त्याचा हात माझ्यापुढे केला. त्याच्या करड्या नजरेत आशा, ओढआणि विनोद भरला होता. तो पूर्णपणे बास्टर्ड आहे आणि माझ्यावर त्याची जादू झाली होती. मी माझा हात त्याच्या हातात ठेवला. तो आळसावल्यासारखा माझ्याकडे बघून हसला आणि त्याच्या मिठीत मला ओढून घेतलं, त्याच्या हाताने माझ्या कमरेभोवती विळखा घातला.

मी माझे मोकळे हात त्याच्या खांद्यावर ठेवले आणि त्याच्याकडे बघून हसले, त्याच्या लागण करणाऱ्या, खेळकर लहरीने पकडली गेले. तो एकदा डुलला, नंतर आम्ही निघालो. बॉय. काय नृत्य करतो तो! आम्ही खिडकीपासून ते स्वयंपाकघरापर्यंत आणि पुन्हा परत असं नृत्य करत, संगीतावर वेळेवर थिरकत आणि वळत डान्स फ्लोअरवर फिरलो. पावलांवर पदन्यास करणं, त्याने अगदी विनासायास केलं.

आम्ही जेवणाच्या टेबलाभोवती फिरलो, पियानोपर्यंत गेलो आणि ग्लास वॉलच्या समोर पुढे-मागे केलं, बाहेर सीॲटल चमचमत होतं, आमच्या नृत्याला एक गडद आणि जादूई किनार देत होतं. मी माझं निष्काळजी हास्य थांबवू शकले नाही. गाणं संपत आलं तसा तो माझ्याकडे बघून हसला.

''तुझ्याइतकी छान चेटकीण दुसरी कोणी नाही,'' तो पुटपुटला आणि मग त्याने माझं गोड चुंबन घेतलं. ''वेल, त्याच्यामुळे तुझ्या गालांवर थोडा रंग आलाय, मिस स्टील. नृत्याबद्दल धन्यवाद. आपण जाऊन माझ्या आईवडिलांना भेटू या का?''

''यू आर वेलकम आणि हो, मीदेखील त्यांना भेटायला उत्सुक आहे,'' मी श्वास रोखत उत्तर दिलं.

''तू नीट तयार आहेस ना?''

''ओ यस,'' मी गोडपणे प्रतिसाद दिला.

''नक्की ना?''

मी त्याच्या उत्कट, गंमत वाटत असलेल्या परीक्षणात्मक नजरेतून जेवढं जमेल तेवढं अलिप्त राहत मान हलवली. त्याचा चेहरा एका मोठ्या हास्यात फाकला आणि त्याने त्याचं डोकं हलवलं.

''ओके, तुला जर या पद्धतीने खेळायचं असेल, मिस स्टील...''

त्याने माझा हात पकडला, त्याचं एका बारस्टूलवर लटकवलेलं जॅकेट घेतलं आणि मला फॉयरमधून एलिव्हेटरकडे नेलं. ओह, ख्रिश्चन ग्रेचे अनेक चेहरे. *या पाऱ्यासारख्या माणसाला मी कधी समजू शकेन काय?*

एलिव्हेटरमध्ये मी त्याच्याकडे चोरून बघितलं. तो एका खाजगी विनोदाची गंमत लुटत होता. त्याच्या सुंदर तोंडावर हास्याची एक छटा होती. मला वाटलं तो विनोद माझ्यावर असावा. *मी काय विचार करत होते?* मी त्याच्या आईवडिलांना भेटणार होते तेही अंतर्वस्त्र घातलेलं नसताना. माझ्या अर्धजागृत मनाने मला असहकाराचं, मी तुला तसं सांगितलं होतं असं भान दाखवलं. सापेक्षतेने सुरक्षित असलेल्या त्याच्या अपार्टमेंटमध्ये, ती एक गंमत, एक चिडवणारी कल्पना भासली होती. आता, मी पॅन्टीज न घालता जवळजवळ बाहेर होते! त्याने माझ्याकडे बघितलं. आम्हा दोघांत भारित होणारा तो प्रवाह. त्याच्या चेहऱ्यावरून गंमत वाटत असलेले भाव लुप्त झाले आणि त्याचा आविर्भाव झाकोळला, त्याचे डोळे गडद झाले... ओ माय.

तळमजल्यावर एलिव्हेटरचे दरवाजे उघडले. जणूकाही त्याचे विचार स्पष्ट करण्यासाठी ख्रिश्चनने त्याचं डोकं हलवलं आणि एखाद्या सभ्य गृहस्थाने शिष्टाचार पाळावेत, तसा त्याच्याआधी मला बाहेर पडण्यासाठी खूण केली. *तो कोणाला फसवतोय?* तो सभ्य

गृहस्थ नाहीये. त्याच्याकडे माझ्या पॅन्टीज आहेत!

टेलरने मोठी ऑडी गाडी उभी केली. ख्रिश्चनने माझ्यासाठी मागचं दार उघडलं. मी जेवढं डौलदारपणे चढता येईल तेवढ्या डौलदारपणे मी आत चढले. (माझ्या उनाड वस्त्रहीनतेचा विचार करता.) केटचा प्लम ड्रेस चिकटून बसणारा आणि माझ्या गुडघ्यांच्या वरच्या बाजूला लटकणारा होता, म्हणून मी कृतज्ञ होते.

आम्ही इंटरस्टेट ५वरून वेगाने गेलो. दोघंही शांत होतो. नि:संशय आमच्या पुढ्यात सातत्याने असलेल्या टेलरच्या उपस्थितीची बोच होती. ख्रिश्चनचा मूड जवळजवळ कळून येणारा होता. तो बदलल्यासारखा भासला, त्यातला सगळा विनोद सावकाशपणे झिरपत होता. आम्ही उत्तरेच्या दिशेने मार्ग आक्रमला. तो विचार करत होता, खिडकीच्या बाहेर टक लावून बसत होता आणि तो माझ्यापासून दुरावत चालला असल्याचं मला कळलं. तो कसला विचार करतोय? मी त्याला विचारू शकले नाही. टेलरच्या समोर मी काय बोलणार?

''तू नृत्य करायला कुठे शिकलास?'' मी सहज विचारलं. तो माझ्याकडे बघण्यासाठी वळला. मधूनमधून येणाऱ्या रस्त्यावरच्या दिव्यांच्या प्रकाशाने त्याच्या डोळ्यांतले भाव वाचता येत नव्हते.

''तुला खरंच जाणून घ्यायचंय का?'' त्याने मृदूपणे उत्तर दिलं.

माझं हृदय खचलं आणि आता मला ते जाणून घ्यायचं नव्हतं, कारण मी त्याचा तर्क करू शकत होते.

''येस,'' मी नाइलाजाने पुटपुटले.

''मिसेस रॉबिनसनना नृत्याची आवड होती.''

ओह, माझ्या वाईट संशयाला पुष्टी मिळाली. तिने त्याला छान शिकवलं होतं आणि त्या विचाराने मी निराश झाले – मी त्याला शिकवू शकेन असं काहीच नव्हतं. माझ्याकडे कोणतंही विशेष प्रावीण्य नव्हतं. ''ती एक चांगली शिक्षिका असणार!''

''होती खरी.''

माझ्या डोक्याच्या त्वचेचे केस ताठरले. तिला त्याचा सर्वांत चांगला भाग मिळाला का? तो एवढा स्वकेंद्रित व्हायच्या आधी? किंवा मग तिने त्याला त्याच्या कोशातून बाहेर आणलं? त्याच्या व्यक्तिमत्त्वाला एक गमतीदार, खेळकर बाजू आहे. जेव्हा मला त्याने त्याच्या बाहुपाशात असताना त्याच्या बैठकीच्या खोलीत घुमवलं, इतकं अनपेक्षितपणे आणि माझ्या पॅन्टीज त्याच्याकडे कुठेतरी होत्या.

मग ती रेड रूम ऑफ पेन. मी प्रतिक्षिप्त क्रियेने माझी मनगटं चोळलं – प्लॅस्टिकच्या पातळ पट्ट्यांनी एखाद्या मुलीला होईल तसं तिने ते सगळंदेखील त्याला शिकवलं किंवा मग त्याचा सत्यानाश केला, हे एखाद्याच्या दृष्टिकोनावर ते अवलंबून आहे. किंवा मग कदाचित त्याने त्याचा मार्ग तिथे मिसेस रॉबिनसन व्यतिरिक्तदेखील शोधून काढला असता. त्याक्षणी मला कळून आलं की, मी तिचा तिरस्कार करत होते. मी तिला कधीही भेटणार नाही, अशी मी आशा केली, कारण जर मी भेटलेच तर माझ्या कृतींबद्दल मी जबाबदार राहिले नसते. एखाद्याबद्दल एवढ्या आत्मीयतेने कोणाबद्दल काही वाटलेलं मला आठवत नव्हतं, विशेषत: अशा एखाद्या व्यक्तीला जिला मी कधीच भेटलेले नाही. कोणाच्या नजरेत न येता खिडकीच्या बाहेर नजर लावत मी माझ्या अतार्किक रागाला आणि मत्सराला गोंजारलं.

माझं मन दुपारच्या घटनांकडे भरकटलं. त्याच्या प्राधान्यक्रमांना मी जे समजून घेतलं त्याप्रमाणे तो माझ्याशी मवाळपणेच वागला होता. *मी ते पुन्हा करेन?* मी त्याच्यावर वार घालण्याचा देखावादेखील करू शकले नाही. अर्थातच मी ते करेन, त्याने जर मला विचारलं तर – जोपर्यंत तो मला इजा करत नाही आणि त्याच्यासोबत असण्यासाठी तेवढा एकच मार्ग असेल तर...

हीच बॉटम लाइन होती. मला त्याच्याबरोबर राहायचं होतं. माझ्या अंतर्देवतेने सुटकेचा सुस्कारा टाकला. मी असा निष्कर्ष काढला की, मी माझ्या अंतर्देवतेचा बौद्धिक विचार करण्यासाठी क्वचितच वापर करते, पण त्याहीपेक्षा जास्त वापर तिच्या शरीराच्या 'त्या' भागाचा करते जो याक्षणी उघडा पडला होता!

''नको,'' तो पुटपुटला.

मी कपाळाला आठ्या घातल्या आणि त्याच्याकडे बघण्यासाठी वळले.

''काय नको?'' मी त्याला स्पर्श केला नव्हता.

''गोष्टींचा अतिविचार, ॲनास्टॅशिया,'' पुढे होऊन, त्याने माझा हात पकडला. त्याच्या ओठांपर्यंत नेऊन माझ्या बोटांच्या पेरांचं हळुवारपणे चुंबन घेतलं. ''माझी दुपार फार छान गेली, थँक यू.''

तो पुन्हा माझ्याबरोबर होता. मी त्याच्याकडे बघून डोळ्यांची उघडझाप केली आणि लाजून हसले. तो इतका गोंधळवून टाकणारा आहे. माझ्या मनात खदखदणारा एक प्रश्न मी त्याला विचारला.

''तू केबल टाय का वापरलास?''

तो माझ्याकडे बघून हसला.

''ते जलद होतं, सोपं असतं आणि अनुभव म्हणूनही ते जरा वेगळं होतं. मला माहीत आहे ते फारच राक्षसी आहेत. प्रतिबंध करणाऱ्या साधनांत मला ते आवडतं,'' तो माझ्याकडे बघून मवाळपणे हसला. ''तुला जागच्या जागी ठेवण्यासाठी फारच परिणामकारक.''

मी लाल झाले आणि अस्वस्थपणे टेलरकडे नजर टाकली. त्याचे डोळे रस्त्यावर ठेवून तो निर्विकार होता.

*मी याच्यावर काय भाष्य करावं?...* ख्रिश्चनने निष्पापपणे खांदे उडवले

''हे सगळं काही माझ्या विश्वाचा भाग आहे, ॲनास्टॅशिया,'' त्याने माझा हात दाबून सोडून दिला आणि पुन्हा खिडकीच्या बाहेर टक लावली.

त्याचं विश्व! खरंच या विश्वाचा मला एक भाग व्हायचंय, पण त्याच्या अटींवर? मला खरंच माहीत नाही. त्याने त्या कराराचा उल्लेख केला नव्हता. माझ्या अंतर्गत विचारांमुळे आनंदित व्हायला काहीच मदत होत नव्हती. मी खिडकीच्या बाहेर नजर टाकली

आणि लँडस्केप बदलला होता. आम्ही शाईसारख्या काळोखाने व्यापलेला पूल ओलांडत होतो. माझ्या विचारमग्न मन:स्थितीशी ती रात्र मिळतीजुळती होती, बंद करणारी, घुसमटवून टाकणारी.

मी पटकन एक नजर ख्रिश्चनकडे टाकली आणि तो माझ्याकडे टक लावून बघत होता.

''पेनी फॉर युवर थॉट्स?'' त्याने विचारलं.

मी नि:श्वास टाकला आणि कपाळाला आठ्या घातल्या.

''तेवढे वाईट आहेत का?'' तो म्हणाला.

''तू काय विचार करतो आहेस हे मला कळलं असतं, तर बरं झालं असतं.''

तो शिष्टपणे हसला. ''डिट्टो, बेबी,'' तो म्हणाला. टेलरने आम्हाला बेलेव्ह्यूकडे नेलं.

आठच्या सुमारास आमची ऑडी एका सरंजामशाही पद्धतीच्या मॅन्शनच्या ड्राइव्ह वेमध्ये वळली. ते श्वास रोखायला लावणारं होतं, अगदी दरवाजाच्या भोवताली लावलेल्या गुलाबांपर्यंत. चित्रांच्या पुस्तकासारखं परिपूर्ण.

''तू तयार आहेस का?'' टेलरने एका छाप टाकणाऱ्या पुढच्या दरवाजाजवळ गाडी थांबवली तेव्हा ख्रिश्चनने विचारलं.

मी मान हलवली आणि त्याने माझा हात आणखी एकदा दिलासा देण्यासाठी दाबला.

''माझ्यासाठीदेखील हा पहिलाच अनुभव,'' तो कुजबुजला. नंतर खट्याळपणे हसला. ''तू आत्ता तुझं अंर्तवस्त्र घातलेलं असतंस, तर बरं झालं असतं असं तुला वाटत असणार, हे मी पैजेवर सांगतो,'' त्याने चिडवलं.

मी लाल झाले. मी माझ्या हरवलेल्या पॅन्टीजना विसरून गेले होते. सुदैवाने, टेलर गाडीतून खाली उतरून माझ्यासाठी दरवाजा उघडत होता, म्हणजे आमच्यातलं बोलणं तो ऐकू शकत नव्हता. मी ख्रिश्चनकडे खवळून बघितलं, एक रुंद हास्य त्याच्या चेहऱ्यावर होतं; मी वळले आणि गाडीतून उतरले.

डॉ. ग्रेस ट्रेव्हेल्यान – ग्रे दरवाजाच्या पायऱ्यांवर आमची वाट बघत होत्या. तिच्या फिक्कट निळ्या रंगाच्या रेशमी ड्रेसमध्ये ती डौलदार, उच्चभ्रू दिसत होती. तिच्या मागे, माझ्या कल्पनेप्रमाणे, मि. ग्रे. उभे होते – उंच, पिंगट केसांचे आणि ख्रिश्चनसारखेच त्यांच्यापरीने देखणे.

''ॲनास्टॅशिया, तू माझ्या आईला भेटलेली आहेस, ग्रेस. हे माझे वडील, कॅरिक.''

''मिस्टर ग्रे, तुम्हाला भेटून खूप आनंद झाला,'' मी हसले आणि त्यांनी पुढे केलेला हात हलवला.

''मलाही तेवढाच आनंद झाला, ॲनास्टॅशिया.''

''प्लीज, मला ॲना म्हणा.''

त्यांचे निळे डोळे सौम्य आणि मृदू होते.

''ॲना, तुला पुन्हा भेटणं सुखद आहे,'' ग्रेसने मला एका प्रेमळ आलिंगनात लपेटलं. ''कम इन, माय डिअर.''

''ती इथे आलीय?'' मी घराच्या आतून एक चिरकलेला आवाज ऐकला. मी ख्रिश्चनकडे अस्वस्थपणे बघितलं.

''ती मिया असेल, माझी छोटी बहीण,'' तो जवळजवळ, पण फार न चिडल्यासारखा म्हणाला.

ज्या पद्धतीने त्याचा आवाज मृदू झाला आणि तिच्या नावाचा उच्चार करताना त्याचे डोळे चमकले, त्यावरून त्याच्या आवाजात ममतेचा एक अंतर्गत स्रोत होता. ख्रिश्चन नक्कीच तिच्यावर खूप प्रेम करत असणार. ते उघड होतं. ती ढांगा टाकत हॉलमध्ये आली. काळे कुळकुळीत केस, उंच आणि वळणदार शरीरयष्टी. ती साधारणपणे माझ्या वयाची असावी.

''ॲनास्टॅशिया! मी तुझ्याबद्दल खूप ऐकलंय,'' तिने मला घट्ट आलिंगन दिलं.

होली काउ. तिच्या खळाळत्या उत्साहामुळे मी माझं हसू आवरू शकले नाही.

''ॲना म्हण प्लीज!'' तिने जेव्हा मला प्रशस्त हॉलमध्ये ओढून नेलं, तेव्हा मी पुटपुटले. तिथे सगळीकडे गडद रंगाचं लाकडी फ्लोअरिंग आणि जतन केलेले रग्ज होतं; त्याला एका मजल्यावरून जाणारा जिना होता.

''त्याने यापूर्वी कधीही एखाद्या मुलीला घरी आणलेलं नाही,'' मियाचे गडद डोळे उत्तेजनेने चमकत असताना ती म्हणाली.

ख्रिश्चन त्याचे डोळे फिरवत असल्याचं मला दिसलं. मी माझी भुवई त्याच्याकडे बघून उंचावली. त्याने त्याचे डोळे बारीक करून माझ्याकडे बघितलं.

''मिया, शांत हो,'' ग्रेसने सौम्यपणे दटावलं. ''हॅलो, डार्लिंग,'' असं म्हणत असताना तिने ख्रिश्चनच्या दोन्ही गालांचं चुंबन घेतलं.

तो प्रेमळपणे तिच्याकडे बघून हसला. मग त्याच्या वडिलांशी हस्तांदोलन केलं.

आम्ही सगळे वळलो आणि बैठकीच्या खोलीत गेलो. मियाने माझा हात सोडला नव्हता. खोली प्रशस्त होती. क्रीम, तपकिरी आणि फिक्कट निळ्या रंगाच्या अभिरूचीपूर्ण फर्निशिंगने सजवलेली – आरामशीर, सौम्य आणि अतिशय स्टायलिश. केट आणि इलिअट हातात शॅम्पेनचे उंच ग्लासेस घेऊन एकमेकांना खेटून कोचावर बसले हाते. केट मला आलिंगन देण्यासाठी उसळी घेऊन उठली आणि शेवटी मियाने माझा हात सोडला.

''हाय, ॲना!'' ती प्रफुल्लित झाली. ''ख्रिश्चन,'' तिने तुटकपणे त्याच्याकडे बघून मान डोलावली.

''केट,'' तो पण तिच्याबरोबर तेवढाच औपचारिक होता. मी त्यांच्या देवाणघेवाणीमुळे कपाळाला आठ्या घातल्या. इलिअटने मला कवेत घेणारं आलिंगन दिलं. हा काय प्रकार आहे? 'ॲनाला आलिंगन द्या' आठवडा! प्रेमाचं हे चमकदार प्रदर्शन – मला त्याची मुळीच सवय नव्हती. ख्रिश्चन माझ्या बाजूला उभा राहिला, त्याचा हात त्याने माझ्याभोवती गुंडाळला. त्याचा हात माझ्या नितंबावर ठेवून त्याने त्याची बोटं पसरवली आणि मला जवळ ओढली.

प्रत्येक जण आमच्याकडे टक लावून बघत होता. ते धीर खचवणारं होतं.

''ड्रिंक्स?'' मि. ग्रे भानावर आल्यासारखे दिसले.

''प्रॅझिक्को?''

''प्लीज,'' ख्रिश्चन आणि मी एकदमच म्हणालो.

''ओह्... हे अतिशय चमत्कारिक आहे.'' मियाने टाळ्या वाजवल्या. ''तुम्ही सारखंच बोलताय; मी आणते,'' ती खोलीच्या बाहेर पळाली.

मी लालभडक झाले. केटला इलिअटबरोबर बसलेली बघून एकाएकी माझ्या लक्षात आलं की, ख्रिश्चनने मला बोलावल्याचं एकमेव कारण म्हणजे केट होती. इलिअटने कदाचित मोकळेपणाने आणि आनंदाने केटला त्याच्या आईवडिलांना भेटायला सांगितलं. ख्रिश्चन अडकला – हे जाणून की, केटकडून मला ते कळलं असतं. त्या विचाराने मी कपाळाला आठ्या घातल्या. हे आमंत्रण द्यायला त्याच्यावर जबरदस्ती झाली होती, ही जाणीव खिन्न आणि निराश करणारी होती. माझ्या अर्धजागृत मनाने संतासारखं डोकं हलवलं. *शेवटी... तुला... ते... कळून... चुकलं. मूर्ख भाव चेहऱ्यावर घेऊन.*

''डिनर जवळजवळ तयार आहे,'' मियाच्या मागोमाग खोलीच्या बाहेर जात ग्रेस म्हणाली.

ख्रिश्चनने माझ्याकडे बघताना कपाळाला आठ्या घातल्या.

''बस,'' आरामशीर कोचाकडे निर्देश करत त्याने आज्ञा केली. माझे पाय काळजीपूर्वक एकावर एक घेत मी सांगितलं गेलं तसं केलं. तो माझ्याशेजारी बसला; पण मला त्याने स्पर्श केला नाही.

''आम्ही फक्त सुट्ट्यांबद्दल बोलत होतो, ॲना.'' मि. ग्रे दयाळूपणे म्हणाले. ''इलिअटने केट आणि तिच्या कुटुंबाबरोबर एका आठवड्यासाठी बार्बाडोसला जायचं ठरवलंय.''

मी केटकडे नजर टाकली आणि ती हसली; तिचे डोळे मोठे झाले आणि चमकत होते. ती आनंदित झाली होती. कॅथरिन कवाना, काहीतरी सन्मान दर्शव!

''तू आता तुझी पदवी मिळवलीस म्हणून थोडी विश्रांती घ्यायचं ठरवलंयस का?'' ग्रेंनी विचारलं.

''काही दिवसांसाठी जॉर्जियाला जाण्याचा मी विचार करतेय,'' मी उत्तर दिलं.

ख्रिश्चनने माझ्याकडे तोंड उघडं टाकून पाहिलं. दोन-तीन वेळा डोळ्यांची उघडझाप केली. त्याच्या चेहऱ्यावरचा भाव वाचता येत नव्हता. *ओह्, शिट्.* मी त्याच्याजवळ या गोष्टीचा उल्लेख केला नव्हता.

''जॉर्जिया?'' तो पुटपुटला.

''माझी आई तिकडे राहते आणि मी तिला बरेच दिवसात भेटले नाहीये.''

''तू केव्हा जाण्याचा विचार करत होतीस?'' त्याचा आवाज हळू होता.

''उद्या, संध्याकाळी उशिरा.''

मिया बैठकीच्या खोलीत परत आली. तिने आमच्या हातात फिक्कट गुलाबी प्रॅझिक्कोने भरलेले शॅम्पेन फ्ल्यूट्स दिले.

''तुमच्या उत्तम प्रकृतीसाठी!'' मि. ग्रेंनी त्यांचा ग्लास उंचावला. एका डॉक्टरच्या नवऱ्याकडून योग्य टोस्ट. त्यामुळे मला हसू आलं.

''किती काळासाठी?'' ख्रिश्चनने विचारलं. त्याचा आवाज फसण्यासारखा मृदू होता.

*होली क्रॅप...* तो रागावला होता.

''मला अजून माहीत नाही. उद्या माझ्या मुलाखती कशा होतात, त्याच्यावर ते अवलंबून आहे.''

त्याचा जबडा आवळला. केटच्या चेहऱ्यावर तो ढवळाढवळ करणारा भाव आला. ती अतिशय गोडपणे हसली.

''ॲनाला ब्रेक घेण्याची गरज आहे,'' ती ख्रिश्चनला टोकदारपणे म्हणाली. तिने तिचं मत त्याच्याबद्दल एवढं कलुषित का करून घेतलं होतं? तिला अडचण काय होती?

''तुझ्या मुलाखती आहेत?'' मि. ग्रेंनी विचारलं.

''होय, दोन प्रकाशकांकडे प्रशिक्षणार्थी म्हणून, उद्या.''

''आय विश यू द बेस्ट ऑफ लक.''

''डिनर तयार आहे,'' ग्रेसने घोषित केलं.

आम्ही सगळे उभे राहिलो. केट आणि इलिअट, मि. ग्रे आणि मियाच्या मागोमाग खोलीच्या बाहेर गेले. मी जायला निघाले, पण ख्रिश्चनने माझं कोपर पकडून मला अचानक थांबवलं.

''तू जाणार आहेस हे तू मला केव्हा सांगणार होतीस?'' त्याने घायकुतीला आल्यासाारखं विचारलं. त्याचा आवाज हळुवार होता, पण तो त्याच्या रागावर मुखवटा घालत होता.

''मी नाही जातेय. मी माझ्या आईला भेटणार आहे आणि मी त्याबद्दल फक्त विचार करतेय.''

''आपल्या व्यवस्थेबद्दल काय?''

''आपण अजून तशी व्यवस्था केलेली नाहीये.''

त्याने त्याचे डोळे बारीक केले आणि मग त्याला आठवलं. माझा हात सोडून त्याने माझं कोपर पकडलं आणि मला खोलीच्या बाहेर जाण्याचा मार्ग दाखवला.

''हे संभाषण संपलेलं नाही,'' आम्ही जेव्हा जेवणाच्या खोलीत प्रवेश केला तेव्हा तो धमकावल्यासारखं कुजबुजला.

ओह्, क्रॅपोला. तुझ्या पॅन्टीज एवढ्या चुरगाळू नको... आणि माझ्या मला परत दे. मी त्याच्याकडे डोळे मोठे करून बघितलं.

मला त्या जेवणाच्या खोलीमुळे हिथमॅन येथील खाजगी जेवणाची आठवण झाली. गडद लाकडी टेबलाच्या वरच्या बाजूला क्रिस्टल शॅन्डेलिअर टांगलं होतं; आणि भिंतीवर एक मोठा, कलात्मकतेने कोरीवकाम केलेला आरसा होता. टेबल एका चुरचुरीत, सफेद लिनन टेबलक्लॉथने आच्छादलेलं होतं आणि जेवणासाठी सज्ज होतं. टेबलाच्या मध्यभागी फिकट गुलाबी पिऑनीजचा बाउल सेंटरपीस म्हणून ठेवला होता. ते थक्क करणारं होतं.

आम्ही आमच्या जागांवर बसलो. मि. ग्रे टेबलाजवळच्या मुख्य जागेवर बसले आहेत; मी त्यांच्या उजव्या हाताला बसले आणि ख्रिश्चन माझ्याशेजारी. मि. ग्रेनी रेड वाइनची उघडलेली बाटली घेतली आणि थोडी केटला दिली. मिया ख्रिश्चनच्या शेजारच्या जागेवर बसली आणि त्याचा हात पकडून तो घट्ट दाबला. ख्रिश्चन तिच्याकडे बघून प्रेमळपणे हसला.

''तू ॲनाला कुठे भेटलास?'' मियाने त्याला विचारलं.

''डब्ल्यूएसयू विद्यार्थी वार्तापत्रासाठी तिने माझी मुलाखत घेतली होती.''

''ज्याचं संपादन केट करते,'' मी त्या संभाषणाचा रोख माझ्यापासून दूर नेण्याच्या आशेने बोलले.

मिया केटकडे बघून हसली; ती तिच्यासमोर इलिअटच्या शेजारी बसलेली होती. त्यांनी विद्यार्थी वर्तमानपत्राबद्दल बोलायला सुरुवात केली.

''वाइन, ॲना?'' मि. ग्रेंनी विचारलं.

''प्लीज,'' मी त्यांच्याकडे बघून हसले. मि. ग्रे बाकीचे ग्लासेस भरण्यासाठी उठले.

मी ख्रिश्चनकडे तिरपी नजर टाकली. तो माझ्याकडे बघण्यासाठी वळला, त्याचं डोकं एका बाजूला झुकलेलं होतं.

''काय?'' त्याने विचारलं.

''प्लीज माझ्यावर रागावू नकोस,'' मी कुजबुजले.

''मी तुझ्यावर रागावलो नाहीये.''

मी त्याच्याकडे टक लावून बघितलं. त्याने निःश्वास टाकला.

''होय, मी तुझ्यावर रागावलो आहे,'' त्याने थोडा वेळ त्याचे डोळे मिटले.

''हात शिवशिवण्याइतका चिडलायस?'' मी अस्वस्थपणे विचारलं

''तुम्ही दोघं कशाबद्दल कुजबुज करता आहात?'' केट मध्येच बोलली.

मी लाल झाले आणि ख्रिश्चनने तिच्याकडे 'कवाना, तू लांबच रहा' पद्धतीने डोळे वटारून बघितलं. केटदेखील त्याच्या त्या एकटक नजरेखाली कोमेजली.

''माझ्या जॉर्जियाच्या ट्रीपबद्दल,'' मी गोडपणे हसले. त्यांच्यातली शत्रुत्वाची मानसिकता घालवण्याच्या आशेने.

केट हसली. तिच्या डोळ्यांत एक खट्याळ चमक होती.

''तुम्ही शुक्रवारी बारमध्ये गेलात तेव्हा जोस कसा होता?''

*होली फक्*, केट. मी तिच्याकडे बघून माझे डोळे मोठे केले. ती काय करत होती? तिने तिचे डोळे मोठे करून परत माझ्याकडे बघितलं. मला कळलं की, ती ख्रिश्चनच्या मनात मत्सर निर्माण करण्याचा प्रयत्न करत होती. तिला फारच थोडी माहिती होती. मला वाटलं होतं, मी याच्यातून निसटून जाईन.

''ठीक होता,'' मी पुटपुटले.

ख्रिश्चन पुढे वाकला.

''हात शिवशिवण्याइतका रागावलेला,'' तो कुजबुजला. ''विशेषतः आत्ता.'' त्याचा स्वर शांत आणि भीतिदायक होता.

ओ नो! मी चुळबुळले.

दोन प्लेट्स घेऊन ग्रेस परतली. तिच्या मागे एक पिंगट केसांची पिगटेल्स बांधलेली सुंदर तरुण स्त्री होती आणि तिने फिक्क्या निळ्या रंगाचा तरतरीत पोशाख केला होता. तिच्या हातात प्लेट्सचा ट्रे होता.

तिच्या डोळ्यांनी ताबडतोब ख्रिश्चनच्या डोळ्यांना शोधून काढलं. ती लाजली आणि तिच्या मस्कारा लावलेल्या लांब पापण्यांच्या आडून ख्रिश्चनला बघितलं. काय?

घरात कुठेतरी फोनची रिंग वाजायला लागली.

''क्षमा करा,'' मि. ग्रे उठून गेले.

''थँक यू, ग्रेचेन,'' ग्रेस हळुवारपणे म्हणाली. मि. ग्रेंनी बाहेर जाताना कपाळाला आठ्या घातल्या. ''फक्त कंसोलवर ट्रे ठेव.''

ग्रेचेनने मान हलवली आणि दुसरी एक विनवणारी नजर ख्रिश्चनकडे टाकून निघून गेली. म्हणजे ग्रेंकडे असणाऱ्या कर्मचाऱ्यांची नजर माझ्या वुड-बी डॉमिनंटवर होती तर. ही संध्याकाळ यापेक्षा आणखी वाईट होईल काय? माझ्या मांडीवर ठेवलेल्या हातांकडे मी खवळून बघितलं.

मि. ग्रे परत आले.

''तुझ्यासाठी फोन आहे, डिअर, हॉस्पिटलमधून,'' ते ग्रेसला म्हणाले.

''कृपा करून प्रत्येकाने सुरुवात करा,'' माझ्या हातात प्लेट देऊन जाताना ग्रेस हसली.

वास खमंग येतो आहे – केरिझो आणि स्कॅलॉप्स. भाजलेल्या रेड पेपर्स आणि शॅलॉट्सबरोबर, फ्लॅट-लीफ पार्सलेबरोबर. आणि ख्रिश्चनच्या अवगुंठित धमक्यांमुळे माझ्या पोटात ढवळत होतं हे जरी सत्य असलं तरी, प्रीटी लिटल पिगटेल्समधून ख्रिश्चनला चुकार कटाक्ष मिळत असले आणि माझ्या हरवलेल्या अंडवेअरचं संकट जरी असलं, तरी मला खूप भूक लागली होती. दुपारच्या शारीरिक कष्टांमुळे मला एवढी भूक लागली होती, हे लक्षात येऊन मी लाल झाले.

काही क्षणानंतर ग्रेस परतली; तिच्या भुवया आक्रसल्या होत्या. मि. ग्रे त्यांनी डोकं एका बाजूला झुकवलं... ख्रिश्चनसारखं.

''सगळं काही ठीक?''

''आणखी एक गोवरची केस,'' ग्रेसने निःश्वास टाकला.

''ओ नो.''

''होय, एक मूल. या महिन्यातली चौथी केस. लोकांनी त्यांच्या मुलांना प्रतिबंधात्मक लस टोचली पाहिजे, पण...'' तिने दुःखाने तिचं डोकं हलवलं आणि मग हसली. ''मला आनंद आहे की, आमची मुलं या सगळ्यातून गेली नाहीत. कांजण्यांपेक्षा वाईट संसर्ग त्यांना कधीच झाला नाही, थँक गुडनेस. बिचारा इलिअट.'' बसत असताना ती म्हणाली, तिच्या मुलाकडे हसत बघितलं. इलिअटने जेवता जेवता कपाळाला आठ्या घातल्या आणि अस्वस्थपणे चुळबुळ केली.

''ख्रिश्चन आणि मिया नशीबवान होते. त्यांना सौम्य संसर्ग झाला, फक्त दोघांमध्ये मिळून एखाद-दुसरा डाग.''

मिया खुदखुदली आणि ख्रिश्चन त्याचे डोळे फिरवले.

''मग, तुम्हाला मरिनर्स गेम मिळू शकला का, डॅड?'' उघडच इलिअट संभाषण पुढे न्यायला अधीर होता.

जेवणाआधीचे खाद्यपदार्थ चवदार होते आणि इलिअट, मि. ग्रे आणि ख्रिश्चन जेव्हा बेसबॉलवर बोलू लागले तेव्हा मी खाण्यावर लक्ष केंद्रित केलं. त्याच्या कुटुंबीयांबरोबर बोलताना ख्रिश्चन शांत आणि सैलावलेला वाटला. माझं मन वेगाने काम करत होतं. डॅम केट, ती कोणता खेळ खेळतेय? *तो मला शिक्षा करेल का?* मी त्या करारावर अजून सही केली नव्हती. कदाचित मी करणार नाही. कदाचित मी तो जिथे पोचू शकणार नाही, अशा जॉर्जियामध्ये राहीन.

''तू तुझ्या नवीन अपार्टमेंटमध्ये कशी काय स्थिरावते आहेस डिअर?'' ग्रेसने सभ्यपणे विचारलं.

तिच्या प्रश्नाबद्दल मी कृतज्ञ झाले. त्यामुळे माझं चित्त विचलित झालं. मी तिला आमच्या स्थलांतराबद्दल सांगितलं.

आम्ही जेव्हा आमचे जेवणाच्या आधीचे खाद्यपदार्थ संपवले, तेव्हा ग्रेचेन आली. मला प्रथमच वाटलं – मला ख्रिश्चनच्या अंगावर मोकळेपणाने हात टाकावेत, फक्त तिला सूचित करायला – तो फिफ्टी शेड्स – विसकटलेला असला, तरी माझा आहे. तिने टेबल आवरणं सुरू केलं. मला ते आवडत नाही – एवढं ख्रिश्चनच्या अंगाला जवळून अंग घासणं. सुदैवाने, तो तिची दखलही घेताना दिसत नाही, पण माझी अंतर्देवता धुसफुसत होती.

केट आणि मिया पॅरिसचं काव्यमय भरभरून वर्णन करत होत्या.

''तू पॅरिसला गेली आहेस का, ॲना?'' मियाने निर्व्याजपणे विचारलं आणि मला माझ्या मत्सरी दिवास्वप्नातून विचलित केलं.

''नाही, पण मला जायला आवडेल,'' मला माहीत होतं की, त्या टेबलावर बसलेल्यांपैकी यूएसए सोडून बाहेर न गेलेल्यांपैकी मी एकटीच होते.

''आम्ही पॅरिसला मधुचंद्र साजरा केला,'' ग्रेस मि. ग्रेकडे बघून हसली आणि तेही तिच्याकडे बघून हसले.

त्याचं बघणं जवळजवळ शरमिंदं करणारंच होतं. ते निश्चितच एकमेकांवर गाढप्रेम करत होते. मी क्षणभर विचार केला की, दोघंही आईवडील असताना वाढणं हे एखाद्यासाठी कसं असेल?

''ते एक सुंदर शहर आहे,'' मिया सहमत झाली. ''पॅरिसच्या लोकांव्यतिरिक्त! ख्रिश्चन, तू ॲनाला पॅरिसला न्यायला पाहिजेस,'' मियाने ठासून सांगितलं.

''मला वाटतं, ॲनास्टॅशिया लंडनला प्राधान्य देईल,'' ख्रिश्चन सौम्यपणे म्हणाला.

ओह्... त्याने लक्षात ठेवलंय. त्याने त्याचा हात माझ्या गुडघ्यांवर ठेवला – त्याची बोटं माझ्या मांडीपर्यंत पोचली. प्रतिसाद म्हणून माझं पूर्ण शरीर ताठरलं. नो... इथे नाही, आत्ता नाही. मी लाल झाले आणि चुळबुळले, त्याच्यापासून दूर होण्याचा प्रयत्न केला. त्याच्या हाताची पकड माझ्या मांडीवर बसली, मी स्तब्ध झाले. मी गडबडून माझी वाइन घेतली.

लिटिल मिस युरोपियन पिगटेल्स परत आली. लाजरे कटाक्ष आणि हलणारे नितंब. तिने आमचं मुख्य जेवण आणलं : बीफ वेलिंग्टन, मला वाटलं. सुदैवाने, ती आम्हाला आमच्या प्लेट्स देऊन गेली, तरीही ती ख्रिश्चनला त्याची प्लेट देताना रेंगाळली. तिने जेवणाच्या खोलीचं दार बंद करून घेताना मी बघितलं तेव्हा ख्रिश्चनने माझ्याकडे प्रश्नार्थक नजर टाकली.

''मग पॅरिसच्या लोकांमध्ये काय खोड होती?'' इलिअटने त्याच्या बहिणीला विचारलं, ''तुझ्या जिंकून घेणाऱ्या अदांची त्यांना भुरळ पडली की नाही?''

''छे! नाही, त्यांना ती पडली नाही. आणि मॉन्सूर फ्लोबेर, ज्या राक्षसासाठी मी काम करते, तो एक वर्चस्व गाजवणारा हुकूमशहा होता.''

मी माझ्या वाइनमध्ये फुरफुर आवाज केला.

''ॲनास्टॅशिया, तू ठीक आहेस ना?'' ख्रिश्चनने त्याचा हात माझ्या मांडीवरून काढून घेत विचारलं.

त्याच्या आवाजातला विनोद परत आला होता. ओह्, देवा तुझे आभार. मी जेव्हा मान हलवली, तेव्हा त्याने माझ्या पाठीवर हलकेच थोपटलं. जेव्हा मी सावरले आहे, असं त्याला कळलं तेव्हाच त्याचा हात काढून घेतला.

बीफ चवदार होतं आणि ते भाजलेल्या रताळ्यांबरोबर वाढलं होतं. सोबत गाजरं, पार्सनिप्स आणि हिरव्या शेंगापण होत्या. जेवण संपेपर्यंत ख्रिश्चनने त्याची मन:स्थिती चांगली टिकवून ठेवण्याचं साध्य केलं, म्हणून तर ते जेवण अधिकच स्वादिष्ट लागलं. मी एवढी मनापासून जेवत होते म्हणून असेल कदाचित, असा मला संशय आला. ग्रे कुटुंबातलं संभाषण मुक्तपणे चालू राहिलं, प्रेमळ आणि आपुलकीचं, एकमेकांना सौम्यपणे चिडवत. लेमन सिलॅबच्या जेवणानंतरच्या गोड पदार्थांचा आस्वाद घेताना, मियाने तिच्या पॅरिसमधल्या किश्श्यांनी आमचं मनोरंजन केलं; एकदा तर ती ओघवत्या फ्रेंचमध्ये बोलली. आम्ही सगळे तिच्याकडे टक लावून बघितलं आणि तिने गोंधळून आमच्याकडे परत टक लावली. ख्रिश्चनने तिला तेवढ्याच ओघवत्या फ्रेंचमध्ये तिने काय केलं ते सांगेपर्यंत; ती खुदुखुदु हसायला लागली. तिचं हास्य फार लाघवी होतं आणि लवकरच आम्ही सगळेदेखील हसू लागलो.

इलिअटने त्याच्या अलीकडच्या बांधकाम प्रकल्पाबद्दल सांगितलं. तो प्रकल्प सीॲटलच्या उत्तरेला एक नवीन इको-फ्रेंडली कम्युनिटीचा होता. मी केटकडे बघितलं आणि ती इलिअट सांगत असलेल्या प्रत्येक शब्दाकडे काळजीपूर्वक लक्ष देत होती. तिचे डोळे लालसेने आणि प्रेमाने चमकत होते. तो तिच्याकडे बघून हसला आणि त्यांच्यात जणूकाही अघोषित वचनाची देवाणघेवाण झाली. ''नंतर, बेबी,'' तो म्हणाला आणि ते हॉट, वेड लावणारं

हॉट होतं. त्यांचं नुसतं निरीक्षण करूनच मी लाल झाले.

मी नि:श्वास टाकला आणि फिफ्टी शेड्‌सकडे तिरपा कटाक्ष टाकला. मी त्याच्याकडे अनंत काळासाठी टक लावून बघू शकेन. त्याच्या हनुवटीवर हलकीशी दाढी वाढली होती आणि माझी बोटं ती खाजवायला शिवशिवली, त्या दाढीचा स्पर्श माझ्या चेहऱ्याजवळ अनुभवायला, माझ्या स्तनांजवळ, माझ्या मांड्यांमध्ये... माझ्या विचारांच्या दिशेमुळे मी लाजले. त्याने माझ्याकडे तिरपी नजर टाकली आणि माझी हनुवटी ओढायला हात वर केला.

''तुझा ओठ चावू नकोस,'' तो घोगऱ्या आवाजात कुजबुजला. ''मला करायचंय.''

ग्रेस आणि मियाने आमचे डेझर्ट्‌सचे ग्लासेस आवरले. त्या स्वयंपाकघराकडे गेल्या. मि. ग्रे, केट आणि इलिअट वॉशिंग्टन राज्यातील सोलर पॅनेल्सच्या गुणविशेषांवर चर्चा करू लागले. ख्रिश्चनने त्यांच्या संभाषणात रस असल्याचं खोटंच दर्शवत पुन्हा एकदा माझ्या गुडघ्यावर हात ठेवला. त्याच्या बोटांनी माझ्या मांडीपर्यंत प्रवास केला. माझा श्वासोच्छ्‌वास वाढला. त्याची प्रगती रोखण्यासाठी माझ्या मांड्या मी एकत्र दाबल्या. त्याला शिष्टपणे हसताना मी बघितलं.

''मी तुला मैदानात फेरफटका मारायला नेऊ का?'' त्याने मला उघडच विचारलं.

मला माहीत आहे मी 'होय' म्हणणं अपेक्षित होतं, पण माझा त्याच्यावर विश्वास नव्हता. मी उत्तर देण्यापूर्वीच तो उभा राहिला आणि त्याने त्याचा हात माझ्यापुढे केला. मी माझा हात त्याच्या हातात ठेवला आणि माझ्या पोटातले सगळे स्नायू, त्याच्या गडद, भुकेल्या नजरेला प्रतिसाद देत खोलवर पिळवटले.

''क्षमा करा,'' मी मि. ग्रेना म्हणाले आणि ख्रिश्चनच्या मागे जेवणाच्या खोलीतून बाहेर पडले.

त्याने मला हॉल वेमधून मार्ग दाखवला आणि स्वयंपाकघरातून गेला. तिथे मिया आणि ग्रेस डिशवॉशर लावत होत्या. युरोपियन पिगटेल्स कुठेच दिसत नव्हती.

''मी ॲनास्टॅशियाला मागचं अंगण दाखवतोय,'' ख्रिश्चनने निष्पापपणे त्याच्या आईला सांगितलं. तिने आम्हाला हसत हात हलवत बाहेर पाठवलं, मिया जेवणाच्या खोलीत परत गेली.

आम्ही एका करड्या रंगाच्या दगडात लाइट लावून प्रकाशित केलेल्या फ्लॅगस्टोन पॅशिओ भागात पाऊल टाकलं. तिथे करड्या रंगाच्या स्टोन टब्जमध्ये झुडपं होती. एक सुरेख धातूचं टेबल आणि खुर्च्या एका कोपऱ्यात लावल्या होत्या. ख्रिश्चन त्याच्यावरून गेला, काही पायऱ्या चढला आणि एका विस्तीर्ण लॉनवर आला जे किनाऱ्यापर्यंत पोचलं होतं – ओ माय – ते सुंदर होतं. क्षितिजावर सीॲटल चमकत होतं आणि मे महिन्याच्या थंड, चमकदार चंद्राने पाण्यावर एक चमकणारा चंदेरी रस्ता काढला होता; तो दोन बोटी नांगरलेल्या जेट्टीपर्यंत जात होता. जेट्टीच्या शेजारी एक बोटहाउस होतं. ते खूपच शांत, रम्य होतं. मी उभी राहिले आणि क्षणभर तोंड उघडं टाकून बघितलं.

ख्रिश्चनने मला त्याच्या मागे खेचलं आणि माझ्या टाचा मऊ गवतात रुतल्या.

''थांब, प्लीज,'' मी डळमळले.

त्याने थांबून माझ्याकडे पाहिलं. त्याच्या चेहऱ्यावरचे भाव अगम्य होते.

''माझ्या टाचा. मला बूट काढले पाहिजेत.''

''काळजी करू नकोस,'' तो म्हणाला आणि खाली वाकून मला गोळा करून त्याने त्याच्या खांद्यांवर घेतलं. धक्कामिश्रित आश्चर्याने मी जोरात ओरडले. त्याने माझ्या पार्श्वभागावर एक आवाज करणारी चापटी मारली.

''ओरडू नकोस!'' तो गुरकावला.

*ओ नो... हे चांगलं नाही.* माझं अर्धजागृत मन गुडघ्यात कापतंय. तो कशावरून तरी चिडला होता... जोसवरून असू शकेल, जॉर्जिया, पॅन्टीज नाहीत, माझं ओठ चावणं. जीझ, त्याला करणं सोपं आहे.

''आपण कुठे चाललोय?'' मी श्वास घेतला.

''बोटहाउस.'' तो तुटकपणे बोलला.

मी त्याच्या मागच्या बाजूला लटकत होते. कारण मला त्याने उलटं धरलं होतं. तो चंद्रप्रकाशात लॉनवरून बुद्धिपुरस्सर मोठ्या ढांगा टाकत चालत होता.

''का?'' माझा श्वासोच्छ्‌वास थांबल्यासारखा वाटला. मी त्याच्या खांद्यांवर हेलकावत होते.

''तू मला एकटी हवी आहेस, आत्ता!''

''कशासाठी?''

''कारण मी तुझ्या नितंबांवर चापट्या मारणार आहे आणि नंतर तुझ्याशी संग करणार आहे.''

''का?'' मी हलकेच विचारलं.

''का ते तुला माहीत आहे,'' तो फुस्कारला.

''मला वाटलं होतं, तू त्या क्षणातच राहणाऱ्या पुरुषांपैकी आहेस, क्षणिक विचार करणाऱ्या...'' मी श्वास अवरोधलेला असताना विनवणी केली.

''ॲनास्टॅशिया, मी अजून त्या क्षणातच आहे, खरंच!''

*होली फक्.*

**प्रकाशक : मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे**
या पुस्तकाच्या प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी
fsg@mehtapublishinghouse.com
या इ-मेलवर संपर्क साधा.

नवे कोरे




एका स्त्रीने धरलेली विनोदाची बिकट वाट,
त्यांच्या सूक्ष्म निरीक्षण, भाविक करामती आणि
विसंगती हेरण्याची वृत्ती यामुळे वाचकांची
हसून हसून पुरेवाट लावते.
ह्या हास्यवारीचा अनुभव आनंददायी ठरेल.

# हसाल तर वाचाल

लेखिका : **मीरा सिरसमकर**

नवे कोरे




मराठा इतिहासातील
क्लिष्ट राजकीय घटना आणि
बऱ्याच अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरे
शोधण्याचा प्रयत्न
ही ऐतिहासिक राजकीय कादंबरी करते.

# अग्निदिव्य

लेखक : **कल्याणीरमण बेन्नुरवार**

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद


पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.


बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे
पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड,
टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६
शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पायर, ताराबाई पार्क,
कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६
शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी,
औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी www.wordpowerbookshop@gmail.com येथे संपर्क साधा.


Find us on: facebook®


https://www.facebook.com/mehta.publishinghouse








This Diwali
Make Your Bond Stronger
by Gifting This
Set of Books.













Chartered Psychologist:
**Sam Kotadia**

Illustrator:
**Nick Hilditch**

Set of 8 books:
**Rs. 720/-**








RNI NO-MAHMAR/2000/2739
Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date: 11 October 2015

Regd. No.: PCW/086 / 2015-2017
Posting Date: 11 October 2015

# एस्.एल्. भैरप्पा यांच्या सिद्धहस्त लेखणीतून उतरलेल्या आणि उमा कुलकर्णी यांनी समर्थपणे अनुवादित केलेल्या दोन साहित्यकृती




॥ पारखा ॥




॥ तंतू ॥

मेहता पब्लिशिंग हाऊस
१९४१, सदाशिव पेठ, बाजीराव रोड टेलिफोन भवनसमोर, माडीवाले कॉलनी, पुणे ३०
फोन : ०२०-२४४७६९२४, २४४७५४६२, २४४६०३१३, २४४६३०४८
Email: mmgj@mehtapublishinghouse.com,
customercare@mehtapublishinghouse.com
Website: www.mehtapublishinghouse.com

बुक-पोस्ट

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक :
सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक
१९४१,सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
पुणे ४११०३० येथून प्रसिद्ध केले.

मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट
३५६, अ गणेश पेठ, पुणे ४११००२